मुस्लिम स्त्रीचे अधिकार

व त्यावरील आक्षेपांचा आढावा

लेखक

सय्यद जलालुद्दीन उमरी

अनुवाद

सय्यद जाकिर अली

अनुक्रमणिका

प्रकरण	पृष्ठ क्र.
प्रस्तावना	**९**
प्रकरण – ०१	१२
स्त्री-स्वातंत्र्याची पाश्चात्य कल्पना व त्याचे परिणाम	**१२**
लैंगिक स्वैराचार	१४
कुटुंब विघटन	१५
अधिकार व जबाबदाऱ्यांमधील असमतोल	१६
स्त्रीच्या प्रति सहानुभूतीच्या भावनेत कमतरता	१७
प्रकरण – ०२	१९
मुस्लिम स्त्रीचे अधिकार	**१९**
१) जिवंत राहण्याचा अधिकार	१९
२) पालनपोषणाचा अधिकार	२०
३) शिक्षणाचा अधिकार	२२
४) विवाहाचा अधिकार	२३
५) 'मेहेर'चा अधिकार	२५
६) 'नान व नफ्का'चा अधिकार	२८
७) व्यवसाय आणि कार्यस्वातंत्र्याचा अधिकार	२९
८) धनसंपत्तीचा अधिकार	२९
९) शील व अब्रूसुरक्षेचा अधिकार	३०
१०) टीका आणि जाब घेण्याचा अधिकार	३१
प्रकरण – ०३	३२
आक्षेपांचा आढावा	**३२**
एक सर्व सामान्य भाष्य	३२
प्रकरण – ०४	३९
पुरुषाचे शासन	**३९**
पती-पत्नी हे जिव्हाळ्याचे व प्रेमाचे संबंध आहेत	३९
पुरुषच परिवाराचा शासनकर्ता का आहे?	४१

पुरुष जास्त शक्तिशाली व कार्यक्षम आहे ४२
पुरुषच आर्थिक जबाबदारी पूर्ण करतो ४३
खरोखरच स्त्री परिवाराची शासनकर्ती होऊ शकते काय? ४४

प्रकरण – ०५ ४५
'हिजाब'ची बंधने कशासाठी? ४५
'हिजाब'चे नियम ४५
परपुरुषाशी संवादाचे नियम ४५
घर हेच स्त्रीचे मूळ कार्यक्षेत्र आहे ४६
एखाद्या वस्तूच्या देवाणघेवाणीची पद्धत ४७
घराबाहेर 'हिजाब'चे पालन ४७
'गज्जे बसर' – नजर खाली ठेवणे व परपुरुषावर कटाक्ष न टाकणे ४८
'महरम' व्यक्तीशी वर्तनाचे नियम ४९
चालण्या-फिरण्याचे नियम ४९
आधुनिक काळात 'हिजाब' स्वीकारणीय नाही ४९
स्त्रीमध्ये बिनधास्ततेची मानसिकता निर्माण केली गेली ४९
पुरुषाचा पोषाख हा शरीरास जास्त झाकणारा आहे ५०
'हिजाब' नैसर्गिक भावनांवर अंकुश नाही! ५१
'हिजाब' विकासाच्या मार्गातील अडसर आहे काय? ५३
'हिजाब'च्या मर्यादावर चर्चा व त्यापासून चुकीचे आकलन ५५

प्रकरण – ०६ ५७
स्त्रीचा आर्थिक प्रश्न ५७
स्त्रीचे आर्थिक प्रयत्न ५७
अबला आणि सशक्ताचा सामना ५७
स्पर्धात्मक परिस्थितीचा परिणाम ५८
स्त्रीने काय गमावले आणि काय मिळविले? ५९
आधुनिक काळात स्त्रीने अर्थार्जन करणे आवश्यक आहे काय? ६०
इस्लाममध्ये स्त्रीच्या पारिवारिक जबाबदाऱ्या महत्वाच्या आहेत ६१
पत्नीचा 'नफ्का' पुरविणे पुरुषाचे कर्तव्य आहे ६२
इस्लामने स्त्रीची आर्थिक स्थिती भक्कम ठेवली ६२
स्त्रीच्या आर्थिक प्रयत्नांच्या काही मर्यादा ६३

प्रकरण – ०७ ६५

'मेहेर'चे स्वरुप आणि त्याचे नियम ६५

'मेहेर' स्त्रीला खरेदी करण्याचे माध्यम नाही ६५

मेहेरचे स्वरुप ६५

'मेहेर' प्रामाणिकतेचा पुरावा व कसोटी आहे ६७

'मेहेर' भेट आहे ६८

'मेहेर'चा आदेश अटळ व स्थायी स्वरुपाचा आहे ६९

'मेहेर'ची उपयुक्तता ७१

'मेहेर'चे प्रमाण ७२

'मुतलका' (तलाक झालेल्या) स्त्रीचा 'मेहेर' ८०

स्त्रीला 'मेहेर' वापरण्याचा अधिकार आहे ८३

प्रकरण – ०८ ८५

बहुपत्नीत्व ८५

बहुपत्नीत्वाकडे पुरुषाची मानसिकता ८६

बहुपत्नीत्व पुरुषाची एक गरज ८६

स्त्रीसाठी बहुपत्नीत्वाची उपयुक्तता ८७

बहुपत्नीत्व एका सामाजिक गरजेच्या स्वरुपात ८७

'स्त्री' एकापेक्षा जास्त पतीना सहन करू शकत नाही ८८

बहुपत्नीत्व भोग विलासाकरिता नाही! ९०

बहुपत्नीत्वाची शास्त्र संमती ९०

वैधानिक प्रयत्न ९१

चार पत्नींची मर्यादा ९२

बहुपत्नीत्व हा आदेश नसून केवळ परवानगी ९२

काही बंधने व अटी ९३

प्रकरण – ०९ ९६

'तलाक'चा प्रश्न ९६

'तलाक'ची गरज पडू शकते ९६

'तलाक'चा अधिकार कोणाला असावा? ९७

न्यायालयाद्वारे घेतलेल्या 'तलाक'चे दुष्परिणाम ९९

काही नैतिक मार्गदर्शन १००

'निकाह' एक प्रामाणिक व गंभीर करार आहे १००
'तलाक' हे सक्त नापसंत कृत्य आहे १०१
स्त्रियांच्या त्रुटी व चुका सहन कराव्यात १०२
धारण्याचे प्रयत्न करावे १०२
'तलाक'च्या बाबतीत दोन सुधारणादायी पावले १०६
'तलाक' कशा प्रकारे द्यावा? १०८
'तलाक' मासिक पाळीच्या वेळी न देता 'तुहर' (शुचिर्भूतता) च्या अवस्थेत द्यावा १०८
'तलाक-ए-मस्नून' व 'गैर मस्नून' १०९
'तलाक-ए-मस्नून'चा अर्थ १०९
'अहसन' अथवा श्रेष्ठ प्रणाली १०९
'हसन' अथवा उत्तम पद्धत ११०
मासिक पाळीमध्ये 'तलाक' देण्याचा नियम ११२
'तलाक-ए-बदई' ११३
'इद्दत'च्या काळात पत्नी पतीच्या घरीच राहील ११४
'रुजुअ'चा अधिकार व त्याची रीती ११४
एकाच बैठकीत तीन 'तलाक'चा नियम ११६

प्रकरण – १० ११७
'तलाक' झालेल्या स्त्रीचा 'नफ्का' **११७**
काही अनिष्ट परिणाम ११७
'तलाक' झालेल्या स्त्रीचे अधिकार १२०
'मेहेर' १२१
'इद्दत'च्या मुदतीची निश्चिती १२१
'इद्दत'च्या काळापर्यंत 'नफ्का' १२२
'तलाक' झालेल्या स्त्रीकरिता 'मताअ' १२४
'मताअ'चा शब्दश: अर्थ १२५
दिव्य कुरआनात 'मताअ' शब्दाचा वापर १२५
'तलाक'ची 'मताअ' १२६
'मताअ' म्हणजे 'नफ्का' नव्हे! १२८
'सहाबा' आणि 'ताबेईन'चे मत १२८

इस्लामी विधीतज्ञांचा दृष्टिकोन १२९
'मताअ'चा दर्जा नैतिक आहे की वैधानिक? १३०
प्रत्येक तलाकीत स्त्रीकरिता 'मताअ' अनिवार्य आहे काय? १३२
तलाकीत स्त्रीचा आर्थिक प्रश्न १३४
'खुलअ'चे स्वरुप १३७
'खुलअ' स्त्रीचा अधिकार आहे १३८
'खुलअ'ला स्त्री-शोषणाकरिता वापरण्याची परवानगी नाही १३९
'खुलअ'चा अधिकार शासनाला देता येत नाही! १४१

प्रकरण – ११ १४४
स्त्रीचा वारसाहक्क **१४४**
वारसासंपत्तीत पुरुष व स्त्री दोघांचा अधिकार आहे १४४
पुत्र आणि कन्येचा अधिकार १४५
माता-पित्यांचा अधिकार १४७
पती-पत्नीचा अधिकार १४९
'अखयाफी' भाऊ-बहिणीचे अधिकार १४९
सख्खे आणि सावत्र बहीण-भावाचे अधिकार १५०

प्रकरण – १२ १५२
वारसाहक्कचे मूळ आधार **१५२**
वांशिक नाते आणि वैवाहिक संबंधच मूळ आहे. १५२
ते नातलग जे कधी वंचित होत नाहीत १५२
सर्वात मोठा अधिकार संततीचा आहे १५४
स्त्री-पुरुषादरम्यान असलेला भेद कोठे व का? १५४
काही परिस्थितीत दोघांमध्ये फरक न होण्याचे कारण १५६
जवळच्या नातलगांचा अधिकार जास्त आहे १५७

प्रकरण – १३ १५८
स्त्रीचा 'किसास' **१५८**
स्त्रीच्या प्राणाचा 'किसास' पुरुषाकडून १५८
स्त्रीच्या खुनाचा स्त्रीकडून किसास १६२
स्त्रीच्या जखमांचा 'किसास' १६२

प्रकरण – १४ १६९

स्त्रीची 'दैयत' **१६९**

विधि तज्ज्ञात मतभेद १६९

स्त्रीची 'दैयत' पुरुषाच्या 'दैयत'पेक्षा निम्मी आहे १६९

एक तृतियांश 'दैयत'च्या पुढे स्त्रीची 'दैयत' निम्मी आहे १७१

आणखी काही मतभेद १७४

एक विचारपात्र भूमिका १७६

प्रकरण – १५ १७७

स्त्रीची साक्ष **१७७**

'हुदुद' आणि 'किसास'मध्ये साक्ष १७७

अधिकार आणि व्यवहारात साक्ष १७९

स्त्रियांच्या विशिष्ट प्रकरणात साक्ष १८१

प्रकरण – १६ १८३

स्त्री आणि राजकीय नेतृत्व **१८३**

नमाजच्या 'इमामत'वरून घेण्यात येणारा पुरावा व सिद्धान्त १८३

हा स्त्रीबरोबर पक्षपातीपणा आहे काय? १८४

इस्लाममध्ये राष्ट्रप्रमुखाच्या जबाबदाऱ्या १८४

स्त्री या जबाबदाऱ्या सांभाळू शकत नाही १८५

स्त्री इतर सामूहिक जबाबदाऱ्या सांभाळण्यास पात्र आहे काय? १८५

संदर्भ **१८६**

शब्दसूचिका **१९२**

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

प्रस्तावना

ज्या इस्लामी विषयावर अलीकडे बऱ्याच दिवसांपासून विद्वानांच्या वर्तुळात चर्चा चालू आहे, त्यापैकी 'स्त्रीचे अधिकार' या विषयास विविध बाजूंनी प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे. यावर आधुनिक व इतर बुद्धीवाद्यांनी बराच गदारोळ माजविला व आक्षेपांची बरसात केली. या पुस्तकात प्रथमतः संक्षिप्तपणे इस्लामने स्त्रीला प्रदान केलेल्या अधिकारांचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर या विषयावर घेण्यात आलेल्या ठळक आक्षेपांचा समीक्षणात्मक वेध घेण्यात आला. ज्या प्रश्नांबाबत चर्चा झाली त्यांची संपूर्ण बाजू न घेता केवळ आक्षेपार्ह बाबींचे उत्तर देण्यापर्यंत मर्यादा पाळण्याचा व उद्‌भवलेल्या समस्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यापैकी काही प्रश्नांवर मी माझ्या इतर लेखांत सविस्तर चर्चा केलेलीच आहे, म्हणून येथे थोडक्यात त्यावर प्रकाश टाकला आहे.

कोणत्याही प्रश्नाच्या चर्चेचे स्वरूप 'वाद-विवादाचे' नसावे, ज्यामध्ये सत्य समजाविण्याची व समजण्याची भावना धुळीस मिळालेली आणि प्रभावहीन असते. तसेच यामध्ये माणसाच्या भावना अग्रस्थानी आणि वैद्विक समीक्षा मागे असते. अशा ठिकाणी केवळ दिव्य कुरआन, हदीस (पैगंबरांची वचने व कार्य) आणि इस्लामच्या प्रकाशात समस्यांची आकलनशक्ती या तीन बाबींना धरून आक्षेपांची उत्तरे देण्यात आली आहेत. तसेच कोणतीच गोष्ट संदर्भाशिवाय व अप्रमाणितरित्या प्रस्तुत केलेली नाही. प्रसंगी सामान्यतः पुस्तकांचे संदर्भ देऊन लेखक, प्रकाशक, आवृत्तीची माहिती पुस्तकाच्या शेवटी स्पष्ट करण्यात आलेली आहे.

नेहमीच पाश्चात्य विचारसरणीने प्रभावित होऊन मुस्लिम स्त्रीच्या अधिकारांवर टीकांची झोड उठविली जाते. याकरिता सुरुवातीला 'स्त्री-स्वातंत्र्याच्या' पाश्चात्य विचारसरणीचा समाचार घेण्यात आला. यामुळे हे लक्षात येईल की केवळ वरपांगी नेत्रदीपकतेव्यतिरिक्त त्याच्या कितीतरी बाजू अंधारात चाचपडत आहेत, व हे आपल्या व आपल्या समाजाकरिता अजिबात अनुकरणीय नाहीत.

या विषयावर टीका आणि आक्षेपांची मालिका बहुतेक अशा समुदायातर्फे सुरु झाली, जो इस्लामद्वेष्टा इस्लामविरोधात प्रसिद्ध होता. परंतु दुर्दैवाने बरेचसे

मुस्लिम विचारवंतसुद्धा यामध्ये सामील झाले आहेत. ही विचारवंत मंडळी त्यांच्या वर्तुळात कितीही मोठे ज्ञानी व संशोधक समजले जात असले तरी आणि कितीही सन्मानित असले, तरी मुस्लिमांमध्ये त्यांची संख्या अत्यल्प आहे. या पुस्तकात याच विद्‌वानांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परंतु सर्वसामान्य मुस्लिमांतसुद्धा ज्यांच्यापैकी एक मुस्लिम स्वत: लेखक असूनही व स्वत:मध्ये काही दौर्बल्य असूनदेखील काही प्रस्तुत करण्याची मनोकामना बाळगतो.

सामान्य मुस्लिम हे आपल्या विश्वास व श्रद्धेच्या भाषेत हे स्पष्टीकरण देतात की इस्लाम धर्माने स्त्रीला जे अधिकार प्रदान केले आहेत, ते प्रत्यक्ष अल्लाहने प्रदान केलेले आहेत, म्हणून हे अधिकार तिला अवश्य मिळावेत. या अधिकारांत बदल अथवा त्यांना रद्द करणे म्हणजे प्रत्यक्ष ईशकायद्याचे उल्लंघन करणेच समजतो. तसेच या ईशकायद्यास वास्तव स्वरुपात अबाधित ठेवण्याकरिता प्रत्येक प्रकारचा त्याग करण्यासाठी नेहमीच तत्पर व तयार दिसतात, परंतु कार्यात्मकरित्या ते या आदेशांचे पालन करीत नाहीत. एवढेच नसून पावलोपावली या आदेशांची पायमल्ली व उल्लंघन होत असते. पिता आपल्या कन्येचे अधिकार हिरावून घेतो. तिच्या शिक्षण व प्रशिक्षणाकडे एवढे लक्ष पुरविले जात नाही जेवढे पुत्रांच्या शिक्षणाकडे पुरविले जाते. व्यवहारातसुद्धा पुत्र व कन्येत फरक केला जातो. विविध कारणे व निमित्त पुढे करून तिला वारसाहक्कापासून वंचित केले जाते. माता-पित्याबरोबर मुलांचा व्यवहार विशेषत: विवाहानंतर खूपच किळसवाणा असतो. त्यांच्याशी चांगले व प्रेमपूर्वक वर्तन केले जात नाही. त्यांचे न्यायोचित अधिकार हिरावून घेतले जातात. त्यांच्याजवळ अर्थार्जनांची साधने नसल्यास त्यांना यातनामय जीवन जगावे लागते. पत्नीस पतीचे प्रेम लाभत नाही. सासरघरात दासी व मोलकरीणीसारखा व्यवहार तिच्याशी केला जातो. ती तिच्या कितीतरी अधिकारांपासून वंचित होते. किरकोळ कारणावरून तिच्यावर अन्याय होतो. क्षुल्लक वादविवाद पण तलाक (घटस्फोटा) चे कारण बनते. 'मेहेर'च्या बाबतीत तर ही कल्पना रूढ झाली की ते फक्त घटस्फोटाच्या स्थितीतच देण्यात येते किंवा घटस्फोट न झाल्यास मेहेर देण्याची आवश्यकताच नाही. नेमका असाच व्यवहार सामान्यत: या सर्व स्त्रियांबरोबर होतो ज्यांचे अधिकार इस्लामने पुरुषांवर ठेवलेत व स्त्रियांबरोबर उत्तम व सहानुभूतीपूर्वक वर्तन करण्याची शिकवण दिली. इस्लाम धर्माने (तिच्या मर्यादाकक्षेत राहून) स्त्रीला अर्थार्जनाची परवानगी दिली, तसेच तिच्या शिक्षणात तिला अग्रेसर पाहू

इच्छितो, तिला प्रसार व प्रचार, प्रकाशन, टीका व समीक्षा आणि राजकीय व सामाजिक सेवा करण्याचा पूर्ण अधिकार आहे, परंतु यापैकी कोणत्याही क्षेत्रात ती कार्यरत दिसत नाही. मग जगाचा या गोष्टीवर कसा विश्वास बसेल की इस्लाम धर्माने तिला विकासाच्या सर्व संधी उपलब्ध करून दिल्या आहेत! तसेच तिला सर्व काही दिले जे तिला मिळावयास पाहिजे.

इस्लाम धर्माने स्त्रीला दिलेल्या अधिकारांचा सन्मान करून ते अधिकार तिला मिळवून दिल्यास या समस्याच मुळात उद्‌भवणार नाहीत, ज्यांचा संदर्भ देऊन संपूर्ण इस्लामी विधीलाच बदनाम करण्याचा व त्याला बदलण्याचा प्रयत्न करण्यात येतो. मुस्लिम स्वत:च स्त्रीचे अधिकार हिरावून घेतील तर मग त्यांना हा दावा करण्याचा अधिकाराच काय आहे की 'स्त्रीविषयक इस्लामचे अधिकार त्यांच्याकरिता आदरणीय आहेत, ज्यांच्यावर त्यांना गर्व आहे व त्यामध्ये किंचितसुद्धा बदल खपवून घेतला जाणार नाही!' या स्त्री–अधिकाराविषयक नियमांवर त्यांची अकार्यक्षमताच ही बाब सिद्ध करते की त्याचे पावित्र्य भंग पावले आणि कमीतकमी कार्यात्मक जीवनात त्याचे महत्त्व नामशेष झाले आहे.

ही गोष्ट चांगल्या प्रकारे लक्षात घ्यावी की इस्लामने प्रदान केलेले अधिकार तिला जर सहृदय व सन्मानपूर्वक मिळाले नाहीत तर.... ते मिळविण्याकरिता ती इस्लामेतर कायद्यांचा आधार घेऊ शकते. परिणामी तिच्यात या गोष्टीची कल्पना उभी राहू शकते की जो कायदा तिला तिचा अधिकार मिळवून देऊ शकत नाही, तो कायदा बदललेलाच बरा. हा केवळ अंदाज व अनुमान नसून बऱ्याच घटना याचे सबळ पुरावे सादर करतात. म्हणून हे आवश्यक आहे की संपूर्ण समाज इस्लामी शिकवणीकडे वळावा आणि प्रामाणिकपणे त्याच्या आदेशाचे पालन करावे.

शेवटी हे स्पष्ट करतो की हा एक छोटासा रक्षणात्मक प्रयत्न आहे. यामध्ये चुकांची संभावना आहे. आपल्याकडे अशा व्यक्तींची कमतरता नाही जे या विषयावर प्रगल्भ व खोल दृष्टी ठेवतात. त्यांना नम्र विनंती करतो की या बाबतीत आढळलेल्या त्रुटी व चुका सूचित कराव्यात. पुढील प्रसंगी त्यात सुधारणा करण्यात येईल व मी आपला अत्यंत आभारी राहीन. अल्लाहदरबारी प्रार्थना आहे की पुस्तक ज्या उद्देशपूर्तीस्तव लिहिले गेले, तो उद्देश पूर्ण व्हावा, त्याच्या भक्तांना यापासून लाभ मिळावा व माझ्याकरिता परलोकसंपत्ती सिद्ध व्हावी.

जलालुद्दीन उमरी

२१ फेब्रू. इ.स. १९८६

स्त्री-स्वातंत्र्याची पाश्चात्य कल्पना व त्याचे परिणाम

अगदी प्राचीन काळापासून स्त्रीवरील अन्याय व अत्याचाराने इतिहासाची पाने भरलेली आहेत. तिच्या अश्रू व रक्ताने इतिहासाची पाने रक्ताळलेली आहेत...

ती प्रत्येक राष्ट्र व प्रदेशात अत्याचारित व पीडित होती. ग्रीस, रोम, इजिप्त, इराक, भारत, चीन व अरब देशांत प्रत्येक ठिकाणी तिच्यावर अन्याय होत होता. बाजारात आणि उत्सवांमध्ये तिची खरेदी-विक्री होत असे. जनावरापेक्षाही वाईट वर्तणूक तिच्याशी करण्यात येई. ग्रीसमध्ये तर बऱ्याच काळापर्यंत यावरच चर्चा होत होती की स्त्रीच्या शरीरात आत्मा आहे किंवा नाही? अरबी जनता स्त्रीच्या अस्तित्वास अडसर समजत असे. काही पाषाणहृदयी तर आपल्या मुलींना जन्मताच जिवंत पुरत असत. भारतामध्ये मृत पतीच्या चितेवरच सतीच्या नावावर तिला जाळण्यात येई. तसेच वैराग्याच्या धर्मात स्त्रीची व्याख्या 'दुष्टतेचे उगमस्थान', 'अपराध्यांचे द्वार' आणि 'पापाची प्रतिमा' या अर्थाने करण्यात येत असे. तिच्याशी संबंधांना आत्मिक विकासात रोधक मानण्यात येत असे. जगाच्या बऱ्याचशा संस्कृती व समाजव्यवस्थेत तिला स्थान नव्हते. तिला अतिशय क्षूद्र व किरकोळ समजले जात होते. तिला आर्थिक राजकीय अधिकार नव्हते. स्वतंत्ररित्या व्यवहाराचा तिला हक्कच नव्हता. ती सुरवातीस पित्याच्या, नंतर पतीच्या व त्यानंतर पोटच्या मुलाच्या ताब्यात जीवन जगत असे. त्यांच्या विरोधात 'ब्र' काढण्याची तिला कधीच परवानगी नसे. एवढेच नव्हे तर तिच्यावर होत असलेल्या अन्यायाची दखल कधीच घेतली जात नसे व न्याय मागण्याची कल्पना करण्याचा अधिकारसुद्धा तिला नसे.

यातदेखील शंका नाही की कधीकधी स्त्रीच्या हातात संपूर्ण शासन असे व असेही घडले की शासन व साम्राज्य तिच्या इशाऱ्यावर नाचत असे. बहुतेक वेळा हेदेखील दिसते की कुटुंब व कबिल्यावर तिचे प्रभुत्व असायचे. काही असंस्कृत समाजात स्त्रीला पुरुषावर एक प्रकारे प्रभुत्व असायचे व तीच स्वामित्व गाजवायची आणि आजसुद्धा काही ठिकाणी ही परिस्थिती आहे. परंतु हे सर्व काही असूनदेखील स्त्री-जातीच्या दर्जात्मक अवस्थेत काही विशेष फरक आढळत नाही. ती अत्याचारित व पीडितच होती व आजही आहे. तसेच तिच्या अधिकारावर गदा आणण्याची मालिका अद्याप चालू आहे.

इस्लाम धर्माने स्त्रीला अन्याय व अत्याचाराच्या गर्तेतून बाहेर काढले, तिला न्याय दिला, तिला मानवाधिकार दिले, मान-सन्मान दिला आणि समाजात तिला सन्मानाने जगण्याचा शिकवण दिली. परंतु पश्चिमी राष्ट्रे, जी इस्लामच्या कृपाशील छत्रछायेत येऊ शकली नाहीत आणि त्याच्या वरदान व मधुर फळांपासून वंचित राहिली, त्यांच्यात महिलाधिकारांची पायमल्ली झाली व स्त्री प्रत्येक अत्याचार मुकाट्याने सहन करीत राहिली. वर्तमानकाळात या राष्ट्रांमध्ये याची प्रतिक्रिया उमटली ती स्त्री-स्वातंत्र्य व समानतेच्या कल्पनेच्या स्वरूपात. तिच्या पुरस्कारात सिद्धान्त उभे करण्यात आले व हे सिद्ध करण्याचा आटोकाट प्रयत्न करण्यात आला की स्त्री ही कोणत्याही क्षेत्रात पुरुषापेक्षा किंचितही कमी नाही. दोघेही प्रत्येक बाबतीत समान आहेत. या दोघांत कोणत्याही प्रकारचा फरक करणे वा विषमता बाळगणे योग्य नाही. ती प्रत्येक काम सुरळीत पार पाडू शकते. प्रत्येक जबाबदारी पार पाडण्यास सक्षम आहे. तसेच हरप्रकारे स्वतंत्र आणि स्वावलंबी आहे. त्यामुळे पुरुषाचे प्रभुत्व तिच्यावरून संपावयासच हवे आणि तिला तिचे सर्व अधिकार मिळायला पाहिजेत जे पुरुषांना मिळतात.

ही कल्पनाच मुळात स्त्री-हृदयास भुरळ पाडणारी होती, जणू तिची हरवलेली संपत्तीच तिला परत मिळाली आणि हळूहळू ती आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यात पुरुषांबरोबर सामील होत गेली. ती कारखान्यांत, कार्यालयांत, शैक्षणिक संस्थांत पुरुषांबरोबर खांद्याला खांदा लावून प्रयत्नशील असायची; तसेच पार्क, क्लब, घर व मनोरंजनालयात त्याच्याबरोबर क्रीडा व मनोरंजनात भाग घ्यायची. तिचे अस्तित्व प्रत्येक जीवनक्षेत्रात आवश्यक समजले गेले. तिच्याशिवाय व्यावहारिक जीवन नीरस व उदास वाटू लागले. स्त्रीला हा विकासाचा मार्ग वाटू लागला आणि एकानंतर दुसरे पाऊल पटापट उचलत ती या मोहिनीस बळी पडत गेली. ती या जीवनकल्पनेच्या दर्शनीय सौंदर्यावर मोहित झाली. परंतु त्याच्या आत दडलेल्या अंधकारमय धोक्यापासून अज्ञानीच राहिली. पाश्चात्य विचारसरणीने स्त्रीला स्वातंत्र्याची कल्पना प्रस्तुत केली. या कल्पनेच्या काही बाजू लाभकारी होत्या. परंतु काही बाजू तिच्यासाठी घातक व विनाशक होत्या. यामध्ये एकीकडे स्त्रीला पुरुषांच्या अत्याचारांतून मुक्ती देण्यात आली, तर दुसरीकडे तिची शक्ती व कार्यक्षमता, स्वभाव व मानसिकतेची अजिबात गय केली नाही. वास्तविक पाहता पुरुषी अत्याचाराविरुद्ध ही तीव्र प्रतिक्रियाच होती. यामध्ये त्या संपूर्ण विषमता होत्या ज्या अशा प्रकारच्या प्रतिक्रियांच्या स्वरूपात आढळतात.

स्त्रीच्या या स्वैर स्वातंत्र्यामुळे पाश्चात्यांचे संपूर्ण जीवन चुकीच्या मार्गी लागले, परिणामस्वरूप परिस्थिती अगदी स्फोटक व आवाक्याबाहेर गेली. अशा अगदी नाजुक व कठीण परिस्थितीत इस्लाम आपले मार्गदर्शन करतो. तो स्त्रीचे मूलभूत अधिकार प्रदान करतो व तिच्या विकासाची जबाबदारीही स्वीकारतो. तसेच समाजास या स्फोटक परिणामापासून सुरक्षिततेची हमी देतो. या बाबतीत काही सामाजिक व राजकीय परिणामांचा आढावा घेण्यात येत आहे.

लैंगिक स्वैराचार

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्री-पुरुषांच्या स्वैर व स्वतंत्र देवाणघेवाणीमुळे लैंगिक स्वैराचाराची मानसिकता बळावली आहे. या स्वैराचाराने सार्वजनिक रूप धारण केले. मग याच्याच मुळावर एका विवस्त्र आणि निर्लज्ज संस्कृतीने जन्म घेतला की तिच्या विषारी प्रभावाने नैतिकतेची फुलबाग जळून भस्म झाली. आज लाज व शरम आणि प्रामाणिकता टाहो फोडत राहिली आहे.

इतिहासाने प्रत्यक्ष अनुभवले की जेव्हा जेव्हा स्त्रीने आपले घर सोडून चारचौघांत आपल्या सौंदर्याचे प्रदर्शन केले, तेव्हा लैंगिक स्वैराचाराने उग्र रुप धारण केले. जी क्लिष्टता चार भिंतीच्या आत असहनीय असते ती बाजारात व सार्वजनिक ठिकाणी उफाळत गेली. अतिशय पवित्र नातेसुद्धा या आगीत होरपळून निघाले. सर्वसामान्य माणूस तर सोडाच त्याचे पूजनीय स्थान असलेले महाभागसुद्धा आणि देवी-देवतासुद्धा यामध्ये गुरफटलेले आढळले व त्यांच्या लैंगिक दंतकथा ऐकून लाज व शरमेने पार टाहो फोडला. रखेली आणि वारांगणांना ते स्थान प्राप्त झाले जे घरातील अगदी प्रतिष्ठित स्त्रियांना मिळावयास हवे होते. कला आणि संस्कृतीतून लैंगिक व कामुक भावना व्यक्त होऊ लागल्या. अश्लील छायाचित्रे काढण्यात येऊ लागली व विवस्त्र मूर्ती तयार होत गेल्या. नाच आणि संगीताच्या नावावर स्त्रीपासून रस घेण्यात येऊ लागला. कथा, नाटक, वाङ्मय, काव्य आणि साहित्याच्या माध्यमाने लैंगिक कार्याचे वर्णन होऊ लागले. स्त्री ही पुरुषाच्या हातातील बाहुली बनली आणि या साऱ्या उचापतींचा फक्त एकच उद्देश की पुरुषांची लैंगिक तृष्णा भागविणे होय. अर्थात संपूर्ण संस्कृतीतून लैंगिक वासना व्यक्त होत गेली व ती या वासनेच्या तालावर नाचू लागली. लैंगिक भावनांच्या या क्रूर साम्राज्याने ग्रीस, रोम, इजिप्त व इतर कितीतरी प्राचीन संस्कृती नष्ट केल्या. नवसंस्कृतीसुद्धा याच वाटेवर चालू लागली आहे. कदाचित ती वेळ जवळ येऊन ठेपली आहे, जेव्हा हे तेज लोप पावून एका नवीन संस्कृतीस जन्म देईल.

कुटुंब विघटन

कौटुंबिक व्यवस्था स्त्रीच्या मुळावर आधारलेली होती. त्याच्या अंतर्गत व्यवस्थेस तीच सांभाळत होती. स्त्रीच्या घराबाहेरील व्यवहारामुळे तिची घरातील व्यवस्था पार कोलमडली. तिने घराबाहेर जे काही केले त्याची भक्कम व मोठी किंमत तिला परिवारविघटनाच्या स्वरूपात चुकवावी लागली. परिवार ही संपूर्ण समाजाची मूळ आधारशिला आहे. या आधारशिलेच्या सरकण्यामुळे पूर्ण समाजाची इमारत कोलमडून पडली. स्त्री पुरुषाकरिता शांतीचे साधन होती, परंतु आता ती अशी राहिलेली नाही. त्यांच्या दरम्यान प्रेम, सहानुभूती व जिव्हाळ्यांचे संबंध होते. ज्यामुळे जीवनाच्या उतार-चढावावर ते एकमेकांबरोबर होते. परंतु आता या भावना दुभंगल्या आहेत. माता-पिता व त्यांच्या संततींचे नाते दुभंगले आहे. पुत्रांसाठी माता-पिता प्रेमाचे केंद्रबिंदू आहेत. परंतु या ममत्वास ते मुकले असून आईच्या प्रेमळ कुशीऐवजी नर्सींग हाऊसमध्ये कैद झाले. माता-पित्यांच्या वृद्धत्वाची काठी त्यांची मुले असतात, परंतु ही काठी कधीची त्यांच्या हातातून सुटली आणि ते या म्हातारपणात यातनामय जीवन जगण्यास विवश झाले आहेत. एवढेच नव्हे तर स्त्रीच्या घर सोडल्यामुळे परिवाराचे सर्व संबंध दुभंगले, जे त्याचे अस्तित्व अबाधित ठेवण्याकरिता आवश्यक असतात. परिणामत: मानव सुखी व शांततामय जीवनास मुकला. हे नुकसान इतके प्रचंड आहे की कोणताच समाज जास्तकाळपर्यंत सहन करू शकत नाही. शेवटी हे नुकसान समाजाला नष्ट करण्याच्या मार्गावर आहे.

इस्लाम स्थिर परिवारास समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक समजतो. कारण परिवाराच्या मुळावरच समाज उभारलेला आहे. परिवाराचे स्थैर्य म्हणजेच समाजाचे स्थैर्य आणि परिवाराचे विघटन म्हणजेच समाजाचे विघटन असे समीकरण इस्लामने मांडले आहे. इस्लाम परिवाराच्या उभारणीकरिता अतिशय भक्कम पाया उपलब्ध करतो. तसेच त्याच्या स्थैर्यास अबाधित ठेवणारी साधनसामग्रीसुद्धा पुरवितो. याची एक संपूर्ण व्यवस्थाच त्याने प्रस्थापित केली आहे. त्याचा तपशील देऊन त्याचे पूर्ण सूत्र आणि मर्यादा निश्चित केल्या आहेत. तो याचा पूर्ण आग्रह करतो की ही व्यवस्था अबाधित ठेवून अल्लाहने निश्चित केलेल्या मर्यादांना सांभाळण्यात यावे. या विशेष व्यवस्थेत स्त्रीला मूलभूत महत्त्व आहे आणि तिची निर्माण कार्यात महत्त्वाची भूमिका आहे. यामध्ये तिचे अधिकार व कर्तव्येसुद्धा आहेत. तिने या कर्तव्यापासून दूर होऊन एकाग्रतेने जबाबदाऱ्या न सांभाळल्यास ही व्यवस्था पार कोलमडून जाईल. ही व्यवस्था केवळ स्त्रीच्या आटोकाट प्रयत्न आणि लक्ष केंद्रीकरणामुळेच अबाधित व सुरक्षित राहू शकते.

अधिकार व जबाबदाऱ्यांमधील असमतोल

स्त्रीचे अधिकार व जबाबदाऱ्यांमधील प्रमाण बिघडले व त्यामधील असणारी समानता संपली. स्त्रीचा शारीरिक व मानसिक विकास सृष्टी अशारितीने करते की तिला मातृत्व लाभून तिच्या कुशीत मानवजातीचे पालन व्हावे. याकरिता आवश्यक असलेल्या भावना, जाणिवा, शक्ती, ऊर्जा व कार्यक्षमता नैसर्गिकरित्या तिला मिळते. म्हणूनच प्रत्यक्षात स्वभावत: तिच्या मानसिकतेत नैसर्गिक गरजांच्या पूर्ततेची असामान्य कार्यक्षमता असते. परंतु माता बनून मानवजातीचा विकास म्हणजे क्षणिक व तात्पुरते कार्य नाही, तर तो एक कठीण मार्ग आहे. यामध्ये गरोदरपण, जन्मदान, मुलाचे पालनपोषण व त्याचे शिक्षण-प्रशिक्षण आलेच आहे. या संपूर्ण कार्यमालिकेत पुरुष हा काही कार्यात तिच्याबरोबर असतो व अप्रत्यक्षरित्या सहकार्यसुद्धा करतो. परंतु प्रत्यक्षरित्या जबाबदाऱ्या सांभाळण्यास असमर्थ असतो. मग ही संपूर्ण जबाबदारी एकटी स्त्रीच सांभाळते. या कार्यात तिच्या ऊर्जेचा आणि कार्यक्षमतेचा मोठा भाग खर्च होतो. मग एवढे काही असताना तिच्यावर सामाजिक आणि आर्थिक जबाबदाऱ्या सोपविणे म्हणजे तिच्यावर घोर अन्याय होईल. म्हणून सामाजिक व आर्थिक जबाबदाऱ्या सोपविण्याकरिता हे आवश्यक आहे की स्त्रीला तिच्या मातृत्वाच्या, कुटुंबाचे पालनपोषण व परिवार उभारणीच्या जबाबदाऱ्या ज्या निसर्गत:च पार पाडण्याची कार्यक्षमता तिच्यात आहे. यापासून मुक्ती देऊ नये. स्त्री जेव्हा निसर्गत:च स्त्री आहे व तिच्या पवित्र भावना व तिची उत्तम कार्यक्षमता मानवजातीच्या पोषणाला आवश्यकता आहे, तेव्हा ही तिची नैसर्गिक जबाबदारी तिच्यावर असणारच कोणत्याही अनैसर्गिक व कृत्रिम रितीने तिला परावृत्तही करता येणार नाही अथवा कोणता बदलही करता येत नाही.

या बाबतीत इस्लाम धर्म अत्यंत समान दृष्टिकोन प्रस्तुत करतो. इस्लामने स्त्रीला ते सर्व अर्थिक, सामाजिक व राजकीय अधिकार प्रदान केले आहेत जे पुरुषाला प्रदान केले आहेत. मात्र तिला काही जबाबदाऱ्यांतून अलिप्त ठेवण्यात आले आहे की ज्या तिच्या स्वभाव आणि शारीरिक स्वरूपाशी विसंगत आहेत व या जबाबदाऱ्यांची पूर्तता करण्यामुळे ती तिच्या नैसर्गिक जबाबदाऱ्या पार पाडू शकत नाही. उदाहरणार्थ, इस्लामी राष्ट्राचा शासक पुरुषच होऊ शकतो, तसेच राष्ट्र सुरक्षेची जबाबदारीसुद्धा प्रत्यक्षात त्याच्यावरच आहे. अर्थात या अवघड जबाबदाऱ्या स्त्रीवर टाकण्यात आलेल्या नाहीत, परंतु तिला इतर सर्व राजकीय अधिकार दिलेले आहे. ती राजकारणात मत आणि अभिप्राय देऊ शकते. टीका

करू शकते व खरपूस समाचारसुद्धा घेऊ शकते. ती राज्याच्या अधिकाऱ्यावर तसेच शासनकर्त्यावर सर्वांसमक्ष अंकुश लावू शकते. तिचे हे अधिकार कोणीच हिरावून घेऊ शकत नाही. आणखी एक उदाहरण देता येईल. ते असे की स्त्रीवर कोणतीही आर्थिक जबाबदारी लादलेली नाही. परंतु तिला अर्थार्जनाचा अधिकार अवश्य देण्यात आलेला आहे. ती इस्लामने निश्चित केलेल्या मर्यादांच्या आत राहून अर्थार्जनाचे प्रयत्न करू शकते.

इस्लाम धर्माने पुरुषावर ज्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत त्यांच्या पूर्ततेकरिता त्यांना काही अतिरिक्त अधिकारसुद्धा देण्यात आले आहेत. परंतु या बाबतीत स्त्रीवर अन्याय न होण्याकडे पूर्ण लक्षसुद्धा दिले आहे. या हेतूपूर्तीकरिता इस्लामने एकीकडे पुरुषांवर कायदेशीर बंधने लावलीत की जेणेकरून त्याला त्याच्या अधिकारांचा दुरुपयोग करता येऊ नये. दुसरीकडे स्त्रीचे अधिकार सुरक्षित ठेवून त्यांची पायमल्ली करण्याची कोणत्याही परिस्थितीत परवानगी देण्यात आलेली नाही. परिवारामध्ये पुरुषच स्वामी व काळजीवाहक आहे. परंतु कायदेशीररित्या तो स्त्रीवर कसलाही अन्याय करू शकत नाही. जेव्हा त्याच्याकडून स्त्रीवर अन्याय व अत्याचार होईल, कायदा त्याला तावडीत घेण्यास सज्ज असेल. एवढेच नव्हे तर राष्ट्राचा शासनकर्तासुद्धा तिच्या जीवन, संपत्ती, मान, अब्रु व इतर वैयक्तिक व सामूहिक अधिकारांवर गदा आणू शकत नाही. अन्यथा तो कायद्यासमोर एक सामान्य अपराध्याप्रमाणे उत्तरदायी असेल.

स्त्रीच्या प्रति सहानुभूतीच्या भावनेत कमतरता

शेवटची बाब म्हणजे पुरुषाने स्त्रीवर नि:संशय मोठे अन्याय केले आहेत. परंतु याचबरोबर त्याच्यामध्ये स्त्रीविषयी प्रेम, सहानुभूतीची एक नैसर्गिक भावनासुद्धा आहे. इस्लाम धर्म नेमक्या याच भावनांना प्रेरित करून त्यांना खतपाणी घालतो. तो पुरुषाला या गोष्टीची प्रेरणा देतो की स्त्रीच्या कायदेशीर अधिकारांची पूर्तता करण्यासह तिच्याबरोबर सहानुभूती व प्रेमपूर्वक व्यवहार करण्यात यावा. ती सद्वर्तनास पात्र आहे आणि पुरुषांच्या प्रेमळ वर्तनावर तिचा हक्क आहे म्हणून तिला तो मिळालाच पाहिजे. या प्रेमळ भावनांचे स्त्री-पुरुष संबंधात केंद्रीय महत्त्व आहे. वर्तमानकाळात स्त्री-पुरुषांदरम्यान अधिकारांच्या हस्तगत करण्याच्या स्पर्धेने या भावना नष्ट केल्या आहेत. कधीकधी तर मनात असा विचार स्पर्श करून जातो की कदाचित ही पवित्र भावना पूर्णत: नष्ट झाली आहे व त्यामुळे स्त्रीचे अतोनात नुकसान झाले आहे. कारण सोनेरी शब्दांत

लिहिला गेलेला कायदासुद्धा तिच्या समस्यांचे समाधान करू शकत नाही. याचाच परिणाम असा झाला की स्त्री व पुरुषादरम्यान समानतेचा डंका तर वाजविला जात आहे, परंतु वास्तविक समानतेचा लवलेषही दिसत नाही. कायद्याने तिला जे सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार दिले आहेत, त्यापासून ती पूर्णत: वंचित आहे. काही ठिकाणी तर तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराने परिसीमाच ओलांडली आहे. पुरुषी तहान भागविण्यासाठी तिची खरेदी-विक्रीसुद्धा होत आहे. तिच्यावर आणि तिच्या प्राण व संपत्तीवर हल्ले होत आहेत आणि तिची अब्रू बेधडक लुटली जात आहे. असे वाटते की पावलोपावली तिच्यावर होणाऱ्या नवनवीन हल्ल्यांचा सामना करणे अतिकठीण काम होऊन बसले आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की एखाद्या अबलेचे अधिकार मान्य केल्यानंतर सुद्धा ते अधिकार तिला मिळणे सोपे नाही. स्त्री भांडूनसुद्धा तिचे अधिकार प्राप्त करू शकत नाही. ते अधिकार केवळ अशाच परिस्थितीत तिला मिळू शकतात जेव्हा पुरुष तिला ते देऊ इच्छितो. याकरिता हे अत्यावश्यक आहे की त्यांनी त्यांच्या अंत:करणात तिच्याविषयी प्रेम व सहानुभूतीची भावना बाळगावी आणि तिच्यावर होणाऱ्या अत्याचारास अक्षम्य अपराध समजावे. इस्लाम धर्माने या बाबतीत अद्वितीय व अविस्मरणीय यश संपादन केले आहे. इतिहासाच्या या प्रयोगाचे जेव्हा पुनरावलोकन होईल तेव्हा समाजामध्ये परत एकदा चैतन्य येईल जे जगाने यापूर्वी अनुभवले आहे.

प्रकरण-०२

मुस्लिम स्त्रीचे अधिकार

सामान्यत: दुर्बलांना आपले अधिकार मिळविण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतात. त्याशिवाय त्याला त्याचे नैतिक अधिकार तर मिळत नाहीत परंतु मान्यसुद्धा केले जात नाहीत. वर्तमानकाळात मोठ्या वाद-विवाद व कठोर प्रयत्नांती स्त्रीचे काही मूलभूत अधिकार मान्य करण्यात आले आहेत. हे उपकारच मानावे लागेल. खरे तर हे उपकार इस्लाम धर्माचे आहेत. सर्वप्रथम विश्वामध्ये इस्लामने स्त्रीला ते अधिकार प्रदान केले ज्या अधिकारांची याचना स्त्री खूप पूर्वीपासून करीत होती. हे सर्व अधिकार इस्लामने स्त्रीला यामुळे दिले नाहीत की ती अत्याचारित व पीडित होती व सर्व बाजूंनी या बाबतीत निषेध व्यक्त होत होता व तिचा पक्ष घेऊन प्रतिनिधित्व करण्यात येत होते; तर यासाठी दिले की हे स्त्रीचे नैसर्गिक व स्वाभाविक अधिकार होते जे तिला मिळायलाच पाहिजे होते. इस्लामने विवश होऊन हे अधिकार दिले नसून स्त्री अत्याचारित व पीडित होती आणि अत्याचारितांना न्याय देणे हे इस्लामचे परम कर्तव्य होते, आहे व असेल.

या ठिकाणी काही अधिकारांचा उल्लेख करण्यात येत आहे जे इस्लामने स्त्रीला प्रदान केले आहेत. इस्लाम या अधिकारांचे वर्णन केवळ कायद्याच्या भाषेत करून गप्प बसत नसून त्यास प्रोत्साहणाच्या माध्यमाने त्यांना प्रदान करण्याची तीव्र भावना निर्माण करतो.

१) जिवंत राहण्याचा अधिकार

स्त्रीची जी अवस्था संपूर्ण जगात होती तीच अरब देशात होती. अरबचे काही कबिले आपल्या मुलींना जिवंत पुरुन टाकायचे. दिव्य कुरआनच्या आदेशामुळे हा प्रकार थांबविण्यात आला व तिला जिवंत राहण्याचा अधिकार दिला आणि सांगितले की जी व्यक्ती तिचा जिवंत राहण्याचा अधिकार हिरावून घेईल. कयामत (महाप्रलय) च्या दिवशी त्यास याचा हिशोब द्यावा लागेल.

''आणि जेव्हा जिवंत गाडलेल्या मुलीला विचारले जाईल की ती कोणत्या अपराधापायी ठार केली गेली.'' *(दिव्य कुरआन, ८१:८-९)*

एकीकडे निरपराध मुलींवर अत्याचार करण्यास नरकाच्या यातनामय

जीवनाचे भय दाखविण्यात आले व दुसरीकडे त्या लोकांना आनंदाची खबर देण्यात आली ज्यांनी निरपराध मुलींवर अत्याचार न करता त्यांच्याशी सद्व्यवहार केला. मुलींबरोबर सुद्धा तोच व्यवहार करतात जो मुलांबरोबर करतात. अर्थात मुलगा आणि मुलगी दोघांबरोबर समान वागणूक व वर्तन करतात. व दोघांच्या वागणुकीत किंचितही फरक करीत नाहीत.

माननीय अब्दुल्लाह बिन अब्बास यांचे निवेदन आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

''ज्या माणसाला मुलगी झाली, त्याने ना तिला जिवंत पुरावे, ना तिला अपमानास्पद वागणूक द्यावी व ना तिच्यावर आपल्या पुत्रास श्रेष्ठत्व द्यावे. तेव्हा अल्लाह त्याला जन्नत (स्वर्ग) मध्ये दाखल करील.''

(हदीस : अबू दाऊद, किताबुल अदब)

या नैतिक शिक्षणाबरोबर इस्लामने पुरुषाप्रमाणे स्त्रीच्या जीवनाच्या सुरक्षेची शिकवण दिली आणि तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराचा बदला घेण्याचा तिला अधिकार देण्यात आला. यालाच इस्लामच्या भाषेत 'किसास' हा शब्द वापरण्यात आला. एवढेच नव्हे तर कोणी एखाद्याचा खून केला तर मृताचे वारस खुनाच्या बदल्यात जीव सुद्धा घेऊ शकतात. हा कायदा स्त्री व पुरुष दोघांसाठी समान आहे. दिव्य कुरआनात आहे,

''तौरातमध्ये यहूदी लोकांसाठी हा आदेश लिहिला होता की प्राणाच्या बदल्यात प्राण, डोळ्यासाठी डोळा, नाकासाठी नाक, कानाबद्दल कान, दाताबद्दल दात आणि सर्व जखमांबद्दल बरोबरीचा बदला. मग जो किसास (हत्यादंड) ऐवजी दान (सदका) करील तर तो त्याच्यासाठी पापक्षालन (कफ्फारा) होय. आणि जे लोक अल्लाहद्वारे अवतरित केलेल्या कायद्याला अनुसरून न्यायनिवाडा करत नसतील तेच अत्याचारी होत.'' *(दिव्य कुरआन, ५ : ४५)*

'तौरात'च्या या कायद्याचे इस्लामने पुनरुज्जीवन केले व तो इस्लामी शरीयत (विधी) चा एक भाग बनला. या कायद्याने केवळ स्त्रीवरच नव्हे तर प्रत्येक दुर्बलावर होणाऱ्या अत्याचारावर विळखा कसला व त्यांना न्याय दिला.

२) पालनपोषणाचा अधिकार

इस्लाम शिकवण देतो की प्रत्येक जन्म घेणारे मूल हे नैतिक व कायदेशीर अधिकार घेऊनच जन्मास येते, जेणेकरून त्याच्या जीवनावश्यक गरजा पूर्ण

करण्यात याव्यात व त्यास मृत्यूच्या विळख्यात जाऊ न द्यावे. त्याचे संगोपन व पालनपोषण करावे. हे कठीण कार्य आहे. सामान्यतः मुलाचे संगोपन जेवढ्या काळजीने केले जाते तेवढ्या काळजीपूर्वकपणे मुलीचे संगोपन होत नाही. इस्लाम धर्माने ही तफावत अजिबात पसंत केली नाही. तसेच मुलीच्या पालनपोषणास विशेष प्रोत्साहन दिले. याला एक परम कर्तव्य घोषित केले.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

''कन्यादान देऊन जर अल्लाहने एखाद्या माणसाला आजमावले आणि जर त्या माणसाने आपल्या मुलींशी सद्व्यवहार केला तर त्याचा हा मुलींप्रती सद्व्यवहार नरकाग्नीपासून बचावाचे साधन होईल.''

(हदीस : बुखारी,मुस्लिम)

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या या कथनामध्ये मुलीवर 'एहसान' व सद्व्यवहाराचा उल्लेख आहे. 'एहसान' म्हणजे पालन-पोषण, शिक्षण-प्रशिक्षण आणि त्यांच्याशी उत्तम व्यवहार व प्रेमळ वागणूक हे सर्व काही आहे.

माननीय अनस (रजि.) यांचे निवेदन आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

''जो माणूस आपल्या दोन मुलींचे संगोपन त्या तरुण होईपर्यंत करील अंतीम निवाड्याच्या दिवशी मी आणि तो असे असतील. हे सांगताना पैगंबरांनी आपली दोन बोटे जोडली.'' (हदीस : मुस्लिम)

याचे कायदेशीर स्वरूप पाहिल्यास लक्षात येईल की इस्लामी विधीनुसार मुलांना अन्न-पाणी पुरविणे, पोषण करणे या सर्व जबाबदाऱ्या पित्यावर आहेत. मग या मुलांमध्ये मुलगा असो व मुलगी त्याच्या संगोपानात फरक करता येणार नाही किंवा जबाबदारीतून कोणतेही कारण दाखवून परावृत्त होता येणार नाही. 'रजाअत' (मुलास दूध पाज़ण्याची मुदत) च्या बाबतीत कुरआनात आहे,

''जर आपल्या मुलांना एखाद्या परक्या स्त्रीकडून दूध पाजावयाचा असेल तर यातसुद्धा काही हरकत नाही परंतु केवळ या अटीवर की त्याचा जो काही मोबदला ठरवाल, तो परिचित पद्धतीनुसार अदा करा.'' *(दिव्य कुरआन, २:२३३)*

या बाबतीत इस्लामी विद्वानांनी भरपूर वर्णनात्मक माहिती उपलब्ध केली आहे. 'हनफी' विद्वानांनी लिहिले आहे की पुत्रास अन्न पुरवण्याची जबाबदारी त्याच्या तरुणावस्थेत पोहोचण्यापर्यंत आहे. यानंतर पिता या जबाबदारीतून मुक्त

होऊ शकतो, परंतु मुलगा अपंग नसावा. तसेच मुलीस अन्न पुरविण्याची जबाबदारी तिच्या तारूण्यानंतर सुद्धा (लग्नापर्यंत) जन्मदात्या पित्यावर आहे. काहींच्या मते तरुणावस्थेत आल्यावर ही जबाबदारी माता व पिता या दोघांत विभागली जाते. या खर्चाच्या एकूण रकमेपैकी दोन भाग वडिलांवर आणि एक भाग आईवर असेल. अशा प्रकारे जी तरुण स्त्री आहे परंतु तिला अन्न-पाणी मिळत नाही, तिची जबाबदारी सुद्धा जवळच्या नातेवाईकांवर आहे.

३) शिक्षणाचा अधिकार

मानवाचा विकास ज्ञानाशी जुळलेला आहे. जी व्यक्ती अथवा समूह विद्या व ज्ञानापासून वंचित राहील तो जीवनाच्या प्रवासात इतरांच्या तुलनेत मागे राहील. अज्ञानामुळे त्यांची विचारसरणी उंच भरारी घेऊ शकत नाही, तसेच भौतिक प्रगतीतही त्याची पिछेहाट होत असते. हे सर्व काही असूनसुद्धा इतिहासाचा एक मोठा काळ असा होता की स्त्रीकरिता ज्ञानार्जनाची महत्त्वाची जाणीवच झाली नाही. ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात केवळ पुरुषांची मक्तेदारी समजली गेली. पुरुषांमध्ये सुद्धा काही विशेष वर्गच ज्ञानार्जन करीत असे. स्त्री ज्ञानार्जनाच्या कल्पनेपासून खितपत खूप दूर अज्ञानाच्या गर्तेत चाचपडत होती.

इस्लामने ज्ञानार्जनाचे सर्व मार्ग स्त्री व पुरुष दोघांकरिता उघडले. या मार्गातील प्रत्येक अडसर दूर करून प्रत्येक प्रकारची सवलत व सरळ पद्धती उपलब्ध करून दिली. इस्लामने मुलींच्या शिक्षण व प्रशिक्षणाकडे विशेष लक्ष केंद्रित केले. तिच्या शिक्षण व प्रशिक्षण कार्यास पुण्य कार्य घोषित केले.

माननीय अबू सईद खुदरी (रजि.) यांचे निवेदन आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

''ज्याने तीन मुलींचे संगोपान केले, त्यांना शिक्षण दिले, त्यांचे विवाह केले आणि लग्नानंतर सुद्धा सद्व्यवहार केला तर त्याच्यासाठी (निश्चितच) स्वर्ग आहे.'' (हदीस : अबू दाऊद)

इस्लाम धर्म स्त्री व पुरुष दोघांना संबोधित करतो. त्याने प्रत्येक स्त्री व पुरुषास भक्ती, नैतिकता व शरीयतचे नियम यांच्या पालनाचा आदेश दिला. ज्ञानाशिवाय या नियमांचे पालन शक्य नाही. स्त्रीकरिता पुरुषाशी संबंधाचा प्रश्न एक महत्त्वाचा प्रश्न आहे. हे संबंध अतिशय नाजुक व किचकट असतात. यामध्ये स्त्रीचे अधिकार, जबाबदाऱ्या व कर्तव्यसुद्धा आले. आपले अधिकार मिळविणे

आणि आपले कर्तव्य व जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी तिला ज्ञानार्जन करणे अत्यावश्यक आहे.

इस्लामी विद्वानांनी लिहिले की स्त्री व पुरुष या दोघांसाठी कमीतकमी धर्माच्या मूलभूत नियमांचे ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे. स्त्री या बाबतीत अज्ञानी असेल तर पतीचे कर्तव्य आहे की त्याने तिला याचे ज्ञान द्यावे अथवा अशी व्यवस्था करावी की तिला या बाबतीत शिक्षण मिळावे. किंवा स्त्रीने स्वत:हून हे नियम शिकण्याचा व जाणून घेण्याचा प्रयत्न करावा. हा तिचा कायदेशीर अधिकार आहे. या शिक्षणासाठी (नैतिक मर्यादांचे पालन करून) ती घराबाहेर पडू शकते आणि पती तिच्यावर बंधन लादू शकत नाही. (या सखोल माहितीसाठी माझे 'इस्लामी समाजात स्त्रीचे स्थान' हे पुस्तक अवश्य अभ्यासावे.)

या संपूर्ण गोष्टींचा परिणाम असा झाला की सुरुवातीच्या काळात ज्या प्रकारे पुरुषांत ज्ञानाचा सुकाळ झाला त्याच प्रकारे स्त्रियासुद्धा विद्याविभूषित झाल्या. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सहकाऱ्यांमध्ये कुरआन व हदीसचे ज्ञान असणाऱ्या प्रगल्भ स्त्रिया मुबलक प्रमाणात पाहावयास मिळतात. दिव्य कुरआन व पैगंबर कथनाच्या प्रकाशात प्रश्न सोडविणे व समस्यांचे निराकरण करणे हे एक कठीण व विद्वत्तापूर्ण कार्य आहे. या क्षेत्रातसुद्धा स्त्रियांची विद्वत्ता वाखाणण्याजोगी आहे. या प्रगल्भ स्त्रियांमध्ये माननीय आएशा (रजि.), उम्मे सलमा (रजि.), उम्मे अतिया (रजि.), सफिया (रजि.), उम्मे हबीबा (रजि.), अस्मा बिन्त अबू बकर (रजि.), उम्मे शरीफा (रजि.), फातिमा बिन्त कैस (रजि.), खौला (रजि.) उल्लेखणीय आहेत.

४) विवाहाचा अधिकार

स्त्रीला ज्याप्रमाणे जीवनातील महत्त्वाच्या व्यवहार व प्रश्नांबाबत 'ब्र' काढण्याचा अधिकार नव्हता, त्याचप्रमाणे विवाहाच्या बाबतीतही तोंड उघडण्याचा अधिकार नव्हता. तिचे आई-वडील व परिवाराची बुजुर्ग मंडळी ज्या व्यक्तीबरोबर विवाह करतील त्याविरुद्ध एकही शब्द बोलण्याचा तिला अधिकार नसे. अर्थात आई, वडील व परिवाराच्या निर्णयाविरुद्ध आपला अभिप्राय देणे म्हणजे अतिशय कुकर्म, महापाप समजले जाई व समाजात तऱ्हेतऱ्हेची चर्चा करण्यात येई. आपल्या भावी जीवन सवंगड्याच्या बाबतीत मत व्यक्त करणे आणि परिवाराच्या निश्चित केलेल्या वरास नाकारणे या बाबींना व्यभिचार समजले जात असे.

हे पण म्हटले जाते की मुलीला तिच्या पसंतीचा वर निवडण्याचा अधिकार देणे हे तिच्याच स्वार्थाच्या विरोधात आहे. ती तिच्या अज्ञानामुळे आणि कच्च्या अनुभवामुळे चुकीचा वर निवडते. मुलीचे आई-वडील आणि परिजन तिच्यापेक्षा जास्त अनुभवी आणि व्यवहारज्ञानी असल्याकारणाने तेच मुलीच्या बाबतीत योग्य निर्णय करू शकतात. तसेच ते मुलीचे शत्रू नसून शुभचिंतक असतात आणि तिच्या भल्या-बुऱ्याची त्यांनादेखील खूप काळजी असते. म्हणून ते तिच्या भविष्याशी कधीच दगा करू शकत नाहीत.

हे सत्य आहे की मुलीचे पालक व परिवारजन तिच्याकरिता उत्तम वर निवडू शकतात. परंतु हेदेखील तेवढेच सत्य आहे की कधीकधी वर निवडण्यात आईवडिलांकडून सुद्धा अन्याय होतो. ते वैयक्तिक स्वार्थ साधण्याकरिता या संबंधांचा वापर करतात. कमीतकमी हे तर नाकारताच येत नाही की वर निवडणाऱ्या पालकांसमोर ते आदर्श नसतातच ज्यांना मुलगी महत्त्व देते. या परिस्थितीत मुलीच्या विवाहाचा अधिकार पूर्णपणे पालकांना देणे बरोबर असणार नाही.

हे एक कटू सत्य आहे की कोणत्याही स्त्री व पुरुषांचे विवाहबंधनात बांधले जाणे एक अतिमहत्त्वाची घटना आहे, दोघेही या घटनेपासून जीवनाच्या एका नवीन अध्यायाची सुरुवात करतात. म्हणून या संबंधांची प्रस्थापना दोघांच्या राजी-मर्जीने व्हावी. ही गोष्ट कधीच योग्य होणार नाही की स्त्रीवर तिच्या आवडीविरुद्ध विवाहाचा निर्णय थोपविण्यात यावा.

इस्लाम धर्माने विवाहाच्या बाबतीत मुलीच्या पालकास महत्त्व अवश्य दिले, परंतु हेदेखील स्पष्ट केले की तिचा विवाह तिच्या परवानगीनेच व्हावा. स्त्री विधवा किंवा घटस्फोटित असल्यास स्पष्टपणे आपली मर्जी कळवील आणि कुमारिका असल्यास गप्प बसेल व यालाच तिची परवानगी समजण्यात येईल.

माननीय अबू हुरैरा (रजि.) यांचे निवेदन आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

''विधवा आणि तलाकपीडित स्त्रीचा विवाह तिचे मत माहिती होईपर्यंत होणार नाही. तसेच कुमारिकेचा विवाह तिच्या परवानगीशिवाय होऊ शकत नाही.''

(हदीस : बुखारी ,मुस्लिम)

यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या तत्कालीन सोबत्यांनी विचारले, ''कुमारिका तर लाजत असल्यामुळे काहीच बोलणार नाही. मग तिची परवानगी

कशी घ्यावी?''

तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''तिचे मौन धरणेच परवानगी समजण्यात येईल.'' (अर्थात मौन स्वीकृती.)

''जर एखाद्या स्त्रीच्या पालकाने तिचा विवाह केला व त्या स्त्रीने या विवाहास मान्यता दिली नाही, तर हा विवाह 'रद्दबातल' ठरेल. या बाबतीत माननीय खन्सा बिन्त खुद्दाम (रजि.) चा विवाह तिच्या मर्जीविरुद्ध तिच्या वडिलांनी करून दिला, तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हा विवाह रद्दबातल ठरविला.'' (हदीस : बुखारी)

५) 'मेहेर'चा अधिकार

इस्लामने पुरुषाला आदेश दिला की तो ज्या स्त्रीशी विवाह करील तिला मेहेर अवश्य देण्यात यावा. कारण पतीतर्फे पत्नीस मेहेर दिल्याशिवाय विवाह होत नाही. इस्लामपूर्व अज्ञानाच्या युगातही पत्नीला पतीतर्फे मेहेर देण्याची प्रथा होती. परंतु अरबवासीयांनी स्त्रीचा हा अधिकार हिरावून घेतला होता. याचे विविध स्वरूप होते. ते याप्रमाणे,

१) स्त्रीचा पालक या मेहेरच्या राशीला स्वत:ची मिळकत समजून त्यावर स्वत:च ताबा मिळवत असे. तसे पाहता मुलगी म्हटल्यावर तिला तो स्वत:प्रती अडसर समजत. तिच्या जन्म घेण्यावरच तो छाती बदडून घेत आणि दु:ख व संताप व्यक्त करीत असे. या दृष्टिकोनाने तिच्या विवाहाच्या वेळी मिळणाऱ्या मेहेरच्या संपत्तीवर हक्क बजावयाचा आणि स्त्रीजन्माच्या दु:खाची या आनंदाने परतफेड करायचा. या कारणाने तो मुलीला 'अलनाफेजा' (संपत्तीत वाढ करणारी) या शब्दाने संबोधित करीत असे. तसेच तिच्या जन्म घेण्यावर 'तुमच्याकरिता संपत्तीत वाढ करणारी आली' या शब्दांत शुभ कामना स्वीकार करीत असे. मेहेरमध्ये ते उंट स्वीकारित असे, अर्थातच मुलीच्या विवाहासमयी उंटांची संख्या वाढून संपत्तीत वाढ व्हायची.

२) हेसुद्धा घडत असे की पतीच्या मृत्यूनंतर त्या विधवेचा सावत्र मुलगा अथवा नातेवाईक तिच्या अंगावर चादर टाकायचा आणि म्हणायचा, 'मरणाऱ्याच्या संपत्तीप्रमाणेच मी या स्त्रीचासुद्धा वारसदार झालो.' यामुळे त्या विधवा स्त्रीवर त्याचा अधिकार स्थापित व्हायचा. मग कोणी दुसरा इसम तिच्यावर

दावा करू शकत नसे व स्वत: त्या विधवा स्त्रीलादेखील त्याच्या विरोधात काहीही करता येत नसे. जर या नवीन तथाकथित वारसास त्या विधवेशी विवाह करायचा झाल्यास पूर्वीचाच 'मेहेर' ग्रहित धरून लग्न लावण्यात येई व नवीन 'मेहेर' देण्याची गरज नसायची, अथवा कोण्या दुसऱ्या इसमाशी तिचे लग्न करून दिल्यास त्या नवीन घरोब्यापासून मिळालेल्या मेहेरवर ताबा मिळवित असे. (तफसीरे कबीर)

३) कधीकधी तिच्या विवशतेचा व दौर्बल्याचा फायदा उचलून अत्यल्प मेहेर देण्यात येई.

माननीय आएशा (रजि.) सांगतात,

''एखाद्या वडील व आई वारलेल्या अनाथ मुलीचा पालक तिच्या सौंदर्यावर आणि संपत्तीवर भाळून स्वत: तिच्याशी विवाहाचा इच्छूक असल्यास दुसऱ्याशी तिचा विवाह न करता स्वत:च लग्न करायचा आणि एवढे 'मेहेर'सुद्धा देत नसे जेवढे 'मेहेर' दुसरा इसम देण्याकरिता तयार असायचा. दिव्य कुरआनने या प्रथेवर प्रतिबंध लावला आणि म्हटले की या अनाथ मुलींशी जर विवाह करायचा असेल तर त्यांना पूर्ण मेहेर द्या! अन्यथा दुसऱ्या स्त्रियांशी विवाह करा.'' (हदीस : बुखारी)

४) अज्ञानाच्या (अर्थात इस्लामपूर्व) काळात मेहेर नष्ट करण्याची आणखी एक शक्कल होती. तिला पैगंबरवचनात 'शिघार' असा शब्द वापरण्यात आला आहे. याचा अर्थ असा होतो की एक इसम आपल्या कन्येचा विवाह दुसऱ्या इसमाशी या अटीवर करतो की त्याच्या कन्येच्या मोबदल्यात त्याला आपली मुलगी विवाहकरिता द्यावी आणि या साट्यालोट्यात दोन्ही मुलींचा 'मेहेर' देण्यात येत नसे.

इस्लाम धर्माने ही पथभ्रष्ट प्रथा संपुष्टात आणली. पैगंबरांचे तत्कालीन सोबती माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांनी सांगितले,

''पैगंबर मुहम्मद (स.) यांनी शिधारची मनाई केली आहे.''

(हदीस : बुखारी,मुस्लिम)

इमाम बुखारी यांच्या पैगंबरकथनांच्या संग्रहात विनामेहेर कन्यांच्या अदला-बदलीचा उल्लेख आहे. इमाम मुस्लिम यांच्या पैगंबरकथन संग्रहास बहिणींच्या अदलाबदलीचा उल्लेख आढळतो. ही दोन्ही उदाहरणे आहेत. याव्यतिरिक्त 'इमाम नूदी' सांगतात, ''इस्लामी विचारवंत सहमत आहेत की

त्या काळात कन्या आणि बहिणीव्यतिरिक्त पुतण्या, आत्या आणि चुलतबहिणीसुद्धा या साट्यालोट्यांत बळी पडत आणि इस्लामी पंडितांनी यावर सहमती व्यक्त केली की इस्लामपूर्व काळातील या मार्गभ्रष्ट प्रथा इस्लामने मुळापासून नष्ट केल्या आहेत. मात्र या बाबतीत वाद आहे की या प्रकारच्या विवाहाच्या बाबतीत नेमका आदेश काय आहे?''

इमाम अबू दाऊद यांच्या कथनसंग्रहात आहे की अब्दुल्लाह बिन अब्बास यांचे सुपुत्र अब्बास यांनी त्यांच्या कन्येचा विवाह अब्दुर्रहमान बिन हकमशी केला आणि अब्दुर्रहमान बिन हकम यांनी त्यांच्या कन्येचा विवाह अब्बास यांच्याशी केला. याच साट्यालोट्यास 'मेहेर'साठी पर्याय ठरविला. माननीय माविया (रजि.) यांना जेव्हा ही बातमी समजली तेव्हा त्यांनी (ही गोष्ट माननीय मावियांच्या शासनकाळातील आहे.) मदीनाचा राज्यपाल 'मरवान' यास पत्र पाठविले की हा विवाह संपुष्टात आणण्यास फरमान जारी करावा. कारण या प्रथेलाच अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांनी 'शिघार' म्हटले आहे व ही प्रथा कायमची बंद केली आहे.

इमाम मालिक, इमाम शाफई व इमाम अहमद बिन हम्बल या इस्लामी विद्वानांच्या दृष्टिकोनांनुसार हा विवाह रद्दबातल आहे. परंतु इमाम अबू हनीफा आणि सुफियान 'सूरी' यांच्या दृष्टिकोनांनुसार, हा विवाह तर झाला परंतु मेहेर अदा न करण्याचा अपराध त्यांच्याकडून घडला. जर त्यांनी मेहेर निश्चित करून अदा केला तर हा विवाह अबाधित राहील. (हदीस : मआलिमुस्सुनन)

अशा प्रकारे इस्लाम धर्माने 'मेहेर'ला केवळ विवाह करणाऱ्या एकट्या स्त्रीचाच अधिकार घोषित केला आणि या अधिकारावर होणाऱ्या सर्व बाधांना समूळ नष्ट करून स्पष्ट शब्दांत आदेश दिला,

''आणि स्त्रियांचे मेहेर (स्त्रीधन) आनंदाने (कर्तव्य समजून) अदा करा....''
(दिव्य कुरआन, ४ : ४)

धर्मपंडित अबू बकर जस्सास यांनी याचे वर्णन अशा शब्दांत केले आहे,

''मेहेर पत्नीची स्व-संपत्ती असून केवळ तिचाच त्यावर अधिकार आहे. आणि तिच्या पालकाचा त्यावर कोणताच अधिकार नाही.''

(एहकामुल कुरआन)

शरीयतने (अर्थात इस्लामी विधीने) मेहेरच्या राशी व संपत्तीची कोणतीच मर्यादा निश्चित केली नाही. ती माणसाच्या अर्थिक क्षमतेच्या प्रमाणात कमी-

जास्त होऊ शकते. परंतु एवढे मात्र निश्चित की कोणत्याही व्यक्तीकरिता तिच्या ऐपतीनुसार 'मेहेर'ची अदायगी कठीण होता कामा नये. इस्लामी कायदेतज्ञांच्या दरम्यान 'मेहेर'च्या रकमेच्या किमान मर्यादिबाबत वाद आहे. हनफी कायदेतज्ञांच्या मतानुसार मेहेरची रक्कम कमीतकमी दहा दिरहमपेक्षा कमी नसावी.

अशा प्रकारे ही बाब स्पष्ट होते की 'मेहेर'ची राशी कमी असो व जास्त असो शेवटी तो केवळ स्त्रीचाच कायदेशीर अधिकार आहे. इस्लामी कायद्यानुसार तिला या अधिकारापासून वंचित ठेवता येणार नाही. काही वेळा 'मेहेर'ला स्त्रीच्या सन्मानाविरुद्ध समजले जाते आणि यावर आणखीन काही आक्षेप व हरकती आहेत. त्यावर सखोल चर्चा पुढील भागात करण्यात आली आहे.

६) 'नान व नफ्का'चा अधिकार

लग्नापर्यंत मुलीच्या संगोपनाची जबाबदारी तिच्या पित्याची आहे. लग्नानंतर तिच्या 'नान व नफ्क्या'ची (उदरनिर्वाहाची) जबाबदारी पूर्णपणे तिच्या पतीची आहे. इस्लामी विधीनुसार पत्नी श्रीमंत असो अथवा गरीब तिच्या उदरनिर्वाहाची पूर्तता करणे पतीचे परम कर्तव्य आहे. 'हनफी फिक्ह'मध्ये म्हटले गेले की पती आणि पत्नी जर दोघेही अर्थिक सबळ असल्यास पत्नीचा उदरनिर्वाह तिच्या आर्थिक दर्जानुसार असावा. पत्नी गरीब व पती श्रीमंत असल्यास त्यांचा उदरनिर्वाह गरीब व श्रीमंताच्या मधल्या दर्जाचा असेल. अर्थात श्रीमंतापेक्षा थोडा कमी आणि गरीबापेक्षा थोडा जास्त असेल. परंतु जर पत्नी श्रीमंत आणि पती गरीब असल्यास पती त्याच्या आर्थिक ऐपतीनुसार तिला लागणारा खर्च पुरवेल व बाकीची रक्कम त्याच्यावर कर्जाच्या स्वरूपात असेल व त्याची तो सवडीनुसार परतफेड करू शकतो.

पत्नी जर श्रीमंत असेल तर तिच्यासाठी नोकरचाकर सुद्धा पुरविण्यात यावेत. पत्नी पतीच्या परिवारात किंवा परिजनात किंवा नातलगांसोबत राहण्यास तयार नसल्यास तिच्यासाठी वेगळ्या आवासाचा बंदोबस्त करण्यात यावा. हा तिचा वैधानिक अधिकार आहे आणि त्या अधिकाराची पूर्तता करणे पतीचे कर्तव्य आहे. या विषयात हे स्पष्टीकरण करणेसुध्दा आवश्यक आहे की पतीची सेवा व घराचे कामकाज करणे पत्नीवर बंधनकारक नाही किंवा तिची जबाबदारीसुद्धा नाही. ती हे सर्व काही करीत असल्यास तिचे ते उपकारच समजावे. परंतु पतीची सेवा व घरकाम करण्याकरिता तिच्यावर बळजबरी करता येणार नाही. (याचे तपशीलवार वर्णन हनफी फिकहमध्ये विस्तारित स्वरूपात आहे.

(संदर्भ - हिदाया-२/४१७-४१९)

७) व्यवसाय आणि कार्यस्वातंत्र्याचा अधिकार

इस्लाम धर्माने स्त्रीला व्यवसाय आणि कार्याचे स्वातंत्र्य दिले आहे. तिच्याकरिता व्यापार, कृषी, देवाणघेवाण, उद्योग व निर्मिती, नोकरी, ज्ञानदान, पत्रकारिता व लेखन या सर्व कार्यांची परवानगी आहे. या कार्यांसाठी ती घराबाहेरदेखील जाऊ शकते. मात्र गोशाच्या (पडदा) सुरक्षेसहीत या सुरक्षात्मक बंधनांची दोन उद्दिष्टे आहेत. प्रथम हे की परिवार व्यवस्थेत कोणतीही ढवळाढवळ होऊ नये व त्याच्या स्थैर्यात बाधा येऊ नये. द्वितीय हे की स्त्रीने मानाने व अब्रु शाबुत ठेवून जीवन जगावे आणि तिला अशा परिस्थितीत कोणी ढकलू नये की तिच्यासाठी नैतिक मर्यादा जपणे कठीण व्हावे. (या विषयावर विस्तारित वर्णनांकरिता 'स्त्री आणि आर्थिक समस्या' या विषयावरील चर्चा अभ्यासावी.)

८) धनसंपत्तीचा अधिकार

जगातील कितीतरी राष्ट्रांमध्ये स्त्रीला संपत्तीच्या अधिकारापासून वंचित केले. माता-पित्याच्या संपत्तीत तर तिचा वाटा नव्हताच याउलट तिने स्वत: काबाडकष्ट करून मिळविलेल्या पैशावर पती, मुले व बाप किंवा इतर परिजन ताबा मिळवून फस्त करीत. इस्लाम धर्मात स्त्रीच्या मिळकतीस मान्यता देऊन तिच्या मिळकतीत ढवळाढवळ करण्यास प्रतिबंध करण्यात आला. तिने नैतिकरित्या कमावलेल्या संपत्तीवर ज्याप्रमाणे पुरुषांचा मिळकतीचा अधिकार आहे, त्याचप्रमाणे स्त्रीलाही हा अधिकार देण्यात आला. दिव्य कुरआनात म्हटले आहे,

''जे काही पुरुषांनी कमावले आहे त्यानुसार त्यांचा वाटा आहे आणि जे काही स्त्रियांनी कमावले आहे, त्यानुसार त्यांचा वाटा आहे.''

(दिव्य कुरआन, ४ : ३२)

स्त्रीला इस्लामी वैधानिक सूत्रानुसार माता-पिता, पती अथवा संतती वगैरेंपासून जी संपत्ती मिळते किंवा तिच्या स्वप्रयत्नांनी जी संपत्ती मिळते तिच्यावर तिचा मालकीहक्क आहे. तिच्या वापराचा तिलाच पूर्ण अधिकार आहे. ती तिच्या स्वतंत्र आवडीनिवडीनुसार स्वत:वर, पती व मुलांवर, माता-पिता व परिवारजणांवर खर्च करू शकते आणि विधायक कार्यावर खर्च करू शकते. संपत्तीची खरेदी-विक्री व दानधर्माचा तिला अधिकार आहे. तिच्या अधिकारांत ढवळाढवळ कोणीही करता कामा नये.

९) शील व अब्रूसुरक्षेचा अधिकार

मानसन्मान व अब्रू स्त्रीची अनमोल संपत्ती आहे. तिच्या अब्रूशी खेळ करणे व तिचा मानभंग करण्याचा कोणालाही अधिकार नाही. स्त्रीच्या अब्रू व इज्ज़तीवर नेहमीच आक्रमणे होत असतात. ती तिच्या दुर्बलतेच्या कारणास्तव स्व:रक्षणात जास्त यशस्वी झालेली दिसत नाही. तिच्यावरील हल्ल्यांचे दोन स्वरूपे आहेत. प्रथम स्वरूप म्हणजे तिच्यावर व्यभिचाराचे आरोप लावून तिला मानसिक ताप देणे व दुसरे स्वरूप म्हणजे तिच्यावर लैंगिक अत्याचार करणे. इस्लाम धर्मात हे दोन्ही अपराध अतिभीषण स्वरूपाचे आहेत. स्वत: पैगंबर मुहम्मद (स.) यांनी माणसास जगातून नष्ट करणाऱ्या सात अपराधांपैकी एकाचा उल्लेख अशा प्रकारे केला आहे,

''सत्‌शील, श्रद्धावंत आणि निरागस स्त्रियांवर आळ घेणे.''

(हदीस : मिश्कात, बुखारी,मुस्लिम)

इस्लाम धर्माने या भीषण अपराधावर शक्तिशाली विळखा आवळला. तो अशा प्रकारे की जर कोण्या इसमाने एखाद्या स्त्रीवर व्यभिचाराचा आरोप लावला तर त्याला तब्बल ऐंशी फटक्याची शिक्षा ठोठावली व नंतर कोणत्याही प्रकरणात त्याची साक्ष मान्य करण्यात आली नाही. कुरआनात सांगितले आहे,

''आणि जे लोक मर्यादाशील स्त्रियांवर आळ घेत असतील, मग चार साक्षीदार घेऊन येत नसतील, त्यांना ऐंशी फटके मारा. व त्यांच्या साक्षी कधी स्वीकारू नका, आणि ते स्वत:च अवज्ञाकारी आहेत. त्या लोकांव्यतिरिक्त जे आपल्या कर्मावर पश्चात्ताप करतील व सुधारणा घडवून आणतील. कारण अल्लाह अवश्य (त्यांच्या बाबतीत) क्षमाशील व परम दयाळू आहे.''

(दिव्य कुरआन, २४ : ४-५)

आता व्यभिचार आणि बलात्काराचा विषय चर्चेला घेऊ या. इस्लामी विधीनुसार कोणत्याही इसमाने एखाद्या स्त्रीवर जबरी लैंगिक अत्याचार केल्यास अविवाहितास शंभर कोरड्यांची शिक्षा आणि विवाहितास 'रजम' म्हणजे समाजातील लोकांकडून त्याचा दगडाने ठेचून वध केला जाईल. तसेच स्त्री व पुरुषाच्या राजीमर्जीने हे पातक घडल्यास दोघांना ही शिक्षा भोगावी लागेल.

१०) टीका आणि जाब घेण्याचा अधिकार

हे खरे आहे की इस्लाम धर्माने स्त्रीला काही सामूहिक आणि राजकीय जबाबदाऱ्यांतून मुक्ती दिली. (या विषयावर आपण वेगळी चर्चा करू या.) परंतु याचा अर्थ अजिबात असा होत नाही की ती या प्रकरणांशी बिल्कुल अलिप्त आणि सामूहिक व सामाजिक स्वार्थ आणि फायदे व तोट्यांशी तिला काहीच देणेघेणे नाही. दिव्य कुरआनने स्त्री आणि पुरुष दोघांनाही 'सत्याचा आदेश व वाईट कर्मांचा त्याग' करण्याचा आदेश दिला. दिव्य कुरआनात ईशआदेश आहे,

''ईमानधारक पुरुष व ईमानधारक स्त्रिया हे सर्व एक दुसऱ्यांचे मित्र आहेत. भलेपणाचा आदेश देतात व वाईट गोष्टींपासून रोखतात.''

(दिव्य कुरआन, ९ : ७१)

सत्याची प्रस्थापना व दुष्कर्मांना आळा घालण्याचा विषय अतिशय विस्तृत आहे. या आदेशाच्या चौकटीत इस्लामचा प्रसार व प्रचार, समाज सुधारणेचे कार्य आणि शासनाच्या अयोग्य नीतीवर टीका व त्याचे परीक्षण हे सर्व काही आलेच. स्त्रीची जबाबदारी आहे की तिने तिच्या मर्यादा पाळून हे सर्व कार्य करावे. (याच्या तपशीलाकरिता माझे 'मुस्लिम स्त्रियांची जबाबदारी' अवश्य अभ्यासावे.)

इतिहासाने स्पष्टपणे याची साक्ष दिली की इस्लामच्या प्रारंभी काळातील स्त्रियांनी हे कर्तव्य यशस्वीपणे व शौर्याने पार पाडले आहे.

प्रकरण-०३

आक्षेपांचा आढावा

एक सर्व सामान्य भाष्य

'स्त्रीचे अधिकार कोणते व तिच्या जबाबदाऱ्या काय आहेत?' वर्तमानकाळातील हा एक बिकट व नाजुक प्रश्न आहे. या प्रश्नावर एवढी चर्चा झाली व होत आहे की त्यांना गोळा केल्यास एक मोठे ग्रंथालयच तयार होईल. परंतु असल्या चर्चांमधून हा प्रश्न सुटला नाही तर अधिकच कीचकट होत गेला. या प्रश्नाच्या उत्तराच्या स्वरुपात इस्लाम धर्माची सुद्धा एक स्पष्ट भूमिका आहे. ही भूमिका आधुनिक काळाने प्रेरित नसून ती इस्लामच्या प्रारंभापासून होती, आजही आहे व जग संपेपर्यंत जशीच्या तशीच राहील. ही इस्लामी भूमिका त्या भूमिकेच्या अगदी विरोधात होती जी शतकानुशतके जनमानसांत रूजलेली व मान्य करण्यात आलेली होती. यामध्ये स्त्रीच्या वयोमानानुसार पुरुषाच्या संबंधाच्या स्वरूपानुसार प्रेम, सहानुभूती, सहकार्य, समानता, तसेच तिच्या स्थायी व्यक्तिमत्त्वाची स्वीकृती आहे. यात तिचा जीव, संपत्ती व विनयाचे संरक्षण आले. शिवाय तिचे आर्थिक, सामाजिक व राजकीय अधिकार आहेत. असे म्हणावयास हरकत नाही की यामध्ये तिच्या व्यक्तिमत्त्वाच्या परिपूर्णतेची सर्व साधनसामग्री उपलब्ध आहे. ही अतिशय स्पष्ट, प्रमाणित व कणखर भूमिका आहे. या भूमिकेमुळे ते सर्व प्रश्न सुटतात जे वर्तमानकाळाच्या भूमिकेने समाजजीवनात निर्माण करून ठेवले आहेत.

इस्लाम धर्माच्या बाबतीत काही लोकांची भूमिका अज्ञानी व पक्षपाती असते. ते त्यांच्या विशेष धार्मिक व राजकीय विचारसरणीमुळे इस्लाम धर्माच्या कोणत्याच विशेषत्वास पचवू शकत नाहीत. हे लोक स्त्रीच्या बाबतीत इस्लामच्या सकारात्मक भूमिकांकडे कानाडोळा करतात. म्हणजेच द्वेष आणि शत्रुत्वाची सूडभावनाच माणसाला सत्यापासून दूर ठेवते. जो मनुष्य या क्लिष्ट मानसिक रोगास बळी पडतो तो महामहीम वास्तवांना पाहू शकत नाही. व पाहिल्यावर सुद्धा त्यांना न पाहण्याचे ढोंग करीत असतो. परंतु सत्य लपविल्याने व डोळे मिटवून घेतल्याने लपत नसते. ते आपले अस्तित्व प्रखरपणे प्रकाशमयरित्या मान्य करण्यास भाग पाडते. जोपर्यंत या भूतलावर दिव्य कुरआन व हदीसची स्पष्ट शिकवण अस्तित्वात आहे, ज्यानुसार शतकानुशतके संपूर्ण जगामध्ये निर्णय व त्यावर कार्य होत राहील, स्त्रीवरील इस्लामच्या उपकारांना नाकारता येत

नाही. काहींना वाटते की इस्लामपूर्व काळात स्त्रीची जी दयनीय अवस्था होती, इस्लामने त्यात सुधारणा अवश्य केली व काही अधिकारसुद्धा दिलेत, ज्यापासून ती वंचित होती. परंतु स्त्रीबरोबर परिपूर्ण न्याय करण्यात आला नाही. पुरुषाला मिळालेल्या अधिकारांपेक्षा स्त्रीला मिळालेले अधिकार तुलनात्मकदृष्ट्या खूप कमी आहेत आणि ही तफावत अजूनही बाकी आहे जी पूर्वी स्त्री-पुरुषांत अधिकारांच्या बाबतीत होती. दुसऱ्या शब्दांत इस्लामने पुरुष व स्त्रीला समान दर्जा दिला नाही व त्यांच्या दरम्यान परिपूर्ण समानता प्रस्थापित केली नाही.

इस्लामने स्त्रीला जे अधिकार दिले आहेत त्यावर विषमतेच्या या दृष्टिकोनानुसार पुष्कळ आक्षेप व हरकती घेण्यात येतात. हे असे म्हणता येते की इस्लाममध्ये पुरुषश्रेष्ठत्वाची कल्पना आहे. पुरुष घराचा स्वामी व मालक आहे. तो एकापेक्षा जास्त विवाह करू शकतो. त्याला तलाक (घटस्फोट) देण्याचा अधिकार आहे. वारशात स्त्रीपेक्षा दुप्पट अधिकार पुरुषाला आहे. साक्ष, बदला आणि भरपाईच्या कायद्यात स्त्रीवर अन्याय झालेला आहे. असे व अशा प्रकारच्या कितीतरी हरकती व आक्षेप घेणारे इस्लामी कायद्यात बदल घडविण्याच्या मानसिकतेत आहेत. त्यांची मागणी आहे की पुरुषाचे अधिकार संपुष्टात आणावेत. स्त्रीला खाजगी जीवनात पुरुषांना मिळालेले सर्व अधिकार देण्यात यावेत. दोघांचे अधिकार समान असावेत. वारसाहक्कात दोघांचा समान वाटा असावा. पतीला तलाक देण्याचा अधिकार स्त्रीलासुद्धा असावा. तिला जेव्हा वाटल्यास पतीपासून विभक्त होण्याचा अधिकार असावा. पुरुषाने तलाक दिल्यास आजीवन घटस्फोटित स्त्रीला पोटगी द्यावी. पुरुषाला एक पत्नी घरात असताना दुसऱ्या लग्नाची परवानगी नसावी. कधीकधी तर जीभ एवढी अवाक्याबाहेर जाते की पुरुषांना असलेल्या बहुपत्नित्वाच्या अधिकाराप्रमाणेच स्त्रीलाही बहुपतित्वाचा अधिकार मिळावा. अशा प्रकारे स्त्रीलादेखील पुरुषांना मिळालेले, सर्वच राजकीय व सामाजिक अधिकार मिळावेत. हे सर्व आक्षेप इस्लामविषयी अज्ञानाचे कडू फलीत आहेत. दुर्दैवाने या अज्ञानी मंडळींमध्ये बरेचसे लोक सुशिक्षित आहेत व विचारवंतदेखील आहेत. इस्लाम धर्माने जीवनाची जी विस्तारित आणि परिपूर्ण कल्पना सादर केली आणि ज्याप्रमाणे व्यक्तिगत व सामूहिक जीवनाची त्याने उभारणी केली. याच्या प्रकाशात हे आक्षेप आपोआप लोप पावतात.

हे आक्षेप काही नवीन नाहीत. हे फार जुने आहेत. या मुदतीत विविध अगांनी त्यांचे समाधान करण्यात आले. परंतु ही गोष्ट किती आश्चर्याची व खेदजनक आहे की प्रत्येक वेळी या आक्षेपांना अगदी नवीन व आधुनिक स्वरूपात

सादर करण्यात येते आणि याचा प्रचार करण्यात येतो की ही समस्या जगनिर्मितीपासून आजपर्यंत पहिल्यांदाच जगासमोर आणण्यात आली व इस्लामी विद्वानांजवळ यांचे उत्तरच नाही. या त्यांच्या नीतीमुळे असे सहसा वाटते की यांच्यात इस्लाम धर्म समजण्याची भावना कमी आणि टीकेचे लक्ष्य बनविण्याचीच भावना जास्त आहे. गरज याची आहे की ज्या आक्षेपांची उत्तरे त्यांना मिळालीत त्यावर त्यांनी गंभीरपणे विचार करावा आणि त्यातही त्रुटी आढळल्यास स्पष्ट करावे. यामुळे आकलन व विवेकशीलतेचे मार्ग मिळतील. गैरसमजुती दूर होतील आणि इस्लामच्या वास्तव स्वरूपाचे आकलन होईल.

हे सर्व आक्षेप अशा प्रकारचे लोक घेतात ज्यांच्या विचारांवर व बुद्धींवर स्त्री-पुरुषांचा पाश्चात्यांनी दिलेला विषमतेचा पगडा बसलेला आहे. या पगड्याच्या विळख्यात ते स्वत: विवश आहेत. ही विचारसरणी आता केवळ विचारसरणी राहिलेली नसून तिला मोठ्या प्रमाणात आजमावण्यात आले आहे. परिणामी लैंगिक स्वैराचार आणि परिवारांच्या विघटनाच्या स्वरूपात भीषणता ओढवून घेण्यात आली. (याचे तपशीलवार वर्णन 'स्त्री स्वातंत्र्याची पाश्चात्य कल्पना' या मथळ्याखाली आपल्यासमोर मांडण्यात आले आहे.) परंतु या भीषण परिणामांकडे कानाडोळा करून त्याचा अशारितीने पुरस्कार करण्यात येतो की ती केवळ उपयुक्त विचारसरणी नसून स्त्रीची मुक्ती आणि उत्तुंग यशाची गुरुकिल्ली आहे. इस्लामने या विचारसरणीचा पुरस्कार केला नाही तर विवेकशीलतेची मागणी आहे की इस्लामलाच नेहमीकरिता घटस्फोट देण्यात यावा. वस्तुस्थिती अशी आहे की स्त्रीच्या बाबतीत इस्लामने दिलेल्या विचारसरणीची उपयुक्तता व मोल आणि पावित्र्य इतिहासात सिद्ध झाले आहे. जेव्हा केव्हा पश्चिमच्या स्त्री-पुरुष समानतेच्या कल्पनेत सुधारणा घडवून आणण्यात येईल व त्यातील विषमतेस दूर करण्यात येईल तेव्हा ती कल्पना इस्लामी-विचारसरणीच्या जास्त जवळ येईल. एवढेच नाही तर हे सांगणे अयोग्य होणार नाही की इस्लामच्याच माध्यमाने त्यात सुधारणा घडवून त्याच्या त्रुट्या संपविण्यात येतील.

स्त्रीच्या बाबतीत इस्लामच्या भूमिकेवर विरोधकांकडून टीकांची झोड उठविण्यात आली व सतत हल्ले होत आले. हे हल्ले एवढे तीव्र आहेत की बरेचसे इस्लामचे नाव घेणारेसुद्धा खूप प्रभावित झाले आणि त्यांना इस्लामी शिकवणीत मोठ्या चुका व त्रुट्या आढळून येऊ लागल्या.

या न्यूनगंडाचेही भरपूर प्रकार आहेत. या सर्व प्रकारांना निश्चित करणे सोपे नाही. काही मंडळी मग ते तोंडी दावा करो अथवा न करो, परंतु इस्लाम

धर्माच्या कायद्यापासून मुक्त होऊ इच्छितो. त्यांच्या दृष्टिकोनात वर्तमानकाळात स्त्रीचे लक्ष्य इस्लाम धर्माने नव्हे तर पाश्चात्यांनी निश्चित केले आहे. ती इस्लामच्या बंधनात अडकून स्वत:चा विकास करू शकत नाही. यासाठी तिला त्या मुक्त वातावरणामध्ये बागडावयास हवे जे पाश्चिमात्यांच्या मार्गदर्शनात निर्माण झाले आहे. त्याच्या या कामना व प्रयत्नांना एक व्यक्ती ती मुस्लिम असेपर्यंत तरी साथ देऊ शकत नाही. कारण त्या मुस्लिमांसाठी शरीयतच्या त्या मर्यादा आहेत ज्यांचे उल्लंघन करण्याची त्याला परवानगी नाही. यदाकदाचित त्याच्याकडून अशी चूक घडली तरी तो स्वत:ला अपराधी आणि अल्लाहसमोर उत्तरदायी असण्याची जाणीव बाळगेल व तात्काळ 'शरीयत'च्या मर्यादाकक्षेत येण्याची धडपड करील. हीच त्याच्या श्रद्धेची मागणी आहे. या वेळी शरीयतचे सर्व आदेश चर्चेत घेतलेले नाहीत. केवळ पारिवारिक जीवनविषयक बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. या आदेशांना दिव्य कुरआनने विविध ठिकाणी 'ईशमर्यादा' या शब्दाने संबोधित केले आहे. या मर्यादांचे उल्लंघन करण्यास सक्तीने बंदी घातली आहे.

''अल्लाहने निश्चित केलेल्या या मर्यादा आहेत. त्यांचे उल्लंघन करू नका. जे लोक त्यांचे उल्लंघन करतील, तेच अत्याचारी आहेत.''

(दिव्य कुरआन, २ : २२९)

सूरह तलाकमध्ये सुद्धा तलाकचे नियम वर्णन करण्यात आले आहेत. त्यानंतर तात्काळ सांगितले आहे,

''कित्येक वस्त्या अशा आहेत ज्यांनी आपला पालनकर्ता आणि त्याच्या पैगंबरांच्या आज्ञेविरुद्ध दुर्लक्ष केले तर मी (स्वयं अल्लाहने) त्यांचा सक्तीने हिशोब घेतला आणि त्यांना कठोर शिक्षा दिली. त्यांनी त्यांच्या कर्मांची फळे चाखली आणि त्यांची कार्यपरिणती तोटाच तोटा आहे. अल्लाहने (परलोकात) त्यांच्यासाठी तीव्र प्रकोप उपलब्ध करून ठेवला आहे. म्हणून अल्लाहच्या प्रकोपाचे भय बाळगा. हे बुद्धिमान लोक हो! ज्यांनी श्रद्धा ठेवली आहे. अल्लाहने तुमच्याकडे एक आदेश अवतरला आहे.'' *(दिव्य कुरआन, ६५ : ८-१०)*

मग कोणतीही मुस्लिम व्यक्ती या मर्यादा आणि ताकीदनंतर स्त्रीचे अधिकार किंवा आदेश अथवा कोणत्याही शरीयतच्या कायद्याचा विरोध करण्याची कल्पनाच कशी करणार?

काहीजणांच्या बुद्धी व विचारांवर पाश्चात्यांचा एवढा पगडा नाही की ते कुरआनच्या नियमांना प्राचीन विधी समजून व प्राचीन परंपरा समजून रद्दबातल

ठरवतील. परंतु त्यांना असे वाटते की इस्लामी विधी ज्या परिस्थितीत अवतरला होता ती परिस्थिती आता पार बदलून गेली आहे. बदलत्या परिस्थितीत शतकानुशतके प्राचीन नियम व कायदे आणि परंपरांवर कार्यरत असण्याचा हट्ट धरणे योग्य नाही. हा काळ स्पर्धेचा काळ आहे. इस्लामने स्त्रीविषयी जी भूमिका घेतली आहे त्या भूमिकेवर ठाम राहून वर्तमानकाळातील स्पर्धात्मक जीवनात ती वावरू शकत नाही. स्त्रीच्या इतरांबरोबरील स्पर्धेत मागे पडण्याचा अर्थ असा आहे की संपूर्ण समाज व राष्ट्रच मागे राहील. याकरिता इस्लामी कायद्यात सुधारणा करून वर्तमानकाळाशी साम्य साधण्याची नितांत आवश्यकता आहे. या मंडळीच्या दृष्टिकोनात हे आवश्यक झाले आहे. जे लोक असे पुनरुज्जीवन करण्याची भाषा करीत नाहीत त्यांच्यावर हे परिवर्तनवादी लोक परिस्थितीबद्दल अज्ञानी, पुरातनवादी व अगतिक असण्याचे आरोप करीत असतात.

काही मंडळी याही पुढे जाऊन मोठ्या साधेपणाने व भोळसटपणाने असे म्हणतात की इस्लाम एक आधुनिक धर्म आहे. त्याने स्त्रीला आधुनिक युगातील सर्व अधिकार बहाल केले आहेत. परंतु या पुरातनवाद्यांनी कुरआन आणि हदीसचा अर्थच अशा प्रकारे वर्णन केला की गुलामगिरीच्या काळातील आठवण यावी. म्हणून इस्लाम धर्माचे आधुनिक व विकासवादी वर्णन करण्याची गरज आहे. कोण आहे जो या आकलनशक्ती, दूरदर्शिता व उच्च विचारांची दाद देणार?

जे लोक इज्तेहाद (साकल्याने केलेला विचार) च्या नावावर इस्लामी कायद्यात सुधारणेचे इच्छुक आहेत ते कदाचित इस्लामी कायद्यांना मानवनिर्मित कायदा समजतात की जो कायदा मानव निर्माण करतो व तो गरज भासल्यास त्याच्या मर्जीनुसार त्यात बदल करीत जातो. इस्लामी कायदा हा मानवनिर्मित नसून अल्लाहने स्वत: अवतरित केलेला आहे. याकरिता कोणत्याही व्यक्तीस त्यात सुधारणा व परिवर्तन करण्याचा अजिबात अधिकार नाही. हा अधिकार त्याने पैगंबरासमुद्धा दिला नाही ज्यांच्यावर 'शरीयत' अवतरली. कारण दिव्य कुरआनात आहे,

''जेव्हा आमच्या स्पष्ट गोष्टी त्यांना ऐकविल्या जातात तेव्हा ते लोक जे आम्हाला भेटण्याची अपेक्षा करीत नाहीत म्हणतात, 'याच्याऐवजी एखादा अन्य कुरआन आणा अथवा यांच्यात काही बदल करा.' हे पैगंबर (स.) त्यांना सांगा, माझे हे काम नव्हे की मी आपल्याकडून याच्यात काही फेर-बदल करावा. मी तर केवळ त्या दिव्य प्रकटनाचे अनुसरण करणारा आहे, जे माझ्याकडे पाठविले जाते. मी जर आपल्या पालनकर्त्याची अवज्ञा केली तर मला एका मोठ्या भयंकर

अशा दिवसाच्या यातनेची भीती आहे.'' *(दिव्य कुरआन, १० : १५)*

दुसरी गोष्ट अशी की मानवाने निर्माण केलेले कायदे वेळ आणि परिस्थितीचे द्योतक असतात. ते काळ आणि परिस्थितीच्या प्रभावापासून मुक्त नसतात. त्यांच्यात मोठी लवचिकता असते. ते काळानुसार बदलत असतात. मानवी कायद्यांत लवचिकता असणे म्हणजे ती त्यातील त्रुटी आहे जी बदलत्या काळात त्यावर कर्म करण्यास अपात्र बनविते. परंतु ज्याने इस्लामचा शुद्ध अंत:करणाने अभ्यास केला आहे तो या वास्तवास कधीच नाकारू शकत नाही की दिव्य कुरआनाने स्वत:स एका कायमस्वरुपी धर्माच्या स्वरुपात सादर केले व ज्यामध्ये कयामत (महाप्रलय) पर्यंत परिवर्तन घडणे शक्य नाही. इज्तेहाद (विचारसाकल्य) म्हणजे कुरआनच्या नियमांना बदलण्याचे नाव नसून या नियमांना बदलत्या परिस्थितीवर लागू करण्याचे कौशल्य व त्याच्या प्रकाशात व मार्गदर्शनात नवीन नियमांचा शोध लावणे आहे. हे काम स्वतंत्र विचारसरणी व स्वैर विचारसहित शक्य नसून त्या नियमांच्या मर्यादांचे पालन करणे आवश्यक आहे जे इस्लामने निर्माण केले आहेत.

येथे एक प्रश्न राहून-राहून डोक्यात येतो, तो म्हणजे शेवटी या सुधारकांना स्त्रीचे अधिकार आणि मुस्लिमांची सामाजिक सुधारणेची एवढी काळजी का लागली? मुस्लिमांमध्ये भरपूर बिघाड आहेत. श्रद्धेच्या बाबतीतही आणि कार्याबाबतीतही बिघाड आहेत. त्याचप्रमाणे नैतिक आणि व्यावहारिक बिघाड आहेतच. परंतु हा सुधारक या सर्व बिघाडांना दूर करण्याऐवजी मुस्लिम स्त्रीवर होत असलेल्या अत्याचार व अन्यायावरच का चिंतित आहे?

या मंडळीच्या बुद्धी व विचारधारेचे निरीक्षण केल्यास याचे एक कारण लक्षात येते की त्यांच्या विचारानुसार मानवाच्या जीवनाचे उद्दिष्ट व त्याचे लक्ष्य हे पाश्चात्यांनी निश्चित केलेले उद्दिष्ट आणि लक्ष्य आहे. म्हणून त्यांनीच निश्चित केलेला मार्ग यांनी स्वीकारला आहे. त्यांचे एक स्पष्ट वैशिष्ट्य हे की धर्म एक निरर्थक बाब आहे व त्याचा आपल्या जीवनाशी सुतराम संबंध नाही. कोणाला जर रस असलाच तर त्याने धर्माला केवळ त्याच्या व्यक्तिगत जीवनापर्यंतच मर्यादित ठेवावे. सामूहिक जीवन त्यापासून मुक्त असावे. जोपर्यंत मानव धर्माच्या बंधनात जखडलेला आहे, भूतकाळाच्या अंधकारमय युगात पडलेला असेल आणि विकासाचे मार्ग त्याच्यासाठी बंद असतील. आजच्या काळात त्याला जगण्याचा अधिकार नाही. हे सर्व इस्लामी अनुयायांना याच मार्गावर चालविण्याचे इच्छूक आहेत. याकरिता प्रथम पावलाच्या स्वरूपात कदाचित ते 'समाजसुधारणे'स

जास्त लाभकारी समजतात आणि मुस्लिम स्त्रीच्या अधिकाराच्या माध्यमाने त्यांना या क्षेत्रात यशस्वितेची जास्त आशा आहे. कारण जोपर्यंत मुस्लिम स्त्री धर्माच्या प्राचीन कल्पनेच्या 'दलदली'मध्ये फसलेली आहे व नवीन पिढीला अल्लाह आणि पैगंबरांचे दासत्व आणि त्यांच्या आदेशांचे पालन करण्याची शिकवण देत आहे तोपर्यंत धर्माची बंधने इतकी सैल होणार नाहीत की इस्लामच्या अनुयायांना त्यांच्यात हजारो दुष्कर्म असूनही त्यांच्या मार्गाची दिशा बदलणे शक्य होईल. त्यांची दिशा बदलणे केवळ अशा प्रसंगीच शक्य होईल जेव्हा स्त्रीच धर्माच्या दिशेत असलेले तिचे तोंड वळवील व आपले अधिकार मिळविण्यासाठी धर्माविरुद्ध रणशिंग फुंकेल. वस्तुस्थिती अशी आहे की विरोधक त्यांच्या उद्दिष्टात यशस्वी झालेले नाहीत आणि त्यांना यशस्वी होण्याची आशा बाळगण्याची गरजसुद्धा नाही. याचाच राग ते धार्मिक नेत्यांवर काढतात व त्यांना अज्ञानी, प्राचीनवादी आणि मूलतत्ववादी यासारख्या संबोधनांद्वारे संताप व्यक्त करीत असतात. त्यांच्या मुखाद्वारे व लेखणीद्वारे निघालेला प्रत्येक शब्द 'प्रमाणपत्र' आहे आणि आधुनिक काळाने त्यास विस्तारण्याची व्यवस्था केलेली आहे. म्हणून हे सर्व प्रयत्न विकास आणि संस्कृतीच्या नावावर मोठ्या बिनधास्तपणे विस्तारीत करण्यात येत आहेत.

काहीजण स्वत: धार्मिक वृत्तीचे आहेत आणि पाश्चात्य संस्कृतीच्या कटू अनुभवांपासून दहा पावले दूर राहू इच्छितात. परंतु चारही बाजूंनी या संस्कृतीचा विळखा एवढा घट्ट आहे की ते तिच्या प्रभावापासून सुरक्षित राहू शकत नाहीत. हळूहळू त्यांच्या समाजजीवनात बदल होत आहे आणि पाश्चात्य संस्कृतीचा विळखा घट्ट होत आहे. परंतु अजूनही ते या बाबतीत समाधानी व आनंदित आहेत की पाश्चिमात्यांच्या अनुकरणाच्या स्पर्धेत सामील होऊनसुद्धा तिच्या वाईट प्रभावापासून त्यांचे समाजजीवन सुरक्षित आहे व यापुढेसुद्धा असेच सुरक्षित राहील. परंतु हे गैरसमज आहेत जे जास्त काळ टिकू शकणार नाही. अद्यापपर्यंत त्यांना पाश्चात्यांचे कडू फलित भोगावे लागले नसतील तरी हे केवळ इस्लामचे परिणाम आहेत जे या संस्कृतीच्या परिणामांना प्रगट होऊ देत नाहीत. जेव्हा हे परिणाम संपतील तेव्हा पाश्चात्य संस्कृती तिच्या सर्व दुष्कर्मांसहित त्यांच्या घरांत नांदणार आहे. वादळाच्या पूर्वानुमानांना पाहून जो माणूस सावध होणार नाही व आपल्या घराचे संरक्षण करणार नाही, त्याचे घर वादळाच्या एका तडाख्याने नेस्तनाबुद होईल आणि कोणीही त्यास वाचविण्यासाठी येणार नाही.

आता आपण काही ठळक आक्षेपांचा थोड्या तपशीलासह आढावा घेऊ या, जे स्त्रीच्या अधिकारावर घेण्यात येत आहेत.

पुरुषाचे शासन

इस्लाम धर्माने वैवाहिक जीवनाच्या प्रत्येक बाजूवर सविस्तर चर्चा केली आहे आणि परिवाराचे एक सुनियोजित स्वरुप प्रस्तुत केले आहे. यावर एक आक्षेप हा आहे की यामध्ये पुरुषास असामान्य अधिकार देण्यात आले आहेत आणि स्त्रीचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यात आले आहेत. पुरुष हा राज्यकर्ता आहे आणि स्त्री त्याच्या हाताखालची दासी आहे. पुरुष तिच्यावर वाटेल तसे राज्य करु शकतो. जोपर्यंत ती विवाहबंधनात बांधलेली आहे ती त्याच्याविरुद्ध एक पाऊलसुद्धा उचलू शकत नाही. हे चित्र जेवढे भीषण आहे तेवढेच वास्तवापासून दूर आहे. या बाबतीत इस्लामच्या शिकवणीस समजून घेण्याचे कदाचित एवढे प्रयत्न झाले नाहीत जेवढे या शिकवणीस विद्रुप करण्याचे प्रयत्न झाले आहेत व चालू आहेत.

पती-पत्नी हे जिव्हाळ्याचे व प्रेमाचे संबंध आहेत

सर्वप्रथम या विषयाच्या धार्मिक आणि नैतिक बाजूवर चर्चा करू या. हाच विषय इस्लामच्या पारिवारिक व्यवस्थेत मूलभूत महत्त्वाचा आहे. इस्लाममध्ये पती-पत्नी संबंध हे जिव्हाळा आणि प्रेमाचे संबंध आहेत. ज्यामध्ये दोघे एक दुसऱ्यांशी सुखासमाधानाने राहणे, आपसातील गरजा पूर्ण करणे व एक दुसऱ्यांना प्रेमळ सहकार्य करणे आणि शांतीपूर्ण जीवन व्यतीत करण्याचे प्रयत्न करणे होय. दिव्य कुरआनने प्रेम भावनांना निसर्गाच्या गुणधर्मांपैकी एक मोठा गुणधर्म म्हटले आहे. दिव्य कुरआनात म्हटले आहे,

''त्याच्या संकेतचिन्हांपैकी हे आहे की, तुमच्यासाठी तुमच्यामधून पत्नी बनविल्या, जेणेकरून तुम्ही त्यांच्यापासून संतोष प्राप्त करावा. आणि तुमच्या दरम्यान प्रेम व करुणा उत्पन्न केली. निश्चितच यात बरीच संकेतचिन्हे आहेत त्या लोकांसाठी जे मनन व चिंतन करतात.'' *(दिव्य कुरआन, ३० : २१)*

एका दुसऱ्या ठिकाणी पती-पत्नीस एक दुसऱ्यांचा 'पोषाख' म्हटले आहे. दिव्य कुरआनने म्हटले की या वर्णनात महीम अर्थपूर्णता आहे. पोषाखांची काही वैशिष्ट्ये आहेत. दिव्य कुरआन हीच वैशिष्ट्ये पती-पत्नी दरम्यान पाहू इच्छितो. पोषाखाचे एक वैशिष्ट्य हे आहे की पोषाख शरीराशी चिटकून राहतो. त्याच्या व शरीराच्या दरम्यान कोणतीच वस्तू अडसर नसते. हीच अवस्था पती-पत्नी यांच्या

संबंधाची असते. भौतिक संबंधांच्या या विश्वात काही बाबतीत जी जवळिकता या संबंधामध्ये आहे ती इतर दुसऱ्या संबंधामध्ये आढळत नाही. पोषाखाचे दुसरे वैशिष्ट्य असे आहे की तो मानवाला विविध ऋतुच्या प्रतिकूल वातावरणात अर्थात ऊन, पाऊस व थंडीपासून बचाव करतो. पती-पत्नीचे संबंधसुद्धा पती-पत्नीपैकी कोणीही अडचणीत आल्यास त्या अडचणीपासून त्याचा बचाव करावा. जीवनाच्या कोणत्याही प्रसंगात एक दुसऱ्यांची मदत करून शक्य होईल तेवढे शांतीचे व प्रेमळ सहकार्य करावे. पोषाखाचे तिसरे वैशिष्ट्य असे की तो शरीर झाकण्याचे काम करतो. मानवाच्या शरीराचे जे अवयव झाकण्याजोगे आहेत व ज्याच्या विवस्त्र होण्यामुळे मानवाला लाज वाटते, ते अवयव पोषाखामुळे झाकले जातात. हीच अवस्था पती व पत्नीची असावी त्यांना असे कधीच वाटू नये की आपल्या जीवनसोबत्याचे वाईट गुण लोकांसमोर उघड व्हावे व उभयतांना याची लाज वाटावी. पोषाखांचा चौथा गुणधर्म हे आहे की, त्यामुळे मानव सुंदर दिसतो. अशाच प्रकारे स्त्रीचे सौंदर्य पुरुषामुळे व पुरुषांचे सौंदर्य स्त्रीमुळे आहे. चांगल्या वैवाहिक संबंधामुळेच हे जग सुंदर व विभूषित दिसते. याशिवाय हे जीवन अंधकारमय आणि नीरस आहे. अशा प्रकारे कितीतरी प्रगल्भित वास्तवांकडे ही वर्णने इशारा करतात.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पती-पत्नींच्या संबंधांचे विस्तृतपणे वर्णन केले आहे. त्यांनी सद्वर्तनी पत्नीची व्याख्या अशी केली आहे,

''जेव्हा पती तिला पाहील (तेव्हा) त्याला खूष करावे (पतीने) एखादी गोष्ट सांगितल्यास मान्य करावे आणि आपले प्राण व पतीची संपत्ती पतीच्या आवडीविरुद्ध वापरून त्याचा विरोध करू नये.'' (हदीस : मसनद अहमद)

याचप्रमाणे सद्व्यवहारी पतीला उत्तम मानवाची उपमा दिली आहे.

आदरणीय आएशा (रजि.) यांचे निवेदन आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी म्हटले आहे, ''तुम्हांपैकी श्रेष्ठ माणूस तो आहे, जो आपल्या परिवारजणांच्या प्रती चांगला (सद्वर्तनी) आहे मीदेखील आपल्या परिवारजणाप्रती चांगला आहे.''

(हदीस : तिर्मिजी, इब्नेमाजा)

याविषयी पैगंबराची कितीतरी प्रवचने आहेत. (याकरिता माझे 'स्त्री आणि इस्लाम' पुस्तक अभ्यासावे.) या प्रवचनांत जे आदर्श वर्णन करण्यात आले आहे, यावर जर पती-पत्नी दोघांनी जीवन व्यतीत केले तर संपूर्ण परिवार शांती व समाधानाचे केंद्र होईल आणि एका आदर्श समाजाची सहज उभारणी शक्य होईल.

पुरुषच परिवाराचा शासनकर्ता का आहे?

आता प्रत्यक्षात पुरुषाच्या शासनाचा प्रश्न घेऊ या. या जगात प्रत्येक लहान-मोठ्या संस्थाना एका शासक व संचालकाची आवश्यकता असते. जो तिचे सर्व कामकाज शिस्तीत आणि व्यवस्थित चालवू शकतो. संस्थेकरिता फायदेशीर कार्य करणे, त्यातील सभासदांचे हक्क पूर्ण करणे व त्यांच्याशी प्रेम व सहानुभूतीपूर्वक वर्तन करणे या सर्व त्याच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये आहेत. तसेच संस्थाचालकाच्या आदेशांचे आनंदाने पालन करणे, संस्थेच्या फायद्याकरिता सहकार्य करणे व नियमांचे उल्लंघन न करता आणि बंडखोरी व आपसात वाद-विवाद न करता संस्थेच्या निर्णयास अंतिम निर्णय समजून त्याचे पालन करणे हे सभासदांचे कर्तव्य आहे. संस्थाचालकाचा हा दर्जा कोणत्याही एकाच व्यक्तीस मिळू शकतो. जर एकापेक्षा जास्त व्यक्ती या हुद्यास पात्र असल्यास व आपल्या स्वतंत्र अपेक्षावर कामकाज चालविण्याचा हट्ट धरल्यास संस्थेचे अस्तित्व पार विस्कळीत होते. परिवारसुद्धा एक अशीच संस्था आहे व खूप गुंतागुंतीची व्यवस्था आहे. केवळ एकाच पात्र व्यक्तीच्या हातात तिचे सूत्रसंचालन असल्यास त्यामध्ये सुव्यवस्था आणि शिस्त राखली जाऊ शकते. जर मुख्य सूत्रसंचालकाव्यतिरिक्त इतर दुसऱ्या व्यक्तीस हा दर्जा दिल्यास त्या संस्थेचे अस्तित्व धोक्यात येते. प्रश्न केवळ हा आहे की परिवाराची शासनव्यवस्था पुरुषाच्या हाती असावी की स्त्रीच्या हाती? याचे समाधानकारक उत्तर दिव्य कुरआनने खालील आयतीत दिले आहे.

''पुरुष स्त्रियांचे विश्वस्त आहेत. या आधारावर की, अल्लाहने त्यांच्यापैकी एकास दुसऱ्यावर श्रेष्ठत्व दिले आहे. तसेच या आधारावर की, पुरुष आपली संपत्ती (परिवारजणांसाठी) खर्च करतात.'' *(दिव्य कुरआन, ४ : ३४)*

यामध्ये पुरुषाला परिवाराचा सूत्रधार नेमण्याची दोन कारणे वर्णन करण्यात आली आहेत. पहिले कारण हे आहे की, त्यास स्त्रीच्या तुलनेत श्रेष्ठत्व देण्यात आले आहे. दुसरे कारण हे आहे की तो स्वतःची कमावलेली धनसंपत्ती खर्च करतो. याचा स्पष्ट अर्थ असा की दिव्य कुरआनने परिवाराच्या सूत्रधाराकरिता पुरुषाची निवड कोणत्याही द्वेषाच्या व भेदभावाच्या आधारे केली नसून त्याच्या कार्यक्षमता व आर्थिक जबाबदारी पार पाडण्याच्या क्षमतेवर केली आहे. आता आपण या दोन्ही विषयांचा गंभीरपणे अभ्यास करू या.

पुरुष जास्त शक्तिशाली व कार्यक्षम आहे

स्त्री आणि पुरुषाची शारीरिक व मानसिक स्थितीच्या तुलनात्मक अभ्यासातून हे सिद्ध होते की परिवाराच्या जबाबदाऱ्यांचे ओझे पेलण्याकरिता ज्या शक्ती आणि कार्यक्षमतेची आवश्यकता आहे, ती स्त्रीच्या तुलनेत पुरुषामध्ये निश्चितच जास्त आहे. तो अर्थार्जनाकरिता जास्त धावपळ करू शकतो. शेतीवाडी, उद्योग व निर्मिती आणि इतर क्षेत्रात कष्टदायक कामे करू शकतो. जीवनाच्या मार्गात येणाऱ्या संकटांना समर्थपणे तोंड देणे व त्यावर यश संपादन करण्याची क्षमतासुद्धा त्याच्यात जास्त असते. एवढेच नव्हे तर केवळ स्त्रियांनी करायची असलेली कामे जी एका काळापासून तीच करीत आलेली आहे व त्यावर तिचीच मक्तेदारी आहे, ती कामेसुद्धा पुरुष मोठ्या कौशल्याने व झपाट्याने पार पाडतो. उदाहरणार्थ, स्वयपाक करणे, शिवण व भरतकाम व इतर कलाकुसरीचे काम वगैरे. स्त्रीचे अंत:करण अगदी नाजुक व प्रेमळ भावनांचे केंद्र आहे. ती आनंददायी आणि दु:खद घटनांमुळे पुरुषाच्या तुलनेत जास्त प्रभावित होते. म्हणूनच असा विचार येतो की अशा घटनांच्या प्रगटीकरणांतही पुरुषाच्या तुलनेत स्त्रीला यशस्वी व्हावयास पाहिजे. परंतु हे एक ऐतिहासिक सत्य आहे की साहित्य, काव्य, कला आणि कौशल्याच्या माध्यमाने या अवस्थांना व भावनांना व्यक्त करण्यामध्ये पुरुषाने जी बाजी मारली तेवढे यश स्त्रीला मिळालेले नाही. कौशल्याच्या सर्वच क्षेत्रांत पुरुषांची मक्तेदारी आहे. असेसुद्धा म्हटले जाऊ शकते की, या सर्व क्षेत्रांवर पुरुषांचाच ताबा असल्यामुळे स्त्रीला विकासाची आणि आपली क्षमता व्यक्त करण्याची संधीच मिळाली नाही. परंतु या उत्तरामध्ये आणखी एक प्रश्न उभा राहतो की या सर्व क्षेत्रांवर पुरुषाचे वर्चस्व कसे स्थापित झाले? आणि स्त्री या स्पर्धेत कशी मागे पडली? हीदेखील वस्तुस्थिती स्वीकार करावीच लागेल की पुरुष प्रत्येक क्षेत्रात आपली कार्यक्षमता व शक्ती जास्त सिद्ध करु शकतो आणि त्याने केलीसुद्धा आहे.

ज्याअर्थी अनुभव या गोष्टीची साक्ष देतो की पुरुषांत स्त्रीच्या तुलनेत जास्त शक्ती व कार्यक्षमता आहे, त्याअर्थी नैसर्गिकदृष्ट्या परिवाराचा सूत्रधार व शासक तोच असायला पाहिजे. पुरुषाचे श्रेष्ठत्व स्वीकार न करणे आणि स्त्री व पुरुषाला प्रत्येक बाज़ूने समान सिद्ध करणे, ही एक प्रकारची पक्षपाती प्रतिक्रिया आहे जी कदाचित वादविवादात तर काहीअंशी चालू शकते, परंतु जीवनकार्यात जास्तकाळ मानवाची साथ देऊ शकत नाही. येथे तात्काळ हे सत्य स्वीकारावेच लागते.

पुरुषच आर्थिक जबाबदारी पूर्ण करतो

आता आपण आर्थिक जबाबदाऱ्यांचा विषय चर्चेला घेऊ या. इस्लामी कायद्यानुसार पुरुषावर स्त्रीचे 'मेहेर' आणि तिच्या उदरनिर्वाह व निवासाची व्यवस्था करण्याची जबाबदारी आहे. याबरोबरच गरजेप्रमाणे स्त्रीचे शिक्षण-प्रशिक्षण, धार्मिक व नैतिक काळजी तसेच तिचा जीव, संपत्ती, मान व अब्रूचे रक्षण करण्याचीदेखील जबाबदारी पुरुषावर आहे.

पुरुष या सर्व जबाबदाऱ्या याकरिता स्वीकारतो की स्त्रीने त्याच्या देखरेखीखाली त्याच्या घराची व्यवस्था सांभाळावी, त्याला सुखशांती द्यावी, त्याच्या मुलांची निगा राखावी आणि शिक्षण व प्रशिक्षणासहित त्यांचे संगोपन करावे आणि एका उत्तम परिवाराच्या उभारणीत त्याला सहकार्य करावे.

अशा तऱ्हेच्या आर्थिक आणि व्यवस्थेच्या जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी पुरुषाला काही अधिकारसुद्धा देण्यात आले आहेत. परंतु हे अधिकार अगदीच अमर्याद नसून त्यांना काही मर्यादाची बंधने निश्चित करण्यात आली आहेत. तो या निश्चित मर्यादांच्या आतच आपले अधिकार वापरु शकतो. यातही शंका नाही की कार्यात्मिक जीवनात याची मात्र शक्यता आहे की पुरुष इस्लामने निश्चित केलेल्या मर्यादांचे उल्लंघन करून आपल्या अधिकारांचा गैरवापर करुन स्त्रीवर अन्याय करू शकतो. परंतु इस्लामसुद्धा या शक्यतेकडे दुर्लक्ष करीत नाही. अशा परिस्थितीत स्त्री इस्लामी कायद्यानुसार पुरुषाला त्याच्या मर्यादाकक्षेत आणू शकते व प्रतिकूल परिस्थितीत ती पतीपासून विभक्त होऊ शकते. अर्थात खुलअ (पत्नीकडून घेण्यास येणारा घटस्फोट) घेऊ शकते.

खरोखरच स्त्री परिवाराची शासनकर्ती होऊ शकते काय?

स्त्रीच्या समर्थनार्थ काहींना असे वाटते की पुरुषाला खाजगी जीवनात जे हक्क व अधिकार आहेत ते सर्व हिरावून घ्यावेत. परंतु जर हे अधिकार त्याच्यापासून हिरावून घेतले तर त्याच्याकडून या गोष्टीची अपेक्षासुद्धा करणे शक्य नाही की तो त्या जबाबदाऱ्या पूर्ण करील ज्या परिवाराच्या सूत्रधाराच्या नात्याने त्याच्यावर आहेत. म्हणून पुरुषाच्या ठिकाणी परिवाराचे सूत्रसंचालन स्त्रीच्या हाती दिले, तिला पुरुषांना असलेले सर्व अधिकार सोपविण्यात आले आणि पुरुषाच्या सर्व जबाबदाऱ्या तिच्यावर लादण्यात आल्या तरीसुद्धा जोपर्यंत स्त्री या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडू शकत नाही तोपर्यंत तिला परिवाराचे सूत्रधार मानण्याचा प्रश्नच येत नाही.

असेही म्हटले जाते की, स्त्रीला उदरनिर्वाह आणि घरखर्च देण्याचा आता प्रश्न संपला आहे. कारण आता स्त्री पैसा कमवू लागली आहे आणि ती आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र आहे. परंतु या परिस्थितींकडे दुर्लक्ष करण्यात येते की अशा स्त्रियांचे प्रमाण आजसुद्धा नगण्य आहे ज्या आर्थिकरित्या सक्षम आहेत. प्रश्न केवळ स्त्रीच्या रोजी-रोटीचा नाही. मुलांचे संगोपान, त्यांची निगा, शिक्षण-प्रशिक्षण त्यांचा विवाह आणि परिवाराच्या इतर सदस्यांचे वेगवेगळे प्रश्न व त्यांच्या जबाबदाऱ्यांचा सुद्धा आहे. मुख्य प्रश्न हा आहे की स्त्री तिच्या आर्थिक ओझे पेलविण्याव्यतिरिक्त परिवाराच्या सूत्रधाराच्या नात्याने या सर्व जबाबदाऱ्या उचलण्याकरिता तयार आहे का?

यात शंका नाही की जगामध्ये नेहमी अशा स्त्रियादेखील होत्या ज्यांची आर्थिक स्थिती भक्कम होती आणि परिवाराचे व्यवस्थापन त्या उत्तमरितीने चालवू शकत होत्या. अशा स्त्रिया आजही आहेत व यापुढेही असतील. परंतु या संख्यात्मक नगण्य असलेल्या स्त्रियांच्या बाबतीत चर्चा नसून सर्व स्त्रियांविषयी आपण चर्चा करीत आहोत. जाहीररित्या त्यांना त्यांच्या शुभचिंतकांचे सल्ले व समर्थन असूनही त्या आपल्या उदरनिर्वाहाचा अधिकार सोडण्यास आणि परिवारांची जबाबदारी पतीकडून स्वत:वर घेण्यास तयार नाहीत.

'हिजाब'ची बंधने कशासाठी?

'हिजाब'चे नियम

दिव्य कुरआनने स्त्रीच्या गोशा- पडद्याचे नियम विविध ठिकाणी वर्णन केले आहेत. विविध पृष्ठ- संदर्भी असले तरी ते त्यांचे मुद्दे व गरजा स्पष्ट करतात. यामुळे इस्लामचा स्वभाव आणि कल याबरोबरच त्याच्या भूमिकेचेही आकलन होते.

परपुरुषाशी संवादाचे नियम

''पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नीं आपल्या माता आहेत.''

(दिव्य कुरआन, ३३ : ६)

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे जीवन आपल्यासाठी नमूना व आदर्श आहे. त्यांना अल्लाहने सांगितले आहे,

''पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नींनो! तुम्ही सामान्य स्त्रियांप्रमाणे नाहीत. जर तुम्ही अल्लाहचे भय बाळगणारे असाल तर हळू आवाजात बोलत जाऊ नका की विकृत हृदयाचा एखादा माणूस लालसेत पडेल, तर स्पष्ट सरळ बोलणे बोला.'' *(दिव्य कुरआन, ३३ : ३२)*

या आयतीमध्ये त्यांना परपुरुषांशी बोलचाल करण्याची पद्धत व रीत दाखविण्यात आली. या बाबतीत दोन प्रकारे मार्गदर्शन करण्यात आले. एक हे की कोणाशीही बोलताना बोलण्याच्या शैलीत आकर्षकता नसावी व एक प्रकारची कठोरता असावी. अन्यथा कोण्याही दुष्ट अंत:करण असलेल्या व्यक्तीच्या मनात वाईट विचार येऊ शकतात. दुसरे मार्गदर्शन हे की बोलण्यातून केवळ सद्‌वर्तन- सदाचाराचे आदेश निघावे. वाह्यात व निरर्थक गोष्टी व्यक्त होऊ नयेत.

घर हेच स्त्रीचे मूळ कार्यक्षेत्र आहे

याच्यानंतर दिव्य कुरआनने तात्काळ सांगितले आहे,

''आपल्या घरात मर्यादिने राहा आणि गत अज्ञानमूलक काळाप्रमाणे शृंगाराचे प्रदर्शन करीत फिरू नका. नमाज कायम करा. जकात द्या, अल्लाह आणि त्याचे पैगंबर (स.) यांचे अज्ञापालन करा, अल्लाह तर हे इच्छितो की तुम्ही पैगंबराच्या घरवाल्यापासून पाप दूर करावे आणि तुम्हाला पूर्णपणे पवित्र करावे.'' *(दिव्य कुरआन, ३३ : ३३)*

या आयतींमध्ये पैगंबरांच्या पत्नींचे घरात राहणे (यामध्ये गरज असल्यास घराबाहेर पडण्याची बंदी नाही), अज्ञानाच्या बिभत्स संस्कृती व त्याच्या क्लिष्ट प्रथांपासून स्वतःस सुरक्षित ठेवणे, नमाज कायम करणे, जकात देणे आणि जीवनाच्या सर्व बाबतीत अल्लाह व त्याच्या पैगंबरांच्या आदेशांचे पालन करण्याचे आदेश आहेत.

याचा तार्किक अर्थ अशा रीतीने स्पष्ट करण्यात येतो की अल्लाहची ही इच्छा आहे की त्याच्या पैगंबराच्या परिवारजणांचे जीवन नैतिक दुर्वर्तनापासून पवित्र आणि जीवनप्रणाली कार्यात्मक भूमिकेच्या उत्तुंग शिखरावर असावे. हे मुळात पैगंबराच्या पत्नींकरिताच नसून जगातील सर्व स्त्रियांसाठी मार्गदर्शन आहे की त्यांचे सामाजिक जीवन कसे असावे व त्यांनी कोणत्या मर्यादा पाळावयास पाहिजेत!

एखाद्या वस्तूच्या देवाणघेवाणीची पद्धत

दिव्य कुरआनातील 'सूरह अल-एहजाब'च्या या आयतीमधील पुढील भागात आदेशित केले आहे,

''जर तुम्हाला काही मागावयाचे असल्यास पडद्यामागून मागत जा. ही तुमच्या आणि त्यांच्या हृदयांच्या निर्मलतेसाठी अधिक उचित पद्धत आहे.'' *(दिव्य कुरआन, ३३ : ५३)*

या आदेशात व वरील आयतीत 'हिजाब' अर्थात गोशा- परदाचे जे फायदे व कारणे स्पष्ट करण्यात आले आहे, त्यांचा जेवढा संबंध पैगंबराच्या पत्नींशी अर्थात आपल्या मातांशी आहे, त्यापेक्षा जास्त संबंध जगातील इतर सर्व स्त्रियांशी आहे, तो असा की, यामुळे पुरुष आणि स्त्री दोघांची मने अपवित्र भावनांपासून सुरक्षित राहू शकतात.

घराबाहेर 'हिजाब'चे पालन

सूरह अल-एहजाब मध्येच पैगंबराच्या पत्नीं व कन्या यांच्याबरोबरच इतर सर्व श्रद्धावंत स्त्रियांकरिता सुद्धा घरा बाहेर वावरण्याचे नियम वर्णन केले आहेत. ते याप्रमाणे,

''हे पैगंबर (स.) आपल्या पत्नी व मुली आणि श्रद्धावंतांच्या स्त्रियांना सांगा की, आपल्या चादरीचे पदर आपणावर अच्छादुन ठेवत जा. ही अधिक योग्य पद्धत होय. जेणेकरून त्या ओळखल्या जाव्यात आणि त्रास दिला जाऊ नये. सर्वश्रेष्ठ अल्लाह क्षमाशील व कृपाळू आहे.''(दिव्य कुरआन, ३३ : ५९)

या आयतीमध्ये घराबाहेर पडल्या नंतर 'हिजाब'च्या वापरण्याचा आदेश देण्यात आला आहे. हिजाब म्हणजे एक प्रकारची मोठी चादर ज्या मध्ये संपूर्ण शरीर झाकले जाऊ शकते. या चादरीच्या वापरण्याचा तात्विक लाभ अशा प्रकारे वर्णन करण्यात आला आहे की, यामुळे ती पवित्र ख्याली, सदाचारी आणि कुलीन स्त्री वाटते. आणि त्यांना छेडण्याची व त्यांच्यावर हात घालण्याची कोणाची हिम्मत होत नाही.

'गज्जे बसर'– नजर खाली ठेवणे व परपुरुषावर कटाक्ष न टाकणे

दिव्य कुरआनच्या सूरह नूर मध्येसुद्धा गोशा–पड्याचे नियम वर्णन करण्यात आले आहेत. या नियमांची सुरुवात 'गज्जे बसर'च्या आदेशाने झाली आहे. गज्जे बसर म्हणजे आपल्या नजरा खाली ठेवणे आणि परपुरुषावर दृष्टी न टाकणे होय. दिव्य कुरआनने सांगितले आहे,

''श्रद्धावंत पुरुषांना सांगा की त्यांनी आपल्या दृष्टीची जपणूक करावी. आणि आपल्या लज्जास्थानांचे संरक्षण करावे, ही त्यांच्यासाठी अधिक पवित्र पद्धती आहे. जे काही ते करतात अल्लाह त्याची खबर राखणारा आहे.''

(दिव्य कुरआन, २४ : ३०)

नजरा-नजरीची क्रीडा ही माणसाला व्यभिचाराच्या मार्गी लावते. करिता 'गज्जे बसर' हे व्यभिचारापासून सुरक्षित राहण्याचे कणखर हत्यार आहे. यामुळे सदाचार व पावित्र्य आणि सद्वर्तनाचा मार्ग सुकर होतो. म्हणूनच 'गज्जे बसर' बरोबर 'हिफ्जे फरुज' म्हणजेच आपल्या लैंगिग अवयवांना व्यभिचारापासून सुरक्षित ठेवण्याचा आदेश आहे. कारण की या दोन्हींचे गाढ संबंध आहेत.

'गज्जे बसर'चा हा आदेश स्त्री व पुरुष दोघांना आहे. म्हणून पुरुषांनंतर लागलीच स्त्रियांनासुद्धा हा आदेश देण्यात आला आहे. याबरोबरच हेसुद्धा सांगण्यात आले की, आपल्या सौंदर्याचे प्रदर्शन आपल्या जवळच्या व्यक्तीशिवाय इतर कोणासमोरही करू नये.

दिव्य कुरआनने सांगितले आहे,

''श्रद्धावंत पुरुषांना सांगा, त्यांनी आपल्या दृष्टींची जपणूक करावी आणि आपल्या लज्जास्थानांचे रक्षण करावे. आणि आपला साज शृंगार दर्शवू नये. त्या व्यतिरिक्त जे सहजासहजी प्रकट होईल आणि आपल्या छातीवर आपल्या ओढणीचा पदर घालून ठेवावा. त्यांनी आपला साज शृंगार प्रकट करू नये, परंतु केवळ मात्र आपल्या पतींसमोर....... आपले पाय जमिनीवर आपटत चालू नये की जेणेकरून त्यांनी जो आपला शृंगार लपविलेला आहे त्याचे ज्ञान लोकांना होईल. हे श्रद्धावंतांनो, तुम्ही सर्वजण मिळून अल्लाहजवळ पश्चताप व्यक्त करा, अपेक्षा आहे की, सफल व्हाल.'' *(दिव्य कुरआन, २४ : ३०-३१)*

'महरम' व्यक्तीशी वर्तनाचे नियम

यानंतर अशा व्यक्तींचा उल्लेख आहे. ज्यांच्या समोर स्त्री आपल्या सौंदर्याचे प्रदर्शन करू शकते. या 'महरम' व्यक्तींमध्ये एकूण सात जवळचे नातेवाईक आहेत. ते याप्रमाणे १) पिता, २) पतीचा पिता (सासरा), ३) मुलगा, ४) सावत्र मुलगा, ५) भाऊ, ६) पुतन्या, ७) भाचा, मामा व चुलता हे नातेवाईक स्त्रीसाठी 'महरम' आहेत. म्हणजे या सात नातेवाईकापैकी कोणाशीही कोणत्याही परिस्थितीत स्त्रीचा विवाह शक्य नाही. यामध्ये 'काका' (चुलता) आणि मामा यांचा पण समावेश आहे. याव्यतिरिक्त 'रझाई' नातेवाईकांच्या बाबतीतही हाच आदेश आहे.

याबरोबरच या आयतीत निम्नोल्लेखित व्यक्तीसमोरसुद्धा सौंदर्यप्रदर्शनाची परवानगी देण्यात आली आहे. घर व परिवारातील स्त्रिया आणि शेजारील स्त्रिया, अथवा मैत्रिणी, परंतु त्या स्त्रिया धर्म व नैतिकतेच्या दर्जात यांच्यासारखीच असावी.

कारण या ठिकाणी (आपल्यासारखी) चा शब्दप्रयोग झाला आहे. दासी, नोकर-चाकर ज्यांना स्त्रियांत रस नाही व अल्पवयीन मुले यांचा समावेश आहे.

पती आणि पत्नी दरम्यान लैंगिक संबंध असतात. यांच्याकरिता 'हिजाब'च्या बाबतीत 'तो' आदेश नाही 'जो' दुसऱ्यांकरिता देण्यात आला आहे. ते एक दुसऱ्यांच्या संपूर्ण शरीरांपासून लैंगिक सुख भोगू शकतात. 'महरम' नातेवाईकासमोर आणि ज्यांचा वर उल्लेख करण्यात आला आहे, यांच्या समोर स्त्रीला त्यांच्याशी असलेले संबंध आणि वयोमानाप्रमाणे त्यांच्या समोर नटण्याची व चांगले सुशोभित राहण्याची परवानगी आहे.

चालण्या-फिरण्याचे नियम

आयतीच्या शेवटी असे मार्गदर्शन करण्यात आले की स्त्रीने तिच्या चालण्या फिरण्यातूनही तिच्या सौंदर्याचे प्रदर्शन होऊ देता कामा नये. दिव्य कुरआनने सांगितले आहे,

''आपले पाय जमिनीवर आपटत चालू नये की जेणेकरून त्यांनी जो आपला शृंगार लपविलेला आहे. त्याचे ज्ञान लोकांना होईल. हे श्रद्धावंतानो! तुम्ही सर्वजण मिळून अल्लाहजवळ पश्चात्ताप व्यक्त करा अपेक्षा आहे की सफल व्हाल.'' *(दिव्य कुरआन, २४: ३१)*

आधुनिक काळात 'हिजाब' स्वीकारणीय नाही

आधुनिक काळात हिजाबची ही शिकवण 'पुरातन काळाचे स्मरण' आणि अस्वीकारणीय आहे. तो यास स्त्री-स्वातंत्र्याच्या विरुद्ध आणि तिच्या विकास मार्गातील अडसर समजतो. आज काळ बदलला आहे. आणि नवीन मागण्यासमोर येत आहेत. जोपर्यंत स्त्रीला या बंधनांतून मुक्ती मिळत नाही तोपर्यंत ती वर्तमान परिस्थितींचा व त्याच्या आव्हानांचा मुकाबला करू शकत नाही व विकासही करू शकत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे.

स्त्रीमध्ये बिनधास्ततेची मानसिकता निर्माण केली गेली

आधुनिक काळाच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांमध्ये एक वैशिष्ट्य हेसुद्धा आहे की तिने 'स्त्री'मध्ये निर्लज्ञता आणि अश्लीलतेची मानसिकता रुजविली. ही मानसिकता जेवढ्या जोमाने वाढत गेली. तिच्या अश्लीलतेत ही वाढ होत गेली. स्त्रीच्या अश्लीलतेमुळे पुरुषाला लैंगिक रस मिळतो. म्हणून पुरुषानेदेखील या

अश्लीलतेविरोधात पाऊल उचलले नाही व आक्षेपही घेतला नाही. व त्यावर प्रतिबंधही लावला नाही. या उलट त्याने अश्लीलतेच्या वृक्षाला खतपाणी दिले. त्याने स्त्रीच्या विचारात ही कल्पना रुजविली की तिचे अप्रतीम सौंदर्य, चारचौघात उघडपणे प्रदर्षित व्हावयास हवे. तिला सात पडद्या आड ठेवणे म्हणजे तिच्या सौंदर्याचा घोर अपमान आहे. पुरुषांशी परदा करणे अथवा त्यांच्याशी आपले सौंदर्य लपविणे अनैसर्गिक बाब आहे. तिचा पोषाख तिच्या शरीर सौंदर्याच्या वैशिष्ट्यांना लपविण्यासाठी नसावा तर तिच्या सौंदर्यास प्रदर्शित करणारा असावा. की जेणेकरून पुरुष तिच्याकडे आकर्षित व्हावा आणि त्याच्या निद्रित भावना जागाव्यात व तो तिच्याकडे वेड्या सारखा धावत यावा. ज्या पोषाखात मन मोहिनीची ही शक्ती नाही तो पोषाख स्त्रीच्या नाजुक व आकर्षक शरीरावर शोभत नाही. याचा परिणाम असा झाला की स्त्रीच्या पोषाख निर्मितीत अशा पद्धती रुजल्या की तिच्या शरीराचे सर्व चढ-उतार स्पष्ट होऊ लागले. व अशा अवयवांचेसुद्धा दर्शन घडू लागले. ज्यांचे दर्शन या पुर्वी वाईट व घृणास्पद समजण्यात येत. आता तिच्या शरीरावर कपड्यांऐवजी थोडे फार धागे-दोरे व तेही अतिशय नाक मुरडत शेष राहिलेले आहेत व स्त्री पोषाखापासून पूर्ण स्वतंत्र झालेली दिसत आहे. काही दिवसांनी हे धागे-दोरे पण लांब कचराकुंडीत फेकले जातील. कारण की अश्लीलतेचा प्रसार व प्रचार जोमाने सुरु आहे. याच्यासाठी तर्किक पुरावे सादर करण्यात येत आहेत. याला अगदी 'मानवीय स्वभाव' म्हटले जाऊ लागले. आणि महत्त्वाची गोष्ट अशी की स्त्रीने या मार्गावर वाटचाल सुरु केली. मानवीय स्वभावाचा अपमान या जगाने यापूर्वी कधीच अनुभवला नाही.

पुरुषाचा पोषाख हा शरीरास जास्त झाकणारा आहे

आधुनिक काळाने अश्लीलतेस कला व कौशल्याचे स्वरूप दिले. आणि तिच्या विकासाकरिता असे वातावरणनिर्माण केले की स्त्रीने लाज व शरमेचे आभूषण व अलंकार फेकून दिले आणि बिनधास्तपणे अर्धनग्न होऊन वावरू लागली. परंतु आश्चर्याची बाब आहे की पुरुषाने मात्र अश्लीलतेची ही कला अंगीकारली नाही. कारण पुरुषाच्या पोषाखात एवढी अश्लीलता नाही जेवढी स्त्रीच्या पोषाखात आढळते. या उलट त्याचा पोषाख संस्कृतीच्या विकासाबरोबर जास्तच वाढत गेला. तो स्वत: वातावरणाला व हवामानाला अनुसरून शरीरभर जाडजुड कपडे वापरु लागला. आणि बिचाऱ्या स्त्रीस कडक हिवाळ्यांतही शरीर झाकून घेण्याची परवानगी देत नाही. त्याचा पोषाख तर सैल आणि आरामदायक असतो. परंतु स्त्रीसाठी तो एवढे तंग

व फिट्ट आणि दाटलेले आणि त्रासदायक पोषाख असा निश्चित करतो की, तिच्या शरीराच्या एकूण एक भागाचे मोजमाप घेता यावे व तिला आरामसुद्धा मिळू नये. जाडजुड कपडा वापरणे तिच्यासाठी अयोग्य नाही परंतु स्त्रीला एवढे कष्टदायक आणि पातळ पोषाख वापरण्यास देतो की त्याच्या चाळणीतून तिचे शरीर प्रदर्शन होते. हा पुरुषाच्या वर्तनातील विचित्र विरोधाभास आहे. परंतु स्त्रीने अद्याप ही या दांभिकतेकडे लक्ष दिलेले नाही. वस्तुत: पुरुष पायां पासून डोक्यापर्यंत कितीतरी कपडे वापरतो आणि स्त्रीला भर बाजारात अर्धनग्न अवस्थेत घेऊन फिरतो तेव्हा पुरुषाच्या या दांभिकतेविरुद्ध स्त्रीने बंडाचे रणशिंग फुंकायलाच हवे. परंतु स्त्री तिच्या अज्ञानामुळे या अन्याय व अत्याचारास संस्कृतीची व आधुनिकतेची मागणी समजत आहे. आपल्या शरीर प्रदर्शनाचा पश्चात्ताप करणे तर दूरच उलट यावर ती गर्वाने भारून जाते. आणि संपूर्ण लाडिक वर्तनासहित पुरुषाची साथ देते.

अश्लीलतेच्या या वातावरणात जर एखादी स्त्री इस्लामी मर्यादांचे पालन करते व आपल्या शरीराचे परपुरुषांच्या नजरांपासून रक्षण करते, तेव्हा लिंगपिसाटाचे रक्त खवळते. ती त्याला एक चालते-फिरते शव वाटते ज्यापासून त्याच्या कामभावनांना शांती मिळत नाही. जिच्या शोधात त्याच्या नजरा सगळीकडे भटकत असतात.

आता आपण जरा त्या पुराव्याचा वेध घेऊ या, ज्यांच्या आधारावर गोशा-पडद्याचा विरोध करण्यात येतो.

'हिजाब' नैसर्गिक भावनांवर अंकुश नाही!

एक पुरावा हा देण्यात येतो, (तसे पाहता यामध्ये आता काही दम राहिलेला नाही) की, स्त्री व पुरुषा दरम्यान हिजाब (अर्थात गोशा-पडद्या) मुळे त्यांच्या लैंगिक भावना आतल्या आंतच घुसमटत असतात. आणि परिणामी ते क्लिष्ट गुंतागुंतीत अडकतात. 'हिजाब' मानवाच्या नैसर्गिक भावनावर निरर्थक अंकुष आहे. जेव्हा नैसर्गिक भावनांवर अंकुश लावण्यात येते, तेव्हा संधी मिळताच त्या जास्त जोमाने उफाळलात आणि त्याचे भीषण परिणाम समोर येतात. परंतु हा असत्य आणि बिनबुडाचा सिंद्धात मानवाच्या मानसिकतेविरुद्ध आहे. अनुभव नेहमीच त्याला रद्द करतात. स्वत: पाश्चात्यांच्या अनुभवाने हे सिद्ध केले आहे की बेपर्वा असणे व स्त्री पुरुषांचा आपसात बिनधास्त वावर यामुळे लैंगिक भावना जास्त उफाळतात. आणि व्यभिचार फैलावतो. वस्तुत: स्वैर लैंगिक संबंध पाश्चात्य समाजास लागलेला जीवघेणा व घातक रोग आहे. या कारणाने ज्या प्रकारे परिवारच्या परिवार नष्ट होत आहेत. नैतिक मूल्ये पायाखाली तुडविली जात आहेत

आणि शारीरिक बौद्धिक व मानसिक रोग पसरत आहेत, यामुळे पाश्चात्य संस्कृतीला मोठा झटका बसला आहे. या भयानक परिणामां

ना पाहिल्यावर कोणीही सद्‌विवेक बुद्धी असलेली व्यक्ती गोशा व पडद्याचा विरोध करणार नाही. या उलट 'हिजाब' च्या नियमांना उपयुक्त समजेल. जर हा हिजाबचा कायदा अस्तित्वात नसता तरी त्याच्या स्वभावाने अशा प्रकारच्या कायद्याची निर्मिती करण्यास भाग पाडले असते. आणि स्त्री व पुरुष दोघांना त्याचे पालन करणे आवश्यक वाटले असते.

'हिजाब' विकासाच्या मार्गातील अडसर आहे काय?

असे म्हटले जाते की 'पडदा' मुस्लिम स्त्रीच्या विकासाच्या मार्गातील एक मोठा अवरोध आहे. यामुळेच ती अज्ञान व अविकासाच्या गर्तेत पडली आहे आणि राजकीय, सामाजिक व सामूहिक जीवनात वस्तुत: एकाकी पडली आहे. या बंधनापासून ज्या स्त्रिया मुक्त आहेत, त्यांनी आश्चर्य जनक प्रगती केली आहे व करीत आहेत.

परंतु अडचण अशी आहे की आम्हा मुस्लिमांच्या प्रगतीच्या मार्गात असलेले कितीतरी अवरोध वर्णन करण्यात येत असतात. कोणी पडदा पद्धतीस अडसर समजतो. कोणाजवळ इस्लामची संपूर्ण कौटुंबिक व्यवस्थाच अडसर आहे. जी स्त्रीला घराच्या चार भिंतीत बंदीवान करून ठेवते. कोणाच्या विचारानुसार इस्लामी पूजा व भक्ती मुस्लिमांच्या प्रगतीच्या मार्गातील अडसर ठरते. कारण 'नमाज'मध्ये कामांच्या वेळेत व्यत्यय निर्माण होतो. रोजा (रमाजानचे उपवास) सारख्या कठीण उपासना व भक्तीमुळे आरोग्य धोक्यात येते. आणि 'हज'मध्ये वेळ आणि पैशांचा अनाठायी खर्च होतो. काहींच्या मते इस्लामचे अनैसर्गिक सिद्धान्त अडसर आहेत. बिचारा मुस्लिम आश्चर्यचकीत आहे की कोणाचे ऐकावे आणि कोणाला नाकारावे. बिनधास्तपणे सांगावयाचे असल्यास कितीतरी तथाकथित विद्वान इस्लाम धर्मालाच मुस्लिमांच्या प्रगतीच्या मार्गातील अडसर समजतात. परंतु एक सामान्य मुस्लिम त्याच्या कितीही गफलती व चुका असूनही इस्लाम धर्म सोडण्यास अजिबात तयार नाही.

मग स्त्रीच्या ज्या प्रगतीचा उल्लेख केला जातो. ती प्रगती जर मनोरंजन कौशल्याच्या नावावर अश्लीलता निर्लज्जता आणि नृत्य व संगीतामध्ये असेल तर यात शंका नाहीच की या क्षेत्रात तिने मोठी मजल मारली आणि प्रगतीच्या उत्तुंग शिखरावर पोहोचली. परंतु याकरिता तिला लाज-शरम, विनयशीलता व अब्रू, प्रेम व जिव्हाळा आणि प्रामाणिकता व पावित्र्य यासारख्या उच्च नैतिक मूल्यांचा बळी द्यावा लागला. या मूल्यांची पायमल्ली केल्याशिवाय हा 'विकास' शक्यच नाही. इस्लामचा या बाबतीत एक विशेष दृष्टिकोन आहे. त्याच्या दृष्टिकोनात प्रगती म्हणजे ही आहे की, मानवामध्ये मानवाचे गुणधर्म निर्माण व्हावे. ज्या प्रगतीमुळे हे गुणधर्म नष्ट होतात तिला प्रगती म्हणून स्वीकारले जाऊ शकत नाही.

ही वस्तुस्थिती आहे की वर्तमानकाळात स्त्रीने यापासून विभक्त होऊन विविध ज्ञान व कौशल्यात प्रगती केली आहे आणि ज्ञान व विज्ञानात पारंगत होऊन

सेवा केली आहे. काहींचा असा गैरसमज आहे की पडदा पद्धतीच्या मर्यादेत राहून ही प्रगती शक्य नाही. परंतु हा गैरसमज पर्दा पद्धतीचा अवलंब न केल्याने आणि निर्लज्जतेच्या वातावरणामुळे निर्माण झालेला आहे. आणि चोहीकडे पसरलेला आहे. या वातावरणामुळे विचार बुद्धीत विनाकारण न्यूनगंड निर्माण झाला असून या गोष्टीचे आकलन होत नाही की, स्त्री एखाद्या पवित्र वातावरणात प्रगती कशी करणार? वस्तुस्थिती तर अशी आहे की ही प्रगती पर्द्याच्या बंधनातून मुक्त झाल्यामुळे झालेली नाही. याची कारणे दुसरी आहेत.

एक तर हे की ज्या स्त्रियांनी एखादे महान कार्य बजावले ते त्यांच्या कष्ट, प्रयत्न व कामाच्या प्रती प्रामाणिकपणाचे परिणाम आहेत. त्यांच्या या विशेष प्राविण्याचे कौतुक व प्रशंसा आवश्य करावी. हा तर अल्लाहचा कायदा आहे की जो प्रामाणिकपणे आणि प्रयत्न पूर्वक कष्ट करतो, त्याचे त्याला फळ मिळतेच.

दुसरे हे की वर्तमान संस्कृती ही नग्न संस्कृती आहे. यामध्ये ज्ञान व कौशल्याच्या सवलती केवळ पर्द्यातून मुक्त झालेल्या निर्लज्जाच्या रांगेत उभ्या असलेल्या स्त्रियांनाच मिळतात. अशा प्रकारे आपला हिजाब व 'पर्दा' जपणाऱ्या स्त्रियांसाठी प्रगतीचे मार्ग बंद करण्यात आले आहेत. प्रगतीचा संबंध पर्दा अथवा बेपर्दा असण्याशी नसून सवलतींशी आहे. वर्तमान युगात असा अनुभवसुद्धा आला की पर्दा पद्धत पाळणाऱ्या स्त्रियांनी त्यांना जेवढ्या संधी मिळाल्यात तेवढी प्रगती केली आणि बेपर्दा स्त्रियांच्या मागे राहीली नाहीत.

मग हे की ही बाब केवळ अशा स्थितीत खरी ठरू शकते. जेव्हा स्त्रीने पडद्याच्या मर्यादेत राहून प्रगती केली नसेल. हे एक वास्तव आहे की मुस्लिम स्त्रीने पर्द्याच्या मर्यादांचे उल्लंघन करून एखादे आभिमानास्पद कार्य बजावलेले नाही. आणि त्यांच्यात कोणी आएशा सिद्दीका (रजि.), कोणी अस्मा बिन्त अबू बकर (रजि.), कोणी फातिमा बिन्त खत्ताब (रजि.) आणि कोणी खन्सा (रजि.) सारख्या प्रगत स्त्रिया जन्मलेल्या नाहीत.

या मर्यादा कक्षांच्या आत राहून एकीकडे त्यांनी ज्ञानाचे उत्तुंग शिखर सर केलेत, तर दुसरीकडे त्यांनी तत्कालीन राजकीय, सामूहिक व सामाजिक कार्यावर आपला प्रभाव टाकला.

या सर्व कार्यात्मक जीवनात त्यांच्यापोटी असे हिरे व जवाहीर जन्मलेत, ज्यांनी इतिहास गाजविला. तसेच ज्ञान व कौशल्याच्या क्षेत्रात अविस्मरणीय कामगिरी केली व त्यांच्या ज्ञान व सांस्कृतिक उपकाराने मानवजात कायमची ऋणी झाली. मग हे सर्व काही अज्ञानी व अशिक्षित स्त्रियांच्या हातून थोडेच घडले?

'हिजाब'च्या मर्यादावर चर्चा व त्यापासून चुकीचे आकलन

पड्दा पद्धतीवर जे आक्षेप घेण्यात येतात त्यांना भिऊन काहीजण तात्काळ पळ काढतात की मुस्लिम विद्वानांनी व मौलवींनी पड्द्याच्या आड नाना प्रकारची बंधने लादली. इस्लाम या बंधनांच्या विरोधात आहे. इस्लामी शरीयतमध्ये स्त्रीचे हात आणि चेहऱ्यावर पड्द्याचे बंधन नाही. ती परपुरुषासमोर यांना उघडू शकते. आणि मग या परवानगीच्या वर्तुळास वर्तमान युगात स्त्रियांना मिळालेल्या स्वातंत्र्यापर्यंत विस्तारित करतात.

गोष्ट केवळ एवढीच आहे की इस्लामी विधीच्या विद्वानांदरम्यान, या प्रश्नाबाबतीत एवढासा वाद आहे की हिजाबच्या मर्यादेत स्त्रीचा चेहरा व हात आहे अथवा नाही. स्त्रीचा चेहरा व हात उघडण्याच्या कायद्यास जरी आपण स्वीकारले तरी ज्या 'स्वतंत्र वातावरणात' स्त्री या वेळी जीवन जगत आहे. त्याच्या नैतिक असण्यास कोणतेही निमित्त व कारण इस्लामकडून उपलब्ध करून देणे शक्य नाही.

इस्लामधर्म स्त्री पुरुष संबंधांना एका विशिष्ट दृष्टिकोनातुन पाहतो. 'हिजाब' याचाच एक भाग आहे. हा दृष्टिकोन वर्तमानकाळाच्या दृष्टिकोनाशी अगदी वेगळा असून प्रत्येक पावलावर त्याचा विरोध करतो.

इस्लाम धर्माने स्त्रीला लक्ष पुरविण्याचे मूळ केंद्र तिचे राहते घर असल्याचे सांगितले आहे. तो ही बाब पसंत करीत नाही की स्त्रीने गरज नसताना घरा बाहेर पडावे. वर्तमान काळ ही गोष्ट मान्य करण्यास तयार नाही की स्त्रीचे कार्यक्षेत्र तिचे घरच असावयास हवे. इस्लाम स्त्री-पुरुषांनी मिळून काम करण्यास विरोध करतो. आणि नेमकी हीच बाब वर्तमानकाळाचा आवश्यक घटक आहे. इस्लामने 'गज्जे बसर'चा आदेश दिला आहे आणि परिस्थिती अशी आहे की वर्तमान काळाच्या विचारसरणीस संपूर्ण कार्यामध्ये ही कल्पना करणे पण शक्य नाही की 'परस्त्रीवर दृष्टी पडताच तात्काळ दृष्टी खाली करावी.' काही नवल नाही की तो फुकटात मिळालेल्या त्या कटाक्षाच्या लज्जतीने वंचित राहण्यास अरसिकता घोषित करणार. इस्लाम धर्म हा शिक्षण प्रशिक्षण, क्रीडा व मनोरंजनाच्या क्षेत्रात स्त्री पुरुषांच्या एकत्रीकरणास त्यांच्या नैतिकतेप्रति विनाशक व घातक मानतो आणि परिस्थिती अशी आहे की वर्तमान युगातील सर्व व्यवस्था स्त्री पुरुषांच्या एकत्रीकरणावरच आधारित आहे. आणि यास त्याचे वैशिष्ठ्य समजले जाते. इस्लामचा आदेश आहे की स्त्रीने घराबाहेर निघाल्यावर रस्त्याच्या कडेने आणि पुरुषांशी दूर राहून चालावे. पूजा (अर्थात नमाज वगैरे) मध्येसुद्धा त्याने दोघांना एक दुसऱ्यापासून वेगळे राहण्याची

शिकवण दिली. परंतु वर्तमानकाळ स्त्रीबरोबर भेदभावाच्या वर्तनाच्या पक्षाचा नाही. तो रस्त्यांवर, बाजारात, कार्यालयात, सामाजिक व सामूहिक कार्यक्रमात स्त्रीला पुरुषाच्या खांद्यास खांदा लावलेली पाहण्याचा इच्छुक आहे. वस्तुस्थिती अशी आहे की केवळ 'हिजाब' नव्हे. पुष्कळ आदेशांचा भंग केल्याशिवाय कोणतीही मुस्लिम स्त्री जीवनाच्या स्पर्धेत त्या स्वातंत्र्यासहित भाग घेऊ शकत नाही. ज्या स्वातंत्र्याबरोबर आजची स्त्री भाग घेत आहे.

वर्तमानकाळ स्त्रीला स्वैर जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित करीत आहे. इस्लम धर्म नैतिक मर्यादांना तिच्याकरिता आवश्यक समजतो. दोन्हींचे लक्ष्य अगदी डोळ्यांसमोर आहे. ती सहजरित्या तिच्या प्रवासाची दिशा व उद्दिष्ट निश्चित करण्याचा निर्णय घेऊ शकते.

स्त्रीचा आर्थिक प्रश्न

स्त्रीचे आर्थिक प्रयत्न

असे म्हटले जाते की, 'इस्लाम'मध्ये स्त्रीला अर्थार्जनाचे प्रयत्न करण्याचे स्वातंत्र्य नही. परंतु वास्तव हे आहे की हा तिचा नैसर्गिक आणि मूलभूत हक्क आहे की, तिने स्वतंत्ररित्या अर्थार्जनाचे प्रयत्न करावे आणि उद्योग व निर्मिती, व्यापार व कृषी वगैरे सर्वच वाणिज्यिक क्षेत्रात पुरुषाप्रमाणेच चिकाटीने कार्यरत व्हावे. याशिवाय तिला आर्थिक प्रगती आणि स्थैर्य मिळू शकत नाही व ती नेहमीच पुरुषाच्या हाताखाली राहील आणि समाजात किरकोळ समजली जाईल. या सिद्धान्तानुसार पश्चिमी देशांत स्त्री व पुरुषांची वेगवेगळी असलेली कार्यक्षेत्रे एकत्रित झालीत आणि स्त्री आर्थिक क्षेत्रात पुरुषासोबत कार्यरत झाली. पूर्वेकडील राष्ट्रेसुद्धा तीव्र गतीने याच दिशेने धावत आहेत आणि याचे परिणाम परिवार व समाजास भोगावे लागत आहेत. पश्चिमी देशांमध्ये तर याच्या तीव्रतेची जाणीव होत आहे परंतु पूर्वीय देश अजूनही अनुभव घेण्याच्या तंद्रीत चेतनाहीन पडलेले आहेत.

अबला आणि सशक्ताचा सामना

येथे या वास्तवाकडे पार दुर्लक्ष करण्यात येत आहे की स्त्री ही अबला आणि नाजूक स्वभावी आहे. ती कठीण व कष्टाची कामे करू शकत नाही. तिच्यावर अशा कठीण कामांचा भार टाकणे म्हणजे घोर अन्याय होईल ज्यांना उचलण्यासाठी ती शारीरिक आणि मानसिकरित्या सक्षम नाही. तिच्या तारुण्यात तिला गर्भ, मासिक पाळीसारख्या त्रासदायक अवस्था सहन कराव्या लागतात. परिणामी तिचे आरोग्य प्रभावित होते आणि तिची कार्यक्षमता विघटित होत जाते. या कटकटीत तिचे संपूर्ण तारुण्य गुदमरून जाते. जेव्हा या अवस्था संपतात तेव्हा म्हातारपण जवळ आलेले असते. तिच्यातील शक्ती व उत्साह कमी झालेला असतो. वर्तमान युगात या बाबतीत विचित्र विरोधाभास पहायला मिळाला. एकीकडे तर मौखिक दावा तर असा केला जातो की स्त्री प्रत्येक प्रकारचे काम व कार्य करण्यास पात्र व सक्षम आहे. दुसरीकडे ही परिस्थिती पाहावयास मिळते की कार्यात्मक जीवनात तिला नाजुक स्वभावाचीच समजून तिच्या ऐपतीप्रमाणे काम देण्यात येते. अर्थात हलके फुलके काम देण्यात

येते. आणि कठीण व कष्टदायक कामे तिच्याकरिता अयोग्य समजले जाते. आज तिला जास्तीत जास्त दुकानावर माल किंवा वस्तू विक्रीची कामे देण्यात येतात. तर कोठे कारकुन अथवा सचिव, टायपिस्ट वा कम्प्यूटर ऑपरेटर, स्वागतिका, हवाई सुंदरी व यापेक्षाही जास्त असल्यास शिक्षिका, डॉक्टर किंवा नर्ससारखे हलकेफुलके काम देण्यात येते. याउलट लष्करामध्ये तिचे अस्तित्व नाही. अवजड मशीनवरील काम तिला देण्यात येत नाही. ती पायलट व कप्तान बनलेली नाही, अवजड वाहने चालविण्यासाठी तिची निवड होत नाही. साहसी मोहिमेसाठी तिची निवड होत नाही. एवढेच नव्हे तर नाजुक ऑपरेशनचीसुद्धा तिच्यावर जबाबदारी दिली जात नाही व त्यासाठी पुरुषांची निवड करण्यात येते. (आज ह्या क्षेत्रातसुद्धा शिरकाव झालेला आहे.) कारण तिची कार्यक्षमता पुरुषापेक्षा कमी समजली जाते. या कारणास्तव खाजगी संस्थांमधून तिला पगार पुरुषाच्या तुलनेत कमीच देण्यात येतो. ही वस्तुस्थिती त्या देशातीलसुद्धा आहे जेथे एकाच कामासाठी स्त्री व पुरुषाच्या वेतनात फरक करणे कायदेशीर अपराध आहे.

स्पर्धात्मक परिस्थितीचा परिणाम

स्त्रीच्या अर्थिक धडपडीत तिची एक प्रकारे पुरुषाशी स्पर्धाच लागली आहे. आणि स्त्री-पुरुषा दरम्यान प्रेम व जिव्हाळ्याचे वातावरण दुषित झाले व स्पर्धात्मक आणि चढाओढीच्या भावना उदयास आल्यात. वाणिज्य, कृषी, उद्योग व निर्मिती आणि नोकरीमध्ये दोघांत जीवघेणी चढाओढ सुरु झाली. आणि प्रत्येक जण एक दुसऱ्यास पछाडून स्वत: पुढे जाण्याचा प्रयत्न करु लागला. परंतु ही स्पर्धा म्हणजे अबला व सशक्ताच्या दरम्यान आहे. व परिणामी पुरुष आपली शक्ती व कार्यक्षमतेच्या बळावर पुढे आला व अबला स्त्री त्याच्या स्पर्धेत मागे पडली आणि पराजित झाली. या परिस्थिती नुसार हे विसरता कामा नये की प्राचीनकाळा प्रमाणेच आजच्या अत्याधुनिक काळात सुद्धा राष्ट्रांच्या नेतृत्वाचा झेंडा पुरुषांच्याच हाती आहे. महत्त्वाच्या हुद्यावर आणि अधिकारांवर त्यांचीच मक्तेदारी आहे, जीवनाच्या संपूर्ण क्षेत्रावर त्यांचाच पगडा आहे. अबला स्त्रीचा पुरुषांच्या पुढे निघण्याची कल्पनातर लांबच, ती त्याच्या बरोबरीचा दावा सुद्धा करु शकत नाही. काही अल्पशा व नगण्य अपवादामुळे हे वास्तव लपत नाही. कारण की अशा अपवादांची उदाहरणे प्रत्येक युगांत पहावयास मिळतात. वर्तमानकाळातही मिळणारच.

स्त्रीने काय गमावले आणि काय मिळविले?

असे म्हटले जाते की या परिस्थितीत सुद्धा स्त्रीची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा भक्कम आहे. तिच्यात स्वावलंबन आणि आर्थिक स्थैर्य वाढीस लागले आहे. ही गोष्ट बरोबर आहे परंतु हे सत्य ही नाकारता येत नाही की पैसा कमावण्या खातर तिने तिचा धर्म व नैतिकतेचा बळी दिला. आणि ती स्वत:स प्रत्येक खरेदीदारासमोर 'भोगवस्तू'च्या रूपात सादर करण्यास विवश झाली. चार पैसे मिळविण्यासाठी तिला स्वत:चे मोल कमी करावे लागले व आपला मान-सन्मान धुळीस मिळवून पुरुषाखातर पैसा मिळविण्याचे एक स्वस्त साधन बनने भाग पडले. आज व्यापार आणि उद्योग व निर्मितीवर पुरुषांचाच पगडा आहे. मोठमोठे कारखाने व फॅक्ट्रया त्याच्याच हातात आहेत. बाजार व मंडीवर त्याचाच ताबा आहे. एवढेच नव्हे तर मोठमोठे हॉटेल्स, क्लब्ज आणि सिनेमांचे तेच मालक आहेत. अशा प्रकारे संपूर्ण साधन संपत्ती पुरुषाच्याच ताब्यात आहेत आणि स्त्री त्याच्या विस्तारित व्यवसायाला जास्त विस्तारित करण्याचे केवळ मात्र एक साधन आहे. पुरुष आपला व्यापार विकसित करण्यासाठी व आपल्या निर्मितींची जाहिरात व प्रसिद्धी करण्यासाठी तिचा पुरेपूर वापर करीत आहे. परिस्थिती एवढी गंभीर झाली की, हजार रुपयांची वस्तू असो व दोन पैशांची, स्त्रीचे आकर्षक व दिलखेच अदा असलेले चित्र त्याच्यावर अवश्य असतेच. गोष्ट केवळ प्रसिद्धीपर्यंतच थांबलेली नसून स्त्रीला भर बाजारात केवळ यासाठीच बसविण्यात येते की तिने आपल्या नखरेल अदा व मनमोहक हालचालीने पुरुष निर्मित वस्तू विकून पुरुषाचा फायदा करून द्यावा. त्याने उभारलेले हॉटेल्स आणि क्लब्जमध्ये पाहुण्यांचे स्वागत व सरबराई करावी. त्याच्या सिनेमा हॉलमध्ये कंबरडे मोडेपर्यंत नाचून नाचून नाजुक शरीराचे प्रदर्शन करावे आणि प्रसंगी त्याची लैंगिक तृष्णा भागवावी. कटू सत्य हे आहे की स्त्रीने आपल्या अर्थार्जनासाठी यापूर्वी कधीच एवढ्या यातना भोगल्या नसतील.

आधुनिक काळात स्त्रीने अर्थार्जन करणे आवश्यक आहे काय?

स्त्रीची पैसा कमाविण्याची धडपड योग्य व समाज संमत असण्याचे एक कारण हे पुढे करण्यात येते की वर्तमान युगात आर्थिक गरजा इतक्या वाढल्या आहेत की, एकटा पुरुष त्यांची पूर्तता करू शकत नाही. याकरिता स्त्रीनेसुद्धा या कामी हातभार लावला पाहिजे. स्त्री आणि पुरुषाच्या एकत्रित मिळकतीनेच परिवाराचे आर्थिक प्रश्न सुटू शकतात.

या बाबतीत काही गोष्टी दृष्टीसमोर असल्या पाहिजेत.

१) या वेळी प्रत्येकासमोर पाश्चात्य शैलीच जीवनाचा आदर्श आहे. या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी तो उत्सुक आहे. आणि म्हणूनच त्याला वाटते की स्त्री जवळ सुद्धा आवश्यकरित्या अर्थार्जनाचे साधन असावे. परंतु हे अजीबात विसरता कामा नये की पश्चिमी देशात सर्वच कार्यक्षम स्त्रियांना रोजगार उपलब्ध नाही. जास्तीत जास्त तीस ते चाळीस टक्केच स्त्रियांना रोजगार मिळालेला आहे. या रोजगार संपन्न स्त्रिया सुद्धा पुरुषाच्या तुलनेत छोटी मोटी व किरकोळ स्वरुपाची कामे करण्यासाठी विवश आहेत. म्हणूनच त्या परिवाराच्या अर्थिक क्षमतेस वाढविण्याच्या स्थितीत नाहीत. प्रश्न असा आहे की पश्चिमी देशात केवळ अशाच परिवारांच्या गरजा पूर्ण होतात काय ज्या परिवारातील स्त्रीया खूप पैसा कमावितात ? आणि ज्या परिवारातील स्त्रिया पैसा कमावित नाहीत ते परिवार उपाशी आहेत काय? अजीबात नाही ! कारण वस्तुस्थिती अशी आहे की, आजसुद्धा हे काही आवश्यक नाही की स्त्रीच्या अर्थार्जनामुळेच परिवाराच्या गरजा पूर्ण होतील व जर तिने पैसा कमाविला नाही तर पूर्ण परिवार भिकेला लागेल!

२) वर्तमानकाळामध्ये 'गरजांची' यादी लहान नसून एवढी लांबलचक आहे की या मध्ये अत्यावश्यक गरजेच्या वस्तू बरोबरच विलासी वस्तूंचासुद्धा खूप भरणा आहे. व अजूनही ही यादी पूर्ण झालेली नाही. दिवसेंदिवस तिच्यात वाढ होत आहे. माणूस या अवास्तव वाढणाऱ्या यादीनुसार सामान व सामग्री पुरविण्यासाठी रात्र दिवस जिवाचे रान करीत आहे. परंतु एवढे असूनही या गरजा कधीच पूर्ण होताना दिसत नाहीत आणि यदाकदाचित पूर्ण झाल्या तरी दररोज व क्षणाक्षणाला बदलणारे फॅशन व नवनवीन नमुन्यांचा शोध घेण्याची धडपड त्याला शांत बसू देत नाही.

३) वर्तमान युगाने आर्थिक स्पर्धेची एवढी तीव्र मानसिकता निर्माण केली की, माणसाजवळ लक्षावधी व कोट्यवधींचा 'बँक बॅलेस' जरी असला किंवा कुबेराचा खजिना जरी हाती लागला तरी त्याची आर्थिक भूक शमत नाही आणि तो

'हायहाय'चा नारा लावत असतो. यावर हा उपाय अजिबात नाही की स्त्रीनेसुद्धा आर्थिक प्रयत्नांसाठी कंबर कसावी. याउलट यावर उपाय हा आहे की, हे जग, हे जीवन आणि त्याच्या साधनसामग्रीच्या बाबतीत त्याची विचारसरणी व दृष्टिकोन बदलावयास हवे आणि तो हव्यास व अभिलाषांच्या नरकातून बाहेर यावा. जोपर्यंत ही मानसिकता बदलणार नाही. तोपर्यंत पैशांच्या धावपळीत पुरुषाबरोबर स्त्रीच काय, घरातील मुले जरी लागली तरी माणसाचे प्रश्न आजीवन सुटणार नाहीत !

४) स्त्रीने कमविलेल्या पैशामुळे खरोखरच परिवाराच्या मिळकतीमध्ये वाढ होते. परंतु स्वभाविकपणे ती घराकडे लक्ष देऊ शकत नाही. ही एक वस्तुस्थिती आहे की स्त्रीने जर घरावर लक्ष दिले तर आर्थिक वापर निश्चितच कमी होतो आणि जर तिने लक्ष दिले नाही तर खर्च भरमसाठ वाढतात. अशा प्रकारे तिच्या मिळकतीचा वास्तविक पाहिजे तसा लाभ होत नाही.

५) स्त्रीच्या पैसा कमविण्याच्या धावपळीमुळे घरातील शांती भंग पावते. पती-पत्नी दरम्यान तंटे सुरु होतात आणि मुलांचे खरे पालन पोषण व शिक्षण होत नाही. पाश्चात्यांच्या अनुभवाने हे सिद्ध झाले की यामुळे घराची पूर्ण व्यवस्था कोलमडते आणि घराची अवस्था एखाद्या भाडोत्री 'थांब्या' सारखी होते. मग प्रश्न हा आहे की स्त्रीच्या कमाईचे मोल तिच्या अस्तित्वापेक्षा आणि परिवार व समाजाच्या शांतीपूर्ण अस्तित्वापेक्षा जास्त आहे काय?

इस्लाममध्ये स्त्रीच्या पारिवारिक जबाबदाऱ्या महत्त्वाच्या आहेत

अर्थातच इस्लाम पैशांचे महत्त्व स्वीकार करतो परंतु त्याचबरोबर हेसुद्धा इच्छितो की, स्त्रीने निश्चिंत होऊन पारिवारिक कर्तव्य पार पाडावे आणि आर्थिक धावपळीत गुरफटून जाऊन हे कर्तव्य पार पाडण्यात व्यत्यय येऊ देऊ नये. याकरिताच इस्लामने पुरुषावरच आर्थिक जबाबदारी टाकलेली आहे आणि स्त्रीला यातून मुक्ती दिली आहे. अशा प्रकारे दोघांनी आपसांत सहकार्याने व सद्भावनेने परिवाराची व्यवस्था चालवावी.

पत्नीचा 'नफ्का' पुरविणे पुरुषाचे कर्तव्य आहे

म्हणूनच इस्लाममध्ये पत्नीचा नफ्का अर्थात तिच्या जीवनावश्यक संपूर्ण गरजा पूर्ण करणे पुरुषाचे कर्तव्य आहे. याचा उल्लेख दिव्य कुरआनात विविध ठिकाणी विविध गरजानुसार करण्यात आला आहे. (याकरिता कुरआनातील सुरह बकरा २३३ व सूरह तलाक ६ ते ८ चा अभ्यास आवश्य करावा)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी 'हज्जतुल विदा'च्या प्रबोधनात पुरुषांची ही जबाबदारी या शब्दांत वर्णन केली,

''स्त्रियांचा उत्तम पैकी नान-नफ्का (निर्वाह साधन) आणि वस्त्र यासाठी तुमच्यावर त्यांचा अधिकार आहे.'' (हदीस : मुस्लिम)

पत्नीच्या 'नफ्क्या'च्या बाबतीत 'उम्मत'ची इजमा (सहमती) आहे. 'जमहूर'च्या दृष्टीत याचा अर्थ असा आहे की पतीने पत्नीच्या मूलभूत गरजा पुरवाव्यात. 'नफ्क्या'मध्ये पत्नीकरिता अन्न औषध, वस्त्र आणि राहायला घर या मूलभूत गरजा पूर्ण करणे आवश्यक आहेत आणि पती आर्थिकदृष्ट्या सबळ असल्यास पत्नीकरिता सेवकसुद्धा पुरविणे आवश्यक आहे.

स्त्री आर्थिकदृष्ट्या सबळ असो व दुर्बल तिचा 'नफ्का' (उदरनिर्वाह) कोणत्याही परिस्थितीत पतीने द्यावयासच पाहिजे.

(कुदूरी मए हिदाया - बाबुल नफ्का)

इस्लामने स्त्रीची आर्थिक स्थिती भक्कम ठेवली

घरामधील स्त्रीच्या कार्यमग्नतेमुळे इस्लामने तिची आर्थिक स्थिती कमकुवत केली नसून पुरुषापेक्षा जास्त भक्कम व स्थिर केली आहे. या उद्देशपूर्तीकरिता इस्लामने दोन वैधानिक कार्य केले आहे.

१) स्त्रीवर आर्थिक जबाबदारीचा बोजा टाकण्यात आला नाही. तसेच तिच्यावर तिची मुले, आई, वडील अथवा कोणत्याही जवळच्या नातेवाईकाची व स्वत:चीसुद्धा जबाबदारी नाही. कारण जन्मापासून विवाह होईपर्यंत तिची आर्थिक जबाबदारी व इतर सर्वच जबाबदाऱ्या तिच्या वडिलांवर आहेत. आणि लग्नानंतर तिच्या या जबाबदाऱ्या पतीवर येतात. पती नसल्यास मुलांवर आणि तेही नसल्यास तिच्या पित्यावर, भावावर व तेही नसल्यास तिच्या जवळच्या नातेवाईकांवर व तेही नसल्यास शासनावर असते. एकूण परिस्थिती अशी आहे की जन्मापासून मृत्यूपर्यंत तिची जबाबदारी स्वत: तिच्यावर नाहीच!

२) वारसा हक्कात स्त्रीचा पण वाटा आहे. आई-वडील, पती व संततीच्या संपत्तीत तिचा आवश्यकरित्या अधिकार आहे. कधी कधी भाऊ-बहीणीच्या संपत्तीत ही तिचा वाटा आहे. तसेच पतीकडून ही 'मेहेर'ची रक्कम तिला मिळते. या व्यतिरिक्त लग्न-समारंभात व इतर आनंद समारंभात तिला मिळालेल्या भेटवस्तू, दागिने व संपत्तीचीसुद्धा तीच मालकीण आहे. आणि ही सर्व काही तिची अबाधित संपत्ती आहे.

स्त्रीवर कोणतीही आर्थिक जबाबदारी नसल्यामुळे या संपत्ती साधनांच्या माध्यमाने मिळणारी संपूर्ण मिळकत तिच्या जवळ सुरक्षित असते. याउलट पुरुषावर कितीतरी आर्थिक जबाबदाऱ्या आहेत. त्याने कमाविलेल्या संपत्तीचा मोठा भाग परिवारावर खर्च होतो.

अशा प्रकारे इस्लामच्या कौटुंबिक व्यवस्थेत स्त्रीला स्वत:च्या जबाबदाऱ्या सोडून आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी घराबाहेर पडण्याची गरजच नाही. तसेच स्त्री-पुरुषांच्या एकत्रित व्यवहारामुळे निर्माण होणारे वाईट परिणाम भोगण्याची पाळीसुद्धा येत नाही.

स्त्रीच्या आर्थिक प्रयत्नांच्या काही मर्यादा

वर नमूद केलेल्या विषयाचा अर्थ अजिबात असा नाही की, इस्लामने स्त्रीला पैसे कमविण्यास प्रतिबंधित केले आहे आणि तिने तिला मिळालेल्या संपत्तीवरच समाधान मानावे. केवळ येथे एवढेच दाखविण्याचा हेतू होता की इस्लामने स्त्रीला स्वत:च्या व परिवारजणांच्या जबाबदारीतून मुक्त केले. हे सर्व काही असूनही जर तिला अर्थार्जनाच्या सहभागी होण्याची इच्छा असेल तर तिला इस्लामने निश्चित केलेल्या मर्यादाचे पालन करून अर्थार्जनाची परवानगी दिली आहे.

या मर्यादा खालीलप्रमाणे आहेत.

१) स्त्री ही मुळात घराची संचालिका आहे. सर्वप्रथम तिने घरावर लक्ष पुरविले पाहिजे. ती पतीच्या संपत्तीची रक्षक आणि मुलांची शिक्षिका आहे. म्हणून तिच्यासाठी इतर जबाबदाऱ्या स्वत:वर ओढवून घेणे योग्य नाही की ज्यामुळे तिला तिचे मूळ कर्तव्य पार पाडण्याचा विसर पडावा.

२) ती कौटुंबिक व्यवस्थेत पुरुषाच्या ताब्यात आहे. त्याच्या पूर्ण परवानगीनेच कोणतेही काम करावे. कारण जर ती तिच्या स्वतंत्र मर्जीने काम करू लागली तर परिवाराची व्यवस्था कोलमडून जाईल.

३) पुरुषांच्या संपर्कात येऊन करण्यात येणारे कोणतेही काम तिने करू नये. कारण की यामुळे भोगावे लागणारे वाईट परिणाम हे मिळणाऱ्या फायद्यापेक्षा निश्चितच जास्त आहेत.

या मार्गदर्शनाच्या आत स्त्री आपली कार्यक्षमता, पात्रता, वय, परिस्थिती, संधी व मानसिकतेला अनुसरून कोणताही शास्त्रसंमत व्यवसाय करू शकते. इस्लामची त्यावर कोणतीच हरकत नाही किंवा बंधन नाही. त्याचप्रमाणे तिच्या जवळ असलेली संपत्ती इस्लामी मर्यादांच्या आत राहून लाभदायक व फायदेशीर कामात वापरू शकते. यापासून मिळणारा पूर्ण नफा तिचाच असेल व त्यावर इतरांचा अधिकार नसेल.

वर्तमानकाळात या मर्यादांच्या पालनासहित स्त्रीकरिता अर्थार्जनाचे प्रयत्न म्हणजे खूप कठीण कार्य वाटते. कारण की आज पूर्ण आर्थिक व्यवस्था अशा लोकांच्या ताब्यात आहे, जे स्त्री-पुरुषांच्या एकत्रीकरणास समाजाची गरज व वैशिष्ट्य मानतात.

मुस्लिम समाजात आजही ही कमतरता आहे की आजपर्यंत त्यांच्या जवळ अशा प्रकारची कायम स्वरूपी व्यवस्था अस्तित्वात नाही, जी स्त्रीला आर्थिक प्रयत्नांच्या संधी उपलब्ध करून देऊ शकेल. आणि वर्तमानकाळात उद्‌भवलेल्या घृणास्पद प्रथांपासून मुक्ती देऊ शकेल. ही कमतरता लवकरात लवकर भरून निघाली पाहिजे.

‘मेहेर’चे स्वरुप आणि त्याचे नियम

‘मेहेर’ स्त्रीला खरेदी करण्याचे माध्यम नाही

मेहेर म्हणजे लग्नाप्रित्यर्थ पतीकडून पत्नीस दिली जाणारी राशी अथवा द्रव्य अथवा संपत्ती होय आणि लग्नासाठी ‘मेहेर’ अदा करणे पतीकरिता अनिवार्य आहे.

‘मेहेर’ प्रथेच्या बाबतीत काहीजण उपहासात्मकरित्या असा उल्लेख करतात की इस्लाममध्ये एक पुरुष एका स्त्रीला पैसा देऊन (अर्थात ‘मेहेर’ देऊन) खरेदी करतो. परंतु ‘मेहेर’च्या स्वरुपाचा अभ्यास न करण्याचा हा परिणाम आहे. इस्लाम धर्मानुसार स्त्री ही खरेदी व विक्रीची वस्तू नसून तिचा एक वैशिष्ठ्यपूर्ण दर्जा आहे. ती माता-पिता आणि इतर कोणाचीही जहागीर नसते. जर माता-पिता अथवा इतर कोणीही ‘मेहेर’ची रक्कम घेऊन त्यांनी एखाद्या पुरुषाच्या स्वाधीन केल्यास असे कदाचित म्हणता येईल की ‘स्त्री’ मेहेरच्या रकमेत विकण्यात आली. परंतु वस्तुस्थिती या परिस्थितीच्या उलट आहे. इस्लामी शरीयतनुसार पतीने दिलेल्या ‘मेहेर’च्या रकमेची सर्वस्वी मालकीण पत्नीच असते. तसेच पती जर स्त्रीची खरेदी करीत असला असता तर ती पतीची मिळकत झाली असती. परंतु ‘निकाह’ (इस्लामी विधीनुसार विवाह) च्या माध्यमानेदेखील पतीचा स्त्रीवर मालकीहक्क स्थापित होत नाही आणि लग्नानंतरसुद्धा स्त्रीची वैयक्तिकता आणि स्वातंत्र्य व अधिकार अबाधित असतात.

मेहेरचे स्वरुप

आता आपण पाहू या की दिव्य कुरआनने ‘मेहेर’चे स्वरूप व दर्जा कशा प्रकारे सादर केला. ज्या स्त्रियांशी ‘निकाह’ (इस्लामी विधीनुसार विवाह) निषिद्ध आहे त्यांचा सविस्तर उल्लेख केल्यानंतर सांगितले,

“यांच्या खेरीज इतर सर्व स्त्रिया तुमच्याकरिता वैध आहेत अट मात्र एवढी की तुम्ही त्यांना आपल्या संपत्तीच्या माध्यमाने विवाहाकरिता निमंत्रण द्या, व्यभिचारासाठी नव्हे. मग त्यांपैकी ज्या स्त्रियांपासून तुम्ही ‘निकाह’द्वारे लाभ घेतला आहे. त्यांचे मेहेर त्यांना देऊन टाका जे तुमच्यावर अनिवार्य आहे.” *(दिव्य कुरआन, ४ : २४)*

यातून निम्नलिखित गोष्टी माहीत झाल्या आहेत.

१) प्रथम हे की 'महरमात' (अर्थात ज्यांच्याशी कधीच विवाह करता येत नाही व्यक्ती) शिवाय इतर स्त्रिया शास्त्रसंमत आहेत (अर्थात) त्यांच्याशी 'निकाह' होऊ शकतो.

२) त्याकरिता हे आवश्यक आहे की माणसाने संपत्तीच्या माध्यमाने त्यांना निमंत्रित करावे.

३) हे निमंत्रण 'निकाह'च्या उद्देशाने असावे. तसेच 'सफाह' म्हणजे व्यभिचारासाठी नसावे. तेव्हा 'निकाह' आणि 'सफाह'मध्ये (अर्थात व्यभिचारामध्ये) हा फरक आहे की व्यभिचारामध्ये माणूस तात्पुरते आपली लैंगिक कामना पूर्ण करून स्त्रीला सोडून देतो व ती स्वत: दुष्परिणाम भोगत असते. तिची कोणतीच जबाबदारी स्वीकारायला तो तयार नसतो. याच्या अगदी उलट 'निकाह' मुळात या निर्णयासहित होतो की पती-पत्नी दरम्यान कायमस्वरूपी संबंध निर्माण होऊन त्यांनी एक दुसऱ्यांचे अधिकार पूर्ण करून आपापल्या जबाबदाऱ्या कुशलतेने पार पाडाव्यात.

४) आयतीच्या संदर्भाने ही बाब ही स्पष्ट होते की 'निकाह' आणि 'सफाह' (व्यभिचार) च्या दरम्यान 'मेहेर'मुळे फरक स्पष्ट होतो. कारण पुरुषावर स्त्रीच्या ज्या आर्थिक जबाबदाऱ्या असतात, यामध्ये एक जबाबदारी 'मेहेर'सुद्धा आहे. 'मेहेर' स्त्रीचा वैधानिक अधिकार आहे आणि 'मेहेर' अदा करणे पुरुषासाठी आवश्यक व अनिवार्य आहे. व्यभिचारात पुरुष अशा प्रकारची कोणतीच जबाबदारी स्वीकारत नाही.

५) 'निकाह'च्या माध्यमाने पुरुष हा स्त्रीपासून लाभ व समाधान अथवा इतर फायदे घेतो. 'मेहेर' त्यांचा मोबदला आहे.

''ज्या स्त्रियांपासून लाभ घेतला त्याना मेहेर द्या.''

(दिव्य कुरआन, ४ : २४)

जमखशरी या विद्वानानी म्हटले आहे की दिव्य कुरआनने 'मेहेर'चा अर्थ 'मोबदला' म्हणून वर्णन केले आहे. हनफी ग्रंथात 'मेहेर'ची व्याख्या अशा शब्दांत करण्यात आली आहे,

'मेहेर' त्या राशीला म्हणतात जी 'निकाह'मध्ये पतीकडून लैंगिक फायद्याच्या मोबदल्यात पत्नीला अनिवार्यरित्या देण्यात येते. हे मेहेरच्या

निश्चितीमुळे पण होऊ शकते आणि निकाहमुळे पण. यामुळे एक गोष्ट सिद्ध होते की 'मेहेर'मुळे पुरुषास स्त्रीपासून लैंगिक सुख उपभोगण्याचा अधिकार प्राप्त होतो. परंतु तिच्यावर कोणताही मालकी अधिकार त्याला अजिबात प्राप्त होत नाही. यात शंका नाही की स्त्रीसुद्धा पुरुषापासून लैंगिक सुख उपभोगते, परंतु तिच्यावर 'मेहेर'च्या स्वरुपाची कोणतीच बाब अनिवार्य नाही. याचे कारण हे आहे की इस्लाम स्त्रीवर कोणतीही आर्थिक जबाबदारी टाकीत नाही. त्याने स्त्रीला हर प्रकारे आर्थिक जबाबदारीपासून मुक्त ठेवले आहे.

'मेहेर' प्रामाणिकतेचा पुरावा व कसोटी आहे

'मेहेर'ला 'मोबदला' संबोधण्याचे कारण हे की, 'मेहेर' स्त्रीला 'निकाह'च्या मोबदल्यात मिळतो जो मेहेरचा कायदेशीर व वैधानिक दर्जा स्पष्ट करतो. याकरिता दिव्य कुरआन व हदीस (पैगंबराची वचने) मध्ये 'सदका' आणि 'सदाक' हे शब्द वापरण्यात आले आहेत, जे मेहेरचा आत्म्याचे दर्शन घडवितात.

''स्त्रियांचे मेहेर आनंदाने द्या.'' *(दिव्य कुरआन, ४ : ४)*

'सदका' आणि 'सदाक' हे त्यांची 'सदक' या मूळ शब्दापासून उत्पत्ती झाली आहे. 'सदक'चा शब्द अरबी भाषेत अतिशय व्यापक अर्थात वापरण्यात येतो. याचा अर्थ प्रामाणिकता, प्रेम, मैत्री, माणसाचे वचनपूर्तीत खंबीर व पक्के असणे, दिलेला शब्द पाळणे, इतरांनी आपल्या बाबतीत चांगला विचार ठेवल्यास त्यांच्या आदर्शावर पूर्ण उतरणे, परीक्षेच्या वेळी खरे उतरणे, वगैरे होय.

(इब्ने मंजूर, लिसानुल अरब मादा स.द.क.)

'मेहेर'करिता 'सदका' शब्द वापरण्यात मोठी अर्थपूर्णता आहे. मालिकी पंथाचे विद्वान 'सावी' म्हणतात, 'सदका' शब्द 'सदक'ची उत्पत्ती असून 'कजब' (असत्य) चा विरुद्ध अर्थी शब्द आहे. 'मेहेर'साठी 'सदका' हा शब्दप्रयोग यासाठी करण्यात आला आहे की याचे पती-पत्नी दरम्यान असणे या गोष्टीचे लक्षण व पुरावा आहे की ते स्व-संमतीने व सानंद व सहृदय शरीयतचा अंगीकार करतात.

(अलसावी अलल शरहुल सगीर : २/४२८)

मुल्ला जायून हनफी म्हणतात की 'मेहेर' हे खरे प्रेम असण्याच्या दाव्याचा पुरावा आहे. (तफसीराने अहेमदिया, पान १२९)

वस्तुस्थिती अशी आहे की 'मेहेर' हे पतीच्या प्रामाणिकतेचे आणि प्रेम व जिव्हाळ्याचे लक्षण आहे. तेव्हा याला 'पत्नीची किंमत' म्हणणे हे प्रामाणिकतेचा घोर अपमान होईल. 'मेहेर'च्या माध्यमाने पती हे सिद्ध करतो की स्त्रीने त्याच्यावर जो

विश्वास दर्शविला आहे या विश्वासाशी तो कधीच दगा करणार नाही. व आपल्या प्रेमळ संबंधांना कायम ठेवणार.

'मेहेर' भेट आहे

याबरोबरच कुरआनच्या या आयतीमध्ये 'नहला' शब्द खूप अर्थपूर्ण आहे, जो या भावना व जाणिवांना उत्तम प्रकारे स्पष्ट करतो जे 'मेहेर' देण्याच्या बाबतीत असायला पाहिजे. या ठिकाणी 'नहला'चे तीन अर्थ वर्णित झाले आहेत. शब्दकोषानुसार तिन्ही अर्थ योग्य वाटतात.

१) धर्म व पंथ म्हणते स्त्रियांना त्यांचे 'मेहेर' द्या. त्यांना 'मेहेर' देणे तुमचे वैधानिक कतर्व्य आहे.

२) सानंद 'मेहेर' अदा करणे. याचा अर्थ असा की स्त्रीने ते मागण्यापूर्वीच 'मेहेर' सानंद देण्यात यावा. यामध्ये हयगय व दिरंगाई अथवा टाळाटाळ होता कामा नये. जी वस्तू तक्रार आणि भांडणानंतर देण्यात येते तिला 'नहला' (अर्थात सानंद 'मेहेर' अदा करणे) म्हणता येणार नाही.

३) भेट देणे. 'मेहेर'चा अर्थ भेट समजण्याचे कारण हे आहे की पती याच्या मोबदल्यात पत्नीकडून काहीच घेत नाही. प्रश्न राहतो, तो फक्त वैवाहिक जीवनापासून सुख उपभोगण्याचा. तेव्हा ज्याप्रमाणे पती पत्नीपासून शरीरसुख मिळवितो त्याचप्रमाणे पत्नीदेखील पतीपासून शारीरिक सुख मिळविते. याचे स्पष्टीकरण या शब्दांत करण्यात आले आहे.

अल्लाहने 'मुनाफ-ए-निकाह' म्हणजे कामेच्छापूर्ती आणि संततीस जन्म देणे हे पती पत्नींच्या दरम्यान सामायिक ठेवले आहे. (हे कोणा एकालाच मिळत नाही.) याबरोबर त्याने पतीला आदेश दिला की त्याने पत्नीस मेहेर द्यावा. हे जणू अल्लाहतर्फे आरंभीची एक भेट आहे.

वरील भागात 'नहला'चे जे विविध अर्थ दिले आहेत त्यांचा उल्लेख करताना 'इब्ने कसीर' लिहितात,

यांच्या या वर्णनांचा खुलासा हा आहे की माणसाकरिता हे आवश्यक आहे की त्याने 'मेहेर' पत्नीच्या स्वाधीन करावा. हे सानंद मनाने व्हावे की ज्याप्रमाणे माणूस सानंदित कोणाला एखादी (आनंद प्रित्यर्थ) भेट देतो. याच अवस्थेत 'मेहेर'सुद्धा अदा करावे. (फतहुल बारी, ९/४०१, ४०२)

स्त्रीचा 'मेहेर' अनिवार्य असूनसुद्धा ज्याप्रमाणे त्यास 'नहला'सारख्या शब्दाने संबोधित करण्यात आले, त्याचप्रमाणे स्त्रीचा 'नफ्का' (निर्वाहभत्ता) सुद्धा अनिवार्य आहे व याला 'हदीस'मध्ये 'सद्का' या शब्दाने संबोधित करण्यात आले. या शब्दांच्या अर्थपूर्णतेची चर्चा करताना 'इब्नुल मुनीर' म्हणतात,

'नफ्का'ला 'सदका' याच अर्थी संबोधण्यात आले, ज्याअर्थी 'मेहेर'ला 'नहला' याअर्थी संबोधण्यात आले आहे. कारण जीवनाचा आस्वाद, प्रेम व जिव्हाळा, मान, इज्ज़त आणि संततीसाठी ज्याप्रमाणे स्त्रीला पुरुषाची गरज आहे त्याचप्रमाणे या गोष्टीकरिता पुरुषाला पण स्त्रीची गरज आहे. मग ज्याअर्थी स्त्री व पुरुष दोघांना एक दुसऱ्यांची गरज आहे त्याअर्थी हे व्हावयास पाहिजे होते की पुरुषावर 'मेहेर' व 'नफ्का'सारखी कोणतीच जबाबदारी टाकण्याची गरज उरलेली नाही. परंतु अल्लाहने पुरुषाला विशेष करून स्त्रीवर हे श्रेष्ठत्व दिले की त्याने तिची देखभाल करावी आणि म्हणूनच अल्लाहने पुरुषाचा दर्जा उंचावला आहे. या कारणास्तव 'मेहेर'चा अर्थ 'नहला' आणि 'नफ्का'चा अर्थ 'सदका' घेणे योग्य व शास्त्रसंमत आहे. (फतहुल बारी, १/४०१-४०२)

'मेहेर'चा आदेश अटळ व स्थायी स्वरुपाचा आहे

काहीजण अशी शक्यता वर्तवितात की कोणे एके काळी 'मेहेर' प्रेम व्यक्त करण्याचे कदाचित साधन असावे आणि त्या काळी कदाचित ते महत्त्वाचे आणि उपयुक्तसुद्धा असेल. परंतु प्रत्येक काळात परिस्थिती आणि सामाजिक मानसिकता वेगवेगळ्या असतात. वर्तमान युगातील सामाजिक मूल्ये या गोष्टीस प्रेमाविरुद्ध समजतात जे पती-पत्नी दरम्यान असायला हवे. त्याचप्रमाणे आज वस्तुत: मेहेरची तेवढी गरज व महत्त्व राहिले नाही. कारण स्त्री स्वत: पैसा कमावू लागली आहे व कोणावर अवलंबून राहिलेली नाही.

याचा दोन बाजूंनी वेध घेता येईल. प्रथम हे की शरीयतने 'मेहेर'ला कोणता दर्जा दिला आहे? हा अस्थायी आदेश होता की याचे स्वरुप स्थायी होते? द्वितीय हे की मेहेरची उपयुक्तता ही केवळ क्षणिक होती, जी काही काळानंतर संपणारी होती की अजूनही बाकी आहे.

जेथपर्यंत शरीयतचा संबंध आहे, तिने त्याला स्थायी व कायमस्वरूपी आदेशाच्या दर्जानेच प्रस्तुत केले आहे. मेहेरच्या बाबतीत काही कुरआनच्या आयतीचा आपण अभ्यास केलाच आहे. या आयतीमध्ये 'मेहेर' अदा करण्याचा

'अंतिम' स्वरुपाचा व अटळ व बिनशर्त आदेश देण्यात आला आहे. त्याकरिता कोणत्याही प्रकारच्या परिस्थितीची कोणतीही अट किंवा कोणत्याही काळाचे बंध नसून तो कायमस्वरूपी, अबाधित व अटळ आदेश आहे. याव्यतिरिक्त दिव्य कुरआनने 'मेहेर'च्या आदेशाचे सविस्तर वर्णन केले आहे. तसेच या बाबतीत कोठेही याचा इशारासुद्धा मिळत नाही की हे अस्थायी व क्षणिक आहे. अशा प्रकारच्या स्थायी आणि स्पष्ट नियमांच्या बाबतीतसुद्धा त्यांच्या अस्थायी असण्याचा प्रश्न निर्माण केल्यास कदाचित कुरआनच्या सर्वच स्थायी आदेशांचे व नियमांचे अस्थायीकरण होईल.

इस्लामी विद्वान या बाबीवर सहमत आहेत की 'मेहेर'शिवाय कोणत्याही स्त्रीशी लैंगिक संबंध प्रस्थापित करणे निषिध्द आहे. मग स्त्रीने स्वतःच्या राजीखुशीने स्वतःस त्याच्या स्वाधीन केले का असेना. अपवाद एवढाच की केवळ ती त्याची 'बांदी' नसावी. ('बांदी' म्हणजे खरेदी केलेली दासी)

इस्लामी विद्वान इब्ने हजर यांनी सांगितले,

कोणत्याही व्यक्तीकरिता हे योग्य आणि शास्त्रसंमत नाही की 'मेहेर' दिल्याशिवाय त्याने स्त्रीबरोबर लैंगिक संबंध प्रस्थापित करावे. केवळ त्यांच्या 'लौंडी'साठी हा आदेश नाही. या गोष्टीवर विद्वानांची सहमती आहे.

इब्ने रशद सांगतात,

'निकाह' पूर्ण होण्याच्या ज्या अटी व शर्ती आहेत, यापैकी एक अट 'मेहेर'सुद्धा आहे. त्याला डावलणे व नाकारणे शास्त्रसंमत नाही. यावर सर्वांची सहमती आहे. (इब्ने रशद, बदायतुल मुज्तहिद व बहायतुल मकत्सद, २/१८)

मेहेरचे स्वरुप असे आहे की जर कोणी ही अट ठेवली की तो 'मेहेर' अदा करणार नाही अथवा 'मेहेर'चा उल्लेखही करणार नाही. तरी हनफी पंथाच्या नियमांत 'मेहेर' अदा करणे आपोआप अनिवार्य ठरेल. कारण अशा प्रकारचा निर्णय करण्याचा अधिकार कोणालाच नाही की त्याने 'मेहेर' न देता 'निकाह' करावा. कारण स्वयं अल्लाहनेच याचा आदेश दिलेला आहे की 'मेहेर' न देता 'निकाह' होत नाही.

इमाम मालिक सुद्धा सांगतात की 'मेहेर' अदा केल्याशिवाय 'निकाह' होत नाही. (अलगाया अलहिदाया, २/४३४-४३५)

'मेहेर'ची उपयुक्तता

आता आपण याच्या उपयुक्ते बाबतीत विचार करु या. 'निकाह'मुळे ज्या लैंगिक संबंधांची शास्त्रसंमत परवानगी मिळते त्याचे मोल मेहेरमुळेच जाहीर होते. यामुळे माणसात ही जाणीव निर्माण होते की शरीयतच्या ज्या परवानगीमुळे तो लाभ घेतो त्याकरिता त्याला त्याचा पैसा खर्च करावा लागतो. स्त्रीचे मोल आणि महत्त्व त्याच्या भावनामध्ये घर करते. तसेच तो स्त्रीला कधीच कमी लेखू शकत नाही आणि त्याची ही भावना नष्ट होते की त्याने स्त्रीवर उपकार करून आपल्या वैवाहिक जीवनात समाविष्ट केले.

'मेहेर' हे वैवाहिक संबंध कायम ठेवण्याचे एक मोठे साधन आहे. हा एक मानसशास्त्रीय सिद्धान्त आहे की माणूस जी वस्तू मिळविण्यासाठी आपला पैसा खर्च करतो ती वस्तू सहसा सोडण्यास तयार नसतो. या उलट तो तिचे रक्षण करण्याचा व जतन करण्याचा प्रयत्न करतो. याव्यतिरिक्त 'मेहेर' 'तलाक'च्या मार्गातील एक रोधक आहे. कारण 'तलाक' (पतीकडून पत्नीस दिला जाणारा घटस्फोट) मध्ये तत्कालीन पत्नीसह 'मेहेर'ची राशीसुद्धा जाणार आणि मग दुसऱ्यांदा निकाह (लग्न) करण्यासाठी परत 'मेहेर'ची रक्कम खर्च करावी लागणार.

'मेहेर' एका अर्थाने स्त्रीचे सांत्वनही आहे आणि आर्थिक मदतसुद्धा आहे. यातून ती तिच्या जीवनाश्यक गरजा भागवू शकते अथवा विधायक कार्यात खर्च करू शकते किंवा लाभदायक कामात वापरू शकते.

आता जी एक गोष्ट बाकी राहिली की स्त्रीसाठी अर्थार्जनाचे मार्ग खुले आहेत, त्यामुळे 'मेहेर'चे महत्त्व संपुष्टात येते यावर एक मोठा प्रश्न येतो की 'खरोखरच स्त्रीसाठी इतक्या आर्थिक सवलती उपलब्ध आहेत काय की ज्यामुळे तिने पुरुषाच्या निगराणीची गरजच ठेवू नये?' आणि यदाकदाचित आर्थिक बाबतीत ती जर एवढी स्वावलंबी असली तरी तिला 'मेहेर'च्या अधिकारांपासून वंचित करणे म्हणजे तिच्यावर अन्यायच होईल. दुसरी गोष्ट अशी की 'मेहेर'ची उपयुक्तता केवळ आर्थिकविषयी नसून नैतिक व मानसिकसुद्धा आहे. या सर्व बाबतीत असलेल्या उपयुक्ततेस कसे डावलता येईल?

'मेहेर'चे प्रमाण

'मेहेर'च्या राशीच्या प्रमाणाचा प्रश्न सतत निर्माण होत असतो की 'मेहेर'ची राशी किती असावी? शरीयतने 'मेहेर'चे प्रमाण निश्चित केलेले नसून ते पती-पत्नी च्या आर्थिक व सामाजिक परिस्थिती, पारिवारिक परंपरा, आपसांतील संबंध आणि विश्वासावर सोडले आहे. ते त्यांच्या परिस्थितीनुसार या राशीचे प्रमाण कमी-जास्त ठरवू शकतात.

दिव्य कुरआनात अल्लाहचे सांगणे आहे,

''तुम्ही जर एका पत्नीच्या जागी दुसरी पत्नी आणण्याचा इरादाच केला असेल तर तुम्ही जरी तिला ढीग भर संपत्ती दिली असली तरी त्यातील किंचित सुद्धा परत घेऊ नका. तो माल तुम्ही कसा काय घ्याल ज्यावर तुमचा अधिकार नाही आणि उघड पाप होईल.'' *(दिव्य कुरआन, ४ : २०)*

एकदा असे झाले की माननीय उमर (रजि.) यांनी आपल्या भाषणा तून जास्त 'मेहेर' देण्याची मनाई केली. त्या वेळी एका स्त्रीने भाषणस्थळावरच त्यांना मज्जाव केला व म्हणाली 'आपणास याचा काहीही अधिकार नाही.' कारण की आपला हा मनाई आदेश 'कुरआनच्या नियमाविरुद्ध आहे.' मग तिने आपल्या भूमिकेच्या समर्थनात आयतीचा संदर्भ दिला. यावर माननीय उमर (रजि.) यांनी सांगितले, 'या स्त्रीने सत्य सांगितले. माझाच निर्णय चुकीचा होता.' (फतदुलबारी ९/१६१)

पैगंबराच्या कथनामध्ये जास्त 'मेहेर' निश्चित करण्याची मनाई करण्यात आली नाही. मात्र याची प्रेरणा देण्यात आली की त्याचे प्रमाण कमी असावे.

पैगंबराच्या कथनात आहे की सर्वात जास्त 'बरकतीचा' (समृद्धशाली) निकाह तो आहे ज्याचा भार (मेहेर) हलका आहे.

हे एक ऐतिहासिक सत्य आहे की पैगंबरांच्या काळात 'मेहेर'ची रक्कम कमी असायची. माननीय अबू हुरैरा (रजि.) कथन करतात की पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या काळात आम्ही लोकांच्या 'मेहेर'ची राशी दहा ओकिया म्हणजे 'चारशे दिरहम' असायची.

'निसाई किताबुन्निकाह (बाब अल-किस्त फिल सदका) प्रत्यक्षात पैगंबरांच्या भार्यांचा मेहेर साडे बारा ओकिया म्हणजे पाचशे दिरहम एवढा होता.

(मुस्लिम किताबुन्निकाह)

माननीय उमर (रजि.) सांगतात की 'मेहेर' जास्त ठेवू नका. कारण जास्त 'मेहेर' हे जगामध्ये सन्मान आणि परलोकात ईशपरायणता व सहानुभूतीचे जर लक्षण असले असते तर याचा जास्त अधिकार पैगंबर मुहम्मद (स.) यांना असला असता की त्यांनी जास्त 'मेहेर' बांधावे. परंतु त्यांच्या भार्या व कन्यांपैकी कोणाचाही 'मेहेर' बारा ओकियापेक्षा जास्त नव्हता. (अबू दाऊद किताबुन्निकाह)

एका अंसारी सोबत्याने चार ओकिया म्हणजे दोनशे दिरहम 'मेहेर' निश्चित केले. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले की 'असे वाटते की जसे हे पर्वत चांदीचे आहे. आणि तुम्ही या पासून चांदी कोरून कोरून आणता.'

(मुस्लिम किताबुन्निकाह, बाब नदब अराद निकाह अमरात)

आता प्रश्न हा आहे की मेहेरच्या राशीची किमान मर्यादा किती असू शकते? शरीयतने याची किमान मर्यादा निश्चित केली किंवा नाही? यावर शरीयतच्या विद्वानांची सहमतीयुक्त भूमिका अशी आहे की आर्थिक मूल्य असणारी वस्तूच मेहेर असू शकते. ज्या वस्तूचे आर्थिक मूल्य नसते ती वस्तू 'मेहेर' असू शकत नाही आणि अशा प्रकारच्या 'मेहेर'मुळे 'निकाह' शास्त्रसंमत होत नाही कारण दिव्य कुरआन स्पष्ट शब्दांत सांगत आहे,

''तुमच्याकरिता 'महरम' स्त्रियांखेरीज त्या सर्व स्त्रीचा हलाल (धर्म समंत) करण्यात आल्या आहेत की तुम्ही त्यांना आपल्या संपत्तीच्या मोबदल्यात (निकाहसाठी) इच्छू शकतात.'' *(दिव्य कुरआन, ४ : २४)*

दिव्य कुरआनने केवळ मात्र 'संपत्ती व धन'चा शब्द वापरला आहे. म्हणून 'फुक्हा' (शरीयतचे विद्वान) यांनी मत व्यक्त केले की 'मेहेर'ची राशी ज्याप्रमाणे जास्तीतजास्त असू शकते त्याच प्रमाणे कमीतकमीसुद्धा असू शकते. जोपर्यंत एखादी वस्तू एवढ्या किमान किंमतीपर्यंत पोहोचत नाही व त्याचे आर्थिक मूल्य संपत नाही तोपर्यंत ती वस्तू 'मेहेर' बनल्यास पात्र आहे. इमाम नूदी यांनी लिहिले की हे मत इस्लामच्या प्रारंभीच्या बहुतेक विद्वानांचे आहे. यामध्ये यहया बिन सईद, अबुजनाद, रबिया, इब्ने जरीज, मुस्लिम बिन खालेद, इमाम लैस, इमाम सूरी, इब्ने अबी लैला, इमाम शाफई, दाऊद जाहिरी, अहले हदीसचे विद्वान आणि इब्ने वहब मालिकी वगैरेंचा समावेश आहे. (नूदी शरह मुस्लिम, ४५४)

या उलट इमाम अबू हनीफा, इमाम मालिक, सईद बिन जुबैर, इमाम नखई, इब्ने शबरमा वगैरेचे मत असे आहे की शरीयतने 'मेहेर' ची किमान राशी निश्चित केली आहे. यामुळे 'मेहेर'ची राशी कमी होणे योग्य नाही. (या मताची पुष्टी दिव्य

कुरआनच्या अहजाब - ५० या आयतीने करण्यात आली आहे),

''मग तुम्ही या स्त्रियांपैकी ज्यांचा उपभोग घेतला आहे, त्यांचे निश्चित मेहेर अदा करावे.'' *(दिव्य कुरआन, ४ : २४)*

तरी मात्र या बाबतीत थोडासा वाद आहे की 'मेहेर'ची किमान मर्यादा शरीयतने किती निश्चित केली? इमाम अबू हनीफा यांच्यानुसार ही राशी किमान दहा 'दिरहम' असावी. इमाम मालिक यांच्यानुसार चार ते तीन दिरहम आणि इमाम शबरमा यांच्यानुसार पाच दिरहम, इमाम नखई यांच्यानुसार चाळीस व दहा दिरहम असावी. (नूदी शरह मुस्मि १/४५८ इब्ने हजर फतहुलबारी ९/१६४)

इमाम शाफई आणि त्यांच्याशी सहमत विद्वानांच्या मतांची पुष्टी दिव्य कुरआनच्या या आयतीमुळे होते.

''मग तुम्ही या स्त्रियांपैकी ज्यांचा उपभोग घेतला आहे, त्यांचे निश्चित मेहेर अदा करावे.'' *(दिव्य कुरआन, ४ : २४)*

यावरुन स्पष्ट होते की स्त्रीपासून मिळणाऱ्या वैवाहिक सुखाच्या मोबदल्यात पुरुषाने स्त्रीला अनिवार्यत: मेहेर देणे आवश्यक आहे. हा मोबदला आपसातील स्नेह संबंधाने व राजीमर्जीने ठरविण्यात यावा नसता तो मोबदला राहणार नाही. मेहेरची राशी आधीच ठरविण्यात आल्यास भरपाईची जाणीव संपून कुरआनचा हेतू पूर्ण होणार नाही.

विद्वानांच्या या समुदायाच्या संदर्भात 'बुखारी' व 'मुस्लिम' (पैगंबर कथनाचे प्रमाणपत्रित संग्रह) मधील पैगंबरवचनांत आहे की एकदा पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सेवेत एक स्त्री हजर झाली आणि म्हणाली, 'मी स्वत:स आपल्याकरिता 'हिबा' (स्वाधीन) करू इच्छिते.' अर्थात तिचा विचार व उद्देश होता की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तिच्याशी 'निकाह' करावा. ती बराच वेळ उभी राहिली परंतु पैगंबरांनी कोणतेच उत्तर दिले नाही. पैगंबरांचे मौन पाहून एक इसम पैगंबरांना म्हणाला, 'हुजूर! आपण जर इच्छुक नसाल तर हिचा माझ्याशी 'निकाह' करावा.' तेव्हा पैगंबरांनी विचारले, 'तुझ्याजवळ मेहेर देण्याकरिता काही रक्कम वगैरे आहे काय?' तो उत्तरला, 'माझ्या 'तहमद'शिवाय माझ्याजवळ काहीच नाही.' पैगंबरांनी सांगितले, 'तुम्ही जर ही 'तहमद' हिला दिली तर तुमच्याजवळ काहीच राहणार नाही. तेव्हा घरी जा आणि एखादी वस्तू घेऊन या!' यावर परत तो उत्तरला, 'माझ्याजवळ काहीही नाही.' पैगंबरांनी परत सांगितले, 'कमीतकमी लोखंडाची एक अंगठी तरी घेऊन या!' त्याने प्रयत्न केला पण तेही शक्य झाले नाही. मग पैगंबरांनी सांगितले, 'बरं हे सांगा की

तुम्हाला दिव्य कुरआनचा काही भाग पाठ आहे काय?' तो म्हणाला, 'होय. मला पाठ आहे.' तेव्हा पैगंबरांनी सांगितले, 'तुम्हाला दिव्य कुरआनचा जो भाग पाठ आहे त्याच्या मोबदल्यात तुमचा 'निकाह' या स्त्रीशी करून टाकतो.' (अर्थात कुरआनचा पाठ असलेला भागच 'मेहेर' निश्चित झाला.)

या घटनेनुसार हे सिद्ध करण्यात आले की 'मेहेर'च्या राशीची किमान मर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही. (इब्ने हजर म्हणतात की मेहेरची किमान मर्यादा नाही) पती-पत्नी जर तयार व राजी असतील तर 'मेहेर'ची राशी कमीतकमी असू शकते. उदाहरणार्थ– एक कोरडा, चप्पल, लोखंडाची अंगठी किंवा यासारखी इतर किरकोळ वस्तू. (नूदी शरह मुस्लिम, १/४५८)

जे लोक 'मेहेर'ची किमान राशी निश्चित समजतात त्यांच्या उत्तरादाखल काही विद्वानांनी संदर्भात्मक दाखले सादर केलेत. या ठिकाणी हनफी विद्वानांचे काही संदर्भ आपण पाहू या.

हनफी विद्वानांनी पहिल्या पुष्टीचे उत्तर असे दिले की मेहेरचे स्वरुप पती-पत्नी दरम्यान निश्चित होणारा केवळ एक मोबदला नसून यामध्ये उपासनात्मक भावना प्रेरित आहे. कारण कोणताही मोबदला उभय पक्षांच्या तडजोडीने संपुष्टात आणता येतो. परंतु 'मेहेर'ला पती-पत्नी आपल्या स्वेच्छेने संपुष्टात आणू शकत नाहीत. (हिदायतुल मुजतहिद, २)

वर उल्लेखिलेल्या हदीसची विविध उत्तरे देण्यात आली आहेत. प्रथम हे की 'लोखंडाची एक अंगठीच का असेना'चा अर्थ कदापि होत नाही की सद्यास्थितीत केवळ 'लोखंडाची एक अंगठी' 'मेहेर'ची राशी निश्चित झाली. या उलट की एका अर्थी हे स्पष्ट करण्याचे प्रयत्न करण्यात आले की तुमच्या ऐपतीप्रमाणे 'मेहेर' अदा करावा. याची किमान मर्यादा माहीत होती. दूसरे उत्तर याचे असे देण्यात आले की या विषयात 'मेहेर मुअज्ज़ल' (रोख रक्कमेचा मेहेर) चा उल्लेख करण्यात आलेला आहे. अर्थात या वेळी 'मेहेर'चा जो काही भाग तुम्ही अदा करू शकता तो करावा व बाकीचा भाग तुमच्यावर कर्जाच्या स्वरूपात असेल व त्याची परतफेड तुमच्यावर अनिवार्य असणार. याच्या पुष्टीखातर ही बाब सादर करण्यात आली की इस्लामच्या प्रारंभी काळात 'मेहेर मुअज्ज़ल'ची रीतरिवाज सामान्यता सगळीकडे प्रचलित होती व याचे खूप महत्त्व त्या काळी होते. तिसरी तार्किक बाब ही होती की हा प्रश्न केवळ एका व्यक्तीपुरता विशेष होता आणि ही बाब इतरांकरिता अनुकरणीय नाही. याच्या पुष्टीकरिता पैगंबरांचे एक वचन सादर करण्यात येते. परंतु त्या वचनानेदेखील पुष्टी

होत नाही. चौथी तार्किक बाब अशी की जेव्हा पैगंबर (स.) यांनी पाहिले की या इसमास दिव्य कुरआनच्या अनेक आयती मुखपाठ आहेत, तेव्हा त्यांनी त्याच्या विद्वत्तेची कदर करून तो गरीब व दीन असतानासुद्धा त्या स्त्रीचा 'निकाह' त्याच्याशी केला आणि मेहेरची राशी निश्चित केली नाही. परंतु 'मेहेर मुअज्जल' देणे (नगदी राशीतील मेहेर) त्याच्यावर आपोआप अनिवार्य झाले जे त्यास पुढील आयुष्यात द्यावेच लागले असेल. परंतु या पूर्ण तार्किक बाबी अतिशय कमकुवत आहेत आणि पैगंबर प्रवचनाच्या वर्णनानुसार सिद्ध होत नाहीत.

हनफी विद्वानांच्या तर्काचा आधार इमाम बैहकी यांच्या पैगंबर वचनांच्या संग्रहातील या हदीसवर आहे की पैगंबरांनी सांगितले,

'मेहेरची रक्कम दहा दिरहमपेक्षा कमी असू शकत नाही.'

याच्या पुष्टीकरिता 'माननीय अली' यांनी कथन केलेल्या पैगंबराच्या कथनानेसुद्धा होते. पैगंबरांनी सांगितले,

''मेहेर दहा दिरहम'पेक्षा कमी असू शकत नाही''

(दारेकुतनी व बैहकीचा संग्रह)

'मेहेर'ची राशी निश्चित असण्यावर सहमत असलेले लोक मेहेरनिश्चितीचा अर्थ 'कतए-यद' असा घेतात. हनफी विद्वानांनुसार 'कतए यद'चे प्रमाण दहा दिरहम एवढे आहे. करिता ते असे मत व्यक्त करतात की 'मेहेर'चे प्रमाण कमीतकमी दहा दिरहम तरी असावे. कारण या प्रमाणावरून असे सिद्ध होते की दहा दिरहमपेक्षा कमी संपत्ती कोणत्याही आदरयुक्त अवयवास हात लावण्याची पण शास्त्रसंमत परवानगी देत नाही. परंतु एक तर हे 'कतए यद'चे प्रमाण सिद्ध करणारे पैगंबरवचन 'बुखारी व मुस्लिम'च्या संग्रहात नाही. (मौलाना अन्वरशाह कश्मीरींनी लिहिले की 'कतए यद'चे प्रमाणसुद्धा मेहेरच्या प्रमाणाप्रमाणेच पैगंबरकाळाच्या प्रारंभी खूप कमी होते. परंतु नंतर ते वाढविण्यात आले. व दहा दिरहम एवढे करण्यात आले. (संदर्भ : फतहुल) द्वितीय हे की स्त्रीपासून मिळणाऱ्या वैवाहिक सुख व आनंदास 'कतए यद'च्या दृष्टिकोनाने पाहणे एक निराधार समज आहे. कारण 'कतए यद' (हात कापणे) म्हणजे एका अपराधाची शिक्षा असून यामुळे माणसामध्ये भावनिक त्रुटी निर्माण होते. परंतु स्त्रीपासून वैवाहिक सुख व समाधानामध्ये 'शिक्षे'ची कोणतीच कल्पना करणेही शक्य नसून व कोणतीच खराबी नसून हे आपसातील 'प्रेम' व एका विशेष भावनिक शांतीचे साधन आहे. म्हणून दोन्ही बाबींची समानार्थी तुलना करणे योग्य नाही. (इब्ने रशद, बदायतुल मुज्तहिद, २/१०,२०)

पैगंबर प्रवचनाच्या अध्ययनावरून हे स्पष्ट होते की पैगंबर (स.) यांच्या काळात 'मेहेर'च्या राशीचे प्रमाण हे दहा दिरहमपेक्षाही कमी होते, करिता दहा दिरहम एवढे प्रमाण निश्चित करणे योग्य होणार नाही. याची काही उदाहरणे खाली देण्यात येत आहेत.

१) पैगंबरांचे सोबती आदरणीय अब्दुर्रहमान बिन औफ (रजि.) यांनी एका अंसारी स्त्रीशी विवाह केला व एक 'नवात' सोने 'मेहेर' निश्चित केले. (खजुरीच्या बी एवढे सोने) तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांना माहीत झाले. तेव्हा त्यांनी सांगितले की बारकल्लाह (अल्लाह बरकत देओ!) 'वलीमा' करा, मग एक शेळीचा का असेना. (अर्थात एक शेळी कापून लग्नाप्रित्यर्थ भोजन द्या.)

(संदर्भ : बुखारी, किताबुन्निकाह, मुस्लिम किताबुन्निकाह, बाबुस्सदाफ)

२) आमेर बिन रबिया कथन करतात की एका व्यक्तीने बनू फराजा कबिल्याच्या एका स्त्रीशी 'निकाह' केला आणि 'मेहेर'मध्ये केवळ चपलांची एक जोडी दिली. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी नवरीमुलीस विचारले, ''या 'मेहेर'मुळे तुम्ही समाधानी आहात काय? व याच्या 'निकाह'मध्ये येण्यास तयार आहात काय?'' त्यावर नवरीमुलीने होकारार्थी उत्तर दिले व पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हा 'निकाह' शास्त्रसंमत ठरविला.

(संदर्भ : इब्ने यसीर, अल नहाया फी गरीबुल हदीस : ४/१८४)

'नवात मिन जहब'च्या अर्थात विवाद आहे. परंतु कोणीही दहा दिरहमचा अर्थ सांगितला नाही. वर आम्ही प्रचलित अर्थाचा उल्लेख केला आहे.

(इब्ने हजर : फतहुल बारी: ९/१८४,१८५)

३) माननीय जाबिर कथन करतात की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले की जर एका व्यक्तीने त्याच्या 'मेहेर'मध्ये एक ओंजळ धान्य दिले व 'मेहेर'चे हे प्रमाण जर त्या स्त्रीने मान्य केले तर हा निकाह शास्त्रसंमत आहे.

(संदर्भ : मसनद अहमद ३/४४५ तिर्मिजी, अल बाबुल निकाह, बाब माजा, फी महुरून्निसा, इब्ने माजा, अबवाबुन्निकाह, बाब सदाकुन्निसा)

यामधील पहिले कथन प्रमाणित कथनसंग्रहांच्या सर्वच ग्रंथांत सापडते. म्हणून याच्या प्रमाणित असण्यात शंकेला वाव नाही. नंतरच्या कथनात काहीअंशी दुर्बलता आहे. परंतु 'मेहेर' निश्चितीच्या बाबतीत जे पैगंबरवचन प्रस्तुत करण्यात येते, ते अर्थातच प्रमाणित आहे. याव्यतिरिक्त यांची पुष्टी काही इतर वचनांमुळेसुद्धा होते.

यावरून स्पष्ट होते की उभय पक्षांना या बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य व अधिकार आहे की ते 'मेहेर'ची राशी कमी वा जास्त प्रमाणात निश्चित करू शकतात.

(या बाबतीत अनेक पैगंबरकथने 'दारेकुलनी' या संग्रहात उपलब्ध आहेत किताबुन्निकाह, बाबुल मेहेर, पृष्ठ ३९१-३९२, परंतु या सर्व कथनांत दौर्बल्य आहे.)

वास्तव असे आहे की शरीयतने 'मेहेर'ची राशी निश्चित केली नसून ती प्रत्येक काळातील परिस्थिती, पती-पत्नींची आर्थिक परिस्थिती व सामाजिक परिस्थिती, त्यांची कौटुंबिक परंपरा, आपसांतील संबंध आणि विश्वास व स्त्रीच्या गरजांवर अवलंबून आहे. त्यांना वाटल्यास कमीतकमी राशी निश्चित करू शकतात अथवा आर्थिक परिस्थितीनुसार जास्तीतजास्तही ठरवू शकतात. दिव्य कुरआनातसुद्धा असेच मार्गदर्शन मिळते. अर्थात दिव्य कुरआनात म्हटले आहे,

''त्यांच्या मालकांच्या परवानगीने त्यांच्याशी 'निकाह' करा आणि प्रचलित रीतीनुसार त्यांचे 'मेहेर' अदा करा.'' *(दिव्य कुरआन, ४ : २५)*

या ठिकाणी 'मेहेर'साठी 'अजोर' हा शब्द प्रयोग झाला आहे आणि त्यास भल्यासाठी प्रतिबंधित करण्यात आहे. यात शंका नाही की ह्या आयतीमध्ये स्वतंत्र व स्वावलंबी स्त्रीच्या मेहेरचा उल्लेख नसून 'लौंडी'च्या मेहेरचा उल्लेख आहे. बहुतेक इस्लामी विद्वानांच्या मते 'लौंडी' (दासी) तिच्या 'मेहेर'ची मालकीन होत नसून तिचा स्वामी मालक होतो. परंतु यातून एवढे अवश्य स्पष्ट होते की शरीयतने 'मेहेर'चा विषय 'मआरुफ' (सद्कार्य) म्हणूनच घेतलेला आहे. 'मआरुफ'चा अर्थ कोणत्याही काळातील अशी रीत जिला सामान्यत: चांगल्या दृष्टिकोनाने पाहिले जाते आणि ते शरीयतच्या स्पष्ट आदेशानुसार असते. अर्थात 'मेहेर'ची जी राशी योग्य समजली जाईल व त्यामध्ये अयोग्यतेची संभावनासुद्धा नसेल, तेच मेहेरचे योग्य प्रमाण असेल. यामध्ये स्त्री व पुरुष दोघांची पात्रता व क्षमतांचाही विचार व्हावा आणि काळाच्या परिस्थितीचा पण विचार व्हावा. नसता चांगल्या दृष्टिकोनातून त्याकडे पाहणे शक्य होणार नाही.

यामध्ये एक चर्चा अजून शेष राहिली. ती या बाबतीत की शेवटी 'मेहेर'ची राशी म्हणजे काय? हनफी पंथाच्या विद्वानांनुसार मेहेरची राशी म्हणजे 'नगदी' किंवा अशा वस्तू ज्यांची बाजारात किंमत असते. अबू बकर जशास म्हणतात की ''आपल्या संपत्तीच्या माध्यमाने त्यांना निमंत्रण द्या!'' यामुळे स्पष्टरित्या दोन गोष्टी समोर येतात. प्रथम हे की 'मेहेर' केवळ संपत्तीच्या स्वरुपातच असावे व ज्याची मालकी स्त्रीला मिळावी. द्वितीय हे की 'मेहेर' स्त्रीच्या स्वाधीन करण्यात यावे

जेणेकरून तिला त्यापासून लाभ घेता यावा. नफ्यामध्ये या दोन्ही बाबी शक्य नाहीत. कारण यामध्ये वरील प्रथम व द्वितीय दोन्ही बाबींचा समावेश नाही. दिव्य कुरआनात एक आयत आहे,

'स्त्रियांचे मेहेर आनंदाने अदा करा.' *(दिव्य कुरआन, ४ : ४)*

''स्त्रियांना त्यांचे 'मेहेर' द्या''चा स्पष्ट अर्थ असा की स्त्रियांना कोणत्याही प्रकारचा फायदा पोहोचविणे नसून एखादी भौतिक वस्तू व राशी देणे होय. अर्थात 'मेहेर'ची राशी स्त्रीला देण्याचा आदेश आहे व याला 'मेहेर'च्या राशीऐवजी इतर दुसरा कोणताच फायदा पोहोचविणे हा मेहेरला पर्याय ठरू शकत नाही. मग ''तुम्ही मजेशीरपणे खाऊ शकतात'' या शब्दांमुळे आणखीनही स्पष्ट होते की 'मेहेर'चे स्वरूप असे असावे की स्त्री त्यापासून भौतिक उपभोग घेऊ शकते अथवा खाण्यापिण्याच्या वा सुख-चैनीच्या वस्तू खरेदी करू शकते. उदाहरणार्थ- जर कोणी आपल्या पत्नीचा मेहेर असा निश्चित केला की तो 'मेहेर'मध्ये तिला दिव्य कुरआनचे शिक्षण देईल. तेव्हा या बाबीस 'मेहेर' म्हणता येणार नाही.

(जसास अहकामुल कुरआन : २/१७३) तसे पाहता हनफी विद्वानांजवळ कुरआनच्या शिक्षणाचे वेतन घेणे अथवा नफा घेणे योग्य नाही.

(तहावी : शरह अमानिउल आसार)

इमाम शाफई यांनी सांगितले की, कुरआनच्या शिक्षणाचा मोबदला घेणे योग्य आहे आणि हा मोबदला पण 'मेहेर' होऊ शकतो. (नूदी, शरह मुस्लिम १/४५६) वर उल्लेखिलेल्या पैगंबरकथनाने याची ते पुष्टी करतात. ज्यामध्ये पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे,

''जा (आणि निश्चिंतच व्हा!) मी तुमचा निकाह या (स्त्री) बरोबर करून टाकला आहे, या कुरआनच्या बदल्यात जे तुमच्या जवळ आहे.''

(बुखारी किताबुन्निकाह)

आणखीन एक कथन आहे,

''मी तुमचा निकाह या (स्त्री) बरोबर केला. तुम्ही हिला कुरआनचा काही भाग शिकवा.''

काही आणखीन पैगंबरकथनांतून याची सविस्तर माहिती मिळते. नंतरच्या अहनाफ विद्वानांनी या दोन्ही बाबतीत इमाम शाफई (रजि.) यांची वैचारिक बाजू स्वीकार केली. ते कुरआनच्या शिक्षणाचे वेतन घेणे अथवा दिव्य कुरआनचे शिक्षण

'मेहेर'च्या स्वरुपात देणे या दोन्ही बाबी शास्त्रसंमत आणि योग्य समजतात. (रद्दुल मुख्तार अलल दुर्रे मुख्तार, २/४५९) अशा प्रकारे या प्रश्नांवर बरेच विद्वान सहमत झाले आहेत. याचा अर्थ असा झाला की 'मेहेर' नगदी राशीच्या स्वरूपातही असू शकतो. बाग, शेती जमीन, घर किंवा अशा कोणत्याही मौल्यवान वस्तू व मालमत्तेच्या स्वरुपात असू शकतो आणि स्त्रीची इच्छा असल्यास मेहेरच्या मोबदल्यात ती कोणत्याही प्रकारचे धार्मिक, तांत्रिक, वैद्यकीय व इतर सर्व प्रकारचे पुरातन व आधुनिक शिक्षण घेऊ शकते.

'मुतलका' (तलाक झालेल्या) स्त्रीचा 'मेहेर'

मेहेरच्या काही नियमांचा संबंध 'तलाक' (इस्लामी विधीनुसार पतीने पत्नीस दिलेला घटस्फोट) शीसुद्धा आहे. तलाक दोन प्रकारे होत असतो. प्रथम प्रकार हा की पती-पत्नींच्या लैंगिक संबंध प्रस्थापित होण्यापूर्वीची 'तलाक' व द्वितीय प्रकार म्हणजे लैंगिक संबंध प्रस्थापित झाल्यानंतर देण्यात आलेला 'तलाक' दोन्ही परिस्थितीत 'मेहेर' निश्चित होईल अथवा होणार नाही. अशा प्रकारची 'तलाक' चार परिस्थितीत होऊ शकते.

(संदर्भ : शरह विकाया २ - ३८/३९)

१) 'तलाक' जर लैंगिक संबंध प्रस्थापित झाल्यानंतर देण्यात आला असेल आणि 'मेहेर' ठरविण्यात आलेले असेल तर पूर्ण मेहेर देणे आवश्यक होईल. दिव्य कुरआनात आहे,

''स्त्रियांना त्याचे 'मेहेर' भेट म्हणून द्या.'' *(दिव्य कुरआन, ४:४)*

दुसऱ्या ठिकाणी आहे,

''तुमच्यासाठी वैध नाही की जे मेहेर तुम्ही त्यांना दिले आहे त्यातून काहीही परत घ्यावे.'' *(दिव्य कुरआन, २ : २२९)*

२) तलाक जर लैंगिग संबंध प्रस्थापित झाल्यानंतर देण्यात आला असेल आणि मेहेर निश्चित झालेले नसेल तरी मेहेर द्यावाच लागणार. कारण स्त्रीशी वैवाहिक सुख भोगल्यानंतर 'मेहेर' देणे अनिवार्य आहे. आणि त्याचे प्रमाण या स्त्रीच्या कुटुंबातील इतर स्त्रियांच्या मेहेरबरोबर असेल.

(रद्दुल मुख्तार अलल दुर्रुल मुख्तार, २/४६०)

इमाम राजी सांगतात की यांची तार्किक बाजू अशी आहे की चुकून एखाद्या

स्त्रीशी संभोग झाल्यास ज्याअर्थी मेहेर देणे अनिवार्य होते, त्याअर्थी प्रत्यक्षात लग्न करून आणलेल्या पत्नीससुद्धा मेहेर देणे अनिवार्य होईल.

(तफसीरे कुबीर, २/२८२)

३) निकाह झाल्यानंतर संभोग होण्यापुर्वीच 'तलाक' देण्यात आला आणि मेहेर निश्चित झालेले असल्यास निम्मे 'मेहेर' देणे अनिवार्य होईल. दिव्य कुरआनाने याचे अशा प्रकारे विश्लेषण केले,

''जर तुम्ही स्पर्श करण्यापूर्वी तलाक दिला असेल तेव्हा 'मेहेर'चा निम्मा भाग द्यावा लागेल. मात्र तिने उदारता दाखवावी (अर्थात मेहेर घेऊ नये) किंवा त्या पुरुषाने, ज्याच्या अधिकारात निकाहचे बंधन आहे. उदारता दाखवावी (आणि पूर्ण 'मेहेर' द्यावा) व तुम्ही उदारतेचा व्यवहार करावा, तर हा व्यवहार अल्लाहच्या प्रकोपाला भिऊन वागण्यासाठी अधिक सुसंगत आहे. परस्पर व्यवहारामध्ये औदार्याचा विसर पडू देऊ नका. तुमच्या कृती अल्लाह पाहात आहे.'' *(दिव्य कुरआन, २ : २३७)*

४) प्रत्यक्ष संभोगापूर्वी तलाक देण्यात आला आणि 'मेहेर'सुद्धा निश्चित झालेले नव्हते, अशा परिस्थितीत पतीने पत्नीला 'मताअ' (काही धन अथवा द्रव्य) द्यावे. दिव्य कुरआनने या परिस्थितीतील मेहेरचा उल्लेख न करता मताअचा उल्लेख केला आहे.

दिव्य कुरआन मध्ये आहे,

''तुमच्यावर कुठलाही गुन्हा नाही की तुमच्या पत्नींना तुम्ही तला!क द्यावा यापूर्वी की त्यांना स्पर्श करण्याची घटका येईल अथवा मेहेर ठरविला असेल. अशा स्थितीत त्यांना काही न काही अवश्य दिले पाहिजे. सुखवस्तू व्यक्तीने आपल्या ऐपतीप्रमाणे व गरीबाने आपल्या कुवतीप्रमाणे प्रचलित पद्धतीनुसार द्यावे. उपकार करणाऱ्या लोकांवर हे अनिवार्य आहे.''

(दिव्य कुरआन, २ : २३६)

या चार परिस्थिती व्यतिरिक्त आणखीन एक परिस्थिती अशी की प्रत्यक्षात संभोगापूर्वीच पती वारला असल्यास आणि 'मेहेर' निश्चित झाला नसल्यास. या स्त्रीस 'मेहेर'ऐवजी 'मताअ' देण्यात येईल.

(इमाम मालिक आणि इमाम औजाई वगैरे या मतांशी सहमत आहेत. याचा पुरावा असा की पुरुष स्त्रीबरोबर जे लैंगिक संबंध प्रस्थापित करतो त्याचा 'मेहेर'

मोबदला असतो. मग ज्याअर्थी हे संबंधच प्रस्थापित झालेले नसतील तर 'मेहेर'चा प्रश्नच उद्भवत नाही. एक मात्र निश्चित की तिला पतीच्या संपत्तीमधून 'मताअ' (काही द्रव्य) देण्यात येईल. इमाम शाफई यांचे पण मत हेच आहे.

परंतु इमाम अबू हनीफा आणि इमाम अहमद यांचे मत असे आहे की स्त्रीला कुटुंबाच्या इतर स्त्रियांएवढे 'मेहेर' मिळेल आणि वारसाहक्कसुद्धा मिळेल. याची पुष्टी एका हदीस (पैगंबरवचन) ने होते. माननीय अब्दुल्लाह बिन मसऊद (रजि.) (पैगंबरांचे सोबती) यांना विचारण्यात आले की एका इसमाचे देहावसान झाले. त्याने निकाह केलेल्या स्त्रीशी 'मेहेर' ठरविला नव्हता आणि तिच्याशी समागम पण केले नाही. यावर ते उत्तरले, ''वधूच्या परिवारातील इतर स्त्रियांच्या मेहेरइतकी राशी तिला 'मेहेर'च्या स्वरूपात देण्यात यावी. त्याचप्रमाणे तिला 'इद्दत'सुद्धा पूर्ण करावी लागेल. (अर्थात शरीयतच्या नियमांनुसार पती वारल्यानंतर विधवेने सलग तीन महिने एकांतात असावे) आणि तिला 'मीरास' (वारसाहक्क) सुद्धा मिळेल.'' माननीय मआकल बिन सनआन अबू जई (रजि.) यांनी माननीय अब्दुल्लाह बिन मसऊद (रजि.) यांच्या फतव्याशी सहमती दर्शवली आणि सांगितले, ''आमच्या कबिल्याची एक स्त्री 'बरोअ बिन्त वरशक'च्या बाबतीत नेमके असेच घडले. यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी असाच निर्णय दिला होता.'' हे ऐकून माननीय अब्दुल्लाह बिन मसऊद (रजि.) आनंदीत झाले. (तिर्मिजी, अबू दाऊद)

या 'हदीस'वर 'जिरह' (टीका) करण्यात आली. परंतु या जिरहमध्ये तथ्य नाही. इमाम शाफई यांचे शिष्य इमाम मुजनी म्हणतात की ही हदीस शास्त्रसिद्ध असल्यास तिच्याविरुद्ध कोणाचेच मत स्वीकारण्याचा प्रश्नच नाही. (तजूजवलम यसम सदाका) ही 'हदीस' शास्त्रीयदृष्ट्या सक्षम असल्याने इमाम अबू हनीफा यांचीच भूमिका जास्त स्वीकारणीय आहे.

जर शारीरिक समागमापूर्वी स्त्री वारल्यास आणि 'मेहेर' निश्चित झालेले नसल्यास या बाबतीतसुद्धा असाच नियम आहे.

(रद्दुल मुख्तार अलल दुरुल मुख्तार, २/४६०)

स्त्रीला 'मेहेर' वापरण्याचा अधिकार आहे

दिव्य कुरआनने स्पष्टपणे सांगितले आहे की 'मेहेर' हा स्त्रीचा धर्मसिद्ध अधिकार आहे, प्रथम तिचा हा अधिकार स्वीकारणे आवश्यक आहे. मग तिला वाटल्यास ती मेहेरची संपूर्ण राशी वसूल करू शकते अथवा त्यातून काही रक्कम कमीसुद्धा करू शकते किंवा पूर्ण 'मेहेर' माफ करु शकते. दुसरीकडे पुरुषालासुद्धा सांगण्यात आले की स्त्रीने जर स्वखुशीने मेहेरचा काही भाग तुम्हाला परत केला तर तुम्ही तो आनंदाने स्वीकारावा व स्वत:करिता खर्च करावा. यात काहीच गैर नाही. कारण दिव्य कुरआनात म्हटले आहे,

''स्त्रियांचे मेहेर आनंदाने अदा करा.'' *(दिव्य कुरआन, ४ : ४)*

या आयतीमध्ये ही गोष्ट पूर्णपणे स्पष्ट करण्यात आली आहे की 'मेहेर' केवळ स्त्रीचीच सर्वस्वी मिळकत आहे. तिला या मालकीहक्कापासून वंचित करता येत नाही. तिला पूर्णत: आपली मिळकत स्वतंत्ररित्या खर्च करण्याचा अधिकार आहे. जर तिने स्वखुशीने त्यातील काही अंश पतीस वापरण्यास दिल्यास पती वापरू शकतो. परंतु तिच्यावर बळजबरी केल्यास अथवा धमकी देऊन तिच्या 'मेहेर'वर घाला घातल्यास ते शरीयतच्या कायद्यानुसार अपराध ठरेल. काही विद्वानांनी तर इथपर्यंत लिहिले की जर स्त्रीने सुरुवातीस 'मेहेर' माफ केला तरी नंतर ते परत मागण्याचा तिला शास्त्रसमंत अधिकार आहे. कारण हे नेमके याचे लक्षण आहे की तिने स्वखुशीने 'मेहेर' माफ केलेला नव्हता. (तफसीरे कबीर, ३/१४६)

'इमाम शैअबी' कथन करतात की 'एकदा तत्कालीन न्यायाधीश ('काझी शरीह') यांच्या न्यायालयात एक स्त्री आपल्या पतीसह आली. त्या स्त्रीने तिच्या पतीस दिलेली भेटपरत मिळण्याची तिने मागणी केली. न्यायाधीशांनी तिच्या पतीला ती भेट परत करण्याचा आदेश दिला, तेव्हा पतीने उपरोल्लेखित कुरआनच्या आयतीचा संदर्भ देऊन भेट परत करण्यास शास्त्राच्या असंमतीकडे न्यायधीशांचे लक्ष वेधले. यावर काझी शरीह यांनी म्हटले की कुरआनात असे सांगितले की 'तिने स्वखुशीने दिलेली भेट अवश्य स्वीकारा! परंतु जर तिने स्वखुशीने ही भेट दिली असती, तर परत मागितलीच नसती.

माननीय उमर (रजि.) यांच्या बाबतीत असे वर्णन मिळते की त्यांनी न्यायाधीशांना लिखित आदेश दिलेत की जर स्त्रीने तिची पतीस दिलेली रक्कम परत मागितली तर ती तिला परत करावी. (मागील संदर्भानुसार)

तसे पाहिल्यास चारही पंथांचे विद्वान यावर सहमत नाहीत की पती-पत्नी पैकी कुणीही आपसांत दिलेली भेट परत घ्यावी.

(इब्ने हुबैरा अल-अफसाह, २/५९)

ही एक वैधानिक चर्चा आहे. एवढे मात्र निश्चित की स्त्रीने पतीस काही द्यावयाचे असल्यास उल्हासित अंत:करणाने द्यावे. यामध्ये नाराजी व बळजबरी योग्य नाही.

आणखीन एका ठिकाणी दिव्य कुरआनात आहे,

'यामध्ये कोणताही गुन्हा नाही की मेहेर निश्चित झाल्यावर आपसांतील राजीमर्जीने या बाबतीत एखादी गोष्ट निश्चित करा.'

स्त्री आणि पुरुषाच्या आपसांतील सहयोगी भावनांनी मेहेरमध्ये तडजोड होऊ शकते. अर्थात ही राशी वाढवणे किंवा कमी करता येणे शक्य आहे. तसेच त्याच्या अदायगीच्या ठराविक मुदतीत वाढही होऊ शकते आणि ही मुदत कमीसुद्धा होऊ शकते अथवा या परिस्थितीत बदलसुद्धा शक्य आहे आणि पत्नीस वाटल्यास ती 'मेहेर' माफसुद्धा करू शकते अथवा त्यात बदल पण होऊ शकतो. उदाहरणार्थ, 'मेहेर'मध्ये 'बागे'च्या ठिकाणी 'घर'सुद्धा होऊ शकते अथवा घराच्या ठिकाणी 'कारखाना'सुद्धा होऊ शकतो.

या सर्व बाबींचा संबंध पती-पत्नींच्या आपसांतील जिव्हाळा, संबंध व विश्वास आणि परिस्थितीशी आहे. म्हणूनच दिव्य कुरआनने हा विषय त्यांच्या मर्जीवर व इच्छेवर आधारित ठेवला आहे. एका कर्तव्यपूर्तीत या संधी व सवलतीमुळे सामाजिक जीवनात जे आनंदीत व प्रफुल्लीत वातावरण निर्माण होते, ही निश्चितच आनंददायक व लाभदायक बाब आहे.

बहुपत्नीत्व

इस्लाममध्ये 'बहुपत्नीत्व' निषिद्ध नाही. काही विशेष शर्तीनुसार हे शास्त्रसंमत आहे. यावरही हरकत घेण्यात आली आणि असे सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला की 'एकपत्नीत्व' मानवाची स्वाभाविक मागणी आहे. तेव्हा हे त्याच्या स्वभावाविरुद्ध आहे की एकाच वेळेत तो अनेक पत्नींचा दादला असावा. अर्थात हा स्त्रीवर मोठा अन्याय होईल की एका घरात एक पत्नी असताना दुसऱ्या पत्नीस त्या घरात तिची स्पर्धक आणि सवत करून जीवनभर तिला मानसिक ताप द्यावा. अशा प्रकारे बहुतेक देशांत या 'अन्याय व अत्याचारा'वर प्रतिबंध लावण्यात आला आणि बहुपत्नीत्वावर कायदेशीर बंदी घालण्यात आली. काही देशांत कायदेशीर बंदी नसली तरी याला चांगल्या नजरेने कोणी पाहत नाही. वर्तमान स्थितीत किंबहुना खूप कमी देश असे असतील, जेथे कायदेशीर आणि नैतिक आधारावर यात काही वाईट आणि गैर समजण्यात येत नसेल.

बहुपत्नीत्वाच्या प्रश्ना बाबतीत प्रारंभीच मला हे सांगावेसे वाटते की यासाठी केवळ इस्लाम धर्मालाच टीकेचे लक्ष्य बनविणे योग्य नाही. कारण जर बहुपत्नीत्व अपराधच असेल तर तो केवळ इस्लामकडूनच घडला नसून इतर धर्मांनी व राष्ट्रांमध्येसुद्धा घडला. इस्लामपूर्वी जगाच्या कित्येक राष्ट्रांत व समाजात ही प्रथा प्रचलित होती. विविध धर्मांची वैधानिक मान्यता आणि नैतिक संमती याला होती. तसेच याला अपराध किंवा पाप समजले जात नसे. केवळ वैराग्यांच्या धर्मात बहुपत्नीत्वच काय तर एकपत्नीत्वसुद्धा सहन होत नसे. ईसाई धर्माचा प्रसारसुद्धा सन्यासी व वैरागी धर्माच्या स्वरुपात झाला. या धर्मामध्ये विशेष धार्मिक वृत्ती असलेल्या व्यक्तीसाठीसुद्धा नाईलाजास्तव केवळ एकाच पत्नीची परवानगी होती. पश्चिमी देशांचा नास्तिकतेचा दावा असूनही ते ईसाई धर्माच्या प्रभावापासून स्वतःस अलिप्त ठेवू शकले नाही. त्यांनी एकपत्नीत्वाच्या कल्पनेस मान्यता तर दिली परंतु बहुपत्नीत्वाची कल्पना त्यांना सहन झाली नाही. जी राष्ट्रे पश्चिमी विचारसरणीच्या घट्ट विळख्यात होती त्यांनी त्यांचा पुरस्कार अशा प्रकारे सुरु केला की जसे प्रथमच त्यांचे डोळे उघडले आणि स्त्रीच्या श्रेष्ठत्वाचा जणू त्यांना साक्षात्कार झाला.

बहुपत्नीत्वाकडे पुरुषाची मानसिकता

प्रथम हा विषय एका पुरुषाच्या दृष्टिकोनाने पाहा. यात शंका नाही की सामान्यत: एक पुरुष एकच पत्नी ठेवतो. परंतु बहुपत्नीत्वास केवळ अशा प्रकारचेच लोक स्वभावाविरुद्ध व निसर्गाविरुद्ध मानतात ज्यांनी स्वभाव आणि निसर्गाचा अभ्याससुद्धा पाश्चात्यांचा चष्मा लावून केला आहे. ही वस्तुस्थिती आहे की पुरुषांमध्ये एकापेक्षा जास्त पत्नी ठेवण्याचा कल आहे. तो जर एका पत्नीवर जरी समाधानीत असला तरी असा दावा केला जाऊ शकत नाही की त्याच्यात बहुपत्नीत्वाची मानसिकता आणि आकर्षण नाही. पुरुषांमध्ये बहुपत्नीत्वाचे तीव्र आकर्षण असल्यामुळे त्याला याची कायदेशीर व नैतिक परवानगी न मिळाल्यास या गोष्टीची घोर शक्यता आहे की तो आपली नैसर्गिक असलेली लैंगिक तृष्णा भागविण्यासाठी व्यभिचार कर्माचे वाममार्ग अवलंबिले. याचा पश्चिमी देशांतील अनुभव आपल्या समोर आहेच. त्यांच्याकडे बहुपत्नीत्वास कायदेशीर मान्यता नसल्याने तेथील पुरुष व्यभिचार आणि बेकायदा लैंगिक संबंधांना बळी पडले आहेत व हे सर्वकाही त्या देशांना सहन करावे लागते. आज कायदेशीररित्या तेथे एक पत्नी असतानासुद्धा कितीतरी मैत्रिणी व रखेली आहेत. या अवैध स्त्रिया संपूर्ण अधिकारांपासून वंचित आहेत जे वैधानिक अधिकार केवळ शास्त्रसंमत 'निकाह' केलेल्या पत्नीस मिळत असतात.

बहुपत्नीत्व पुरुषाची एक गरज

बहुपत्नीत्वाकडे पुरुषाचे केवळ नैसर्गिक आकर्षणच नसून कधी-कधी ही त्याची गरज बनते. लैंगिक भावना ही नैसर्गिक भावना आहे. ज्या लोकांमध्ये ही भावना तीव्र होते व त्यांचे या भावनेवरील नियंत्रण व ताबा सुटतो, अशा लोकांसाठी एक स्त्री पुरेशी नसते. याचे कारण असे आहे की पत्नी ही मासिक पाळी, रक्तस्राव, गर्भ वगैरेसारख्या स्थितीत असल्यास तिच्या लैंगिक भावना थंडावलेल्या असतात आणि ती पुरुषीय भावनांचे समाधान करण्यास अक्षम ठरते. याची दुसरी बाजू अशी की या दिवसांत लैंगिक संबंध ठेवण्यात काही अडचणीसुद्धा असतात. मासिक पाळीच्या व रक्तस्रावाच्या काळात माणसात तिची घृणा येते आणि अशा स्थितीतील समागम मुलांच्या आरोग्यास हानीकारकसुद्धा असते. तसेच अनुभवाने सिद्ध झाले की स्त्री-पुरुषांच्या अशा परिस्थितील संबंधांचा मुलांच्या नैतिकतेवर आणि सवयींवर दुष्परिणाम होतो.

गर्भधारणा, मुलाचा जन्म आणि नंतरचा रक्तस्राव यामुळे स्त्रीची शारीरिक अवस्था खूप प्रभावित होते. परिणामी ती पुरषाच्या तुलनेत लवकर वृद्धत्वाकडे

वाटचाल करते. या कारणास्तव जर कोणी पुरुष एका पत्नीवर समाधानी नसताना दुसरे लग्न करू इच्छिल्यास त्याची भूमिका गैर नाही. एवढे मात्र निश्चित की त्याने अनिवार्यरित्या दोन्ही पत्नींच्या अधिकारांशी समान न्याय करावा, हे त्यावर बंधनकारक आहे.

स्त्रीसाठी बहुपत्नीत्वाची उपयुक्तता

आता आपण एका स्त्रीच्या दृष्टिकोनाने बहुपत्नीत्वाचा विचार करू या. काही वेळा बहुपत्नीत्व स्त्रीच्यासाठी खूप फायदेशीर असते.

१) मानवांमध्ये संततीची इच्छा पूर्णत: एक नैसर्गिक स्वभाव आहे. जर कोणाची पत्नी वांझ अथवा मूल जन्म देण्यास असमर्थ असेल तर त्याच्यासमोर केवळ दोनच पर्याय असतात. प्रथम पर्याय असा की त्याने पहिली पत्नी घरात असताना दुसरा विवाह करावा. द्वितीय पर्याय असा की पहिल्या पत्नीस 'तलाक' देऊन दुसरा विवाह करावा. अशा वेळी कोणतीच पत्नी प्रथम पर्याय स्वीकारण्यास तयार होणार नाही. ती दुसरा पर्याय स्वीकार करणार.

२) पत्नी जर कायम स्वरूपी आजारी असेल अथवा अशा रोगाने पीडित असेल की पुरुषाशी समागम शक्य नसेल, अशा परिस्थितीत तिला 'तलाक' देऊन दुसरीशी 'निकाह' करणे कधीच उचित असणार नाही. अर्थात पहिल्या आजारी पत्नीस 'तलाक' न देता दुसरा निकाह करणेच उचित आणि योग्य असणार.

अशा प्रकारच्या परिस्थितीत पहिल्या पत्नीस तलाक देणे अथवा कायदेशीररित्या विभक्त होण्यास विवश करणे म्हणजे तिच्यावर घोर अन्याय होईल आणि हा अन्याय अशा परिस्थितीत तर आणखीनच असह्य व यातनामय असतो की पहिली पत्नी पतीला सोडण्याच्या स्थितीत नसते व पतीसुद्धा तिला सोडायला तयार नसतो.

बहुपत्नीत्व एका सामाजिक गरजेच्या स्वरुपात

काही परिस्थितीत 'बहुपत्नीत्व' समाजाचीसुद्धा एक गरज बनते.

१) सर्व सामान्यत: स्त्री आणि पुरुषांची संख्या समान असते परंतु जेव्हा एखाद्या राष्ट्रास वा समाजासमोर युद्धासारखी परिस्थिती उद्‌भवते. अशाप्रसंगी पुरुषच हुतात्मा होतात व बळी पडतात आणि त्यातही तरुण पुरुषच कमी होतात. यामुळे स्त्रियांचे प्रमाण वाढते. तरुण स्त्रिया विधवा होतात आणि अविवाहित तरुणींना

विवाहास्तव पुरुष मिळत नाहीत. यावर एक उपाय असा आहे की विधवा स्त्रियांना आणि अविवाहित तरुणींना जशाच्या तशाच अवस्थेत राहू द्यावे. ही परिस्थिती अतिशय स्फोटक व भीषण आहे. याचा अर्थ असा आहे की त्यांना त्यांची कामभावना. वाममार्गाने पूर्ण करण्यास भाग पाडावे आणि त्या लिंगपिसाटांच्या अत्याचारांना बळी पडाव्यात. यामुळे संपूर्ण समाजास व्यभिचाराचे ग्रहण लागणार आणि भीषण परिस्थिती उद्‌भवणार आणि कोणताच सद्‌वर्तनी समाज यास सहन करू शकत नाही.

२) समाज आणि राष्ट्रांच्या जीवनात व्यक्तींची शक्ती अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडते. संरक्षण, औद्योगिक व कृषी उत्पादने निर्मिती आणि प्रगतीकरिता व सामाजिक सेवाकरिता याचे मूलभूत महत्त्व आहे. काही विशेष आणि नाजुक परिस्थितीत याचे महत्त्व आणखीन वाढते. व्यक्तीची शक्ती वाढविण्याचे एक माध्यम बहुपत्नीत्व आहे. कारण सामान्यत: कोणतीही स्त्री वयाच्या चाळीस ते पंचेचाळीसच्या वयात मुलास जन्म देण्यास सक्षम नसते. याउलट पुरुष सत्तर वर्षांच्या वयातसुद्धा स्त्रीशी समागम करुन तिच्यापासून नवीन पिढी उदयास घालू शकतो. अर्थातच पत्नी मूल जन्म देण्यास जेव्हा असमर्थ ठरते, अशा वेळी पतीने दुसरे लग्न केल्यास परत संततीची मालिका सुरु होऊ शकते. करिता ज्या राष्ट्रांना मानवीय शक्तींची गरज आहे त्यांनी बहुपत्नीत्वास प्रोत्साहन द्यायला पाहिजे.

'स्त्री' एकापेक्षा जास्त पतींना सहन करू शकत नाही

काहीजण म्हणू शकतात की पुरुषास एका पेक्षा जास्त पत्न्यां प्रमाणेच स्त्रीला पण एका पेक्षा जास्त पती ठेवण्याचा अधिकार असावा! परंतु ही केवळ मागणी म्हणून मागणी आहे. वास्तविक व्यवहाराशी याचा किंचितही संबंध नाही. कारण की स्त्रीला हा अधिकार दिल्यावर ती हे अधिकार वापरुच शकणार नाही.

एका स्त्रीचे अनेक पतीची प्रथा काही असंस्कृत समाजात आहे. परंतु सुसंस्कृत जगात मात्र यास वाव नाही.

स्त्री स्वभाव असे दर्शविते की ती एका वेळी एकाच पतीची पत्नी होऊ शकते, बहुपतीत्व तिच्या स्वभावाविरुद्ध आहे. स्त्रीवर पारिवारिक जबाबदाऱ्या सहीत, मासिक पाळी, रक्तस्त्राव, वगैरेचा त्रास असतो. काही बाहेरील कार्यपूर्तीसाठी सुद्धा ती विवश होते. म्हणून अनेक पतींची कामेच्छा पूर्ण करणे तिला अंशक्य आहे. तिचे आरोग्य धोक्यात येण्याचीही शक्यता आहे. यामुळे तिला लैंगिक रोग व व्याधि जडण्याची शक्यता आहे. तसेच मानसिक रोगांनासुद्धा ती बळी पडू शकते. तेव्हा

अनुभवाअंती असे दिसते की ज्या स्त्रियांचे संबंध अनेक पुरुषांशी असतात, त्यांना नाना व्याधी जडतात आणि ती खाजगी जीवनाची पात्रता हरवून बसते.

तसेच एका स्त्रीचे अनेक पती असल्यास सामाजिक समस्यासुद्धा निर्माण होतात.

एका पुरुषाच्या चार पत्नीं असल्यास त्या सर्व समानरूपी त्यापासून काम तृप्ती मिळवू शकतात. परंतु उलट परिस्थितीत एका स्त्रीचे जास्त पती असल्यास, एका वेळेस ती केवळ एकाचीच कामेच्छा पूर्ण करू शकते आणि जरी तिने एकाच वेळी सर्व पुरुषांशी समागम केल्यास तिची होणारी मुले नेमकी कोणत्या बापाची आहेत यांचा थांगपत्ता लागणार नाही.

मग अशा परिस्थितीत त्या मुलास कोणत्या बापाचे नाव द्यावे व कुणाशी संबंधित करावे? त्या मुलाच्या शिक्षण व प्रशिक्षणाची जबाबदारी कोण घेईल आणि कोणत्या पित्याचा वारसाहक्क कोणत्या मुलास देता येईल? अशा प्रकारचे असंख्य प्रश्न आहेत, ज्यांना परिवाराच्या वर्तमान व्यवस्थेत जी पुरुषाच्या हाती आहे व जगाने परिवाराच्या वास्तव स्वरुपात मान्य केले आहे. कधीच सुटणार नाहीत.

बहुपतीत्वाच्या व्यवस्थेमुळे समाजातही अनिष्ट परिणाम होतात.

१) पुरुषाचा स्वभाव आहे की, तो कितीही वाईट असला तरी पत्नीबरोबर परपुरुषास सहन करु शकत नाही. एक पत्नीचे कित्येक पुरुषांशी संबंध असल्यास पुरुषांत द्वेष व वैरभाव, तसेच जीवाचे वैर निर्माण होतात व याचे भीषण परिणाम भोगावे लागतात. त्यांची ही जीवघेणी स्पर्धा स्वत: स्त्रीसाठी असह्य होते व तिच्या मानसिक शांतीचा नाश होतो. असेही म्हणण्यात येते की नेमकी हीच परिस्थिती 'बहुपत्नीत्वात' सुद्धा उद्‌भवू शकते. कारण पुरुषाप्रमाणेच स्त्रीसुद्धा आपली सवत पसंत करीत नाही. निस्संदेह हे खरे असले तरी स्त्रीची प्रतिक्रिया पुरुषाएवढी तीव्र नसते. तिला एकापेक्षा जास्त सवती वैचारिकदृष्ट्या अथवा अवैचारिकदृष्ट्या खरे व न्यायिक वाटतेच.

२) स्त्रीमध्ये अल्लाहने लज्जा व शरम निर्माण केलेली आहे. हे गुणधर्म अतिशय नैसर्गिक आहे. एवढ्या उचापती आणि उठाठेवी करूनसुद्धा पाश्चात्य विचारसरणी स्त्रीची ही भावना नष्ट करू शकली नाही. या भावना पुरुषाप्रमाणे ती लवकर व्यक्त करू शकत नाही. तसेच शक्य तेवढे आपल्या भावना न व्यक्त करण्याचाच ती प्रयत्न करते. स्त्रीच्या या लाज-शरमेचा समाजास खूप मोठा लाभ मिळालेला आहे. ती बिनधास्तपणे स्वैराचार करू शकत नाही. एकापेक्षा जास्त

पुरुषीय संबंध तिच्या वैशिष्ट्यास नष्ट करतात, परिणामी ती बिनधास्त व निर्लज्ज होत जाते. स्त्रीने लाज शरमेचा पदर काढून टाकल्यास समाज अती जास्त वेगाने व्यभिचाराच्या दिशेने धावणार.

बहुपत्नीत्व भोग विलासाकरिता नाही!

बहुपत्नीत्वावर आक्षेप घेणाऱ्यांचा एक मुद्दा असा आहे की 'बहुपत्नीत्व'सुद्धा भोगविलासीपणाचे एक स्वरूप आहे. यामुळे पुरुषास वासनातृप्ती व व्यभिचाराचे उघड स्वातंत्र्य मिळते. तसेच यामुळे जहागीरदार व धनाढ्यांनी स्त्रियांना त्यांच्या महालात अक्षरश: कैदेचे जीवन कंठीत करण्यास भाग पाडले. इस्लामने बहुपत्नीत्वाची विचारधारा स्वीकारून या व्यवस्थेचा पुरस्कार केला आणि स्वैर वासनापूर्ती व व्यभिचाराचे दरवाजे उघडले, जेणेकरून माणसाला वाटेल तेव्हा वाटेल त्या स्त्री बरोबर विवाह करून चार बायकांची संख्या पूर्ण करण्यासाठी वाटेल तिला तलाक देऊन दुसरीला महालात आणून लैंगिक स्वैराचार करायला नेहमी सूट मिळावी आणि वाटेल तेव्हा चारही बायकांना तलाकच्या फैरी झाडून घरातून कचऱ्यासारखे बाहेर काढावे आणि परत चार-चार निकाह करून आपल्या वासनेच्या देवतांस चार-चार नववधू बळी द्यायचे आणि मनसोक्त मजा करायची.

हा आक्षेप एकपत्नीत्वाच्या व्यवस्थेवरसुद्धा घेता येतो. माणसाला वाटल्यास पहिल्या पत्नीचा कंटाळा येताच तिला घराबाहेर काढून लागलीच नवीन बायको आणून कामभावनांची आग शांत करता येते. परंतु अशा प्रकारचा आक्षेप केवळ अशी व्यक्तीच घेऊ शकते, जी हे वास्तव नाकारत असते की व्यभिचारी माणूस हा नेहमीच गैरजबाबदार असतो. त्याला फक्त आपल्या कामपूर्तीशीच देणेघेणे असते. जे लोक व्यभिचारी मनोवृत्तीचे होते त्यांनी बहुपत्नीत्वच काय, अगदी वैवाहिक जीवनसुद्धा नाकारले आणि यदाकदाचित नाईलाजास्तव वैवाहिक जीवन जगले तरी स्त्रीच्या अधिकारांवर घाला घातला. इस्लाममध्ये वैवाहिक जीवन हे जबाबदाऱ्यांनी घेरलेले आहे. मग बहुपत्नीत्वामुळे या जबाबदाऱ्या तर आणखीनच वाढतात. या जबाबदाऱ्या इतक्या गंभीर स्वरुपाच्या आहेत की वास्तविक गरजेशिवाय माणूस एकापेक्षा जास्त विवाहाचे धैर्य करु शकत नाही.

बहुपत्नीत्वाची शास्त्रसंमती

दिव्य कुरआनने अनाथांच्या संगोपन व त्यांच्या अधिकार रक्षणाबाबतच्या विषयात बहुपत्नीत्वाचा उल्लेख केला. तो खालीलप्रमाणे दिव्य कुरआनात सांगितला आहे,

''स्त्रियांचे मेहर (स्त्रीधन) आनंदाने (कर्तव्य समजून) अदा करा. परंतु जर त्यांनी स्वत: स्वखुषीने स्त्रीधनाचा काही अंश तुम्हाला माफ केला तर तुम्ही तो भाग आनंदाने स्वीकारु शकता.'' *(दिव्य कुरआन, ४ : ४)*

या आयतीच्या संदर्भात विश्लेषकांनी लिहिले आहे आणि पैगंबरवचनातून यांची पुष्टी झाली आहे की कधी कधी अनाथ मुलींचे पालक त्यांची संपत्ती व सौंदर्यामुळे त्यांच्याशी निकाह करीत असे आणि त्यांचा मेहेर ठीक तऱ्हेने अदा करीत नसे. हा पूर्णत: अन्याय होता. या अन्यायापासून त्यांना रोखण्यात आले. परंतु ते जर 'मेहेर' पूर्णपणे अदा करीत असल्यास त्यांना त्यांच्याशी 'निकाह' करण्याची परवानगी होती व त्यांच्याव्यतिरिक्त दुसऱ्या स्त्रियांशीसुद्धा निकाह करण्याचा त्यांना अधिकार देण्यात आला. (बुखारी, किताबुन्निकाह, बाकत्तरगीब फी निकाह)

वस्तुस्थिती अशी आहे की मोमिन (श्रद्धावंत) च्या अंत:करणात न्यायाची जाणीव अवश्य असतेच. म्हणून म्हटले गेले की 'जर तुम्हाला भय वाटत असेल की अनाथ मुलींबरोबर न्याय होऊ शकत नसेल तर तुम्ही त्यांना सोडून इतर स्त्रियांशी विवाह करावा ज्या तुम्हाला आवडतात व ज्यांच्याशी शरीयतमध्ये मनाई करण्यात आलेली नाही.'

याचा एक अर्थ असा पण घेण्यात येतो की जर तुम्हाला वाटत असेल की तुम्ही अनाथांशी न्याय करू शकणार नाही तर त्यांच्या (विधवा अथवा घटस्फोटित) मातांशी निकाह करावा ज्या तुमच्याशी निकाह करण्याकरिता शास्त्रसंमत आहेत, अशा प्रकारे त्यांच्याबरोबर न्याय करणे तुम्हाला सुलभ होईल.

या आयतीमध्ये ती पार्श्वभूमीसुद्धा स्पष्ट करण्यात आली की ज्यामुळे एकापेक्षा जास्त निकाहची परवानगी देण्यात आली आहे. आणि त्या आक्षेपावर समाधानकारक उत्तरसुद्धा देण्यात आले की जे या बाबीवर घेण्यात येतात.

वैधानिक प्रयत्न

१) इस्लाम जी मानसिकता निर्माण करू इच्छितो, ती खऱ्या अर्थाने निर्माण झाल्यास माणूस भोगविलासापासून विभक्त होतो. त्याची कल्पनासुद्धा त्याच्याकरिता शक्य नाही. येथे हा विषय चर्चेचा नाही. केवळ काही वैधानिक प्रयत्नांचा उल्लेख करण्यात येत आहे, जे इस्लामने बहुपत्नीत्वाच्या बाबतीत केले आहेत. यामुळे लक्षात येईल की इस्लामने बहुपत्नीत्वाच्या माध्यमाने व्यभिचारास दरवाजे उघडले नसून व्यभीचारास जबरदस्त आळा घातला.

चार पत्नींची मर्यादा

इस्लामपूर्वी बहुपत्नीत्वाचे खूप चलन होते. अरब समाजातही याची परंपरा होती. काही जण बहुसंख्या स्त्रियांशी विवाह करायचे आणि त्या भार्यांशी न्यायपण करीत नसायचे. इस्लामने या आयतीच्या माध्यमाने ही संख्या चारपर्यंत मर्यादित केली. इस्लाम धर्म बहुपत्नीत्वास व्यक्तिगत व सामाजिक गरज अवश्य समजतो, परंतु कोणत्याही अशा परिस्थितीस मान्यता देत नाही ज्यामध्ये माणसाला चारपेक्षा जास्त विवाह करावे लागतील. यास तो निषिद्ध ठरवितो. जी व्यक्ती या मर्यादेचे उल्लंघन करील, इस्लामी कायदा तिच्यावर कार्यवाही करणार. अशा प्रकारे असंख्य बायका ठेवण्याची जी परंपरा होती, त्यावर इस्लामने प्रतिबंध लावला व एका ठराविक मर्यादेच्या पुढे जाण्यास वेसण लावले.

बहुपत्नीत्व हा आदेश नसून केवळ परवानगी

२) काही जण बहुपत्नीत्वाचा उल्लेख अशा प्रकारे करतात जणू इस्लामने हे प्रत्येकावर बंधनकारक केले आणि मुस्लिम त्याच्या इतर आदेशांचे पालन करो अथवा न करो, या आदेशाचे काटेकोरपणे पालन करतोच. एका स्त्रीवर तो कधीच समाधानी होत नाही. त्याच्या शय्येवर नेहमीच चार स्त्रिया असाव्याच लागतात.

मी या बाबतीत सांगतो की मुळात हा विचारच चुकीचा आणि निराधार आहे की सर्व मुस्लिम अथवा कमीतकमी त्यांच्यातील मोठा वर्ग चार-चार विवाह करतो. मुस्लिमांच्या प्रचंड समुदायात कदाचित बोटावर मोजण्याइतके जण चार विवाह केलेली असतील. हा केवळ अनुमान नसून शास्त्रशुद्ध गणणेनुसार सिद्ध झालेले आहे. यापेक्षा जास्त तर हेच सिद्ध झालेले आहे की मुस्लिमांपेक्षा इतर समाजात बहुपत्नीत्वाचे प्रमाण निश्चितच खूप जास्त आहे.

दुसरी गोष्ट अशी की या आयतीमधून स्पष्टपणे हेच सिद्ध होते की इस्लामने बहुपत्नीत्वाची केवळ परवानगीच दिली आहे, आदेश कदापि दिला नाही. माणसाने जीवनभर कधीही चार विवाह न केल्यास तो काही अपराध ठरणार नाही. इस्लामला केवळ एवढेच अभिप्रेत आहे की गरज असल्यावरच या परवानगीपासून लाभ घ्यावा.

तिसरी गोष्ट अशी की या आयतीमधून अथवा इस्लामच्या इतर शिकवणीमधूनसुद्धा बहुपत्नीत्वाची प्रेरणा देण्यात आलेली नाही व त्यास प्रोत्साहनही दिलेले नाही. याउलट याच्या किचकट जबाबदाऱ्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे

की जेणेकरून माणसाने सद्सद्विवेकबुद्धीनेच पाऊल उचलावे. याला केवळ विलासाचे साधन समजू नये.

चौथी बाब अशी की या आयतीच्या माध्यमाने तो गैरसमज दूर करण्यात आला की बहुपत्नीत्व केवळ भोगविलासाकरिताच आहे, परंतु अशातला प्रकार नाही. हे केवळ सहानुभूती व सहकार्याच्या भावनेनेच आहे. अर्थात अनाथांवर दयाभावाकरिता व त्यांचे अधिकार जोपासण्याकरिताच याची परवानगी देण्यात आली आहे. याच प्रकारच्या आणखीन सामाजिक गरजा असू शकतात. उदाहरणार्थ, तरुण स्त्री अविवाहित असल्यास अथवा ती विधवा झाल्यास किंवा तिची आर्थिक जबाबदारी पूर्ण करणारा कोणी नसल्यास, तिच्याबरोबर सहकार्याची व सहानुभूतीची भावना ठेवून कोणी तिचा पत्नी म्हणून स्वीकार केल्यास काय वावगे आहे? त्यावर 'भोगविलास' व व्यभिचाराचा आरोप लावणे कितपत योग्य आहे?

काही बंधने व अटी

ज्या व्यक्तीने घरात एक बायको असताना दुसरा विवाह केल्यास इस्लामने त्याच्यावर निम्नलिखित जबाबदाऱ्या टाकल्या आहेत.

१) तो इतका आर्थिकदृष्ट्या सबळ असावा की पहिल्या पत्नीप्रमाणेच दुसऱ्या पत्नीला पण नान-नफ्का (निर्वाहभत्ता) समान रूपाने देऊ शकेल व तिला राहण्यासाठी घराचा बंदोबस्त करू शकेल.

(रद्दुल मुख्तार अलल दुर्रूल मुख्तार, २/९१२,९१३)

२) तो शारीरिकदृष्ट्या इतका सक्षम असावा की त्याच्यापासून दोघी समानरूपी कामतृप्त व्हाव्यात. या बाबतीत वैधानिक दर्जा आणि मुदतीच्या बाबतीत विद्वानांनी चर्चा केलेली आहे. तसेच 'निकाह'चा उद्देश शीलाचे रक्षण असल्यामुळे बहुतेक विद्वानांनी लिहिले की दोन समागमातील मुदत चार महिन्यांपेक्षा जास्त नसावी. याची पुष्टी माननीय उमर (रजि.) यांच्या एका निर्णयानेदेखील होते.

(अल मुग्री लाब्नि कदामा, ८/३०,३१)

इब्ने लीमीया यांनी सांगितले आहे की माणसाने 'मआरुफ' रितीने समागम करावे. (अर्थात धर्मसंमत रितीने समागम करावे.)

तसेच आणखीन सांगतात की काहींच्या मते, चार महिन्यांत किमान एकदा पत्नीशी समागम अनिवार्य आहे. काही इतरांच्या मते हे की स्त्री पुरुषांच्या गरजा व भावनांवर आणि पुरुषाच्या शक्तीवर हे अवलंबून आहे आणि हेच मत खरे वाटते.

(फतावा इब्ने तैमीया, ३२/७२१)

इस्लामचे विद्वान इब्ने अरबी मालिकी यांनी सांगितले आहे,

जो माणूस आर्थिकदृष्ट्या आणि शारीरिकदृष्ट्या चार विवाह करण्यास सक्षम आहे त्याने चार विवाह करावे. परंतु जर तो आर्थिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम नसल्यास त्याने त्याच्या क्षमतेनुसारच विवाह करावे.

(इब्ने अरबी, अहकामुल कुरआन, १/१३०)

याचा अर्थ असा की जी व्यक्ती आर्थिक व शारीरिकदृष्ट्या बहुपत्नीत्वाच्या परवानगीपासून लाभ घेऊ शकत नाही त्याने एकाच पत्नीवर समाधान मानावे.

३) आर्थिक व शारीरिकदृष्ट्या सक्षम असलेल्या व्यक्तीने सुद्धा दोन्ही पत्नीं दरम्यान शक्यतो नान-नफ्का (निर्वाहभत्ता) वस्त्र व निवास आणि समागम या बाबतीत न्यायपूर्ण वर्तन करणे अनिवार्य आहे. न्यायपूर्ण वर्तन इस्लामी व्यवस्थेचा आत्मा आहे. इस्लामने या बाबतीत न्यायास इतके महत्त्व दिले आहे की पत्नींच्या दरम्यान न्याय न होण्याची संभावना जरी असेल तर माणसाला एकच विवाह करण्याचा आदेश दिला आहे. (दिव्य कुरआन, सूरह निसा : ३)

इस्लामी विद्वान अबू बकर जएसास हनफी यांनी सांगितले आहे की जर कोणाला संभावना असेल की चार पत्नींदरम्यान जो न्यायपूर्ण वर्तन करू शकणार नाही, त्याने तीन पत्नींवर समाधान मानावे. जर संभावना असेल की तो तीन पत्नींदरम्यान न्याय करू शकणार नाही, त्याने केवळ दोनच पत्नींवर आणि दोन पत्नींमध्येसुद्धा न्यायाची संभावना नसल्यास एकच विवाह करावा.

(जसास अहकामुल कुरआन, २/६४)

पत्नींदरम्यान अन्यायपूर्ण वर्तनादर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी तीव्र नापसंती व्यक्त करताना सांगितले आहे,

''ज्या माणसाच्या दोन बायका आहेत व तो त्यांच्यादरम्यान न्यायपूर्ण वर्तन करीत नसेल (अर्थात एकीकडेच त्याचा जास्त कल असेल) त्यास कयामत (अंतिम प्रलया) च्या दिवशी अशा प्रकारे (न्यायदात्या अल्लाहसमोर) हजर करण्यात येईल की त्याची एक बाजू झुकलेली (लकवा मारलेली अथवा अर्धांगवायू झालेली) असेल.

माणसाच्या अख्त्यारीमध्ये असलेल्या प्रत्येक बाबतीत आपल्या भार्यांमध्ये न्यायपूर्ण वर्तणूक करणे अत्यावश्यक व अनिवार्य आहे. परंतु हे मात्र माणसाच्या अख्त्यारीमध्ये नाही की त्याने सर्वांवर सारखेच प्रेम करावे. स्वभाविकरित्या माणसाचा कल कुणीकडे जास्त व कुणीकडे कमी असू शकतो. याचप्रमाणे समागमातसुद्धा ही

समानता शक्य नाही, कारण याचा संबंध माणसाच्या भावनिक आकर्षणाशी आहे आणि हेसुद्धा माणसाच्या अख्त्यारित नाही.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांची भार्या माननीय आएशा (रजि.) यांनी सांगितले,

पैगंबर मुहम्मद (स.) त्यांच्या भार्यांना वस्तु किंवा साहित्यांची सम प्रमाणात न्यायपूर्ण वाटणी करायचे आणि यानंतर सांगत असत, ''हे अल्लाह! ज्या बाबी माझ्या अख्त्यारीत आहेत. त्या मी सम प्रमाणात यांच्यामध्ये वितरित केल्या आहेत आणि ज्या बाबी (माझ्या नसून) तुझ्या अख्त्यारीत आहेत (अर्थात प्रेम, जिव्हाळा वगैरे) त्यात कमी-जास्त झाल्यास माझी पकड करू नकोस.''

(मिश्कातुल मुसाबीह, किताबुन्निकाह, बाबुल किस्म, संदर्भ : तिर्मिजी, अबू दाऊद, निसाई, इब्नेमाजा, दारमी)

याचा अर्थ असा पण घेऊ नये की माणसाचा प्रेम व जिव्हाळ्याच्या नावावर एकाच पत्नी वर एवढा कल आणि आकर्षण असावे की दुसरीवर अन्याय व्हावा आणि ती बिचारी पती असून विधवे सारखी अथवा पती नसलेल्या स्त्री सारखी जगण्यास विवश व्हावी. दिव्य कुरआनात याची सक्तीने ताकीद करण्यात आली की,

''पत्नींच्या दरम्यान परिपूर्ण न्याय करणे तुम्हाला शक्य नाही. परंतु एकाच पत्नीकडे एवढे झुकू नका की दुसरी अधांतरी राहील.''

(दिव्य कुरआन, ४ : १२९)

४) ज्याप्रमाणे पहिल्या पत्नीसमान दुसऱ्या पत्नीस अधिकार आहेत, त्याचप्रमाणे पहिल्या पत्नीच्या मुलासमान दुसऱ्या पत्नीच्या मुलांचेसुद्धा अधिकार आहेत. दोन्ही पत्नींच्या मुलांना कायदेशीररित्या समान अधिकार आहेत व या अधिकारात भेदभाव करणे शक्य नाही. या सर्व बाबींची जबाबदारी म्हणजे एक प्रकारचे न पेलवणारे ओझे आहे जे बहुपत्नीत्वामुळे माणसास सहसा पेलणे शक्य नाही.

वास्तव असे आहे की इस्लामी कायद्यानुसार एकापेक्षा जास्त विवाह करणे, ही काही सोपी व साधारण गोष्ट नाही. परंतु काही विशेष व्यक्तिगत आणि सामाजिक परिस्थितीत बहुपत्नीत्वाची परवानगी त्यावर प्रतिबंध लावण्यापेक्षा निश्चितच फायदेशीर आहे. म्हणूनच इस्लामने याची रीतसर परवानगी दिलेली आहे.

'तलाक'चा प्रश्न

इस्लमच्या तलाक विधीवर एक आक्षेप असा घेण्यात येतो की इस्लामने केवळ पुरुषाला तलाक देण्याचा अधिकार देऊन स्त्रीवर मोठा अन्यायच केला. तसेच तलाक देण्यासाठी विशेष कारण दाखविणेसुद्धा पुरुषाला आवश्यक नाही. अर्थात कोणतेही कारण न दाखविता पुरुषाला तलाक देण्याचा सर्वस्वी अधिकार आहे. ही स्त्रीवर एकतर्फा कार्यवाही असून पतीचाच निर्णय अंतिम समजला जातो. तो वाटेल तेव्हा तिची किरकोळ चूक असताना अथवा काहीही चूक व कारण नसताना 'तलाक' देऊन तिला घराबाहेर काढून निराधार करू शकतो. अशा रितीने एका निरपराध स्त्रीला अंधकारमय परिस्थितीत ढकलून तिला निराधार व यातनामय जीवन व्यतीत करण्यास विवश करण्यात येते.

'तलाक'ची गरज पडू शकते

ज्या भयानक स्वरूपात तलाकचा उल्लेख करण्यात येतो मुळात असे काहीही नाही. पहिली गोष्ट अशी आहे की अशा प्रकारच्या 'भयानक तलाक'चे मुळात इस्लाममध्ये अस्तित्वच नाही. दुसरी गोष्ट अशी की अतिशय क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या कलहामध्ये अतिशय योग्य समाधान म्हणजे 'तलाक' होय. ही एक वस्तुस्थिती आहे की कधी कधी पत्नी व पतीसाठी एकत्र जीवन जगणे कठीणप्राय होते आणि ते एक दुसऱ्यापासून विभक्त होण्याचा प्रयत्न करतात. याची विविध कारणे असू शकतात. कधी कधी त्यांच्या स्वभावात अनुकूलता व साम्य नसते. त्यांची आवड-निवडसारखी नसते. दुर्लक्ष न करण्यासारखी आर्थिक व सामाजिक तफावत त्यांच्यात असते, तर कधी दोघांचे आचारविचार समान नसतात. यामुळे शारीरिक जवळीकता असतानादेखील मानसिक व वैचारिक दुरावा असतो. कधी कधी असे नैतिक दुर्वर्तन समोर येतात की ते दूर करणे अशक्य असते आणि माणसासाठी ते असह्य होते. अशा प्रकारच्या बिकट व अतिकठीण परिस्थितीत विवेकबुद्धीची ही मागणी असते व त्यावर तोडगा काढणे अनिवार्य होते की दोघा पती-पत्नीनी विभक्त व्हावे. जर ईसाई धर्माप्रमाणेच 'तलाक'ची परवानगी नसल्यास दोघांना एकत्रित राहण्यास भाग पाडण्याच्या परिणामस्वरूपी विवाहाची उद्दिष्टे कधीच पूर्ण होऊ शकत नाहीत आणि याची कटू फलित व अनिष्ट परिणाम भोगावे लागत.

प्रथम हे की स्त्री-पुरुषासाठी एकत्रित जगणे कठीण झाल्यामुळे ते परस्परांशी दुर्व्यवहार करतील.

द्वितीय हे की 'तलाक' होऊन पत्नी विभक्त झाल्यास तिला तिच्या आवडीचा जीवनसाथी निवडता येईल आणि ती त्याच्याबरोबर सुखासमाधानाने जगू शकेल. अर्थात 'तलाक'चा मार्ग बंद असल्यास उपरोक्त सुसंभावनेची शक्यताच नाही.

तृतीय असे की पती-पत्नीस बळजबरी एकत्रित राहण्यास भाग पाडल्यास त्यांचे जीवन नरक बनते आणि दोघांची मन:शांती भंग पावते.

चतुर्थ असे की बळजबरी पती-पत्नी एकत्र राहिल्यास त्यांचा संपूर्ण वेळ व जीवन हमरीतुमरीत वाया जाऊन मुलांवर लक्ष देता येत नाही आणि त्यांच्या संस्कारावर आईवडिलांच्या अशा वर्तनाचा भयानक परिणाम पडतो आणि त्यांच्यातसुद्धा भांडखोर वृत्ती जन्म घेते.

'तलाक'चा अधिकार कोणाला असावा?

आता हा प्रश्न आपण चर्चेस घेऊ या की 'तलाक'चा अधिकार कोणाला असावा? याची तीन उत्तरे देता येतील. पहिले उत्तर असे की हा अधिकार दोघांना म्हणजे पती व पत्नींना असावा. दुसरे उत्तर असे की हा अधिकार पुरुषाला मिळावा आणि तिसरे उत्तर असे की हा अधिकार स्त्रीलाच मिळावा.

पहिल्या स्थितीवर विचार केल्यास हे स्पष्ट होते की 'तलाक'चे प्रमाण वाढणार आणि परिवारसंस्था कोलमडून जाणार. कारण 'तलाक'चा अधिकार स्त्री व पुरुषापैकी कोणा एकालाच मिळाल्यास तलाकचा वापर तुलमात्मकदृष्ट्या कमी असणार आणि जर हा अधिकार दोधांना मिळाल्यास आणि दोघांनी याचे स्वतंत्र मर्जीने वापर केल्यास स्वाभाविकपणे यात वाढ होणार. ही एक वस्तुस्थिती आहे की ज्या समाजामध्ये 'तलाक'चे प्रमाण कमी असते त्या समाजात कौटुंबिक व्यवस्था स्थिर असते आणि जेथे 'तलाक'चे प्रमाण वाढलेले असते तेथे कौटुंबिक व्यवस्था पार विस्कळित होऊन बसते. पाश्चात्यांनी पती-पत्नी दोघांना हा अधिकार देऊन भीषण परिणाम ओढवून घेतलेत आणि विवाह हा विवाह न राहता खेळ तमाशा होऊन बसला. पती-पत्नींपैकी कोणीही वाटेल तेव्हा एक दुसऱ्यांपासून विभक्त होतो आणि विस्कळित, कठीण व यातनामय जीवनाचे रडगाणे विलापतात.

दुसऱ्या प्रकारच्या उत्तरावरील स्वरूप इस्लामने स्वीकारले आहे. त्याने 'तलाक'चा अधिकार पतीला दिला आहे. त्याचे कारण असे आहे की पुरुषास परिवारामध्ये स्वामित्वाचा दर्जा आहे. तो मालक आणि निगा राखणारा असतो. तो

पत्नीची आर्थिक जबाबदारी पार पाडतो. तसेच मुलांचे संगोपन आणि शिक्षण वगैरे जबाबदाऱ्या तोच पार पाडतो. करिता पत्नीसोबत राहून या जबाबदाऱ्या पार पाडण्याचा अथवा यातून मुक्त होण्याचा केवळ अधिकार त्यालाच असू शकतो. दिव्य कुरआनच्या शब्दांमध्ये विवाहबंधन बांधणे आणि त्यांना संपुष्टात आणण्याचा अधिकार त्यालाच आहे.

हा तर त्याच्यावर घोर अन्याय आहे की ज्या पत्नीस तो पसंत करीत नाही अथवा जिचे सहकार्य त्याला मिळत नाही अशा पत्नीस घराची मालकीन करण्यास त्याला विवश करण्यात यावे.

हे पण मान्य करता येणार नाही की तो आपल्या या अधिकाराचा मनमानी वापर करील. कारण अशा गैरवापराची त्याला मोठी आर्थिक किंमत मोजावी लागणार, कारण पत्नीस दिलेल्या 'महर'ची तो मागणी करू शकणार नाही आणि 'निकाह'च्या वेळी 'महर' दिला नसेल तर तो त्याला तलाकच्या वेळी द्यावा लागेल. विवाहात पत्नीस भेट म्हणून दिलेले दागदागिने व इतर भेटवस्तूही त्याला परत मिळणार नाहीत. विवाह ते तला़कपर्यंतच्या मुदतीत पत्नीवर केलेला खर्चसुद्धा परत मिळणार नाही. यावरसुद्धा जर त्यास दुसरा विवाह करायचा असल्यास होणाऱ्या वधूस परत एकदा 'मेहर' द्यावा लागणार, तसेच विवाहाचा खर्चही उचलावा लागणार आणि तिची आर्थिक जबाबदारी उचलावी लागणार. याबरोबरच जर पहिल्या पत्नीपासून झालेली मुले असतील तर त्यांचा खर्चसुद्धा उचलावा लागणार. पुरुषाला मिळालेल्या 'तलाक'च्या अधिकारावर आक्षेप घेणारे लोक केवळ कल्पनेच्या जगात वावरतात. बिचाऱ्यांना जीवनाच्या या वास्तविक प्रश्नांवर कधी विचार करण्याची सवड मिळतच नाही. परंतु ज्या व्यक्तीसमोर हे सर्व प्रश्न 'आ' वासून उभे असतील, तो पहिल्या पत्नीस 'तलाक' देऊन दुसरा घरोबा करताना हजारदा विचार करील. ताटातुटी आणि विरह झाल्यानंतर मीलन होणे साधी गोष्ट नसते.

आता आपण तिसऱ्या स्वरुपाच्या उत्तराचा वेध घेऊ या की 'तलाक'चा अथवा पुरुषापासून विभक्त होण्याचा अधिकार स्त्रीला मिळाल्यास काय काहूर माजेल. जर 'तलाक'चा अधिकार स्त्रीला दिला तर तीसुद्धा याचा गैरवापर करू शकते आणि ज्याप्रमाणे 'तलाक'च्या अधिकाराचा गैरवापर करून पुरुष स्त्रीला यातना देऊ शकतो. त्याचप्रमाणे स्त्रीदेखील 'तलाक'चा गैरवापर करून पुरुषाला कष्ट आणि यातना देऊ शकते व पुरुषास सळो की पळो करू शकते. याचे जे भीषण परिणाम भोगावे लागतील ते खालीलप्रमाणे आहेत.

१) स्त्रीच्या संपूर्ण आर्थिक आणि इतर जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या पुरुषापासून 'तलाक'चे अधिकार हिरावून घेतल्यास त्याच्यावर घोर अन्याय होईल.

२) 'तलाक'मुळे पतीचेच नुकसान आहे, पत्नीचे नाही. पत्नीस 'तलाक'चा अधिकार मिळाल्यास दुराचारी पत्नी वाटेल तेव्हा पतीपासून विभक्त होऊन मुलांना त्याच्या स्वाधीन करील आणि 'मेहेर' व इतर संपत्ती घेऊन निघून जाईल आणि परत 'मेहेर' आणि इतर संपत्ती स्वीकारून दुसऱ्याशी विवाह करील.

३) हे एक वास्तव आहे की पुरुषाच्या तुलनेत स्त्री जास्त भावुक व हळवी असते. ती कोणत्याही क्षणिक भावनेच्या आहारी जाऊन पतीपासून विभक्त होईल. परिणामस्वरूप 'तलाक'चे प्रमाण खूप वाढेल आणि समाजास एका नवीन वादळी परिस्थितीस बळी पडावे लागेल.

न्यायालयाद्वारे घेतलेल्या 'तलाक'चे दुष्परिणाम

न्यायालयाद्वारे 'तलाक' घेण्यास या समस्येचे समाधान समजले जाते. पती-पत्नींपैकी ज्याला वाटेल त्याने न्यायालयात जाऊन घटस्फोटासाठी अर्ज करावा. जर न्यायव्यवस्था विभक्तीच्या कारणांनी संतुष्ट असेल तर दोघांच्या विभक्तीचा निर्णय देईल, नसता त्याची मागणी रद्दबातल ठरविण्यात येईल.

यात हानिकारक बाब ही आहे की दांपत्यापैकी ज्याच्या मनात येईल तो न्यायालयात 'तलाक'ची मागणी करून आपली मागणी यथायोग्य व न्यायसंमत असण्याचे पुरावे सादर करील आणि द्वितीय पक्षाच्या चुका व अन्याय आणि वेळप्रसंगी त्यावर चुकीचे आरोप करील. उत्तरादाखल द्वितीय पक्षसुद्धा प्रथम पक्षाविरुद्ध प्रत्यारोपाच्या फैरी झाडून त्याची कार्यविकृती चव्हाट्यावर आणील. अशा प्रकारे दोघांच्याही अब्रूची लक्तरे वेशीवर टांगण्यात कोणीच कमी पडणार नाही. समाजात त्यांची इभ्रत धुळीस मिळेल आणि संपूर्ण परिवारास अपमानाचे कडवे घास गिळावे लागतील. याचा आणखीन एक दुष्परिणाम हासुद्धा आहे की जर न्यायालयाने त्यांना विभक्त न केल्यास पती-पत्नी बळजबरीने आणि नाइलाजास्तव विवाहबंधनाच्या बेड्यात अडकतील, त्यांच्यासाठी शांतीपूर्ण जीवन अशक्यप्राय बाब होईल.

काही नैतिक मार्गदर्शन

इस्लामच्या विचारसरणीनुसार प्रशिक्षित माणसाच्या जीवनात 'तलाक'ची क्वचितच संभावना येते. असे सहसा होतच नाही की पुरुषरूपी मानवाने केवळ आपल्या काम भावनेने पिसाटले जाऊन 'तलाक'चे हत्यार उपसावे. इस्लामने या बाबतीत जे नैतिक मार्गदर्शन केले त्याचा परिचय करण्यात येत आहे.

'निकाह' एक प्रामाणिक व गंभीर करार आहे

इस्लाम धर्मानुसार 'निकाह'च्या माध्यमाने स्त्री पुरुष काही दिवसांच्या विलास व मनोरंजनाकरिता भेटत नसून ते जीवनभर एक दुसऱ्यासाठी जगण्याच्या आणि कठीण प्रसंगी एक दुसऱ्यास जीवापाड सहकार्य करण्याच्या आणा-भाका घेतात. याच जिव्हाळापूर्ण करारनाम्यास दिव्य कुरआनने 'मिसाक गलीज' शब्दाने परिभाषित केले. (सूरह निसा : २१) जी माणसे प्रामाणिकपणे व गंभीरपणे हा करार करतात ते सहजासहजी त्यास भंग करण्याची कल्पनासुद्धा करू शकत नाहीत. असे कुकृत्य करण्याची हिंमत केवळ तोच करू शकतो ज्याला याच्या महत्त्वाची काही किंमत नसेल आणि अविवेकबुद्धीने आणि अज्ञानात हा करार केलेला असेल. अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांनी 'निकाह' आणि 'तलाक'च्या बाबतीत होणाऱ्या मस्करीला सक्त नापसंत केले आहे. कारण हे एक गंभीर व विवेकपूर्ण ठरावाची थट्टा करणेसुद्धा गांभीर्याप्रमाणेच आहे.

माननीय अबू हुरैरा (रजि.) पैगंबरांचे वचन कथन करतात,

''तीन गोष्टी अशा आहेत की त्या थट्टेने केलेल्या असल्याससुद्धा गंभीरच आहेत, त्या म्हणजे १) निकाह, २) तलाक आणि ३) रूजुअ (अर्थात पत्नीस परत विवाह बंधनात घेणे).''

(अबू दाऊद, किताबुल तलाक, बाब फील तलाक अलक हजर, तिर्मिजी)

इमाम खत्ताबी म्हणतात आणि यावर संपूर्ण इस्लामी विद्वान सहमत आहेत की जर एखाद्या 'आकिल' (ज्याच्यात विवेक आहे) ने व 'बालिग' (प्रौढ) ने स्पष्टपणे तलाक दिल्यास तलाक घडणार आणि जर त्याने यास थट्टा व मस्करी ठरवून रद्द केल्यास रद्दबातल ठरणार नाही. काही विद्वानांनी त्याच्या या अविवेकपूर्ण कर्मास अल्लाहच्या आयतीची टिंगल करण्यासमान ठरविले आहे. कारण जर यास संमती दिल्यास या गोष्टीचे भय व संभावना आहे की एक व्यक्ती 'निकाह' केल्यावर, 'तलाक'

दिल्यावर व 'गुलाम' स्वतंत्र केल्यावर हे कारण पुढे करून की ''मी तर थट्टा करीत होतो.'' आपला ठराव परत घेईल आणि परिणामस्वरूप ईशआदेशाचे पालन होणार नाही. म्हणून पैगंबरवचनात ज्या तीन गोष्टींचा उल्लेख आहे त्या बाबतीत तोंडाने एखादा निर्णय व्यक्त केल्यास तो पूर्ण करणे अनिवार्य आहे.

(मआलिमुल सुनन, ३/२४३)

'तलाक' हे सक्त नापसंत कृत्य आहे

इस्लामने आवश्यक असलेल्या प्रसंगी 'तलाक' देण्याची परवानगी अवश्य दिली. परंतु याबरोबरच हे पण जाहीर केले की हे काही शुभकृत्य नसून अल्लाहपाशी एक अतिशय नापसंत असलेले कृत्य आहे. म्हणून अतिशय कठीण व बिकट प्रसंगी आणि दुसरा पर्यायच नसलेल्या स्थितीत हे कृत्य करण्याची परवानगी आहे.

माननीय अब्दुल्लाह (रजि.) पैगंबरांचे सांगणे कथन करतात,

''अल्लाहपाशी सर्व धर्मसंमत कृत्यांमध्ये नापसंत व न आवडणारे कृत्य हे 'तलाक' आहे.''

(अबू दाऊद किताबुत्तलाक, बाब फी कराहतुत्तलाक, इब्ने माजा अबवाबुत्तलाक)

माननीय महारिब (रजि.) पैगंबरांचे कथन कथित करतात,

''अल्लाहपाशी अशी कोणतीच बाब धर्मसंमत नाही. जी 'तलाक'पेक्षा जास्त नापसंत आहे.'' (अबू दाऊद, संदर्भ पूर्वीचा)

याच स्वरूपाचे आणखीन एक पैगंबरकथन माननीय मआज (रजि.) यांनी कथित केले आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''हे मआज (रजि.)! अल्लाहने या भूतलावर कोणतीच अशी बाब निर्माण केली नाही जी गुलामास स्वतंत्र करण्यापेक्षा ज़ास्त आवडणारी व पसंत आहे. याचप्रमाणे त्याने पूर्ण भूतलावर कोणतीच अशी बाब निर्माण केलेली नाही जी 'तलाक'पेक्षा जास्त नापसंत आहे.''

(दार कुतनी मआत्तालीकुल मुगनी, किताकत्तलाक, पृष्ठ ४३९)

एकीकडे इस्लामने पुरुषाच्या मानसिकतेत ही बाब ठासून रुजविली आहे की 'तलाक' एक अतिशय नापसंत असलेले कृत्य आहे, तर दुसरीकडे स्त्रीला मार्गदर्शन केले की तिने 'तलाक'ची मागणी करू नये.

माननीय सौबान (रजि.) पैगंबरांचे कथन करतात,

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''जी स्त्री विनाकारण पतीकडून 'तलाक' मिळविण्याची मागणी करील तिच्यावर स्वर्गाचा सुगंधसुद्धा निषिद्ध केला जाईल.'' (मिश्कात किताबुन्निकाह, बाबुल खुलअ वत्तलाक, संदर्भ : अहमद, तिर्मिजी, अबू दाऊद, इब्ने माजा, दारमी)

स्त्रियांच्या त्रुटी व चुका सहन कराव्यात

सामूहिक जीवन एकट्या व्यक्तीच्या ताब्यात नसते. माणसाला सामूहिक स्वार्थासाठी आपली इच्छा त्यागावी लागते. वैवाहिक जीवनातसुद्धा असे प्रसंग येत असतात, जेव्हा पती-पत्नीमध्ये मतभेद होत असतात. जर या दोघांपैकी कोणा एकास दुसऱ्याचे मत आणि आवडीनिवडीशी मतभेद झाल्यास 'तलाक' हे त्याचे समाधान नाही की पटकन 'तलाक' देऊन हे पवित्र नातेच संपुष्टात आणावे. कधी कधी माणूस भावनांच्या आहारी जातो. तो क्षणिक फायद्यासाठी महत्त्वाच्या स्वार्थाकिडे दुर्लक्ष करतो. अशा स्थितीत इस्लामची शिकवण अशी आहे की परिवाराच्या व समाजाच्या परिपूर्ण फायद्यासाठी स्त्रीच्या छोट्या-मोठ्या चुकांना सहन करावे आणि प्रेमभावनेने तिच्याबरोबर जगावे.

दिव्य कुरआनात आहे,

''त्यांच्याबरोबर चांगल्या रीतीने जीवन व्यतीत करा. जर त्या तुम्हाला नापसंत असतील तर शक्य आहे की एखादी गोष्ट तुम्हाला पसंत नसेलही परंतु अल्लाहने त्यांच्यात बरेचसे भले ठेवले असेल.'' *(दिव्य कुरआन, ४ : १९)*

धारण्याचे प्रयत्न करावे

स्त्री जर अज्ञाधारक नसली, बंडखोर वृत्तीची असली व कामचुकार असली तरी इस्लामने तात्काळ 'तलाक' देण्याचा आदेश दिला नसून पुरुषास विशेष अधिकार दिले की जेणेकरून प्रेमाने अथवा सक्तीने तिच्यात सुधारणा घडवावी आणि घरातील मतभेद घरातच राहून तलाकचा प्रसंग सहसा येऊ नये.

दिव्य कुरआनने सांगितले,

''ज्या स्त्रियांकडून तुम्हाला दुर्वर्तनाचे भय असेल तर त्यांची समजूत घाला. शैय्यागृहात त्यांच्यापासून अलिप्त राहा. (यावरही सुधारणा न झाल्यास) त्यांना मार द्या. यावरही त्या तुमच्या आज्ञाधारक न झाल्यास विनाकरण त्यांच्यावर हात टाकण्याचे निमित्त शोधू नका. नि:संशय अल्लाह सर्वांत उच्चतम

आणि महान आहे.''   *(दिव्य कुरआन, ४ : ३४)*

अवज्ञा करणारी, बंडखोर वृत्तीच्या स्त्रीमध्ये सुधारणा घडवून आणण्याची रीती या आयतीमध्ये वर्णन करण्यात आली आहे, ती अशी की प्रबोधनाद्वारे व उपदेशाद्वारे तिला समजाविण्याचा आणि तिच्यामध्ये ईशपरायणता निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. एक दुसऱ्यांच्या हक्कांप्रती जबाबदाऱ्यांकडे लक्ष वेधावे आणि परिवाराच्या स्वार्थपूर्तीची जाणीव करून द्यावी. हे सर्व काही प्रेम व मृदू स्वभावानेच शक्य आहे. यात यश न मिळाल्यास दिव्य कुरआनात म्हटले आहे,

''अर्थात शय्यागृहात त्यांच्यापासून विभक्त राहा.''

सहाबा (रजि.) (पैगंबरसोबती) व ताबइन (पैगंबरसोबत्यांचे सोबती) यांनी याचे तीन प्रकारे विश्लेषण केले आहे. प्रथम हे की दोघांनी एकाच बिछान्यावर झोपावे. परंतु समागम करू नये. दुसरे हे की एकाच शय्येवर झोपूनही आपली नाराजी व्यक्त करण्यासाठी आपले तोंड विरुद्ध दिशेने ठेवावे व मौन पाळावे. तिसरे असे की आपली शय्या तिच्या शय्येपासून वेगळी ठेवावी.

(इब्ने जरीर, जामेऊल बयान फी तफसीरुल कुरआन, ५/३८-४१)

हा एक मानसिक तोडगा आहे. सहनशील आणि मानसिकरित्या कणखर असलेला पुरुषच या बाबी करू शकतो. जर त्याने आपल्या वर्तनात हा तटस्थपणा दाखविला तर स्त्रीची बंडखोर वृत्ती संपून तिच्या वर्तनात फरक पडू शकतो. कारण कामभावना या अतिशय तीव्र असतात. जर माणसाने ही सहनशीलता दाखविली तर स्त्रीला त्याच्यासमोर नमते घेणे भाग पडते.

काही वेळा स्त्रियांचा स्वभावसुद्धा कठोर असू शकतो आणि पुरुषाच्या तटस्थपणासमोर नमते घेत नसल्याने अशा प्रकारचा तोडगा अपयशी ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत दिव्य कुरआनने पत्नीस शिक्षा देण्याची परवानगीसुद्धा दिली आहे. अर्थात ही बाब मोठी भयानक वाटते, परंतु पहिल्या दोन उपायानंतरही स्त्रीमध्ये सुधारणा न झाल्यास याची परवानगी आहे.

पैगंबर मुहम्मद (स.) चे सांगणे आहे की सुधारणा घडविण्याकरिता त्यांना मारण्याची परवानगी तर आहे परंतु हा मार सक्तीचा नसावा. (मुस्लिम) माननीय अब्दुल्लाह बिन अब्बास (रजि.) याचे वर्णन असे करतात की त्यांना मिसवाक (दात घासण्याचा सहा इंची लाकडी ब्रश) ने अथवा यासारख्या लहान वस्तूने चोप द्यावा. माननीय कतादा यांनी सांगितले की मार असा असावा की यामुळे त्यांच्या शरीरावर कोणत्याही प्रकारची जखम होऊ नये. माननीय हसन बसरी सांगतात की या मारामुळे

तिच्या शरीरावर व्रण अथवा खुणा पडू नयेत. (इब्ने जरीर, जामेऊल बयान फी तफसीऊल कुरआन ५/४१-४२)

याशिवाय जर पुरुषाने पत्नीस पशुप्रमाणे बदडल्यास त्याचे हे कृत्य इस्लामी कायद्याविरुद्ध होणार व त्याला याची शिक्षा भोगावी लागणार. 'इमाम नूदी' यांनी सांगितले की शरीयतने ज्या मर्यादेत स्त्रीला मारण्याची परवानगी दिली आणि या मर्यादित शिक्षेमुळेसुद्धा स्त्री जर दगावली तर यास चुकून झालेला 'वध' गृहीत धरले जाईल, तसेच पतीच्या परिवारजणांवर तिची 'दैयत' (स्त्रीवधाची धर्मसमंत भरपाई) अनिवार्य आहे आणि एकट्या पुरुषाला त्याचा कफ्फारा (एक मुस्लिम गुलाम स्वतंत्र करणे अथवा सतत दोन महिने रोजे (उपवास) धरणे. संदर्भ - सूरह निसा : ९२) द्यावा लागेल. (नूदी शरेह मुस्लिम १/३९७)

'तलाक' देण्यापासून पतीला परावृत्त ठेवण्याकरिता स्त्री आपले काही अधिकार त्यागू शकते.

एकीकडे इस्लामने पुरुषास वारंवार बजावले की त्याने स्त्रीबरोबर जास्तीतजास्त चांगले वर्तन करावे. तिचे अधिकार जपावेत, तिच्या चुकांकडे दुर्लक्ष करावे, तिच्या वैशिष्ट्यांना पाहावे व तिच्यात सुधारणा घडवावी अथवा शिक्षण द्यावे. दुसरीकडे स्त्रीला सांगितले की किरकोळ बाबींवर 'तलाक'चा हट्ट धरू नये. तिने जर पाहिले की पतीचे आपल्यावरील प्रेम कमी होत आहे. अशा प्रसंगी ती आपले अधिकार मागण्याऐवजी त्यांचा त्याग करू शकते आणि पतीबरोबर अरेरावी करण्याऐवजी प्रेममय जीवन जगू शकते. स्त्रीकडून अशा प्रकारचे सादरीकरण स्वीकारण्याकरिता पतीचा अहं दुखावू शकतो. याकरिता स्त्रीने आपले पतीवर असलेले काही अधिकार त्याग करून पतीच्या जबाबदाऱ्यांचे ओझे कमी करावे. पतीने यास आपला अपमान न समजता मोठ्या अंत:करणाने पत्नीच्या प्रस्तावास स्वीकार करावे. स्त्रीची मदत घेण्यास पतीने आपला कमीपणा समजू नये. दिव्य कुरआनात आहे,

''जर एखाद्या स्त्रीला आपल्या पतीकडून दुर्वतनाचे व नाराजीचे भय असेल तर यात काहीच हरकत नाही की दोधांनी आपसांत कोणत्यातरी प्रकाराने सामंजस्य घडवून आणावे. (कारण) सामंजस्य हेच प्रत्येक परिस्थितीत उत्तम आहे. मानवी स्वभाव हे विषम मन:स्थितीकडे लवकरच आकर्षित होत असतात. जर तुम्ही सहकार्याचे वर्तन करीत असाल तर आणि तुमच्यात ईशपरायणता असेल तर तुम्ही जे काही करता त्याची अल्लाहला पूर्ण खबर आहे.'' *(दिव्य कुरआन, ४ : १२८)*

हाफीज इब्ने कसीर म्हणतात की स्त्रीला आपल्या पतीच्या प्रेमात कमतरता भासू लागल्यास ती 'नान-नफ्का', वस्त्र आणि समागमसारख्या अधिकारांना त्यागू शकते अथवा त्यातील अधिकार कमी करू शकते. पतीसुद्धा मोठ्या मनाने तिची मदत आणि त्याग स्वीकारू शकतो.

दिव्य कुरआन आहे,

''दोघांच्या दरम्यान विभक्ती होण्यापेक्षा तडजोड करणे उत्तम!''

''उभय पक्षांतील बुजुर्ग मंडळींनी मध्यस्थीद्वारे वाद संपवावा.''

(तफसीर इब्नेकसीर, १/५६१-५६२)

कधी कधी लहान-सहान व किरकोळ बाबीवर वाद सुरु होतो आणि वाढत वाढत उग्र रूप धारण करतो. परिणामस्वरुप पती-पत्नींदरम्यान दुरावा निर्माण होत जातो. ते अशा स्थितीत नसतात की कलह विसरून स्वत:हून तडजोड करावी. अशा परिस्थितीत उभय पक्षांतील एक एक जबाबदार व्यक्तीने संवाद साधून तोडगा काढण्याचा प्रयत्न करावा. जर प्रामाणिकता असेल तर निश्तिच अल्लाहच्या मदतीने अशक्य असलेले प्रश्न सुटतील.

दिव्य कुरआनात आहे,

''जर तुम्हाला पती-पत्नीचे संबंध बिघडण्याचे भय असेल तर एक पंच पुरुषाच्या नातेवाईकांकडून आणि एक स्त्रीच्या नातेवाईकांकडून नियुक्त करा. ते दोघे सुधारणा करू इच्छित असतील तर अल्लाह त्यांच्यात समेटाचा मार्ग काढील. तो सर्व काही जाणणारा आणि खबर ठेवणारा आहे.''

(दिव्य कुरआन, ४ : ३५)

'तलाक'च्या बाबतीत दोन सुधारणादायी पावले

या सर्व प्रयत्नांत निष्फळ झाल्यानंतर 'तलाक'ची वेळ येते. या बाबतीत इस्लामने निम्नलिखित पावले उचलली आहेत. यामुळे ही समस्या निश्चितच तडीस लागेल.

१) अरब समाजात 'तलाक' आणि 'रुजुअ'ची कोणतीच मर्यादा नव्हती. आपल्या पत्नीस त्रस्त करण्यासाठी ते तिला 'तलाक' देऊन परत मुदत संपण्यापूर्वीच 'रुजुअ' करीत. परत 'तलाक' देत आणि परत 'रुजुअ' करीत. उंदरास मारण्यापूर्वी मांजर ज्याप्रमाणे त्याच्याशी खेळते त्याप्रमाणे तिला छळण्यात येत असे आणि अशीच ही मालिका सुरु असायची.

(सविस्तर माहितीकरिता : 'तफसीर इब्ने कसीर : १/२७१-२७२)

अशा प्रकारे स्त्री विवाहित असूनदेखील (तलाक) पीडित जीवन जगण्यावर विवश असायची. दिव्य कुरआनाने 'तलाक'ची मर्यादा निश्चित करताना म्हटले आहे की 'तलाक' दोनच वेळ द्यावी. या स्थितीतच पतीस 'रूजुअ'चा अधिकार असतो. (अर्थात परत विवाह बंधनात घेऊ शकतो).

''तलाक (रजई) दोनदा आहे. नंतर त्यांना भल्याने रोखून घ्या अथवा भल्याप्रकारे सोडून दिले जावे.'' *(दिव्य कुरआन, २ : २२९)*

तिसऱ्यांदा 'तलाक' दिल्यास 'रुजुअ'चा अधिकार नसतोच आणि पत्नी विभक्त होते.

२) माणूस हा तीन तलाकच्या अधिकारास दीर्घ मुदतीकरिता वापरून पत्नीचा छळ करू शकत होता. उदाहरणार्थ, एक तलाक दिल्यानंतर वर्ष दोन वर्षांपर्यंत 'रुजुअ' न करता तशीच पडू द्यायची (अर्थात परत विवाहबंधनात घ्यायची नाही) आणि परत वाटल्यास 'रुजुअ' करायची. अशा प्रकारे दुसऱ्यांदा तलाक देऊन दीर्घ मुदतीपर्यंत तिला ताटकळत ठेवायचे. यामध्ये तिचे अधिकारही तिला द्यायचे नाहीत आणि तिला विभक्त पण करायचे नाही.

इस्लामने हे अत्याचार व अन्याय संपविण्याकरिता एक छोटीशी मुदत निश्चित केली आहे. याच ठराविक मुदतीच्या आत 'तलाक'नंतर 'रुजुअ' (परत विवाहबंधनात घेणे) चा अथवा रुजु न करण्याचा निर्णय घ्यावा लागेल. दरम्यानच्या मुदतीस 'इद्दत'चा काळ म्हणतात. 'इद्दत'चा काळ संपल्यावर पत्नी आपोआपच विभक्त होईल आणि स्वेच्छेने वाटेल त्याच्याशी लग्न करण्यासाठी स्वतंत्र असेल. (जर पतीने एकाच वेळी तीन 'तलाक' दिल्यास अधिकांश धर्मपंडितांच्या मते

रुजुअचा अर्थात परत विवाह बंधनात घेण्याचा अधिकार संपुष्टात येतो आणि इद्दतीची मुदत पूर्ण झाल्यावर स्त्रीला दुसऱ्याबरोबर विवाह करण्याच्या धर्मसंमत अधिकार प्राप्त होतो.

दिव्य कुरआनात सांगितले की 'तलाक' जर देत असाल तर त्याचा विधिवत हिशेब ठेवा. हा काही पोरखेळ नव्हे की माणूस वाटेल तेव्हा 'तलाक' देईल आणि त्यास हेसुद्धा माहिती नसावे की 'तलाक' केव्हा देण्यात आला व त्याची मुदत कधी संपणार आहे!

''हे पैगंबरा! तुम्ही लोक जेव्हा तलाक देत असतील तर इद्दतीवर तलाक द्या आणि त्याच्या दिनगणनेचा हिशेब ठेवा.'' *(दिव्य कुरआन, ६५ : १)*

''तलाक फक्त दोन वेळा आहे. नंतर त्यांना एक तर सर्वसंमत पद्धतीने आपल्या जवळ ठेवून घ्या अथवा सन्मानपूर्वक निरोप द्या.''

(दिव्य कुरआन, ४ : २२९)

'तलाक'ची वेळ समागमानंतर आणि समागमापूर्वीसुद्धा येऊ शकते. समागमानंतर दिलेल्या 'तलाक'करिता 'इद्दत'ची मुदत तीन मासिक पाळ्या इतकी आहे. दिव्य कुरआनात आहे,

''ज्या स्त्रियांना तलाक दिला गेला असेल त्यांनी तीन ऋतुस्त्रावापर्यंतच्या काळापर्यंत प्रतीक्षा करावी.'' *(दिव्य कुरआन, २ : २२८)*

हा उल्लेख तरुण स्त्रियांच्या बाबतीत आहे, ज्यांना मासिक पाळी येते. ज्या स्त्रियांना मासिक पाळी कोणत्याही कारणास्तव येत नाही त्यांच्याकरिता 'इद्दत'ची मुदत तीन महिने आहे. जर पत्नी गर्भवती असल्यास गर्भ संपेपर्यंतची मुदत आहे. दिव्य कुरआनात आहे,

''तुमच्या ज्या स्त्रिया रजोनिवृत्त झाल्या असतील व तुम्ही त्यांच्यावर संशय घेत असाल (तर तुमच्या माहितीस्तव) त्यांच्या इद्दतीची मुदत तीन महिने आहे. हाच नियम अद्याप मासिक पाळी सुरु न झालेल्या स्त्रियांच्या बाबतीत आहे. तसेच ज्या स्त्रियांना गर्भ असेल त्यांची मुदत गर्भ संपेपर्यंत आहे.''

(दिव्य कुरआन, ६५ : ४)

समागमापूर्वी झालेल्या तलाकची कोणतीच 'इद्दत' नाही. दिव्य कुरआनात आहे,

''हे श्रद्धावंतांनो! श्रद्धावंत स्त्रियांशी 'निकाह' केल्यावर स्पर्श

करण्यापूर्वीच तलाक दिल्यास तुम्हाला अधिकार नाही की त्यांना इद्दतमध्ये बसवावे जेणेकरुन त्यांची दिनगणना करावी. त्यांना 'मताअ' देऊन धर्मसंमत रीतींनी निरोप द्यावा.'' *(दिव्य कुरआन, ३३ : ४९)*

'तलाक' कशा प्रकारे द्यावा?

इस्लामने तलाकची परवानगी अवश्य दिली परंतु तो इच्छितो की माणसाने सद्सद्‌विवेक बुद्धीने विचार न करता भावनावश होऊन तलाक न देता आपला निर्णय पूर्ण विचार करुनच घ्यावा. 'तलाक' केवळ अशा स्थितीतच द्यावा जेव्हा वस्तुत: पती-पत्नींचा निभाव होणे अशक्यप्राय होऊन दोघांत विभक्ती झाल्याशिवाय पर्यायच नाही. या बाबतीत पैगंबरवचनावर आधारित मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.

तलाक मासिक पाळीच्या वेळी न देता 'तुहर' (शुचिर्भूतता) च्या अवस्थेत द्यावा

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या वचनांत 'तलाक'च्या बाबतीत दोन विशिष्ट मार्गदर्शन करण्यात आले आहेत. प्रथम मासिक पाळीत तलाक देऊ नये आणि द्वितीय हे की माणसाने 'तुहर' (शुचिर्भूतता) च्या अवस्थेत समागम न करता तलाक द्यावा. या दोन्ही मार्गदर्शनांत दडलेले रहस्य असे–

मासिक पाळीच्या अवस्थेत स्त्रीमध्ये ती प्रफुल्लता आणि टवटवीतपणा नसतो जो सामान्य अवस्थेत असतो. कधी कधी तिच्या स्वभावात रागीटपणासुद्धा येतो. यामध्ये या गोष्टीची संभावना आहे की या अवस्थेतील तिच्या पोरकट व रागीट स्वभावामुळे तिच्याकडून झालेली अवज्ञा पतीस आवडणार नाही आणि परिणामी तो भावनावश होऊन तलाक देईल. म्हणून तिच्या या अवस्थेतील चिडचिड असलेला स्वभाव सहन न झाल्यास पतीकडून सक्त पाऊल उचलले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

'तुहर'च्या अवस्थेत समागम न करता 'तलाक' देण्याची बरीच कारणे आहेत व त्यात बरेच फायदेही आहेत. पहिला फायदा असा की 'तुहर' हे स्त्री गर्भवती नसण्याचे लक्षण आहे आणि समागमामुळे गर्भधारणेची शक्यता असते. शरीयतची इच्छा आहे की स्त्रीचे गर्भवती असणे किंवा नसणे हे स्पष्ट असावे आणि याच्याशी बरेच प्रश्न निगडित आहेत. म्हणून 'तुहर'च्या अवस्थेत समागम न करता 'तलाक' द्यावा. दुसरे हे की 'तुहर'च्या अवस्थेत लैंगिक सुखाकडे पती-पत्नीचा कल जास्त

असतो. म्हणून यासाठी ते बरेच वाद-विवाद विसरलेले असतात अथवा सहन करीत असतात. ज्या 'तुहर'मध्ये एकदा लैंगिक सुख भोगण्याची संधी मिळताच तलाक देण्याच्या मानसिकतेत थोडीफार कमतरता येऊ शकते. म्हणून सूचित करण्यात आले आहे की 'तुहर'च्या अवस्थेत समागमापासून दूर राहून 'तलाक' द्यावा. मानसिकरित्या हे अवघड काम आहे. तिन्ही तलाक 'तुहर'च्या अवस्थेत समागम न करता तलाक देणे म्हणजे हे काम अगदीच अवघड व कठीण होऊन बसते. अर्थात हे 'तलाक' देण्याचे कठीण काम केवळ अशाच परिस्थितीत शक्य आहे की त्याने 'तलाक'चा निर्णय संपूर्ण विचारांती आणि गांभीर्याने घेतला आहे.

'तलाक-ए-मस्नून' व 'गैर मस्नून'

'तलाक'ची संपूर्ण प्रणाली कुरआन व हदीसमध्ये स्पष्ट करण्यात आली आहे. याशिवाय इतर जी काही रीत अवलंबिली जाईल ती शरीयतच्या विरुद्ध आणि चुकीची आहे. हनफी पंथाच्या विद्वानांनी या विषयावर इतरांच्या तुलनेत जास्त सविस्तर चर्चा केलेली आहे. यानुसार 'तलाक'चे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार 'तलाक-ए-मस्नून' आहे आणि दुसरा 'तलाक-ए-बदई' आहे.

'तलाक-ए-मस्नून'चा अर्थ

'तलाक-ए-मस्नून' म्हणजे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगिलेल्या रीतीनुसार 'तलाक' देणे होय. 'तलाक' ही काही उपासना वा पूजा नसून ती केवळ धर्मसंमत परवानगी आहे. पैगंबरप्रणालीनुसार देण्यात येणाऱ्या 'तलाक'मुळे माणूस गुन्ह्यांपासून वाचतो. तसेच एखाद्याचा विचार 'तलाक-ए-बदई'चा असूनही त्याने पैगंबरप्रणालीचे अनुकरण केल्यास अथवा त्याच्यात पैगंबरप्रणालीच्या अनुकरणाची भावना प्रेरित असल्यास त्यास याचे निश्चितच पुण्य लाभेल.

'अहसन' अथवा श्रेष्ठ प्रणाली

'तलाक-ए-मस्नून'चे सुद्धा दोन प्रकार आहेत. एक 'अहसन' (श्रेष्ठ - अति उत्तम) आणि दुसरा प्रकार 'हसन' (उत्तम).

'अहसन' प्रकारच्या तलाकची रीत अशी की 'तुहर'च्या अवस्थेत समागमाशिवाय केवळ एक तलाक द्यावा. स्त्रीची मासिक पाळी होऊन गेल्यावर 'तुहर'ची अवस्था दुसरी मासिक पाळी येईपर्यंत असते. एक 'तलाक' दिल्यानंतर

'इद्दत' (तीन मासिक पाळ्यांपर्यंत) ची मुदत पूर्ण होईपर्यंत दुसरा तलाक देऊ नये. ही मुदत पूर्ण झाल्यानंतर 'तलाक-ए-बायना' होईल आणि वैवाहिक संबंध संपुष्टात येतील. याचा फायदा हा आहे की 'इद्दत'च्या मुदतीमध्ये पती आपल्या पत्नीस परत 'रुजुअ' करू शकतो, अर्थात विवाह बंधनात घेऊ शकतो. 'रुजुअ' न करता इद्दतीची मुदत संपल्यावर त्यांचा पुनर्विवाह करता येतो. हे स्त्रीकरितासुद्धा फायदेशीर आहे.

'तुहर'च्या अवस्थेत समागम न करता कोणत्याही वेळी 'तलाक' दिला जाऊ शकतो. सुरुवातीलाच 'तलाक' देऊन विभक्त झाल्यास, दरम्यानच्या मुदतीत समागमाची शक्यता कमी असणार.

याचे 'अहसन' असण्याचा पुरावा पैगंबरसोबत्यांच्या जीवनप्रणालीत मिळतो. ते फक्त एकच 'तलाक' देत.

इब्राहीम नखई यांनी सांगितले आहे,

''पैगंबरांच्या सोबर्ती (रजि.) पैकी कोणीही पत्नीला फक्त एकदाच तलाक देऊन तिला सोडणेच पसंत करायचे. इथपावेतो की तिला तीन मासिक पाळ्या येऊन 'इद्दत' पूर्ण होत असे.'' (जेलई, नसबुलरायत फी तखरीज अहादीसुल हिदाया मआ अल हिदाया, ३/२९२)

'हसन' अथवा उत्तम पद्धत

'तलाक-ए-हसन' म्हणजे समागमाशिवाय तीन 'तुहर'मध्ये तीन तलाक देण्यात यावे. 'हदीसे सहीहा'नुसार 'तुहर'च्या स्थितीत 'तलाक' देण्यात यावा. सर्वच हदीसच्या ग्रंथांत ही घटना लिखित आहे की माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांनी त्यांच्या पत्नीस मासिक पाळीच्या अवस्थेत 'तलाक' दिला. माननीय उमर (रजि.) यांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या समोर ही घटना कथन केली. त्यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी उत्तर दिले,

''अब्दुल्लाह (रजि.) यांना सूचना द्या की पत्नीस 'रुजुअ' करून तिची मासिक पाळी संपेपर्यंत तिच्याबरोबर राहावे. मग जेव्हा तिला दुसरी मासिक पाळी येऊन जाईल तेव्हा तिला तलाक द्या व तेही समागमापूर्वी, अथवा वाटल्यास परत विवाहबंधनात ठेवावे.''

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी हेसुद्धा सांगितले की दिव्य कुरआन व या (सूरह तलाक : १) शब्दांचा पण हाच अर्थ अनुस्यूत आहे. (बुखारी किताबुत्तलाक)

दारे कुतनी यांच्या हदीसग्रंथात् आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी माननीय

अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांना सांगितले की तलाकची 'मस्नून' रीत ही आहे की स्त्री जेव्हा 'मासिक पाळी'तून 'तुहर'च्या अवस्थेत येते तेव्हा तलाक द्यावा व परत मासिक पाळी येऊन गेल्यावर 'तुहर'च्या अवस्थेत 'तलाक' द्यावा.

कधी कधी 'तुहर'ची मुदत खूप वाढत जाते. काही तरुण स्त्रियांना मासिक पाळीनंतर बरेच दिवस दुसरी मासिक पाळी येत नसल्याने ही मुदत वाढते. 'रजाअत' (मुलास जन्म दिल्यानंतर होणरा रक्तस्त्राव) च्या काळातसुद्धा सामान्यत: 'तुहर'ची मुदत वाढलेली असते. 'मस्नून प्रणाली'नुसार 'तलाक'ची रीत अशी आहे की या दीर्घ मुदतीच्या तुहरच्या काळात 'समागम' झाल्यास मासिक पाळी येण्याची वाट पाहावी. यानंतर 'तुहर'च्या अवस्थेत समागम न करता तलाक देण्यात यावा.

(इब्ने आबेदीन रद्दुल मुख्तार अलल दुर्रे मुख्तार, ४/४२३)

इमाम मालिक सांगतात की 'तलाक' हे मुळातच 'ममनू' (म्हणजे मनाई करण्यात आलेले) आहे. कठीण व अपर्यायी परिस्थितीतच यास परवानगी देण्यात आली आहे. म्हणून एकापेक्षा जास्त तलाक देणेच वाईट आहे. याचे उत्तर असे देण्यात आले की तलाक हे अति कठीण परिस्थितीत व गरज असल्यावरच शास्त्रसंमत करण्यात आले. ज्या वेळी एखादी व्यक्ती 'तुहर'च्या अवस्थेत लैंगिक आकर्षण असूनही तलाक देत असेल तर याचा अर्थ असा होतो की त्याला खरोखरच याची गरज आहे आणि याच गरजेनुसार परत 'तुहर'च्या अवस्थेत तो दुसऱ्यांदा व तिसऱ्यांदा 'तलाक' देत आहे.

(हिदाया मआ फतहुलकदीर, ३/४४९)

ज्या स्त्रीला कमी वयोमानानुसार अथवा रजोनिवृत्तीमुळे मासिक पाळी येत नसल्यास समागमानंतर तात्काळ 'तलाक' दिला जाऊ शकतो. याची 'मस्नून' रीत अशी आहे की दर महिन्यास एक 'तलाक' देण्यात यावी. अशा प्रकारे तीन महिन्यांत तीन 'तलाक' देण्यात यावेत. अशा रीतीने तीन तलाक पूर्ण होतील. परंतु हनफी पंथाचे विद्वान 'इमाम जाफर' यांचे मत असे आहे की यामध्येसुद्धा समागमानंतर एका महिन्याच्या मुदतीनंतर 'तलाक' देण्यात येईल.

ज्या स्त्रीबरोबर समागम न झाल्यास तिला 'तुहर'च्या अवस्थेत 'तलाक' देण्यात काहीच अर्थ नाही. मासिक पाळीतसुद्धा तलाक देणे 'मस्नून' रीतीनुसार आहे. इमाम जाफर याच्याशीसुद्धा मतभेद करतात. त्यांच्या मतानुसार 'तुहर'च्या अवस्थेत मध्येच तलाक द्यावा.

(सविस्तर वर्णनासाठी हिदायाआ फतहुलकदीर, ३ किताबुत्तलाक आणि रद्दुल मुख्तार फी दुर्रुरल मुख्तार ४ किताबुत्तलाक)

मासिक पाळीमध्ये 'तलाक' देण्याचा नियम

माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांनी त्यांच्या पत्नीस मासिक पाळीच्या अवस्थेत तलाक दिला तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी पत्नीला रुजु करून घेण्याचा त्यांना आदेश देऊन सांगितले की तलाक द्यायचा असल्यास 'तुहर'च्या अवस्थेत द्यावा. प्रश्न असा आहे की मासिक पाळीत दिलेल्या 'तलाक'नंतर 'रुजुअ'च्या नियमाचे स्वरुप काय आहे? 'हाफीज इब्ने हजर' यांनी सांगितले की इस्लामी पंडितांची मोठी संख्या यावर सहमत आहे की अशा प्रकारच्या तलाक नंतर 'रुजूअ' करणे मुस्तहब व पसंत असलेले कर्म आहे. इमाम मालिक यांच्या मतानुसार रुजुअ करणे अनिवार्य आहे. 'इमाम अहमद' सुद्धा यावरच सहमती दर्शवितात आणि त्यांच्या दुसऱ्या कथनानुसार असे समजते की ते याला पसंत असलेले व चांगले कार्य समजतात. (इब्ने हजर, फतहुलबारी, १०/४३९)

हनफी पंथाच्या काही पंडितांनी यास 'मुस्तहब' (हे कृत्य स्पृहणीय तर आहे परंतु न केल्यास वाईटपण नाही) चा दर्जा दिला आहे. परंतु काही संशोधकांनी यास 'वाजिब' (अनिवार्य) घोषित केले आहे.

मासिक पाळीच्या अवस्थेत तलाक दिल्यास त्याच्यानंतर तात्काळ 'तुहर'च्या अवस्थेत तलाक देणे काही विद्वानांच्या मते धर्मसमंत आहे.

माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांच्या या घटनेने जे स्पष्ट होते, त्यामधून काही बाबतीत या गोष्टीकडे इशारा व्यक्त होतो. मासिक पाळीच्या अवस्थेत माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांनी जो तलाक दिला आहे, त्यापासून त्यांनी पत्नीस रुजुअ करावे व विवाहबंधनात घ्यावे आणि तिचा पत्नीसारखा सांभाळ करावा. मग दुसऱ्यांदा जेव्हा मासिक पाळी येऊन जाईल तेव्हा समागम न करता वाटल्यास तलाक द्यावा. हे तपशीलवार वर्णन काही सत्यकथनकारांचे आहे. म्हणून मान्य करावे लागेल.

हनफी पंडितांमध्ये इमाम यूसुफ व इमाम मुहम्मद यांचेसुद्धा हेच मत आहे. इमाम शाफई यांच्याकडूनसुद्धा असेच प्रसिद्ध कथन कथित झालेले आहे. इमाम मालिक व इमाम अहमद हेसुद्धा यावर सहमत आहेत.

याची पुष्कळ कारणे व फायदे असू शकतात की माणसाने केवळ 'तुहर'च्या अवस्थेत तलाक देण्यासाठी मासिक पाळीच्या अवस्थेत दिलेल्या तलाकपासून 'रुजूअ' न करता काही अवधी पत्नीबरोबर घालवावा. तलाकपूर्वी पूर्ण 'तुहर'ची मुदत, मग पूर्ण मासिक पाळीची मुदत जेव्हा संपेल तेव्हा 'तलाक' देण्याचा निर्णय

घ्यावा. या मुदतीत याची शक्यता आहे की पती-पत्नी दरम्यान वैवाहिक संबंध प्रस्थापित होतील व 'तलाक'चा विचार बदलून जाईल. तसेच आणखीन काही फायदेसुद्धा असू शकतात. (फतहुलबारी, १०/४४०)

या बाबतीत सहमत असलेल्या धर्मपंडितांनुसार, मासिक पाळीच्या अवस्थेत देण्यात आलेला 'तलाक' पडतो. परंतु इमाम इब्ने हजम यांच्या मतानुसार हा 'तलाक' पड्त नाही. नंतरच्या काळातील इमाम इब्ने तैमियांचेसुद्धा हेच मत आहे. मतैक्य असलेल्या धर्मपंडितांचे मत असे आहे की माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांनी दिलेला 'तलाक'सुद्धा गणण्यात आला होता.

(बुखारी किताबुत्तलाक. या बाबतीत सखोल माहितीकरिता 'मुस्लिम' किताबुत्तल्लाकचे अध्ययन करावे.)

'तलाक-ए-बदई'

'तलाक-ए-मस्नून'नंतर 'तलाक-ए-गैर मस्नून' म्हणजे 'तलाक-ए-बदई'चे खालीलप्रमाणे स्वरुप आपल्या समोर येतात.

१) एकाच वेळी तीन तलाक देणे.

२) 'तुहर'च्या अवस्थेत ज्यामध्ये समागम झाले, तलाक देणे.

३) एका 'तुहर'मध्ये तीन तलाक देणे.

४) मासिक पाळीच्या अवस्थेत तलाक देणे.

५) मासिक पाळीत समागम करून तलाक देणे.

(सविस्तर वर्णनासाठी 'हिदाया आ फतहुल क़दीर, ३/४३१ व त्यापुढे 'इब्ने आबेदीन', रद्दुल मुख्तार अललदुर्रुल मुख्तार : ४/२२७ व या पुढील भाग वाचावा.)

'इद्दत'च्या काळात पत्नी पतीच्या घरीच राहील.

तलाक झाल्यावर 'इद्दती' ची मुदत पुर्ण होई पर्यंत स्त्रीला पतीच्या घरातच राहण्याचा आदेश आहे. मात्र केवळ अशा स्थितीत की तिच्या तर्फे एखादे लज्ञास्पद कृत्य घडल्यांस अथवा पती पत्नींचे एकत्र राहणे कठीण-प्राय झाल्यास तिला पतीचे घर सोडावे लागेल. दिव्य कुरआनात आहे,

''इद्दतच्या काळात या स्त्रियांना घराबाहेर काढू नका आणि त्यांनी स्वत: पण घर सोडू नये. अपवाद एवढाच की त्यांच्यातर्फे एखादे उघड व्यभिचारकर्म झालेले असावे.'' *(दिव्य कुरआन, ६५ : १)*

याचा एक फायदा असा होतो की एकाच घरात बरोबर राहात असल्यामुळे पतीला आपल्या (तलाकच्या) निर्णयावर आणि पत्नीस तिच्या वर्तनावर लक्षपूर्वक आणि गांभीर्याने विचार करण्याची उत्तम संधी मिळते. अशा प्रकारे परत दोघांचे संबंध प्रस्थापित होण्याचे मार्ग खुलतात.

या तिन्ही गोष्टींनुसार कार्य केल्यास 'तलाक'मध्ये गड्बड आणि घाई होणार नाही. एका 'तलाक'नंतर दुसरा 'तलाक' देण्याची जरी वेळ आली तरी माणसाला आपल्या निर्णयावर पुनर्विचार करून पत्नीला 'रुजुअ' करून तिला परत विवाहबंधनात घेण्याची संधी मिळते.

'रुजुअ'चा अधिकार व त्याची रीती

एक किंवा दोन 'तलाक' दिल्यावर 'इद्दत'ची मुदत संपण्याच्या आत 'रुजुअ'चा पतीला पूर्ण अधिकार आहे. जर स्पष्ट शब्दांत 'रुजुअ' असल्यास या बाबतीत कोणालाच मतभेद नाही. इमाम शाफई सांगतात की 'रुजुअ' अनिवार्यरित्या मुखाद्वारे व्यक्त व्हावे. हनफी पंथाचे विद्वान सांगतात की समागम, आलिंगन वगैरेसारख्या बाबीसुद्धा 'रुजुअ'करिता पुरेशा आहेत. इमाम शाफई यांनी 'रुजुअ'करिता साक्षीदारांची साक्ष अनिवार्य घोषित केली आहे. परंतु अहनाफ यास केवळ 'मुस्तहब' (ऐच्छिक पुण्य) जाणतात. इमाम मालिकसुद्धा यावरच सहमत आहेत. (हिदाया-२/३७५, बदायतुल मुज्तहिद-२/९२)

जर कोणी एकदा अथवा दोनदा 'तलाक' दिल्यावर 'इद्दत'ची मुदत संपण्याच्या आत पत्नीस 'रुजुअ' न केल्यास पत्नी त्याच्यापासून विभक्त होईल. त्याची जर परत वैवाहिक संबंध प्रस्थापित करण्याची इच्छा असेल व पत्नीसुद्धा

यासाठी तयार असेल तर नवीन 'मेहेर' बांधून परत दोघांचा 'निकाह' करावा लागेल व पत्नी जर तयार नसेल तर तो बळजबरी करू शकत नाही.

जर कोणी तिसऱ्या वेळेस 'तलाक' दिला असेल तर त्यांचे वैवाहिक संबंध संपुष्टात येतील. आता परत तिला विवाहबंधनात घेण्यासाठी हे एवढे मात्र शक्य आहे की पत्नीने एखाद्या दुसऱ्या व्यक्तीशी 'निकाह' झाल्यानंतर जर ती विधवा झाली अथवा या वर्तमान पतीने तिला तलाक दिला आणि परत दोघे विवाहास तयार असतील तर त्यांचा पुनर्विवाह होईल. पत्नी राजी नसल्यास तिच्यावर बळजबरी करण्याचा माजी पतीला अधिकार नाही. तो इतर कोणाबरोबरही 'निकाह' करण्यास स्वतंत्र आहे.

दिव्य कुरआनात आहे,

''पुरुषाने स्त्रीला तिसऱ्यांदा तलाक दिल्यास त्याच्याकरिता ती स्त्री वैध होणार नाही की जोपर्यंत तिने इतर दुसऱ्या पुरुषाबरोबर निकाह केला नाही. जर दुसऱ्या पतीने तिला तलाक दिला आणि पहिल्या पतीस व स्त्रीला वाटत असेल की ते दोघे यानंतर अल्लाहच्या मर्यादा कायम राखू शकतील तर परत दोघांनी विवाहबद्ध होण्यास काहीच हरकत नाही. या अल्लाहच्या निश्चित केलेल्या मर्यादा आहेत ज्या यांना समजून घेणाऱ्यासाठी वर्णन करीत आहे.''

(दिव्य कुरआन, २: २३०)

अशा प्रकारे तीन 'तलाक'नंतर 'रुजुअ' होणे खूप कठीण आहे. किंबहुना माणसाचा स्वभावसुद्धा यासाठी तयार नसतो. ही स्थिती याकरिता ठेवलेली आहे की तीन तलाक देण्यापूर्वी माणसाने पूर्णपणे मागचा-पुढचा विचार करावा की आता 'रुजुअ' सोपे नाही. पत्नी नेहमीकरिता विभक्त होत आहे.

एकाच बैठकीत तीन 'तलाक'चा नियम

ही चर्चा संपविण्यापूर्वी एक प्रश्न जो सर्व सामान्यपणे विचारला जातो, त्य बाबतीत काही शब्द बोलावे वाटतात ते असे की जर कोणी 'अहसन' प्रणालीनुसा तलाक दिला नाही अर्थात केवळ एकच तलाक दिला नाही अथवा 'तलाक-ए हसन'च्या रीतीनुसार प्रत्येक 'तुहर'मध्ये किंवा दर महिन्याला एक याप्रमाणे तलाव दिला नाही व एकाच वेळी तीन 'तलाक' देऊन मोकळा झाला. अशा वेळी त्याल 'रुजुअ'चा अधिकार असेल. हा 'तलाक बाइन-ए-मुगल्लिजा' गृहीत धरून त्यार 'रुजुअ'चा अधिकारच नसणार!

सर्वसामान्य इस्लामी विधीतज्ज्ञांच्या अनुसार हे तिन्ही तलाक 'बाइना' गृहीत धरले जातील. परंतु 'अहले-हदीस'च्या विद्वान यास केवळ एकच 'तलाक-ए-रजई मानतात. ही एक वैधानिक चर्चा आहे. या बाबीवर सर्वांची सहमती आहे की एकाच वेळी अथवा एकाच 'तुहर'मध्ये तिन्ही तलाक देणे 'गैर मस्नून' (नापसंत व चुकीचे कृत्य आहे. हनफी पंडितांनी यास 'तलाक-ए-बदई' म्हटले आहे व या कृत्यामुळ माणूस अपराधी ठरविण्यात येतो.

एकाच वेळी तिन्ही तलाक सामान्यत: आवेशाने अथवा क्षणिक रागास बळ पडून देण्यात येतात. यामागे कोणतीच विचारपूर्वक योजना नसते. या चुकीच्या व हंगामी निर्णयाचे भीषण परिणाम जेव्हा समोर येतात, माणूस अचानक आपले कुटुंब उद्ध्वस्त झालेले पाहतो, तेव्हा खूप पश्चात्ताप करतो. पैगंबर प्रणालीनुसार देण्यात येणाऱ्या 'तलाक'मध्ये अशा प्रकारची संकटे कधीच येत नाहीत जी रागाच्या भरात एकदाच तीनदा 'तलाक'मुळे येतात. कधी कधी 'तलाक'शिवाय पर्यायच नसतो कुरआन व हदीसमध्ये याची उत्तरे सांगितली आहेत अशा रीतीचा प्रसार व्हावयास हवा. यामुळे ते सर्वच आक्षेप व हरकती संपून जातील जे या विषयावर घेण्यात येतात

प्रकरण – १०

‘तलाक’ झालेल्या स्त्रीचा ‘नफ्का’

इस्लामच्या ‘तलाक विधी’वर जे आक्षेप घेण्यात येतात त्यापैकी एक म्हणजे रुष ‘तलाक’ या शब्दाच्या दोन फैरी झाडून स्त्रीला अचानक घराबाहेर काढतो. ी समाजात अनाथ व निराधार होऊन दारोदार लोकांच्या पायदळी तुडविली ाते. अत्याचारीत जीवन कंठण्यास तिला भाग पाडले जाते. हा आक्षेप अतिशय ुना आणि निर्जीव आहे. परंतु याचा वारंवार उल्लेख करण्यात येतो, जणू इस्लामी रीयतसाठी हे एक जबरदस्त आव्हान असून त्याच्याजवळ याचे कोणतेच उत्तर ाही. या आक्षेपाचा पोकळपणा प्रत्येक बाजूने स्पष्ट करण्यात आला, परंतु ज्यांचे द्दिष्ट केवळ आक्षेप घेणेच आहे ते स्वत:च्या चुका कधीच मान्य करीत नाहीत. यांच्यासाठी कोणतेच उत्तर समाधानकारक असू शकत नाही. त्यांना केवळ वढेच वाटते की त्यांच्या आक्षेपांना तर्कशुद्ध मानण्यात यावे आणि त्यांच्या च्छेनुसार शरीयत विधीतील त्रुट्यांना बाजूला सारून त्यामध्ये सुधारणा करण्यात ावी. त्यांच्या मते ज्या माणसाने स्त्रीला तलाक दिला त्यासही शिक्षा अवश्य ण्यात यावी की त्याने जीवनभर तिचा नान-नफ्का (पोटगी) द्यावा. परंतु जर िचा दुसरा विवाह झाला अथवा ती स्वावलंबी झाल्यास पुरुषास तिच्या आर्थिक बाबदारीपासून मुक्त होता येईल. सर्वोच्च न्यायालयाच्या तत्कालीन निर्णयाने स्लामच्या तलाक व्यवस्थेवर घेण्यात येणाऱ्या आक्षेपांना एक प्रकारे दुरुस्त रविले आहे. या संकल्पनेस कायदेशीर प्रमाणपत्र दिले की तलाकनंतरसुद्धा रुषाने आजीवन स्त्रीला ‘नफ्का’ द्यावा अथवा तिने दुसरा विवाह करेपर्यंत द्यावा. हणून या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्याची गरज वाटते.

ाही अनिष्ट परिणाम

१) जर कोणी अशी मागणी केली की त्याची आर्थिक जबाबदारी एखाद्या नोळखी इसमावर टाकण्यात यावी, तेव्हा जग त्याच्या बौद्धिक दिवाळखोरीवर खदळून हसेल. दोन अनोळखी व्यक्तींच्या दरम्यान अशा प्रकारचे संबंध कधीच सतात. इस्लाम धर्मानुसार ज्या आधारावर जबाबदाऱ्या टाकल्या जातात ्यामधील एक आधार ‘निकाह’ होय. ‘निकाह’नंतर स्त्री वैवाहिक जीवनाच्या र्वांगीण मागण्यांची पूर्तता आणि परिवाराच्या निर्मितीकरिता पुरुषाला आपल्या ीवनाचा एक काळ देते आणि आपले कौशल्य पणाला लावते. पुरुष या गोष्टींच्या

मोबदल्यात तिच्या 'नान-नफ्क्या'ची संपूर्ण जबाबदारी उचलतो. जोपर्यंत दोघेही वैवाहिक बंधनात बांधलेले असतात, ही जबाबदारी त्याच्यावर असते. 'तलाक'मुळे पती-पत्नीचे वैवाहिक संबंध संपुष्टात येतात. याचबरोबर पुरुषाच्या सर्व जबाबदाऱ्यासुद्धा संपतात आणि दोघांच्या दरम्यान एक प्रकारचा दुरावा आणि अनोळखीपणाचा अडसर येतो. तसेच 'तलाक-ए-मुगल्लेजा' असल्यास हा अनोळखीपणा इतका तीव्र असतो की स्त्री जितक्या सहजतेने दुसऱ्या पुरुषाशी आणि पुरुष दुसऱ्या स्त्रीशी विवाह करु शकतो, तितक्या सहजतेने हे दोघे परत आपले वैवाहिक संबंध बहाल करू शकत नाहीत. जर त्यांना हे संबंध परत प्रस्थापित करावयाचे असल्यास, स्त्रीचा कुण्या दुसऱ्या पुरुषाबरोबर विवाह व्हावा लागेल आणि मग त्याने तिला तलाक द्यावा अथवा त्याचे देहावसना व्हावे. केवळ अशाच परिस्थितीत हे शक्य होईल. 'तलाक'च्या माध्यमाने जेथे इतका प्रचंड दुरावा निर्माण व्हावा आणि अनोळखीपणापेक्षाही जास्त मोठा अडसर निर्माण व्हावा, तेव्हा यापैकी कोणी कोणावर अधिकार लादावे आणि कोणी कोणाची जबाबदारी उचलावी?

२) पती-पत्नी दरम्यान 'तलाक'ची वेळ सामान्यत: अशा परिस्थितीत येते जेव्हा ते आपापल्या जबाबदाऱ्यांपायी गफलत व उदासीनता बाळगतात आणि एक दुसऱ्याच्या अधिकारांची पायमल्ली करतात. यामुळे खाजगी जीवनातील परस्पर सहकार्य संपून जाते आणि असहकार्य व विरोध सुरु होतो. परंतु 'तलाक'चा मुळात उल्लेखच अशा प्रकारे करण्यात येतो की जणू हे पुरुषाकडून स्त्रीवर होणारा घोर अत्याचार व अन्याय आहे आणि स्त्री यामध्ये निष्पाप व निर्दोष आहे. तसे पाहिल्यास हे अजिबात नाकारता येत नाही की स्त्रीनेच अशी परिस्थिती निर्माण केलेली असते की पुरुषाला नाईलाजास्तव 'तलाक' देणे भाग असते. मग हे सर्वकाही असूनसुद्धा 'तलाक' झालेल्या स्त्रीस आजीवन 'नान-नफ्का' देणे पुरुषावर बंधनकारक ठरविणे म्हणजे त्याच्यावर मोठाच अन्याय होईल. जे नैतिक व वैधानिकरित्या अन्यायकारक आहे.

३) 'तलाक' झाल्यावर ज्याप्रमाणे स्त्री पुरुषास सहकार्य करण्यास तयार नसते, त्याचप्रमाणे पुरुषसुद्धा स्वभाविकरित्या स्त्रीशी आर्थिक जबाबदारीपासून मुक्त होतो. जर 'तलाक' झाल्यावरही स्त्रीची आर्थिक जबाबदारी त्याच्यावर तशीच कायम ठेवली तर काही वेळा 'तलाक' न देणेच त्याच्यासाठी 'तलाक' देण्यापेक्षा जास्त फायदेशीर असू शकते. 'तलाक' देऊनसुद्धा पत्नीची आजीवन आर्थिक जबाबदारी उचलण्यापेक्षा तो 'तलाक' न देता या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देईल. कारण 'तलाक' न देता तिची आर्थिक जबाबदारी पूर्ण करण्याच्या

मोबदल्यात त्याला त्याचे स्वामित्वाचे हक्क मागण्याचा तर पूर्ण शास्त्रसमंत अधिकार मिळेल! काहींना वाटते की 'तलाक' झालेल्या स्त्रीने न्यायालयामार्फत आपले अधिकार मिळवावेत. परंतु एक तर न्यायालयामार्फत आपले अधिकार मिळविणे इतके सोपे नाही. दुसरे हे की पुरुष वाटल्यास कितीतरी पळवाटा काढू शकतो. तिसरे हे की हे कोणते विद्वत्तापूर्ण काम आहे की 'तलाक' झालेल्या स्त्रीच्या 'नफ्क्या'ला जरूरी ठरवून 'तलाक'ला इतके अवघड करावे की माणसाने 'नान-नफ्क्या'च्या भीतीने तिला 'तलाक' देण्याची कल्पनाच करू नये आणि बिचाऱ्या स्त्रीला तसेच ताटकळत ठेवावे. एक चूक कायम ठेवण्यासाठी दुसरी चूक करणे म्हणजे काही बुद्धीला पटणारी गोष्ट नाही.

४) 'तलाक'नंतर स्त्री आणि पुरुष दोघांना हे स्वातंत्र्य असावे की त्यांनी त्यांच्या मर्जीनुसार दुसऱ्यांदा आपला जीवनसाथी निवडावे आणि 'तलाक'मुळे जीवनात आलेल्या पोकळीला भरून काढावे. परंतु 'तलाक' दिल्यावरसुद्धा माणसाला पत्नीचा आर्थिक बोजा उचलावा लागणार असल्यास त्याचा दुसरा 'निकाह' करण्याची हिंमतच होणार नाही. माजी पत्नी आणि वर्तमान पत्नी, या दोघींची आर्थिक जबाबदारी उचलण्याऐवजी तो कदाचित लग्न न करता वैराग्याचे जीवन जगणेच पसंत करील. यामुळे त्याचे वर्तन आणि नैतिकता दूषित होण्याची व लैंगिक अनाचार वाढण्याची दाट शक्यता आहे.

५) यामध्ये स्त्रीच्या चारित्र्यास धोका संभवण्याचीसुद्धा शक्यता आहे. जर स्त्रीला यावर विश्वास झाला की 'तलाक' झाल्यावरसुद्धा तिचा 'नफ्का' (पोटगी) तिला बरोबर मिळत राहणार. तेव्हा तिच्यात पुरुषास अगदी किरकोळ गोष्टीवर त्रस्त करून लहानसहान तक्रारीवर 'तलाक'ची मागणी करण्याची मानसिकता बळावणार. म्हणूनच पश्चिमी देशांत घटस्फोटाचे प्रमाण ज्या कारणामुळे वाढलेले आहे, यातील एक प्रमुख कारण हेसुद्धा आहे की स्त्रीला विश्वास असतो की ती घटस्फोटानंतरसुद्धा घटस्फोटाच्या 'पोटगी'च्या नावावर जीवनभर पतीकडून आपला निर्वाहभत्ता वसूल करीत राहणार. इस्लाम 'तलाक'च्या मानसिकतेस पसंत करीत नाही व तिला चुकीचे समजतो. अशा कोणत्याच कायद्याची व सूत्राची पाठराखण अजिबात करू शकत नाही ज्यामध्ये ही मानसिकता बळावते. वैवाहिक जीवनाच्या प्रत्येक न आवडणाऱ्या बाबीस 'तलाक'च्या माध्यमाने दूर करण्यात येते.

६) एक आणखीन उल्लेखनीय बाजू आहे ती ही की 'तलाक'मुळे स्त्री आणि पुरुष एक दुसऱ्यासाठी अनोळखी आणि परके होतात. यानंतरही 'नफ्का' चालूच ठेवल्यास स्वभाविकपणे हा परकेपणा कमी होत राहतो. जुने घाव भरत जातात.

भेटीगाठी सुरु होतात. दोन्हीकडून सहानुभूती व जिव्हाळा वाढत जातो. संकोचाच्या भिंती जमीनदोस्त होतात व याचे पर्यवसान (अनैतिक) प्रेमात होते. कधीकधी हे प्रेम अनैतिकतेचे भीषण स्वरूप धारण करते. मागच्या सवयीप्रमाणेच नि:संकोचपणे त्यांच्यात लैंगिक संबंध प्रस्थापित होतात. अशी परिस्थिती निर्माण होते की ज्यात नैतिकता व निर्लज्जता टाहो फोडत असावी, हे कोणत्याच दृष्टीने योग्य नाही.

याचे पण काहीजण अशा प्रकारे उत्तर देतात, याची व्यवस्था केली जाऊ शकते की दोघांमध्ये प्रत्यक्षरित्या संबंध प्रस्थापित होऊन द्यावे. परंतु कमीतकमी दोघे एकाच ठिकाणी राहात असल्यास हे एक कठीणच काम आहे. याचे खूप भीषण परिणाम पाहण्यात आलेले आहेत. एवढेच नाही तर हे पण अनुभवास आले की अगदी नि:संकोचपणे दोघे एकत्रित राहू लागतात आणि समाजपण त्यांच्या या दुर्व्यवहारास सहन करतो. शरीयतच्या मानसिकतेची ही मागणी आहे की कोणत्याही व्यक्तीसाठी अशी परिस्थिती निर्माण करू नये की त्याने व्यभिचारात खूप पुढे निघावे आणि कधीच मागे वळून पाहू नये व त्याला याची जाणीवसुद्धा होऊ नये.

या आहेत त्या सामाजिक क्लिष्टता ज्या तलाक झालेल्या स्त्रीच्या 'नान-नफ्का (पोटगी) अनिवार्य ठरविण्यामुळे निर्माण होतात. या अनिष्ट परिणामांस दुर्लक्षित करणे सोपे नाही.

'तलाक' झालेल्या स्त्रीचे अधिकार

काही जणांना वाटते की तलाकनंतर स्त्रीला आजीवन 'नफ्का' मिळण्यासाठी येनकेन प्रकारे कुरआनच्या शिकवणीच्या आधारे सिद्ध करावे. परंतु मोठी अडचण अशी आहे की दिव्य कुरआन त्यांची ही इच्छा पूर्ण करण्यासाठी अजिबात तयार नाही. 'तलाक'च्या स्थितीत स्त्रीचे 'मेहेर', 'नफ्का' आणि 'इद्दत'चे प्रश्न निर्माण होतात. कुरआन व हदीसमध्ये याचे नियम दिलेले आहेत. परंतु यामध्ये 'तलाक' झालेल्या स्त्रीच्या आजीवन नफ्क्याचा कोठेच उल्लेख नाही.

'मेहेर'

'मेहेर'च्या प्रश्नावर यापूर्वीच सविस्तर चर्चा झालेली आहे. याचे चार स्वरुप आहेत.

१) मेहेर निश्चित झाले आणि पत्नीशी समागम झाले, अशा स्थितीत तिला पूर्ण 'मेहेर' मिळेल.

२) मेहेर निश्चित झाले नाही आणि पत्नीशी समागम झाले, अशा स्थितीत मेहेरसम राशी मिळेल.

३) मेहेर निश्चित आहे परंतु समागम झाले नाही, अशा स्थितीत एक द्वितीयांश मेहेर मिळेल.

४) जर मेहेर निश्चित झालेले नाही व समागमही झाले नाही, अशा स्थितीत तिला 'मताअ' (थोडीफार राशी) मिळेल.

'इद्दत'च्या मुदतीची निश्चिती

इद्दतचा काळ दिव्य कुरआनने निश्चित करून दिला आहे. समागमानंतर तलाक झाल्यास हा काळ–

''तीन मासिक पाळ्यांपर्यंतचा आहे.'' *(दिव्य कुरआन, २ : २२८)*

''ज्या स्त्रीस कमी वयामुळे अथवा रजोनिवृत्तीमुळे मासिक पाळी येत नसेल तिच्या इद्दतची मुदत तीन महिने आहे.'' *(दिव्य कुरआन, ६५ : ४)*

''तुम्हावर काही गुन्हा नाही की तुमच्या पत्नींना तुम्ही तलाक द्यावा या वेळेपूर्वी की त्यांना स्पर्श करण्याची घटका येईल अथवा महर ठरविला असेल. अशा स्थितीत त्यांना काही न काही अवश्य दिले पाहिजे. सुखवस्तु व्यक्तीने आपल्या ऐपतीप्रमाणे व गरीबाने आपल्या कुवतीप्रमाणे परिचित पद्धतीनुसार द्यावे. हा हक्क आहे सदाचारी लोकांवर.''

(दिव्य कुरआन, २ : २३६)

'इद्दत'च्या काळापर्यंत नफ्का

आता 'नफ्का' (निर्वाहभत्ता) आणि 'सकना' (निवासव्यवस्था) च्या प्रश्नावर चर्चा करू या. 'तलाक'चे दोन प्रकार आहेत, १) 'तलाक-ए-रजई'. यामध्ये पतीला पत्नीस 'रुजुअ' करून घेण्याचा अधिकार असतो. याचे संक्षिप्त नियम असे आहेत.

अ) तलाक-ए-रजई असल्यास विधीतज्ञाची यावर सहमती आहे की स्त्रीला 'नफ्का' आणि 'सकना' (घर) दोन्ही मिळतील.

आ) विधीतज्ञांची यावरसुद्धा सहमती आहे की तलाकपीडित स्त्री गर्भवती असल्यास नफ्का व सकना या दोन्ही बाबी पुरुषावर अनिवार्य आहेत. मग तो 'तलाक-ए-रजई' असो अथवा 'तलाक-ए-बायना' असो.

दिव्य कुरआनचे सांगणे आहे,

''आणि जर त्या गर्भवती असतील तर त्यांच्यावर त्या वेळेपर्यंत खर्च करीत राहा जोपर्यंत त्या गर्भमुक्त होत नाहीत.''

(दिव्य कुरआन, ६५ : ६)

इ) स्त्री गर्भवती नसल्यास 'तलाक-ए-बायना' असल्यास इमाम अहमद, दाऊद जाहिरी आणि अबू सूर वगैरेंचे मत आहे की पतीवर 'नफ्का व सकना' दोन्ही जबाबदाऱ्या अनिवार्य नाहीत. ही मंडळी माननीय फातिमा बिन्त कैस (रजि.) यांच्या कथनाचे संदर्भ देते.

फातिमा (रजि.) सांगतात की ''माझ्या पतीने मला 'तलाक-ए-बायन' दिली.'' तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''तुमच्या पतीवर तुमचा नफ्का अनिवार्य नाही.'' (संदर्भ : मुस्लिम, किताबुत्तलाक बाब अल मुतलका)

आणखीन एका हदीसच्या कथनाचे शब्द असे आहेत की ''तुम्हाला नफ्काही मिळणार नाही व सकना ही मिळणार नाही.'' (मागील संदर्भानुसार, मुस्लिम)

इमाम मालिक व इमाम शाफई सांगतात की, दिव्य कुरआनने 'सकना'चा उल्लेख केला आहे. (सूरह तलाक : ६) म्हणून स्त्रीला 'सकना' मिळेल, पण नफ्का मिळणार नाही.

इब्ने रूशद 'मालिकी' पंथाचे असूनसुद्धा या मतास ते दुर्बल समजतात. (बदायतुल मुजतहिद : २/१०३) या बाबतीत अहनाफचा पंथ जास्त आकलनीय व प्रमाणित वाटतो.

३) हनफी पंथ व काही इतर विद्वानांच्या मते तलाक 'रजई' असो की 'बायन', स्त्रीला 'नफ्का' व 'सकना' दोन्ही मिळावे. हनफी पंथाचा संदर्भ हा आहे की दिव्य कुरआनने 'सकना'चा स्पष्टपणे उल्लेख केला आहे आणि 'नफ्का' पण याच्याच ताब्यात येतो. दिव्य कुरआनने पुरुषाला 'तलाक'नंतर इद्दतपर्यंत स्त्रीला घरातच ठेवण्यास प्रतिबंधित केले. म्हणून तिचा खर्चसुद्धा पुरुषाने उचलावा. 'सकना'च्या आधारावर पत्नीचा 'नफ्का'सुद्धा पुरुषावर अनिवार्य आहे.

दिव्य कुरआनने याचे अशा शब्दांत समर्थन केले,

''त्यांना ('इद्दत'च्या काळात) त्याच जागी ठेवा जेथे तुम्ही राहता, जशी जागा तुम्हाला उपलब्ध असेल. आणि त्यांना अडचणीत आणण्यासाठी त्रास देऊ नका.'' *(दिव्य कुरआन, ६५ : ६)*

माननीय जस्सास म्हणतात की आयतीचे शब्द सामान्य आहेत. हे 'रजई तलाक' झालेली व 'बायन तलाक' झालेली दोन्हीशी संबंधित आहेत की आपल्या शक्ती व ऐपतीप्रमाणे. जुफ्खशरी म्हणतात, 'अलकराफ या शब्दांमुळे स्पष्ट होते की पतीच्या संपत्तीत तलाक झालेल्या स्त्रीसाठी निवास अनिवार्य आहे. अर्थातच मागणी अशी की संपत्तीत 'नफ्का' पण देणे जरूरी असावा, कारण 'सकना'देखील 'नफ्क्या'चाच एक भाग आहे. दुसरा हा आदेश की त्यांना छळण्याच्या हेतुने त्रास देऊ नका. छळणे व त्रास देणे या दोन्ही गोष्टी ज्याप्रमाणे 'सकना'शी संबंधित आहेत त्याचप्रमाणे 'नफ्का'शीसुद्धा संबंधित आहेत.

(जसास, अहकामुल कुरआन, ३/५६५)

फातेमा बिन्त कैस (रजि.) यांच्या कथनाचे हे उत्तर देण्यात आले की यास माननीय उमर (रजि.) यांनी मान्य केले नव्हते आणि सांगितले होते की, ''आम्ही ईशग्रंथ (दिव्य कुरआन) आणि पैगंबरांच्या प्रणालीस एका स्त्रीकथना वरून डावलू शकत नाही. (कारण) माहीत नाही की तिने (चांगल्या रितीने) लक्षात ठेवले की विसरली. तलाक झालेल्या स्त्रीकरिता 'सकना'ही आहे आणि 'नफ्का' पण (देणे गरजेचे) आहे. (मुस्लिम, किताबुल्तलाक, बाबुल मुतलकुल बायनल नफ्कत लहा)

हा प्रश्न अगदी स्पष्ट आहे की 'तलाक' झालेल्या स्त्रीला तिच्या 'इद्दती'च्या मुदतीपर्यंत तिला तिच्या पतीतर्फे 'नफ्का' व सकना मिळणे अनिवार्य आहे. इद्दतनंतर 'नफ्का' व 'सकना'चा अधिकार संपतो.

'तलाक' झालेल्या स्त्रीकरिता 'मताअ'

जे लोक 'दिव्य कुरआनातून तलाकीत स्त्रीकरिता 'नफ्क़ा' सिद्ध करतात, ते 'सूरह बक़रा'च्या आयत क्र. २४१ चा संदर्भ देतात. ते अशा प्रकारे,

''अशाच तऱ्हेने ज्या स्त्रियांना घटस्फोट देण्यात आला असेल त्यांनादेखील योग्य प्रकारे काही न काही देऊन निरोप देण्यात यावा. हा हक्क आहे अल्लाहचे भय बाळगणाऱ्या लोकांवर.'' *(दिव्य कुरआन, २ : २४१)*

या आयतीच्या आधारावर सिद्ध करण्यात येते की यामध्ये 'तलाकीत' स्त्रियांसाठी 'मेहेर'व्यतिरिक्त 'मताअ' (धनसंपत्ती) देण्याचा आदेश आहे. 'तलाक' झाल्यावर ती जिवंत असेपर्यंत तिलाही 'मताअ' मिळत असली पाहिजे की जेणेकरून तिचा उदरनिर्वाह व्हावा. दिव्य कुरआनने 'मताअ'चा आदेश तर दिला, परंतु त्याचे प्रमाण निश्चित केलेले नाही. त्यास तत्कालीन रीतीरिवाजावर सोडण्यात आले आहे. याचा अर्थ असा की परिस्थितीप्रमाणे व तत्कालीन परंपरेप्रमाणे ते निश्चित करता येते. त्यांना असे पण वाटते की 'मताअ'ची रक्कम आजीवन अथवा स्त्रीचा दुसरा विवाह होईपर्यंत निर्वाहभत्ता अथवा पोटगीच्या स्वरूपात स्त्रीला दिल्यास कुरआननुसारच होईल आणि इस्लामी शिकवणीविरुद्धही होणार नाही. कारण 'मताअ'ची अदायगी एक हप्त्यातही होऊ शकते व हप्त्यानुसारसुद्धा होऊ शकते. परंतु हे आवश्यकरित्या पोटगीच्या स्वरूपात देण्यात यावा.

या लोकांनी 'मताअ'चा लावलेला विलक्षण अर्थ अरबी शब्दकोशात तर मिळत नाहीच आणि कुरआनच्या संदर्भानुसार पण मिळत नाही. पैगंबरांच्या सोबत्यांनी आणि कोणत्याच विधीतज्ञांनी असा अर्थ लावलेला नाही. उपरोल्लेखित आयतीमध्ये 'तलाकित' स्त्रीसाठी 'मताअ'चा जो उल्लेख करण्यात आला आहे, याला उत्तम प्रकारे समजण्यासाठी खाली दिलेल्या काही प्रश्नांवर चिंतन करू या.

१) 'मताअ' म्हणजे काय?

२) याचा दर्जा नैतिक आहे की वैधानिक आहे?

३) वैधानिक असल्यास कोणत्या प्रकारच्या 'तलाकिन स्त्री'साठी आहे?

'मताअ'चा शब्दश: अर्थ

'मताअ'चा शब्दकोशातील अर्थ 'थोडेसे सामान' अथवा 'अशी वस्तु अथवा धनसंपत्ती ज्यापासून अल्पकालीन गरजा पूर्ण होऊ शकतात' असा होतो.

इमाम अजहरींनी म्हटले आहे, ''शब्दकोशामध्ये 'मताअ'चा अर्थ असा आहे की अशी प्रत्येक वस्तू जिच्यापासून लाभ घेता येईल.'' (लिसानुल अरब)

इमाम रागिब म्हणतात, ''एका विशेष काळापर्यंत फायदा घेता येणारी वस्तू.'' (अलमफरदात फी गरीबुल कुरआन माद्दा मताअ)

आणखीन म्हणतात, ''कोणत्याही प्रकारचा लाभ मिळणाऱ्या कोणत्याही वस्तूला 'मताअ' असे म्हणतात.'' (मागील संदर्भानुसार)

इमाम राजी म्हणतात, ''मताअ व 'मता' मुळात अशा वस्तूला म्हणतात ज्यापासून असा लाभ घेणे जो बाकी राहात नसून लवकर संपतो.''

दिव्य कुरआनात 'मताअ' शब्दाचा वापर

दिव्य कुरआनात विविध परिस्थितीनुसार 'मताअ'चा अर्थ बदलत असतो. अर्थात घरात वापरण्यात येणाऱ्या वस्तू, पैगंबराच्या भार्यांकडून घरातील अशा काही वस्तू घेण्याची रीत अशी दाखविण्यात आली की–

''जेव्हा तुम्हाला त्यांना कोणती वस्तू मागायची झाल्यास पड्द्याआडून मागा.'' *(दिव्य कुरआन, ३३ : ५३)*

''अल्लाहने आकाशातून पाण्याचा वर्षाव केला आणि प्रत्येक नदी आणि नाला आपल्या पात्रानुसार ते घेऊन निघाला. मग जेव्हा पूर आला तेव्हा पृष्ठभागावर फेसदेखील आला, आणि असेच फेस त्या धातूवरदेखील येत असतात ज्यांना दागिने व भांडी इत्यादी बनविण्यासाठी लोक वितळवीत असतात.'' *(दिव्य कुरआन, १३ : १७)*

'सूरह यूसुफ'मध्ये एका ठिकाणी हा शब्द 'पेल्या'साठी वापरण्यात आला आहे. (७९) याच सूरहमध्ये 'शिकार करण्याच्या साहित्याकरिता' पण हा शब्द वापरण्यात आला. (१७) 'सूरह मायदा'मध्ये 'समुद्रातील शिकार, मासेमारी' वगैरेकरिता हा शब्दप्रयोग झाला आहे. (९६)

अशा प्रकारच्या लहानसहान वस्तू, साहित्यासहित जीवनाच्या सर्व साधनांनासुद्धा 'मताअ' असे म्हटले गेले आहे, ज्यांचा माणूस नित्य वापर करतो. दिव्य कुरआनात आहे,

''आणि तुम्हाला एका निश्चित काळापर्यंत पृथ्वीवर राहावयाचे आहे आणि तिथेच

निर्वाह करायचा आहे.'' (दिव्य कुरआन, २ : ३६)

संपूर्ण साहित्य, साधनसामग्री, जडजवाहिर आणि विलास साधनपूर्ण असलेल्या या विश्वाला 'मताअ' म्हणण्यात आले आहे.

''ही तर केवळ ऐहिक जीवनाची सामग्री आहे आणि मरणोत्तर जीवन तर तुझ्या पालनकर्त्यापाशी केवळ ईशपरायणांसाठी आहे.''

(दिव्य कुरआन, ४३ : ३५)

येथे परलोकाच्या तुलनेत जागतिक जीवनास 'मताअ' म्हटले गेले व तेही 'अल्प-मताअ' म्हटले गेले.

''हे लोक ऐहिक जीवनात मग्न आहेत. खरे पाहता ऐहिक जीवन परलोकाच्या तुलनेत एका अल्पशा सामुग्रीव्यतिरिक्त काहीच नाही.''

(दिव्य कुरआन, १३ : २६)

''या जगातील जीवन परलोकच्या जीवनाच्या तुलनेत अगदीच थोडे आहे.'' (दिव्य कुरआन, ९ : ३८)

'तलाक'ची 'मताअ'

आता पाहू या की 'तलाक'च्या 'मताअ'चा अर्थ काय? दिव्य कुरआनने 'तलाक'च्या 'मताअ'चा आदेश कोणत्याही निश्चित प्रतिबंधाशिवाय दिला आहे. त्यातून हे स्पष्ट होत नाही की 'मताअ'चा नेमका अर्थ काय आहे. 'तलाक'साठी 'मेहेर' जरूरी जरी ठरविण्यात आले तरी तलाकच्या वेळी कोणतीही छोटी-मोठी वस्तू स्त्रीला दिल्याने ही मागणी पूर्ण होते.

अरबी शब्दकोशाच्या विद्वानांनी, ज्यांनी विशेषकरून कुरआन व हदीसच्या शब्दांवर संशोधन केले आहे, 'तलाक'च्या 'मताअ'चा अर्थ असा घेतला नाही की तलाकीत स्त्रीला आजीवन नफ्का (पोटगी) देण्यात यावा अथवा विशेष मुदतीपर्यंत तिची आर्थिक जबाबदारी उचलण्यात यावी. त्यांच्यानुसार याचा अर्थ केवळ एवढाच आहे की 'स्त्रीच्या सांत्वनाकरिता काही तरी द्यावे.'

इमाम रागिब हे दिव्य कुरआनच्या शब्दार्थांचे अतिमहान व प्रगल्भ विद्वान आहेत. ते तलाकच्या मताअ बाबतीत सांगतात,

''पती आपल्या तलाक दिलेल्या पत्नीस इद्दतीच्या काळात जे काही वापरण्याकरिता देतो ते 'मताअ' किंवा 'मता' आहे.'' (सूरह राअद : २६)

(अल मुफर्रदात फी गरीबुल कुरआन माद्दा 'मताअ')

जणू काही ते इद्दतच्या काळातील 'नफ्क्या'लाच 'मताअ' ठरवितात आणि याव्यतिरिक्त 'मताअ'ला कायदेशीर स्वरुपही दिले नाही. (या प्रश्नाबाबत विद्वानांची मते पुढील प्रकरणात सविस्तर येत आहेत.)

हदीसच्या शब्दार्थाचे महान पंडित 'इब्ने कसीर' यांनी अशा शब्दांत वर्णन केले आहे,

''तलाक देणाऱ्याकरिता हे उत्तम आहे की त्याने आपल्या पत्नीस तलाक देतेवेळी एखादी वस्तू अर्पण करावी.'' (अल नहाया फी गरीबुल हदीस : ४/७६ मताअ)

सुयूती यांनी हदीसच्या शब्दकोशावरील इब्ने कसीर यांच्या ग्रंथावर भाष्य केले आहे. यात ते सांगतात,

''तलाकची 'मताअ' ही आहे की स्त्रीला एखादी वस्तू (भेट म्हणून) देण्यात यावी जेणेकरून तिच्या दुखावलेल्या मनास (थोडीशी) शांती मिळेल.''

दिव्य कुरआनने तलाकित स्त्रीच्या 'मताअ'चा उल्लेख ज्या संदर्भात केला आहे, याचासुद्धा अर्थ हाच अभिप्रेत आहे. त्याने (दिव्य कुरआनने) म्हटले आहे की,

''तुम्हावर काही गुन्हा नाही की तुमच्या पत्नींना तुम्ही तलाक द्यावा या वेळेपूर्वी की त्यांना स्पर्श करण्याची घटका येईल अथवा महर ठरविला असेल. अशा स्थितीत त्यांना काही ना काही अवश्य दिले पाहिजे. सुखवस्तु व्यक्तीने आपल्या ऐपतीप्रमाणे व गरीबाने आपल्या कुवतीप्रमाणे परिचित पद्धतीनुसार द्यावे. हा हक्क आहे सदाचारी लोकांवर. आणि जर तुम्ही स्पर्श करण्यापूर्वी तलाक दिला असेल परंतु महर ठरविण्यात आला असेल, तर अशा स्थितीत महरचा अर्धा भाग द्यावा लागेल.'' *(दिव्य कुरआन, २ : २३६-२३७)*

जर 'मेहेर'चा अर्थ आजीवन पोटगीसारखा काढता येत नसला तर 'मताअ'चा अर्थ असा का बरे लावला जाऊ शकत नाही की तलाकीत स्त्रीला आजीवन पोटगी देण्यात यावी?

'मताअ' म्हणजे 'नफ्का' नव्हे!

तसे पाहिल्यास 'मताअ' शब्दाचा अर्थ आजीवन पोटगी होत नाही. याची दोन कारणे आहेत.

१) दिव्य कुरआनने स्पष्ट केले की तलाकनंतर इद्दतपर्यंत स्त्रीचा नफ्का आणि 'सकना' पुरुषावर अनिवार्य आहे. यानंतर तो जबाबदारीतून मुक्त होतो. यानंतरही पुरुषावर नफ्क्याला तलाकीत स्त्रीच्या दुसऱ्या विवाहापर्यंत किंवा आजीवन लादणे म्हणजे दिव्य कुरआनाच्या शिकवणीत वाढ करणे होय आणि हे कदापि शक्य नाही. ज्या जबाबदारीतून स्वयं अल्लाहने कितीतरी लाभदायक कारणास्तव पुरुषाला मुक्ती दिली त्याच जबाबदाऱ्या परत त्याच्यावर लादण्यात याव्यात म्हणजे ईशइच्छांची पायमल्ली होणार.

२) यापूर्वी आपण सविस्तर चर्चा केली आहे की 'निकाह'नंतर स्त्रीच्या नान-नफ्क्याची जबाबदारी पुरुषावर याकरिता देण्यात आली की तो परिवाराच्या निर्मितीसाठी आपला अमूल्य वेळ पणाला लावतो. 'तलाक' झाल्यावर जेव्हा स्त्री मुक्त होते आणि तिच्या जीवनावर पुरुषाचा कोणताच अधिकार नसतो. अशा परिस्थितीत त्याच्यावर पोटगी कोणत्या आधारावर लादण्यात येऊ शकते?

'सहाबा' आणि 'ताबेईन'चे मत

आता या विषयावर आपण सहाबा (पैगंबरसोबती) आणि ताबेईन (पैगंबरसोबत्यांचे सोबती) यांची मते आणि कार्य पाहू या.

माननीय अब्दुल्लाह बिन अब्बास (रजि.) सांगतात की तलाकीत स्त्रीच्या 'मताअ'चा सर्वोच्च दर्जा हा आहे की तिला एक 'सेवक' अथवा 'नोकर' भेट द्यावा. याहून कमी दर्जा हा की एक पोषाख (ज्यामध्ये तीन कपडे असावेत) देण्यात यावे. आणि शेवटचा दर्जा हा आहे की थोडीशी चांदी अथवा रोकड देण्यात यावी. माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) सांगतात की याचे प्रमाण कमीतकमी तीस दिरहम असावयास पाहिजे.

ताबेईनपैकी 'काझी शरीह' यांनी 'मताअ'चे प्रमाण 'पाच हजार दिरहम' एवढे सांगितले आहे. 'इमाम शैबी' यांनी 'मताअ'चे प्रमाण घरातला संपूर्ण पोषाख, रजई आणि 'ज़लबाब' (चादर) एवढे म्हटले आहे. माननीय हसन बसरी यांनी म्हटले आहे की 'मताअ'चे प्रमाण निश्चित नाही. माणसाने त्याच्या ऐपतीप्रमाणे द्यावे. अता बिन रिबाह यांनीसुद्धा असेच म्हटले आहे.

अशी उदाहरणेसुद्धा मिळतात की काहींनी तलाकीत स्त्रीच्या सांत्वनासाठी मोठी रक्कम 'मताअ'च्या स्वरुपात दिली.

माननीय अब्दुल्लाह बिन औफ (रजि.) यांनी आपल्या पत्नीस (अर्थात तमाजिर (रजि.) यांना तलाक दिला तेव्हा 'मताअ'च्या स्वरुपात (एक महागडी) काळी (आफ्रिकन वंशाची) दासी दिली.

माननीय हसन (रजि.) यांच्या बाबतीत येते की यांनी जेव्हा त्यांच्या पत्नीस तलाक दिला, तेव्हा त्यांनी 'मताअ'च्या स्वरुपात दहा हजार दिरहम दिले.

(संदर्भ इब्ने जरीर, तफसीर २/२०४, २०५, इब्ने कसीर, तफसीर : २८८, इब्ने हजम, अलमहली १०/२४८)

अशा प्रकारची कितीतरी उदाहरणे मिळतील. यांचा दर्जा उत्तम वर्तन आणि एक प्रकारच्या उपकाराचा आहे. म्हणून यास कायद्याचे स्वरुप देता येत नाही.

इस्लामी विधीतज्ज्ञांचा दृष्टिकोन

विधीतज्ज्ञांनी परिस्थितीनुरुप 'मताअ'चे प्रमाण निश्चित करण्याचे प्रयत्न केले आहेत. यात कमतरता आणि वाढ प्रत्येक काळानुरूप आणि परिस्थितीनुरूप होऊ शकते. कुरआन व हदीसमध्ये ज्याप्रमाणे 'मेहेर' व 'नफक्या'ची मर्यादा निश्चित नाही, त्याचप्रमाणे 'मताअ'ची मर्यादा निश्चित नाही. यास प्रत्येक काळातील परिस्थितीवर अवलंबून ठेवण्यात आले आहे. या बाबतीत सहाबा व ताबेईनच्या दरम्यान जे मतभेद झाले त्या बाबतीत 'इमाम अबू बकर जस्सास' म्हणतात,

'मताअ'चे जे प्रमाण वर्णन केले गेले आहे ते सर्वच्या सर्वच सुरुवातीच्या काळातील विद्वानांनी साकल्याने दिलेले मत आहे. यापैकी कोणीही एक दुसऱ्यांच्या मतांशी मतभेद केले नाही. यामुळे हे सिद्ध होते की सर्वच्या सर्वच मते साकल्याने व्यक्त केलेले आहे.

काही विद्वानांच्या मतांनुसार 'मताअ'च्या प्रमाणांची निश्चिती स्त्रीच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर अवलंबून नसेल तर केवळ पुरुषांची आर्थिक ऐपत व पात्रता यावर अवलंबून असेल. याकरिता दिव्य कुरआनने सांगितले आहे,

''सुखवस्तु व्यक्तीने आपल्या ऐपतीप्रमाणे व गरीबाने आपल्या कुवतीप्रमाणे परिचित पद्धतीनुसार द्यावे.'' *(दिव्य कुरआन,* २ : २३६)

परंतु सत्यता अशी आहे की यामध्ये स्त्री आणि पुरुष दोघांची पात्रता लेखण्यात येईल. 'इमाम जस्सास' म्हणतात की 'मताअ'च्या निश्चिततेमध्ये 'मआरुफ'च्या अनुकरणाचा आदेश देण्यात आला आहे. ही गोष्ट मुळात 'मआरुफ'च्या विरुद्ध आहे की यामध्ये स्त्रीच्या सामाजिक व आर्थिक ऐपतीचा विचार केला जाऊ नये आणि एका प्रतिष्ठित परिवाराच्या स्त्रीलासुद्धा गरीब स्त्रीप्रमाणेच 'मताअ' देण्यात यावी.

या संपूर्ण चर्चेअंती ही गोष्ट सिद्ध होते की 'मताअ' केवळ 'साधन वा सामान सुमानास' म्हटले जाते. जे तलाकच्या वेळी पात्रतेनुरूप व परिस्थितीनुरूप स्त्रीच्या सांत्वनाकरिता देण्यात येते. याचे प्रमाण वाढवून पूर्ण जीवनभराचा 'नफ्का' ठरवितो. या शब्दाप्रती एवढा उघड अन्याय आहे की कोणत्याही सुबुद्ध व विवेकशील माणसांकडून याची अपेक्षा करता येणार नाही.

'मताअ'चा दर्जा नैतिक आहे की वैधानिक?

आता प्रश्न असा आहे की 'मताअ'चा दर्जा हा नैतिक आहे अथवा वैधानिक आहे?

या प्रश्नावर 'इमाम मालिक' यांचा दृष्टिकोन असा आहे की ज्या स्त्रीला तलाक देण्यात आला असल्यास तिला 'मताअ' देणे हे स्पृहणीय व प्रशंसनीय आणि पसंत करण्याजोगे कृत्य आहे. परंतु अनिवार्य नाही. त्याच्या मताच्या पुष्टी करणासाठी दिव्य कुरआनतचे शब्द आहेत जे आयतीच्या शेवटी येतात. याच्या पूर्वी पहिल्या आयत क्र. २३६ मध्ये 'मताअ'ला (सदाचारीतांचा अधिकार) म्हटले आहे. जी बाब ईशपरायणता आणि उपकाराचे लक्षण आहे ते आपणा सर्वांवर अनिवार्य समजता येणार नाही. (अहमदुल दरदीर, अल शर्रुल सगीर : २/२१७-२१८)

ताबेईनपैकी 'काझी शरीह' यांचे हेच मत आहे. कथनावरून लक्षात येते की एका व्यक्तीने आपल्या पत्नीस जिच्याबरोबर समागम झाले होते, 'तलाक' दिली. काझी शरीहच्या न्यायालयात या स्त्रीने 'मताअ'चा दावा दाखल केला. त्यावर त्यांनी तिच्या पतीस सांगितले,

''सदाचारींच्या समूहात सामील व्हा व ईशपरायणाच्या समूहात सामील व्हा!'' आणि त्यास 'मताअ' देण्यास बळजबरी केली नाही.''

(बगवी, मआलमिल तन्झील अलल हामशल खाजिन : १/२०४)

'इमाम मालिक' यांच्यानुसार समागम न झालेल्या स्त्रीला तलाक झाल्यास

व तिचा मेहेर निश्चित झालेला असल्यास तिला निम्मा 'मेहेर' मिळेल व तिच्यासाठी 'मताअ' मिळणार नाही.

इमाम मालिक यांचे हेसुद्धा मत आहे की 'मताअ' अनिवार्य आहे. परंतु प्रसिद्ध मत तेच आहे जे वर उल्लेखिले आहे. (अल शरहुल सगीर २/६१७)

विधिज्ञांच्या मोठ्या संख्येने 'तलाकित स्त्री'करिता 'मताअ' अनिवार्य ठरविले आहे. त्यांनी याचा पुरावा असा दिला की दिव्य कुरआनने यासाठी 'आदेश' असा शब्द वापरला आहे तो असा, ''त्यांना 'मताअ' द्या. जोपर्यंत त्यांच्याजवळ मजबूत साधन नसते.'' (हा शब्द आदेश देण्याच्या अर्थात असल्याने अनिवार्यता त्यात आलीच.)

दिव्य कुरआनने सांगितले आहे की (तलाकीत स्त्रियांकरिता 'मताअ' आहे) यामुळेसुद्धा अनिवार्यता सिद्ध होते. (तलाकीत स्त्रियांसाठी) हा शब्द असे दर्शवितो की 'मताअ' यांचीच मिळकत असेल आणि ती याची मागणी करू शकते.

(ईशपरायणीतांवर अधिकार आहे) चे शब्दसुद्धा अनिवार्यता सिद्ध करतात. याचा अर्थ असा आहे की 'मताअ' ईशपरायण जणांसाठी अनिवार्य आहे. याचीच ताकीद म्हणून दिव्य कुरआनात सांगितले, ''मुहसिनीनवर अधिकार आहे.''

मग याचा अर्थ असा निघतो की हे केवळ ईशपरायणांवर आणि 'मुहसिनीन'वर अनिवार्य आहे? व इतर लोकांवर अनिवार्य नाही? याच्या उत्तरादाखल 'अबू बकर जस्सास' यांनी दिव्य कुरआनातील उदाहरणावरून असे सिद्ध केले की 'केवळ ईशपरायण आणि मुहसिनीनवरच हे अनिवार्य आहे,' असा याचा अर्थ होत नसून या शब्दप्रयोगामुळे या आदेशाची तीव्रता जाणवते की या आदेशाचे पालन करून त्यांनी सदाचारी लोकांच्या समूहात सामील व्हावे.

(जसास, एहकामुल कुरआन, ५०८-५०९)

प्रत्येक तलाकीत स्त्रीकरिता 'मताअ' अनिवार्य आहे काय?

आता प्रश्न असा आहे की 'मताअ' अनिवार्य असल्यास प्रत्येक तलाकीत स्त्रीला 'मताअ' देणे आवश्यक आहे अथवा यापैकी काहींनाच देणे अनिवार्य आहे. आणि काहींना देणे अनिवार्य नाही?

या विषयात हनफी पंथीयांचे मत असे आहे की 'मताअ' अशा तलाकीत स्त्रीसाठी अनिवार्य आहे जिचा मेहेर निश्चित झालेला नाही आणि जिला समागमापूर्वी 'तलाक' देण्यात आला आहे. कारण दिव्य कुरआनने अशा स्त्रीलाच 'मताअ' देण्याचा आदेश दिला आहे. (सूरह बकरा : २३६) इतर तलाकीत स्त्रियांना मेहेर आणि नफ्का मिळतो. म्हणून यांना 'मताअ' देणे जरूरी नाही. मात्र पसंत करण्यासारखे कृत्य आहे.

(रद्दुल मुख्तार अलल दुरुल मुख्तार, २/४६१-४६२)

इमाम अहमद हेसुद्धा याच पंथाच्या विचारसरणीवर सहमत आहेत.

(इब्ने कदमा, अल मुगनी, ६/७१५)

''इमाम शाफई यांनी सांगितले की 'मताअ' सर्वच 'तलाकीत' स्त्रियांना देणे आवश्यक आहे, केवळ ती 'तलाकीत' स्त्री सोडून जिचे 'मेहेर' निश्चित झालेले आहे आणि तिला समागमापूर्वीच 'तलाक' दिलेला आहे. दिव्य कुरआनने स्पष्ट केले आहे की तिला निम्मा मेहेर मिळेल.''

(सूरह बकरा : २३७, हिदायतुल मुजताहिद, २/१०५-१०६)

सहाबां (रजि.) पैकी आदरणीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांचे हेच मत आहे. (बगवी मआलेमुल तन्जील अली हाशिमुल खाजिन, १/२०४)

माननीय सईद बिन जुबैर (रजि.) अबुल आलिया, हसन बसरी वगैरेचे मत असे आहे की प्रत्येक तलाकीत स्त्रीला 'मताअ' देणे जरूरी आहे. कारण (तलाकीत स्त्रियांना 'मआरुफ' रीतीने म्हणजे इतरांना योग्य वाटेल एवढी 'मताअ' देण्यात यावी.) हा एक सामान्य नियम आहे. यास एका विशिष्ट प्रकारच्या 'तलाकीत स्त्री'लाच मिळावे, असे काहीही नाही. हा विचारसुद्धा चुकीचा आहे की केवळ अशाच तलाकीत स्त्रियांना 'मताअ' मिळेल ज्यांचे 'मेहेर' निश्चित झालेले नाही. कारण पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या भार्यांचा 'मेहेर' निश्चित असताना आणि समागम होऊनसुद्धा 'तलाक'च्या परिस्थितीत त्यांना 'मताअ' देण्याचा आदेश अल्लाहने दिव्य कुरआनात सांगितला,

''हे पैगंबर! तुम्ही आपल्या पत्नींना सांगा की तुम्ही हे भौतिक जग आणि त्यांचे ऐश्वर्य इच्छित असाल तर या! मी तुम्हाला काही देऊन चांगल्या पद्धतीने निरोप देतो.'' *(दिव्य कुरआन, ३३ : २८)*

हे मत माननीय अली (रजि.), इमाम जहरी, इमाम इब्राहीम नखई , अता बिन अबी रिबाह आणि सुफियान सूरी यांनीसुद्धा कथित केले आहे.

(इब्ने हजम, अल महली, २४७)

अहले जाहिर (अर्थात जाहिरी पंथीय) यांचेसुद्धा हेच मत आहे. इब्ने हजम जाहिरी यांनी सांगितले आहे की प्रत्येक प्रकारच्या 'तलाकीत स्त्री'ला 'मताअ' देणे. अनिवार्य आहे. मग ती 'रजई तलाकीत' असो अथवा 'बाइनी तलाकीत' असो, समागम झालेली असो अथवा नसो, तसेच 'मेहेर' निश्चित झालेली असो अथवा नसो. कारण एक सर्वसामान्य आदेश आहे व याला विशिष्ट प्रकारच्या 'तलाकीत स्त्रियांशी' संबंधित करणे योग्य नाही. (मागील संदर्भ : २४५)

ही सर्व मते आणि विचार एकसारखे व समकालीन आहेत. तपशीलवार वर्णनामध्ये थोडेफार मतभेद येऊ शकतात. जे लोक 'तलाकीत स्त्री'साठी 'मताअ' जरूरी ठरवू इच्छितात अशा वेळेस हे शक्य आहे की त्या मतास ते इतर मतांच्या तुलनेत प्राधान्य देऊ इच्छितात. परंतु यामध्ये एक दोन अनिष्टता खूप स्पष्ट आहेत. प्रथम हे की ज्या स्त्रीला समागमापूर्वीच तलाक देण्यात आला, जर तिचा मेहेर निश्चित असल्यास तिला निम्मा 'मेहेर' आणि 'मताअ' दोन्ही मिळतील व 'मेहेर' निश्चित नसल्यास तिला केवळ 'मताअ' मिळेल. हा एक प्रकारचा अन्याय वाटतो.

दुसरे हे की 'मताअ' प्रत्येक तलाकीत स्त्रीला देणे जरूरी ठरविणे म्हणजे असे की 'मताअ'सुद्धा 'मेहेर' आणि 'नफक्या'प्रमाणेच याचा एक जरूरी अधिकार आहे आणि कायद्यानुसार ती याची मागणी करू शकते. यात शंका नाही की 'जाहिर पंथी' आणि इतर विद्वानांच्या मतानुसार (वरील वर्णनाप्रमाणे) 'मताअ'चे हेच स्वरूप आहे. दिव्य कुरआनचे प्रसिद्ध विश्लेषक 'इब्ने जरीर तिबरी' यावर सहमत आहेत. त्यांच्यानुसार प्रत्येक तलाकीत स्त्रीकरिता 'मेहेर'प्रमाणेच 'मताअ'सुद्धा अनिवार्य आहे आणि पतीने तलाकीत पत्नीस ते दिलेच पाहिजे. त्याने 'मताअ' न दिल्यास 'मेहेर' आणि इतर कर्जाप्रमाणेच या पातकास्तव तो कायदेशीररित्या अपराधी ठरेल.

एक प्रकारे हे मत अशक्त वाटते, कारण इस्लामी न्यायसंस्थेने कधीच अशा प्रकारचा निर्णय दिला नाही. 'इमाम शैबी' यांनी सांगितले आहे,

''ईश्वराची शपथ! हे मी कधी पाहिले नाही की 'मताअ' न देण्याच्या

कारणास्तव कुणालाही कैद करण्यात आले असेल. अल्लाहची शपथ! जर हे अनिवार्य असते तर 'मताअ' न देण्यावर न्यायधीश कैदेची शिक्षा अवश्य देत.''

वरील पानांत 'मताअ'चा अर्थ आणि त्याचा वैधानिक दर्जा यावर सविस्तर चर्चा केली आणि या विषयात विविध कायदे पंडितांची मत मतांतरे सादर केली. यामुळे ही गोष्ट स्पष्टपणे समोर येते की तलाकनंतर स्त्रीची आर्थिक जबाबदारी पुरुषाने पूर्ण करण्याचा पुरावा कुरआन व हदीसमध्येही मिळत नाही आणि सुरुवात ते आतापर्यंतच्या इस्लामी विधीतज्ञांच्या मतांनुसारसुद्धा ही बाब सिद्ध होत नाही. ही एक अशी निराधार आणि मार्गभ्रष्ट विचारसरणी आहे की ज्यावर कोणीच सहमत होऊ शकत नाही.

तलाकीत स्त्रीचा आर्थिक प्रश्न

शेवटी आपण या प्रश्नांवर चर्चा करू या की तलाक झाल्यानंतर ही स्त्री कोठे जाईल. तिची आर्थिक जबाबदारी कोण उचलणार? हा प्रश्न अशा प्रकारे उचलून धरण्यात येतो की तलाक होताच जणू काही ती अशा नाजुक परिस्थितीतून जाते की यांचे काही न काही समाधान करणे आवश्यक झाले आहे. मग हा प्रश्न तडीस लावण्याकरिता तऱ्हेतऱ्हेच्या शक्कली लढविण्यात येतात. कुरआनात आपल्या विचारांचे समर्थन करणारे निमित्त शोधत असतात. तसे पाहिल्यास निकाह आणि तलाकचा प्रश्न काही नवीन नसून तब्बल चौदाशे वर्षांपासून ही व्यवस्था प्रस्थापित आहे. यापूर्वीही कितीतरी तलाक झालेले आहे. तरूण स्त्रिया आणि वृद्ध स्त्रियांचे तलाक झालेले आहेत. त्याच्या जीवनांमध्येसुद्धा प्रश्न निर्माण झालेत. बुद्धीसमंत ही बाब आहे की कमीतकमी हे माहिती करून घेण्याचे प्रयत्न करावयास हवे होते की इस्लामने हा बिकट प्रश्न सोडविला अथवा नाही. किंवा हा विचार तर करावयास हवा की ज्या ठिकाणी इस्लामने जीवनाचे एवढे मोठमोठे प्रश्न सोडविले आहेत आणि कठीण मार्गामध्ये मानवाचे मार्गदर्शन केले आहे. तेव्हा या एकुलत्या एक समस्येचे समाधान अवश्य केले असावे. परंतु या बाबीकडे हेतूपुरस्पर कानाडोळा करून उलट कांगावा करायचा की इस्लामने या प्रश्नावर कोणताच तोडगा न काढता तलाकीत स्त्रीला अगदी वाऱ्यावर सोडले आणि मुस्लिम विद्वानांनी या प्रश्नावर विचार करण्याची आजपर्यंत तसदी घेतली नाही. अशा प्रकारे विचार करणे म्हणजे अज्ञान व जाणूनबुजून आंधळ्याचे सोंग घेण्याचे एक उत्तम उदाहरण म्हणता येईल.

इस्लाममध्ये तलाक झाल्यावर स्त्रीचे पतीशी संबंध संपुष्टात येतात. म्हणून तिच्या आर्थिक जबाबदारीचासुद्धा पतीशी कवडीचाही संबंध राहात नाही. परंतु हा

बिकट प्रश्न इस्लामने मोठ्य कौशल्याने सोडविला आहे. तो अशा प्रकारे...

१) हा एका निराधार व बिनबुडाचा विचार आहे की तलाकीत स्त्रीला तिच्या माजी पतीकडून पोटगी न मिळाल्यास तिच्या उदरनिर्वाहाचे साधन शिल्लक राहणार नाही आणि उपाशीतपाशी वणवण फिरण्याची तिच्यावर पाळी येईल. परंतु या विचारसरणीमागे स्त्रीच्या सहानुभूतीपेक्षा जास्त काही प्रेरणा असल्याचे जाणवते. परंतु ते याचा विचार जाणूनबुजून करीत नाहीत की इस्लामी कायद्यानुसार स्त्रीजवळ विविध प्रकारे धन आलेलेच असते. ही वस्तुस्थिती आहे व सर्वज्ञात आहे. तिच्या वारशात आलेले धन, 'मेहेर' वगैरे आणि भेटवस्तूच्या माध्यमाने मिळालेली संपत्ती तिच्याजवळ असतेच. म्हणून ही संभावना नाकारण्यासारखी नाही की या माध्यमातून प्राप्त झालेली संपत्ती तिच्या उदरनिर्वाहासाठी पुरेशी आहे.

२) मी यापूर्वीसुद्धा स्पष्ट केले आहे की स्त्रीला अर्थार्जनाचे प्रयत्न करण्याकरिता विवश करण्यात तर आले नाही. परंतु यातसुद्धा काही गैर नाही की स्त्रीचे अर्थार्जनाचे काही साधन असावे. ती नोकरी करू शकते, व्यापार व कृषी-व्यवसाय करु शकते. उद्योगनिर्मितीमध्ये भाग घेऊ शकते. अर्थात इस्लामी मर्यादित राहून अर्थार्जनाचा तिला पूर्ण अधिकार आहे. या प्रयत्नात जर ती यशस्वी झाली तर ती स्वत:ची आर्थिक जबाबदारी सहजरित्या पेलवू शकते. नव्हे! दुसऱ्यांना सहकार्य पण करू शकते.

३) इस्लामने मानवाकरिता वैवाहिक जीवनास खूप आवश्यक ठरविले आहे. त्याने संपूर्ण समाजाला अवाहन केले की वैवाहिक जीवन यशस्वीपणे जगण्यासाठी प्रत्येकाने सहकार्य करावे. दिव्य कुरआनने हा आदेश अशा प्रकारे दिला,

''तुमच्यापैकी जे अविवाहित आहेत, तुमच्या दास आणि दास्यांपैकी जे सद्वर्तनी आहेत त्यांचे 'निकाह' करा.'' *(दिव्य कुरआन, २४ : ३२)*

या आयतीमध्ये 'अयामी'चा शब्दप्रयोग झाला आहे, जे 'अय्यम'चे अनेकवचन आहे. हा शब्द अविवाहित स्त्री आणि पुरुष दोन्हीकरिता वापरण्यात येतो. यामध्ये त्या स्त्रियांचासुद्धा समावेश आहे ज्यांचे अजूनही लग्न झालेले नाही आणि त्या स्त्रियांचासुद्धा समावेश आहे ज्या विधवा झालेल्या आहेत अथवा तलाक झालेल्या आहेत. त्यांचे वैवाहिक जीवन संपुष्टात आलेले आहे. हे सुद्धा खरे आहे की विविध कारणास्तव वर्तमान काळात विधवा आणि तलाकीत स्त्रिया मध्ये पुनर्विवाहाची मानसिकता मुस्लिमांमध्ये कमी होत आहे.

परंतु इस्लाम ही मानसिकता वाढवितो आणि खरोखरच वाढायला पाहिजे.

इस्लामची शिकवण ही आहे की जर एखाद्या दांपत्यामध्ये मानसिक समानता नसल्यामुळे ते विभक्त झाल्यास अथवा त्या दोघांपैकी एकाचा मृत्यू होऊन त्यांचे वैवाहिक जीवन संपुष्टात आल्यास तात्काळ त्यांचा 'निकाह' व्हावयास पाहिजे. कारण अविवाहित जीवन जगणे हे असंख्य अनैतिक अनिष्टता निर्माण करते. मग जर ही शिकवण अंमलात आणली तर तलाकीत आणि विधवा स्त्रीचा आर्थिक प्रश्न आपोआप सुटतो. कारण यानंतर तिची आर्थिक जबाबदारी वैधानिकरित्या तिच्या पतीवर असते. इतिहास साक्ष देतो की जोपर्यंत यावर अंमलबजावणी होत होती तोपर्यंत विधवा आणि तलाकीत स्त्रीच्या अर्थार्जनाचा कधी प्रश्नच उभा राहिला नाही. या प्रश्नावर केवळ एकमेव सर्वोत्तम हाच उपाय आहे आणि ही बाब सार्वजनिकरित्या अंमलात आणावयास हवी.

४) तलाकीत स्त्री (आणि त्याचप्रमाणे विधवा) जवळ पुरेसे आर्थिक साधन नसल्यास आणि दुसरा विवाहसुद्धा झाला नसल्यास इस्लामने तिची जबाबदारी परिवारावर टाकलेली आहे.

या बाबतीत एक तात्त्विक बाब आपल्या दृष्टीसमोर असावी की इस्लामी कायद्याच्या दृष्टिकोनानुसार स्त्री कधीच एवढी विवश नसते की तिला तिच्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता करण्याकरिता धावपळ करण्याची तिच्यावर 'वेळ' यावी. इस्लामी विधीत म्हटले गेले आहे की केवळ स्त्री असणेच एक विवशता व दुर्बलता आहे. (रद्दुल मुख़्तार अलल दुरुल मुख़्तार, २/९२५)

तिने स्वत: ची आर्थिक जबाबदारी पेलण्याची शक्ती तिच्यात नसते आणि म्हणूनच तिची आर्थिक जबाबदारी तिच्यावर न टाकता दुसऱ्यांवर टाकण्यात आली आहे. पतीने प्रत्येक परिस्थितीत तिची जबाबदारी पूर्ण करावी. 'तलाक' झाल्यावर ती स्वावलंबी नसल्यास आणि तिची मुले कमावती असल्यास त्यांच्यावर तिच्या नफ्क्याची अर्थात उदरनिर्वाहाची जबाबदारी असते. येथे एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते की विधीतज्ञांनी लिहिले की माता-पित्याच्या नफ्क्यामध्ये त्या सर्व सवलतींचा समावेश आहे ज्या पत्नीच्या नफ्क्यामध्ये मोडतात.

पत्नीच्या नफ्क्यात ज्या बाबींचा समावेश आहे, त्या सर्व बाबी माता-पित्यांच्या नफ्क्यात मुलावर अनिवार्य आहेत. अर्थात अन्नपाणी, वस्त्र, निवास आणि नोकर-चाकरसुद्धा यात मोडतात.

(रद्दुल मुख्तार अलल दुर्रुल मुख्तार, २/९३३)

'तलाक'नंतर तिचा दुसरा 'निकाह' न झाल्यास तिच्या मुलांनी तिची जबाबदारी न उचलल्यास तर तिच्या पित्यावर ही जबाबदारी अशी असते जशी तिच्या लग्नापूर्वी तिची त्याच्यावर जबाबदारी होती. हनफी विधीचे प्रसिद्ध ग्रंथ-

विश्लेषक, 'इब्नुल हमाम' यांनी लिहिले आहे,

पित्यावर मुलींचा नफ्का त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास त्यांच्या निकाहपर्यंत आवश्यक आहे. तो त्यांना कामावर अथवा सेवेत ठेवू शकत नाही. मग त्या मुलींमध्ये कामाची पात्रता का असेना. तिला तलाक झाल्यावर आणि इद्दत पूर्ण झाल्यावर तिचा 'नफ्का' परत पित्यावर अनिवार्य होईल.

(फतहुल कदीर, ३/३४४)

'खुलअ'चे स्वरुप

काही जणांना वाटते की ज्याप्रमाणे पुरुषाला 'तलाक' देण्याचा अधिकार आहे, त्याचप्रमाणे अशाच प्रकारचा अधिकार स्त्रीलासुद्धा मिळायला पाहिजे! पुरुषाशी विभक्त होण्याची तिला इच्छा असल्यास तिच्या मार्गात कोणताच अडसर नसावा आणि तिला वाटेल तेव्हा पुरुषाशी विभक्त होण्याची सूट मिळावी. त्यांच्या मते इस्लामने याबाबतीत कोणताच अन्याय केलेला नाही. जेथे पुरुषाला 'तलाक' देण्याचा अधिकार आहे, त्याचप्रमाणे असाच अधिकार 'खुलअ'च्या स्वरुपात स्त्रीला पण दिला आहे. त्यांना वाटते की स्त्री जर पतीला 'मेहेर' परत करून आपल्या घरी बसली की समजा 'खुलअ' (पत्नीकडून घेण्यात आलेला घटस्फोट) झाला. जणू काही 'खुलअ' म्हणजे स्त्रीकडून वैवाहिक संबंध संपुष्टात आणण्याची घोषणाच आहे. मग पती मान्य करो अथवा न करो. हे 'खुलअ'च्या स्वरुपाचे खरे ज्ञान नसल्याचा पुरावा आहे. येथे मी 'खुलअ'चा वैधानिक दर्जा व वैधानिक स्वरुप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करणार.

(खुलअचे नियम आणि प्रश्नांच्या सविस्तर वर्णनाकरिता लेखकाचा एक लेख 'खुलअ' व त्याचे नियम या शीर्षकाखाली त्रैमासिक 'तहकीकात-ए-इस्लामी (उर्दू) अलीगढ - ४ दिनांक १२ एप्रिल ते जून १९९५ वाचावा.)

'खुलअ' स्त्रीचा अधिकार आहे

शरीयतच्या दृष्टिकोनानुसार 'निकाह'च्या माध्यमाने स्त्री ही पुरुषाच्या वैवाहिक मिळकतीत येते आणि या मिळकतीस पुरुषच संपुष्टात आणू शकतो. स्त्री नव्हे 'खुलअ'चा अर्थ केवळ एवढा आहे की स्त्रीकडून काही संपत्ती घेऊन अरबीच्या प्रसिद्ध शब्दकोश 'कामोस'मध्ये याची व्याख्या या शब्दात केली आहे,

''मोबदला घेऊन वैवाहिक मिळकत संपुष्टात आणणे मग हा मोबदला स्त्री ही देऊ शकते अथवा तिच्या तर्फे इतर कोणीही देऊ शकतो.''

(फेरोजाबादी, अलकामोसिल मुहीत : मादा खुलअ)

आता विधीतज्ञांच्या विश्लेषणाचा आढावा घेऊ या. थोर विद्वान 'अकमलुद्दीन बाबरती' यांनी याची शब्दश: व्याख्या केल्यानंतर शरीयतनुसार व्याख्या अशा शब्दांत केली,

''शरीयतमध्ये 'खुलअ'चा अर्थ असा आहे की निकाहच्या मिळकत हक्काच्या मोबदल्यात स्त्रीकडून काही संपत्ती 'खुलअ'चा शब्दप्रयोग करून घेणे होय.''

(अलगाया अललहिदाया, फतहुल कदीर, ३/१९९)

'काही मोबदला घेऊन निकाहच्या मिळकतीचा हक्क 'खुलअ' शब्दप्रयोग करून संपुष्टात आणणे होय.' (फतहुल कदीर : ३/१९९) या व्याख्येवर असा आक्षेप घेण्यात आला आहे की 'मोबदला' हा शब्द यामध्ये योग्य नाही. कारण 'मोबदला' या शब्दाचा उल्लेख न करतानासुद्धा पुरुषाने जर स्त्रीला सांगितले की ''मी तुझ्याशी 'खुलअ' केला'' आणि स्त्रीने जर मान्य केले तर खुलअ होईल. मात्र जर मेहेरला बदल अथवा मोबदला म्हटल्यास की जे खुलअमुळे त्याचा दर्जा संपतो, तर ही दुसरी गोष्ट आहे. (रद्दुल मुख्तार फी दुर्रुल मुख्तार, २/७६७-७६८)

परंतु 'शरेह विकाया' या ग्रंथात याचा अर्थ 'मोबदला'च घेण्यात आला आहे. (वेल्जमा बदला, २/१२३) म्हणजे स्त्रीवर 'खुलअ'चा मोबदला बंधनकारक आहे. (मग हा मोबदला 'मेहेर' असो वा त्यापेक्षा कमी अथवा अधिक काही इतर असो) ही एक विधिवत चर्चा आहे. यामुळे या प्रश्नावर कोणताही फरक पड्त नाही की 'खुलअ'च्या माध्यमाने स्त्री आपोआप 'निकाह'च्या बंधनातून मुक्त होत नाही.)

'खुलअ' या शब्दाचा वापर करण्याबाबत असे लिहिण्यात आले,

''केवळ 'खुलअ' हा शब्द वापरला गेल्यास त्याला 'तलाक बिल औज' (अर्थात मोबदल्याचा तलाक) गृहीत धरले जाईल.''

(रद्दुल मुख्तार फी दुर्रुल मुख्तार : २/७६७)

''हे हनफी विधीनुसार वर्णन आहे. मालिकी कायद्यातसुद्धा 'खुलअ'ला

'तलाक बिल औज' (मोबदल्याचा तलाक) असेच वर्णन आहे.''

(अहमदु-दरदैर, अल शरहुस्सगीर अललकरबुल मसालिक : २/५१८)

काझी बैजावी शाफई म्हणतात,

उघडपणे तर हे तलाक आहे, कारण की यामध्ये पतीच्या मर्जीनुसार विभक्ती होते. अशा प्रकारे हे 'तलाक बिल औज' आहे.

यामुळे हे स्पष्ट होते की 'खुलअ' हे 'तलाक'चेच एक स्वरूप आहे. हे एक वास्तव आहे की इस्लामने 'तलाक'चा अधिकार केवळ पुरुषालाच दिला आहे. तो 'तलाक' देऊ शकतो आणि 'खुलअ' सुद्धा करू शकतो.

'खुलअ'ला स्त्री-शोषणाकरिता वापरण्याची परवानगी नाही

एक असासुद्धा आरोप करण्यात येतो की पुरुष 'खुलअ'च्या या अधिकारास स्त्रीच्या छळासाठी वापर करू शकतो. त्याला पत्नीला विभक्त करावयाचे असल्यास तलाक देणार नाही जेणेकरून त्याला मेहेर देण्याची गरज पडू नये आणि पत्नीचा एवढा छळ करेल की ती स्वत:ला पतीच्या कचाट्यातून सुटण्याकरिता 'खुलअ'चा त्याच्यासमोर प्रस्ताव ठेवील. परंतु या आरोपात तथ्य नाही. कारण शरीयतचा नियम आहे की कोणतीही व्यक्ती हकनाक अथवा बळजबरी कोणाची मालमत्ता बळकाऊ शकत नाही. त्याचप्रमाणे पत्नीचे धन तिची स्वत:ची मिळकत आहे. जर स्वखुशीने पतीला तिने आपले धन अथवा त्याचा काही भाग दिल्यास हे धर्मसमंत होईल. 'खुलअ'च्या नावावर अथवा इतर निमित्ताने तिच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने जे धन तिच्याकडून तो घेईल ते निषिध्द होईल.

थोर धर्मपंडित 'इब्ने जरीर तिबरी' सांगतात,

''पतीचे आपल्या पत्नीकडून जबरदस्तीने अथवा तिचा छळ करणे की जेणेकरून तिने तिचे काही धन पतीला देऊन (त्याच्या जाचास कंटाळून) विभक्त व्हावे. (पुरुषाचे) हे कृत्य निशिद्ध आहे. मग ते धन 'जौ' (गव्हासारखा धान्याचा एक प्रकार) च्या आकाराच्या चांदीचे का असेना वा यापेक्षा मोठी रक्कम (का असेना).''

(इब्ने जरीर तिबरी, तफसीर : ४/५७१, ५७२)

एवढेच नव्हे तर याही पुढे ते म्हणतात की जर पुरुषाने चुकीच्या पद्धतीने स्त्रीकडून रक्कम घेण्याचा प्रयत्न केला तर स्त्रीने आपल्या ऐपतीनुसार आपल्या संपत्तीचे रक्षण करण्याचा प्रयत्न करावा अन्यथा ती गुन्हेगार ठरेल.

(इब्ने जरीर तिबरी, तफसीर : ४/५६६-५६७)

इस्लामी विद्वान 'रशीद रजा मिसरी' यांनी सांगितले,

''पुरुषाकरिता स्त्रीकडून कोणतीही वस्तू केवळ अशाच परिस्थितीत धर्मसंमत होईल, जेव्हडी ती आनंदाने देईल. आणि याकरिता पुरुषाने तिला कोणताच त्रास दिलेला नसेल.'' (नफसीरुल मनार : २/३८९)

आता या बाबतीत विधीतज्ञांचे मत पाहू या.

हनफी विधीत म्हटले गेले आहे,

''पुरुषाने जर स्त्रीस 'खुलअ' घेण्यास भाग पाडल्यास 'तलाक' तर होऊन जाईल परंतु त्याला संपत्ती मिळणार नाही, कारण संपत्तीची देवाण-घेवाण आपसांतील राजी-मर्जी व सामंजस्यातून होते, बळजबरीने होत नसते.''

'दुर्रेमुख्तार' मध्ये आहे,

''पतीने जर पत्नीस खुलअ घेण्यासाठी विवश केले तर पत्नीकडून धन-संपत्ती (व दिलेले मेहेर) न मिळता 'तलाक' होईल. स्त्रीवर धनसंपत्ती अनिवार्य होणे अथवा न होणे यासाठी राजीखुशीने निर्णय झाला तरच स्वीकारणीय आहे.''

हीच गोष्ट मालिकी पंथामध्येसुद्धा सांगितलेली आहे,

''स्त्रीने 'खुलअ' प्राप्त केल्यावर असा दावा केला की तिने यासाठी 'खुलअ' घेतला की पती तिचा छळ करीत होता आणि नेहमी त्रास देत होता. अशा रीतीने त्याने तलाकचे निमित्त निर्माण करून खुलअ घेण्यावर भाग पाडले आणि तलाकचे औचित्य निर्माण झाल्याचे सिद्ध केल्यास ती तिचा माल परत मिळवू शकते. अट एवढीच की तिने आपल्या दाव्यावर साक्षीदार पुरवावेत. साक्षीकरिता लोकांचे एवढेच म्हणणे पुरे की ते सतत असे ऐकत असत की तो तिचा छळ करीत असे. जर प्रत्यक्ष साक्षीदार असतील तर दोन पुरुष साक्षीदार असावेत व स्त्रीने शपथपूर्वक सांगावे आणि दोन पुरुष व दोन स्त्रिया साक्षीदार पुरवावेत. प्रत्यक्ष साक्षीकरिता केवळ एकदा डोळ्यांनी साक्षीदारांनी पाहिलेले पुरेसे आहे. इथपावेतो म्हटले गेले की जर पुरुषाने या अटीवर खुलअ केला की तो स्त्रीला जसे त्रास देत होता त्याची तिने वाच्यता करू नये आणि पुरावा देऊ नये. असे असल्यासही ती खुलअनंतर याचा पुरावा सादर करू शकते. मात्र तो 'खुलअ'च्या स्वरुपात 'तलाक-ए-बाईन' होईल.''

(अश्शरहुल सगीर : २/५०३)

इमाम शाफई आणि इमाम अहमद अशा प्रकारच्या 'खुलअ'ला रद्दबातल ठरवितात.

'इब्ने कदामा हंबली' यांनी लिहिले आहे,

''जर एखाद्या पुरुषाने आपल्या पत्नीस बळजबरी 'खुलअ' घेण्यास भाग पाडण्याकरिता तिचा छळ सुरू केला, शारीरिक त्रास दिला, नफ्का आणि निवासाचे अधिकार हिरावले आणि स्त्रीने विवश होऊन 'खुलअ' प्राप्त केला. अशा स्वरुपाचा 'खुलअ' शास्त्रसंमत ग्राह्य धरला जाणार नाही. 'खुलअ'च्या मोबदल्यात मिळालेली रक्कम पती परत देईल व परत द्यावीच लागेल, अगदी कोणत्याही परिस्थितीत!''

(अल-मुगनी : ८/५४-५५)

इमाम शाफई, इमाम राहविया वगैरेंचेही असेच मत आहे.

इस्लामने 'खुलअ'ची पद्धत यासाठी ठेवली आहे की जर पुरुषाकडून अन्याय व छळ होत असल्यास अथवा पत्नीला पुरुष पसंत नसल्यास काही मोबदला देऊन तिला 'निकाह'च्या बंधनातून स्वत: मुक्त होता यावे. 'खुलअ' याकरिता अजिबात नाही की पुरुषाने स्त्रीला छळावे, तिच्यावर अन्याय करावा. जेथे अशी परिस्थिती असेल तेथे स्त्री कायद्याचा आधार घेऊ शकते. इस्लामी कायदा तिची सर्वतोपरी मदत करील.

'खुलअ'चा अधिकार शासनाला देता येत नाही!

एक मत असे पण व्यक्त करण्यात येते की 'खुलअ'चा अधिकार शासनाला असावा. 'खुलअ'चे बुद्धीसंमत औचित्य असल्यास 'खुलअ' करावा आणि औचित्याच्या कारणांचे समाधान न झाल्यास 'खुलअ' करू नये. इस्लामच्या प्रारंभीच्या काळातील काही धर्मपंडितांनीसुद्धा असे मत व्यक्त केले आहे. यात हसन बसरी यांनी सांगितले आहे, ''खुलअ तत्कालीन शासकच करू शकतो. याशिवाय हे शास्त्रसंमत नाही.''

मुहम्मद बिन सिर्रीन यांनी पण हे मत प्रारंभिक विद्‌वानांतर्फे कथित केले. नंतर अबू उबैदा यांनी हेच मत स्वीकारले आहे. या मंडळींचा संदर्भ दिव्य कुरआनची ही आयत आहे,

''तुम्हाला जर भय असेल की तुम्ही दोघे अल्लाहच्या मर्यादा कायम ठेवू शकणार नाही तर या दोघांनवर या संपत्तीद्‌वारे तडजोड करण्यात काहीच हरकत नाही. जिच्याद्‌वारे स्त्री स्वत:ची सुटका करून घेऊ शकेल.''

(दिव्य कुरआन, २ : २२९)

आणखी एका दुसऱ्या ठिकाणी सांगितले आहे,

''जर तुम्हाला त्यांच्या दरम्यान विवादाचे भय असेल तर पती पक्षातर्फे एक पंच व पत्नी पक्षातर्फे एक पंच पाठवा.'' *(दिव्य कुरआन, ४ : ३५)*

यामध्ये उघडपणे पती-पत्नीस संबोधण्यात आले नसून श्रीमंतवर्ग व अधिकाऱ्यांना संबोधण्यात आले आहे की त्यांना जर पती-पत्नी दरम्यान मतभेदाचे अथवा ईशमर्यादांच्या उल्लंघनाचे भय वाटत असेल तर तडजोड अथवा 'खुलअ' करावा. (फतहुल बारी ९/१३९)

परंतु सार्वमत असलेल्या विद्वानांनुसार 'खुलअ' करण्यासाठी शासकीय निर्णयाची गरज नांही. काझी शरीह, इमाम मालिक, इमाम शाफई, इमाम अहमद बिन हंबल, इसहाक बिन राहविया आणि हनफी पंथीयांचे हेच मत आहे. हसन बसरी वगैरेंशी असलेल्या मतभेदांचे खाली अशा प्रकारचे पुरावे देण्यात आले आहेत.

१) हे खूपच अल्प लोकांचे मत असून एक मोठा वर्ग या विरुद्ध आहे. माननीय 'हसन बसरी' यांनी माननीय माविया यांच्या शासनकाळातील असलेला 'इराक'चा राज्यपाल 'जियाद बिन अबू सुफियान' याच्याकडून स्वीकारलेले आहे. हाफीज इब्ने हजर म्हणतात, 'जियाद बिन अबू सुफियान'चा दर्जा हा नाही की त्याचे अनुकरण करण्यात यावे.

२) या मताचा अर्थ असा आहे की 'खुलअ' केवळ अशाच परिस्थितीत होईल जेव्हा पती-पत्नी दरम्यान मतभेद आढळतील. खरे पाहता तशी आवश्यकता नाही. कारण माननीय साबित बिन कैस (रजि.) यांची पत्नी त्यांना अतिशय नापसंत करायची. केवळ पती पसंत नसल्याच्या कारणास्तव त्यांच्यापासून विभक्त होण्यास इच्छुक होती. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यासमोर ही वार्ता पोहोचली तेव्हा त्यांनी तिला सांगितले, ''साबित बिन कैस यांनी 'मेहेर'मध्ये जी बाग दिली ती त्यास परत कर.'' आणि साबित बिन कैस यांना सांगितले, ''तुम्ही 'मेहेर' मध्ये दिलेली बाग परत घेऊन त्यांना 'तलाक' द्या.'' पैगंबरांनी हे नाही विचारले की ''तुम्हाला तुमच्या पत्नीशी काही मतभेद अथवा तक्रार आहे काय?''

(बुखारी, किताबुत्तलाक, बाबुल खुलअ, कैफुत्तलाक फिहा, अबू दाऊद, निसाई, इब्ने माजा, अब्वाबुत्तलाक)

३) 'तलाक'प्रमाणेच 'खुलअ'सुद्धा पुरुषाला अधिकार आहे. ज्याप्रमाणे शासकाच्या परवानगीशिवाय पुरुष 'तलाक' देऊ शकतो त्याचप्रमाणे 'खुलअ'सुद्धा

करु शकतो. अल्लाहने जो अधिकार त्याला दिलेला आहे तो अधिकार त्याच्याकडून हिरावून दुसऱ्या संस्थेस देणे योग्य नाही. (फतहुलबारी : ९/३१९)

४) 'खुलअ'मध्ये पुरुष स्त्रीतर्फे मोबदला घेतो. मोबदला आणि ठराव किंवा करार करण्यात शासनाच्या परवानगीची गरज नसते. (अल मुगनी : ७/५२)

सर्वसमंत विद्वानांच्या मताची पुष्टी माननीय उमर (रजि.), माननीय उस्मान (रजि.) यांच्या कार्याने होते. इमाम बुखारी सांगतात, ''माननीय उमर (रजि.) यांनी शासकाच्या परवानगीशिवाय झालेल्या 'खुलअ'ला धर्मसमंत ठरविले आहे.'' (बुखारी कीताबुत्तलाक, बाबुल खुलअ)

याचे सविस्तर वर्णन 'अब्दुल्लाह बिन शहाब खुलानी' यांच्या कथनामध्ये मिळते. ते म्हणतात की माननीय उमर (रजि.) यांच्या शासनकाळात एका इसमाने आपल्या पत्नीशी 'खुलअ' केला तेव्हा माननीय उमर (रजि.) यांनी त्याला धर्मसंमत ठरविले. (फतहुलबारी : ९/३१९)

'रबी बिन्त मऊज' आणि त्यांचे चुलते माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) यांच्या सेवेत पोहोचले आणि 'रबी'ने त्यांना सांगितले की माननीय उस्मान (रजि.) यांच्या शासनकाळात त्यांनी आपल्या पतीपासून 'खुलअ' घेतला. माननीय उस्मान (रजि.) यांना जेव्हा हे कळाले तेव्हा त्यांनी कोणतीच हरकत घेतली नाही. यावर माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.) (देखील याला चुकीचे न ठरविता) सांगतात की 'खुलअ' झालेल्या स्त्रीची पण 'इद्दत' तेवढीच आहे जेवढी 'तलाक' झालेल्या स्त्रीची आहे. (मुअत्ता अब्वाबुत्तलाक, तलाकुल मुख्तलिआ)

'उरवा बिन जुबैर' म्हणतात की माननीय उस्मान (रजि.) यांच्या काळात एका व्यक्तीने आपल्या पत्नीपासून खुलअ केला, तेव्हा त्यांनी त्यास धर्ममान्य ठरविले. (बैहकी, अल सुनबुल कुबरा : ७/३१६)

या विवेचनावरून हे स्पष्ट होते की 'खुलअ' पती आणि पत्नीच्या दरम्यानचा विषय आहे. यामध्ये शासनाचा दखल असणे अथवा त्यास मध्यस्थ बनविणे जरूरीचे नाही.

स्त्रीचा वारसाहक्क

इस्लामपूर्वी अरब समाजात वारसाहक्कात स्त्रीचा कोणताच वाटा नव्हता. निमित्त यासाठी असे होते की स्त्री ही अबला असून ती अर्थार्जनाच्या धावपळीत सक्षम नव्हती. तसेच स्वत:चा आणि परिवाराचा बचाव करण्यास पण सक्षम नसून 'गनीमतचा माल'देखील तिच्या कर्त्यापणामुळे मिळत नाही. म्हणून परिवाराच्या संपत्तीमध्ये तिचा कोणताच वाटा नसायचा. याचप्रमाणे अल्पवयीन मुलेसुद्धा वारसाहक्कापासून वंचित असायचे. केवळ तरुण व प्रौढ पुरुषच जे शत्रूंचा सामना करण्यात सक्षम आहेत तेच वारसाहक्काच्या संपत्तीत वाटेकरी असत.

(तफसीर इब्ने जरीर : १६३, १६४)

वारसासंपत्तीत पुरुष व स्त्री दोघांचा अधिकार आहे

केवळ अरब समाजच काय, जगातील सर्वच समाज व राष्ट्रांमध्ये अशाच प्रकारच्या निमित्तांच्या आधारावर स्त्रियांना वारसाहक्कापासून वंचित करण्यात आलेले होते. हा हक्क केवळ सर्वांत थोरल्या पुत्रालाच मिळत असे. इस्लामने या अन्यायाविरुद्ध रणशिंग फुंकले आणि सडेतोड घोषणा केली की पुरुषाप्रमाणेच स्त्रियांचादेखील यामध्ये अधिकार आहे.

''पुरुषांसाठी त्या संपत्तीत वाटा आहे, जी आई-वडील आणि जवळच्या नातेवाईकांनी मागे ठेवली असेल आणि स्त्रियांसाठीही त्या संपत्तीत वाटा आहे जी आई-वडील आणि जवळच्या नातेवाईकांनी मागे ठेवली असेल, मग ती कमी असो वा जास्त असो.'' *(दिव्य कुरआन, ४ : ७)*

या तात्त्विक मार्गदर्शनासह कुरआनने स्त्री आणि पुरुषाचे अधिकारसुद्धा निश्चित केले आहेत. काही विस्तारित वर्णन हदीस (पैगंबरवचने) आणि फुक्हा (इस्लामी विधी) मध्ये मिळते. यावर हा आरोप करण्यात येतो की यामध्ये स्त्री आणि पुरुषात अधिकारांचे समान वाटप करण्यात आलेले नसून पुरुषाचा अधिकार स्त्रीपेक्षा जास्त देण्यात आला आहे. परंतु हा एक निराधार व बिनबुडाचा आरोप आहे, जो इस्लामच्या वारसाविधी आणि त्याचे औचित्य व गूढ न समजल्यामुळे करण्यात येतो. जोपर्यंत या कायद्याचे सविस्तर ज्ञान आणि त्याची उपयुक्तता समोर नसते, तोपर्यंत त्याचे आकलन होत नाही व उलट गैरसमज आणखी वाढत जातात. या ठिकाणी आपण वारसाकायद्याची थोडी सविस्तर चर्चा करू या व त्यानंतर त्याचे फायदे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करू या.

पुत्र आणि कन्येचा अधिकार

इस्लामने पारंपरिक संपत्तीस परिवारात मर्यादित ठेवून परिवार सदस्यांच्या दर्जाप्रमाणे अधिकार निश्चित केले आहेत. यात प्रथम आणि सर्वांत जास्त अधिकार संततीचा आहे. दिव्य कुरआनात सांगितले आहे,

''ईश्वर तुम्हाला तुमच्या संततीविषयी आदेश देत आहे की पुरुषाचा वाटा हा दोन स्त्रियांच्या वाट्यासमान आहे.'' *(दिव्य कुरआन, ४ : ११)*

अर्थात– दोन कन्यांच्या वाट्यासमान एका मुलाचा वाटा आहे. असे नाही सांगितले की एका मुलाच्या वाट्यासमान दोन मुलींचा वाटा आहे. याचा अर्थ असा की मुलींचा हक्क महत्त्वाचा आहे. यावरून मार्गभ्रष्टतेची ही कल्पना नष्ट पावते की मुलींचा वारशात अधिकार नाही आणि अशी कल्पना प्रदान केली की मूळ अधिकार त्यांचाच असून काही कारणास्तव मुलांना त्यांच्यापेक्षा जास्त देण्यात येईल. हाच अर्थ वारशाच्या इतर नियमांच्या बाबतीत स्वीकारण्यात आला आहे.

(संदर्भ तफसीरुल मनार : ४/४०५)

यावरून निम्नलिखित बाबी स्पष्ट होतात.

१) संततीमध्ये मुले आणि मुली दोहोंचा समावेश आहे व वारसामध्ये केवळ मुलांचाच नसून मुलींचासुद्धा अधिकार आहे.

२) एका मुलाचा वाटा दोन मुलींच्या वाट्यासमान असेल. उदाहरणार्थ, मयताच्या मागे एक मुलगा व एक मुलगी असल्यास मयताची संपत्ती तीन भागांत विभागली जाईल. एकतृतियांश भाग मुलीला आणि दोन तृतियांश भाग मुलाला मिळेल. दोन मुली आणि एक मुलगा असल्यास संपत्तीचे चार भाग होतील. दोन भाग (अर्थात दोन चतुर्थांश) म्हणजे निम्मे भाग दोन्ही मुलींना मिळतील आणि दोन भाग म्हणजे निम्मा भाग मुलाला मिळेल.

दिव्य कुरआनने सांगितले,

''जर (मृताचे वारस) दोनपेक्षा जास्त मुली असतील तर त्यांना वारसासंपत्तीपैकी दोन तृतियांश दिला जावा.'' *(दिव्य कुरआन, ४ : ११)*

याचा आधार असा आहे की एका मुलीबरोबर एक मुलगा असल्यास आताच उल्लेखिल्याप्रमाणे, एक तृतियांश मिळेल. ज्या वेळी एक मुलगी दुसऱ्या मुलीबरोबर असल्यास नैसर्गिक बाब आहे की तिचा वाटा तिच्यापेक्षा कमी होता कामा नये.

याचा दुसरा आधार असा आहे की, कुरआनात स्पष्टीकरण करण्यात आले

आहे की मयताची संतती अथवा भाऊ नसल्यास आणि दोन बहिणी असल्यास त्यांना दोन तृतियांश (२/३) अधिकार मिळेल. (सूरह निसा : १७६) जेव्हा दोन बहिणी दोन तृतियांश (२/३) ची हक्कदार असल्यास दोन मुली प्रथम-दर्जा याची हक्कदार होतील.

तिसरा आधार पैगंबर मुहम्मद (स.) यांचा निर्णय आहे. तो असा, माननीय सआद बिन रबीअ (रजि.) यांच्या दोन मुली होत्या. 'ओहद'च्या युद्धात ते शहीद (हुतात्मा) झाल्यानंतर त्यांच्या भावाने त्यांच्या पूर्ण संपत्तीचा ताबा घेऊन त्यांच्या मुलींना वंचित केले. त्या वेळी पैगंबर मुहम्मद (स.) यांनी दोन्ही मुलींना दोन तृतियांश (२/३) एवढा भाग मिळवून दिला.

(तिर्मिजी, अबवाबुल फराएझ बाब माजा फी मीरासुल बनात, अबू दाऊद, किताबुल फराएज, बाब माजा फी मीरासु सल्ब)

येथे एक प्रश्न असा निर्माण होतो की दोन मुलींचा वाटा दोन तृतियांश (२/३) असल्यास दिव्य कुरआनने (दोनपेक्षा जास्त) चा शब्दप्रयोग का बरे केला? याचे उत्तर असे की दोन मुलींना उपरोक्त कायद्यानुसार जेव्हा प्रत्येकी एक तृतियांश (१/३) वाटा मिळाल्यास असा विचार येऊ शकतो की दोनपेक्षा अधिक मुलींना दोन तृतियांशपेक्षा (२/३) जास्त भाग मिळावयास हवे. दिव्य कुरआनने याचे खंडन केले व स्पष्ट केले की मुली दोनपेक्षा जास्त जरी असल्या तरी त्यांना दोन तृतियांश (२/३) एवढाच भाग मिळेल.

जर मुलगा नसून केवळ एकच मुलगी असल्यास ती निम्म्या भागाची हक्कदार असेल. दिव्य कुरआनने सांगितले,

''जर (मृताचे वारस) दोनपेक्षा जास्त मुली असतील तर त्यांना वारसासंपत्तीपैकी दोन तृतियांश दिला जावा'' *(दिव्य कुरआन, ४ : ११)*

यावरून हेसुद्धा लक्षात येते की केवळ एकच मुलगा असल्यास तो संपूर्ण संपत्तीचा एकटा वारसदार होईल. कारण मुलाचा वाटा मुलीपेक्षा द्विगुणीत आहे. ज्याअर्थी एकुलत्या एक मुलीचा अधिकार निम्मा असल्यास एकुलत्या एका मुलाचा अधिकार पूर्ण संपत्तीवर असायलाच पाहिजे. मात्र एकापेक्षा अधिक मुले असल्यास त्यांच्या दरम्यान समान वाटणी होईल. कारण भांवडांमध्ये भेदभाव करण्यासाठी कोणताच आधार नाही.

माता-पित्यांचा अधिकार

वारशामध्ये संततीनंतर माता-पित्यांचा अधिकार आहे. दिव्य कुरआनात त्यांचा वारसाहक्क अशा रितीने स्पष्ट करण्यात आला आहे.

''जर मृतास संतती असेल तर त्याच्या आईवडिलांपैकी प्रत्येकाला वारसासंपत्तीचा सहावा वाटा मिळाला पाहिजे. आणि जर तो नि:संतान असेल आणि आई-वडीलच त्याचे वारस असतील तर आईला तिसरा वाटा दिला जावा. आणि जर मयताचे भाऊ-बहिणीसुद्धा असतील तर आई सहाव्या हिश्याची वाटेकरी असेल.'' *(दिव्य कुरआन, ४ : ११)*

या आधारे निम्नलिखित नियम तयार होतात.

१) मयत व्यक्तीमागे संतती आहे. मग एकच मुलगा व एकच मुलगी का असेना, माता पित्याच्या वाट्यातून सहावा (१/६) भाग मिळेल. तसेच नातू, नात आणि त्यांची मुलेसुद्धा संततीमध्येच मोडतात.

२) मयत व्यक्तीची संतती नसल्यास आईचा वाटा एक तृतियांश (१/३) असेल आणि बाकी दोन तृतियांश (२/३) वडिलांचा वाटा असेल.

३) मयत व्यक्तीची संतती तर नाही, परंतु दोन किंवा दोनपेक्षा जास्त भाऊ-बहिणी (कोणत्याही प्रकारचे) आहेत. अशा स्थितीत आईचा वाटा एक षश्ठांश (१/६) असेल. बाकीची संपूर्ण संपत्ती वडिलांच्या मालकीची होईल. भाऊ आणि बहिणींचा कोणत्याही प्रकारचा वाटा नसणार.

संतती आणि माता-पित्यांचे अधिकार स्पष्ट केल्यानंतर दिव्य कुरआनने सांगितले,

''(या सर्व वाटण्या त्या वेळी काढल्या जातील) जेव्हा मृत माणसाने केलेले मृत्यूपत्र पूर्ण केले गेले असेल आणि त्याच्यावर असलेले कर्ज अदा केले गेले असेल. तुम्हाला माहीत नाही की तुमचे आई-वडील व तुमच्या संततीपैकी कोण लाभाच्या दृष्टीने तुमच्या अधिक जवळ आहे. हे हिस्से अल्लाहने ठरवून दिलेले आहेत, आणि अल्लाह नि:संशय सर्व हकीगती जाणणारा आणि सर्व गर्भित हेतू जाणणारा आहे.'' *(दिव्य कुरआन, ४ : ११)*

याचा अर्थ असा झाला की प्रथम वसीयत (मृत्यूपत्र) नुसार मयताची इच्छा पूर्ण करण्यात येईल आणि त्याने इतरांकडून घेतलेल्या कर्जांची परतफेड करण्यात

येईल. मग यानंतर उरलेली संपत्ती वारसदारांमध्ये वाटण्यात येईल.[1]

१. मयताच्या संपत्तीमध्ये निम्नलिखित चार अधिकार आहेत.

१) मयताच्या 'तजहीज व तक्फीन' (कफन-दफनविधी) ची मध्यम दर्जाची व्यवस्था.

२) मयतावर कर्ज असल्यास त्याची परतफेड.

३) 'वसीयत' (मयताच्या अंतिम इच्छेची) असल्यास त्याचें पालन.

४) बाकी संपत्ती वारसदारा दरम्यान शरीयतच्या पद्धतीनुसार वाटण्यात येईल.

आयतीमध्ये 'कर्जा'चा उल्लेख 'वसीयत' (अंतिम सूचना) नंतर आहे. परंतु याचा अजिबात अर्थ असा नाही की प्रथम मयताने केलेली वसीयत पूर्ण करण्यात यावी आणि उरल्यासुरल्या संपत्तीमध्ये कर्जाची परतफेड करावी. याउलट आयतीचा अर्थ असा आहे की वसीयत आणि कर्ज अथवा दोन्हीपैकी जेसुद्धा शक्य झाल्यानंतर संपत्तीची वारसदारमध्ये वाटणी होईल. कर्ज दुसऱ्यांचा अधिकार आहे. ज्याची परतफेड करणे अत्यावश्यक आहे. ज्याप्रमाणे हयातीत याची परतफेड करणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे मृत्यूनंतर त्याच्या संपत्तीतून ते परत करणे आवश्यक आहे. वसीयत करणे याकरिता आवश्यक नसून वसीयत केवळ ऐच्छिक आहे. आणि अनिवार्य हे ऐच्छिकपेक्षा महत्त्वाचे आहे. आयतीमध्ये वसीयतचा उल्लेख केवळ याकरिता प्रथम करण्यात आला की यास मयताचे ऐच्छिक कर्म समजून दुर्लक्ष करू नये. ज्याअर्थी मयताने 'वसीयत' केली, तर ती पूर्ण करणे आवश्यक आहे. माननीय अली (रजि.) यांनी कथन केलेल्या हदीसवरूनसुद्धा याची पुष्टी होते की पैगंबर मुहम्मद (स) यांनी कर्जाच्या परतफेडीला 'वसीयत'पेक्षा जास्त महत्त्व दिले.

(तिर्मिजी, इब्ने माजा, दारमी)

वसीयतच्या बाबतीत 'हदीस'मध्ये हेसुद्धा स्पष्ट करण्यात आले की तिच्या पूर्ततेसाठी एक तृतियांश (१/३) संपत्तीपेक्षा जास्त वापरता येत नाही. माननीय सआद बिन अबि वकार (रजि.) यांनी आपल्या पूर्ण संपत्तीविषयी 'वसीयत' (अंतीम सूचना) करण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले की ''तुम्ही आपल्या संपत्तीपैकी केवळ एक तृतियांश भागाची 'वसीयत' करू शकता. हे पण जास्तच आहे.''

(संदर्भ बुखारी,मुस्लिम)

पती-पत्नीचा अधिकार

वारशाच्या संपत्तीत पती-पत्नीचे अधिकार कुरआनने या शब्दांत वर्णन केले आहेत.

''आणि तुमच्या पत्नीने जे काही ठेवले असेल त्याचा अर्धा वाटा तुम्हाला मिळेल, जर त्या नि:संतान असतील, परंतु संतती असल्यास वारसासंपत्तीमध्ये एक चतुर्थांश वाटा तुमचा आहे जेव्हा की त्यांनी जी वसीयत (मृत्यूपत्र) केली असेल ती पूर्ण करण्यात यावी, आणि कर्ज जे त्यांच्या अंगावर असेल ते अदा करण्यात यावे.'' *(दिव्य कुरआन, ४ : १२)*

या आयतीमधून निम्नलिखित बाबींचे ज्ञान होते.

१) पतीला पत्नीच्या 'तरका'मधून निम्मा (१/२) भाग मिळेल. जर याच पतीपासून अथवा माजी पतीपासून संतती हयात नसल्यास मुलाचा मुलगा संतती म्हणून गृहीत धरला जाईल. यावर सर्व विद्वानांचे मतैक्य आहे.

२) पतीला पत्नीच्या 'तरका' (मयताची संपत्ती) मधून एक चतुर्थांश भाग मिळेल. जर तिची (या पतीपासून अथवा माजी पतीपासून असलेली) संतती हयात आहे.

३) जर पतीची संतती नसल्यास पत्नीला पतीच्या 'तरका' (मयताची संपत्ती) मधून एक चतुर्थाश (१/४) भाग मिळेल.

४) पतीला (तिच्यापासून अथवा इतर पत्नीपासून) संतती असल्यास पत्नीला एक अष्टमांश (१/८) भाग मिलेल.

'अखयाफी' भाऊ-बहिणीचे अधिकार

संतती, माता-पिता आणि पती-पत्नी हे प्रत्येक स्थितीत मयताच्या संपत्तीचे वाटेकरी आहेत. यांच्यानंतर इतर नातलगांचा अधिकार आहे. यामध्ये सर्वप्रथम मयताचे भाऊ-बहिणी येतात. भाऊ-बहिणी तीन प्रकारचे असतात. 'ऐनी, अलाती आणि अखायाफी' [१] या तीन प्रकारच्या भाऊ-बहिणीपैकी 'अलाती' (सख्खे) भाऊ बहिणींचा अधिकार सर्वप्रथम आहे. ते नसल्यास 'अलाती' भाऊ-बहिणी संपत्तीचे वारसदार होतील. 'अखयाफी' भाऊ बहिणींच्या वाट्यास येणाऱ्या वारसासंपत्तीचे भाग निश्चित आहेत. विद्वानांचे मतैक्य असलेल्या वाटणीचे या आयतीमध्ये

१. 'ऐनी' भाऊ बहिणी म्हणजे एकाच मात्या-पित्याची संतती. अर्थात सख्खे भाऊ-बहिणी. 'अलाती' भाऊ बहिणी म्हणजे एक पिता आणि विविध माता, अर्थात सावत्र भाऊ बहिणी. आणि 'अखयाफी' म्हणजे एकच माता आणि विविध पित्याची संतती असलेले सावत्र भाऊ-बहिणी.

स्पष्टीकरण आहे.

दिव्य कुरआनने सांगितले आहे,

''जर अशा स्त्री व पुरुषाची वारसा संपत्ती आहे ज्यांचा पिता अथवा भाऊ नाही आणि त्याचा एक (अखयाफी) भाऊ किंवा एक (अखयाफी) बहीण (अर्थात सावत्र आणि भाऊ किंवा बहीण) आहे. तर त्यांना प्रत्येकी एक षश्ठांश भाग मिळेल. जर ते दोनपेक्षा जास्त असतील तर सर्व एक तृतियांशात सहभागी असतील. मृत्यूपत्राप्रमाणे अंमलबजावणीनंतर आणि कर्जाची अदायगी केल्यानंतर व कोणालाही त्रास दिल्याशिवाय हा आदेश आहे अल्लाहचा व अल्लाह सर्वकाही जाणणारा व मृदूस्वभावी आहे.'' *(दिव्य कुरआन, ४ : १२)*

याचा स्पष्ट अर्थ असा की, अखयाफी भाऊ असो की बहीण, यापैकी प्रत्येकाला एक षश्ठांश (१/६) एवढा भाग मिळेल. जर ते दोनपेक्षा जास्त असतील तर एक तृतियांश (१/३) भागात सर्वच्या सर्व समान वाटेकरी असतील. यामध्ये भाऊ आणि बहिणीच्या दर्जात कोणताच फरक करण्यात येणार नाही.

सख्खे आणि सावत्र बहीण-भावाचे अधिकार

'ऐनी' (सख्खे) व 'अलाती' (सावत्र) बहीण-भावाचे अधिकार कुरआनने या शब्दांत स्पष्ट केले आहेत.

''एखाद्या मयतास संतती नसल्यास (व पिताही नसल्यास) व त्यास एक बहीण असल्यास तिचा वाटा मयताच्या वारसासंपत्तीत निम्मा असेल. आणि बहिणीस संतती नसल्यास ती व्यक्ती वारसदार असेल. जर दोन बहिणी असतील तर त्यांचा वाटा भावाच्या वारसासंपत्तीमध्ये दोन तृतियांश असेल. आणि अनेक भाऊ व बहिणी असल्यास भावाचा वाटा दोन बहिणींच्या वाट्याएवढा असेल. अल्लाह या गोष्टी उघड करून वर्णन करीत आहे की जेणेकरून तुम्ही पथभ्रष्टतेच्या गर्तेत पडू नये. अल्लाह प्रत्येक गोष्ट जाणतो आहे.''

(दिव्य कुरआन, ४ : १७६)

यावरून हे स्पष्ट होते की मयताचा मुलगा (अथवा मुलाचा मुलगा आणि त्याचा मुलगा) असल्यास किंवा वरील शृंखलेत पिता, आजोबा (पित्याचा पिता) वगैरे असल्यास बहीण भावांचा मयताच्या संपत्तीत कोणताच अधिकार नाही. आणि तेही नसल्यास त्यांच्या दरम्यान खाली दिलेल्या पद्धतीनुसार मयताची संपत्ती वाटण्यात येईल.

१) केवळ एक बहीण असल्यास तिचा निम्मा वाटा असेल.

२) केवळ एक भाऊ असल्यास बहिणीच्या वारसाहक्काचा पूर्णपणे हक्कदार

असेल.

३) दोन किंवा दोनपेक्षा जास्त बहिणी असल्यास आणि भाऊ नसल्यास त्यांना दोन तृतियांश (२/३) भाग मिळेल.

जर मयताच्या केवळ मुलीच आहेत, तेव्हा त्यांचा निम्मा (१/२) निश्चित भाग आणि एकापेक्षा जास्त दोन तृतियांश (२/३) भाग दिल्यानंतर जी संपत्ती शेष राहील, ती भाऊ आणि बहिणी दरम्यान उपरोक्त कायद्यानुसार (की एका पुरुषाचा वाटा दोन स्त्रियांसमान) वाटण्यात येईल. मुलीच्या बरोबर बहिणी असल्यास मुलींचा वाटा दिल्यानंतर उरलेला भाग बहिणींना मिळेल.

हे वारसाहक्काचे काही ठळक नियम आहेत जे दिव्य कुरआनात स्पष्ट करण्यात आले आहेत. यांचे सविस्तर वर्णन 'हदीस' आणि 'फिकह'च्या ग्रंथांमध्ये आहेच. येथे यावर चर्चा करण्याची गरज वाटत नाही.

वारसाहक्कचे मूळ आधार

वांशिक नाते आणि वैवाहिक संबंधच मूळ आहे

इस्लामचा वारसाविषयक हा कायदा ज्याच्या आधारावर प्रस्थापित आहे, आपण याचे थोडे स्पष्टीकरण करु या. या मुळे याची उपयुक्तता आणि फायदे स्पष्ट होतील. 'विरासत' (वारसा) ची संपूर्ण वाटणी परिवाराच्या सदस्यांदरम्यान होते. यामध्ये वांशिक नाते आणि 'निकाह' यांस मूळ आधार मानले गेले आहे.[1] परिवार म्हणजे एक कायमस्वरूपी 'एकक' आहे. ज्याच्या सदस्यांना वांशिक आणि रक्ताचे नाते आपसात जोडून ठेवते. त्यांच्या दरम्यान प्रेम, सद्‌भावना, सहकार्य व जिव्हाळ्याची नैसर्गिक भावना असते. वास्तविकपणे ते एक दुसऱ्यांच्या फायद्या-तोट्यात सामील असतात. त्यांच्या प्रगतीत मदत करतात आणि कठीणप्रसंगी सर्वतोपरी सहाय्य करतात. म्हणूनच परिवारातील सदस्यांचे आपसातील संबंध खूपच गाढ असतात. त्याच्या प्रगतीस ते इतर फायद्यांच्या तुलनेत जास्त महत्त्व देतात. त्यांची आर्थिक धावपळ आणि खटाटोप जास्तीतजास्त यासाठीच असते आणि स्वभाविकदृष्ट्या ते परिवारास आपल्या संपत्तीचे वाटेकरी आणि शास्त्रसंमत हक्कदार मानतात.

पती-पत्नी दरम्यान रक्ताचे नाते नसूनसुद्धा त्यांचे संबंध इतके दृढ असतात व ते एक दुसऱ्यांच्या कामात इतकी मदत करतात की ते परिवाराचे सदस्यच गृहीत धरले जातात. वारशात त्यांचा अधिकार डावलला जाऊ शकत नाही.

ते नातलग जे कधी वंचित होत नाहीत

परिवाराच्या ज्या सदस्यांचा मयताशी प्रत्यक्षात संबंध असतो त्यांना वारशामध्ये वस्तुत: वाटा मिळतोच आणि ते कोणत्याही परिस्थितीत यापासून वंचित होत नाहीत, मग ते पुरुष असोत अथवा स्त्रिया असोत. यामध्ये निम्नलिखित

१. विरासत (वारसा) चा एक आधार 'विला' सुद्धा आहे. 'बुखारी' च्या हदीस मध्ये आहे की, तसेच मुस्लिम च्या 'हदीस' मध्ये सुद्धा आहे की, एखाद्या व्यक्तीने एखादा 'गुलाम' (दास) स्वतंत्र केल्यास आणि मग त्या गुलामाचा कोणी वारस नसल्यास स्वतंत्र करणारी व्यक्तीच त्या गुलामाची 'वारस' असेल. येथे याचे सविस्तर वर्णन करण्याची गरज भासत नाही.

व्यक्तींचा समावेश आहे.

१) मयताची मुले आणि मुली
२) मयताचे माता पिता
३) पती वा पत्नींपैकी जे हयात असेल

यापैकी ('असहाबुल फरायज' यांना त्यांचे निश्चित असलेले वाटे मिळतील. बाकीच्या संपत्तीचे वारस 'असबा' असतील. [१]

परिवाराच्या इतर सदस्यांच्या तुलनेत यांना प्राथमिकता देण्याचे कारण अगदी स्पष्ट आहे. माणूस हा मानसिकरित्यादेखील यांनाच जवळचे समजतो आणि वास्तविकपणे तेच त्याच्या जवळचे असतात. जीवनभर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष यांच्याशीच संबंध येत असतात. जे काही धन आणि संपत्ती तो घाम गाळून गोळा करतो, ती त्यांच्या गरजपूर्तीकरिता खर्च केल्यावर त्याला आत्मिक आनंद प्राप्त होतो. त्याला वाटते की त्याच्या मृत्यूनंतरसुद्धा तेच या संपत्तीचे वारस असावेत. ते असताना कोणी परक्याने त्याच्या संपत्तीवर ताबा मिळवू नये. ही एक स्वाभाविक भावना आहे. यास चुकीचे म्हणता येत नाही. दिव्य कुरआनने यालाच कायद्याचे स्वरूप प्रदान केले आहे.

---

१. वारसाशास्त्रात 'असहाबुल फारयज' म्हणजे शरीयतने ज्यांचा वाटा निश्चित केला आहे अशा व्यक्ती. हे वाटे दिल्यानंतर ज्या व्यक्ती उरलेल्या संपत्तीचे वारस असतात, त्यांना 'असबा' असे म्हणतात. उदाहरणार्थ मयताची पत्नी, माता-पिता, मुलगा व मुलगी हे 'असहाबुल फरायज' आहेत. कारण यांचे वाटे निश्चित आहेत. उरलेल्या संपत्तीचे वारसदार मुलगा व मुलगी असतील, त्यांना 'असबा' म्हणतात. मुलाव्यतिरिक्त केवळ मुलगी असेल तर तिचासुद्धा समावेस 'असहाबुल फरायज'मध्येच झाला असता. कारण या स्थितीत तिचा निश्चित झालेला वाटा निम्मा आहे. अशा स्थितीत पिता 'असबा' असेल. कारण तो त्याचा निश्चित भाग (एक षष्ठांश (१/६) च्या व्यतिरिक्त बाकीच्या संपत्तीचासुद्धा वारस असेल. जर एखादा पुरुष मयतच्या नातेवाईकांमध्ये जवळ असेल तर दूरचे नातेवाईक वारसाहक्कापासून वंचित होतील. याच तत्त्वाच्या आधारावर संतती असल्यावर नातू (मुलाचा मुलगा) आणि नातींचा (मुलाची मुलगी) कोणताच अधिकार नसेल अथवा पिता जिवंत असल्यास मयताच्या भाऊ बहिणी (अर्थात पित्याची संतती) यांना वारसाहक्क मिळणार नाही.

सर्वात मोठा अधिकार संततीचा आहे

परिवाराच्या या जवळच्या नातलगांमध्येसुद्धा त्याने संततीच्या अधिकाराचे आईवडिलांच्या अधिकारापेक्षा जास्त प्राथमिकता व महत्त्व दिले आहे. यामध्ये त्यांच्या गरजा आणि आर्थिक मागण्या दृष्टीसमोर ठेवण्यात आल्या आहेत. मुले मयताच्या पुष्कळशा जबाबदाऱ्या स्वत:वर घेतात आणि त्याचे अपूर्ण राहिलेले नियोजन आणि योजना पुढे चालू ठेवतात. तसेच मुलावर नवनवीन जबाबदाऱ्या येतात, ज्यांना पूर्ण करण्यासाठी नवीन साधने व सामग्री त्यांना हवी असते आणि वर्तमानाच्या आधारावर भविष्य निर्माण करावयाचे असते. याकरिता त्यांना धनसंपत्तीची जेवढी गरज असते तेवढी मयताच्या वृद्ध आईवडिलांना नसते. स्वत: आई-वडीलसुद्धा आपली संपत्ती मुलांच्याच स्वाधीन करण्याचे इच्छुक असतात. आणि इतरांना त्यावर ताबा देण्याच्या मन:स्थितीत नसतात. मात्र मुले नसल्यास माता-पित्यांचाच त्यावर प्रथम अधिकार असणार.

स्त्री-पुरुषादरम्यान असलेला भेद कोठे व का?

स्त्री आणि पुरुष दोघांच्या नात्यांचा मयताशी असलेला संबंध सारखाच असल्यास एका पुरुषाचा अधिकार दोन स्त्रियांच्या अधिकारासमान असेल. उदाहणार्थ– मुलगा व मुलगी अथवा भाऊ व बहीण. यामागे स्त्रीला कमी लेखणे व पुरुषाला श्रेष्ठ समजणे अशी कोणतीच कल्पना नाही. ही कल्पना असती तर प्रत्येक स्थितीत स्त्रीचा वाटा कमी असता अथवा तिचा वाटाच नसता. वास्तविक पाहता यांपैकी कोणतीच गोष्ट नाही. याचे कारण हे की इस्लामने वारसाहक्कास आर्थिक जबाबदारीशी संबंधित केले आहे. इस्लामी कायद्यानुसार पुरुषावरच सर्व आर्थिक जबाबदाऱ्या आहेत. याउलट स्त्रीला या जबाबदाऱ्यांतून मुक्त करण्यात आले आहे. हे समजण्याकरिता मुलगा आणि मुलगीचे उदाहरण घेऊ या. मुलगा आपल्या पत्नी व मुलांचा खर्च उचलतो. कदाचित त्याला आई-वडीलपैकी जे हयात आहे, त्यांचा खर्चसुद्धा सहन करावा लागतो. अशी परिस्थितीसुद्धा येऊ शकते त्याला त्याच्या गरीब व अक्षम अथवा लहान भावंडांचे किंवा इतर नातलगाचे संगोपन करावे लागत असेल. अशा प्रकारे त्यांच्याकडे येणारे धन सतत खर्च होत राहते. याउलट मुलगी आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्यास तिच्यावर जास्तीतजास्त तिचा स्वत:चा खर्च असतो. तिच्या स्वत:शिवाय इतर कोणाचीच जबाबदारी तिच्यावर नाही. विवाहानंतर तर तिची स्वत:ची जबाबदारीसुद्धा तिच्यावर नसते. कारण पतीवर तिच्या 'नान-नफ्का'ची जबाबदारी असते. वस्तुस्थिती अशी आहे की दोघांच्या

जबाबदाऱ्या समोर ठेवल्यास मुलाच्या वाट्यात येणाऱ्या संपत्तीलाही जास्त म्हणता येत नाही आणि मुलीच्या वाट्यात येणाऱ्या संपत्तीलाही कमी म्हणता येणार नाही. दोघांमध्ये अतिशय न्यायपूर्ण समतोल प्रस्थापित करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे पतीच्या तुलनेत पत्नीचा वाटा निम्मा आहे. याचे कारणसुद्धा हेच आहे की ती आर्थिक जबाबदाऱ्यांपासून मुक्त आहे. याशिवाय तिला पतीतर्फे 'मेहेर' सुद्धा मिळते. विवाह आणि इतरप्रसंगी जे दागिणे तिला शुभेच्छेच्या रुपात येतात, ती संपत्ती पण तिचीच असते. पतीच्या निधनानंतर पत्नीस, तसेच पत्नीच्या निधनानंतर पतीस 'विरासत' मध्ये त्यांचा वाटा मिळतो. आता जर पत्नीच्या निधनानंतर पतीने दुसरे लग्न केले तर नवीन नवरीस त्याला परत मेहेरची रक्कम मोजावी लागणार आणि 'नफ्का' सुद्धा द्यावा लागणार परंतु पती वारल्यानंतर विधवा पत्नीने दुसरा 'निकाह' केल्यास तिला परत 'मेहेर' मिळणारच. शिवाय तिचा नान-नफ्का (निर्वाहभत्ता) सुद्धा वर्तमान पतीवर असणार. ही सर्व परिस्थिती पाहता हे न्यायपूर्ण कसे नसणार की 'विरासत' (वारसा) मध्ये पत्नीचा वाटा हा पतीच्या वाट्याच्या निम्मा असावा. तसेच बिचाऱ्या पतीवर अन्याय कसा होणार नाही की त्याचा वाटा पत्नीच्या वाट्यासमान करण्यात यावा. हीच गोष्ट 'हाफीज इब्ने कसीर' यांनी अशा शब्दांत वर्णन केली आहे,

''ईश्वराने एका पुरुषाचा वाटा दोन स्त्रियांच्या वाट्यासमान ठेवला आहे. याचे तात्त्विक कारण असे की पुरुषावर नान-नफ्क्या (निर्वाहभत्ता) ची जबाबदारी, व्यापार व अर्थार्जन वगैरेची धडपड व इतर प्रकारची धावपळ करावी लागते. म्हणून हेच योग्य की स्त्रीला जेवढा वाटा मिळतो, त्याच्या दुप्पट पुरुषाला मिळावयास पाहिजे.'' (तफ्सीर इब्ने कसीर १/४५७)

रशीद रजा मिस्री यांनी लिहिले आहे,

''एका पुरुषाचा वाटा दोन स्त्रियांएवढा असण्याचे तात्त्विक कारण असे आहे की पुरुषाला स्वतःचा आणि आपल्या पत्नीचासुद्धा खर्च उचलावा लागतो. म्हणून त्याचे दोन भाग आणि स्त्रीचा एक भाग ठरविण्यात आला आहे. स्त्री केवळ स्वतःवरच खर्च करते. जर तिचे लग्न झालेले असेल तर तिचा 'नफ्का' सुद्धा पतीवरच अनिवार्य असतो. याच पैलूने काही स्थितीत स्त्रीचा वाटा पुरुषापेक्षा जास्तसुद्धा होतो.''

(तफ्सीऊल मनार : ४/४०६)

अशा प्रकारे इस्लामने स्त्रीवरुन आर्थिक जबाबदाऱ्या संपवून वारसाहक्कास तिचा निम्मा वाटा ठेवला आहे. यावर पुरुषाचासुद्धा अधिकार नसतो की त्याने तिच्यावर काही आर्थिक जबाबदाऱ्या टाकव्यात, तसेच स्त्रीलासुद्धा अशी तक्रार करता येत नाही की तिचा वाटा कमी का ठेवण्यात आला. याउलट जर वारसा-

अधिकारामध्ये दोघेजण समान वाटेकरी असते तर कदाचित पुरुषाने याची मागणी करणे यथायोग्य ठरले असते की आर्थिक जबाबदाऱ्यांमध्येसुद्धा समान वाटणी करुन माझी निम्मी जबाबदारी तिच्यावर टाकण्यात यावी. अधिकार आणि जबाबदाऱ्यांची ही विभागणी स्त्री आणि पुरुष दोघांच्या स्वभावानुसार आहे. यापेक्षा जास्त उत्तम कल्पना विभागणीच्या बाबतीत होऊच शकत नाही.

इस्लामी विद्वान 'हाफीज इब्ने कय्यीम' पुरुषाच्या आर्थिक जबाबदाऱ्या बरोबरच आणखीन एका पैलूकडे लक्ष वेधतात. तो हा की माणसाला या जीवनात स्त्रीपेक्षा जास्त पुरुषामुळे भौतिक लाभ मिळतो. म्हणून त्याच्या मृत्यूनंतर पुरुषाचा वाटा त्याच्या संपत्तीत जास्त असायला पाहिजे. या संदर्भात त्यांनी सांगितले,

''पुरुषाला वारसाहक्क जास्त मिळण्याचे कारण अगदी स्पष्ट आहे. त्याला स्त्रीच्या तुलनेत संपत्तीची जास्त आवश्यकता असते कारण तो जबाबदार आहे. (स्त्रीच्या आर्थिक जबाबदाऱ्या पुरुषावर असतात.) याव्यतिरिक्त मृतास त्याच्या जीवनात पुरुषापासून अधिक लाभ मिळतो. याच वास्तवाकडे अल्लाहने वारसाहक्काचे अधिकार निश्चित केल्यावर आणि त्याचे प्रमाण निश्चित केल्यावर इशारा दिला की तुम्हाला हे माहीत नाही की तुमचा पिता आणि तुमची संतान - यांपैकी कोण तुमच्यासाठी अधिक फायदेशीर आहेत. ज्याअर्थी मयताच्या जीवनात त्याला स्त्रीपेक्षा जास्त लाभ मिळालेला आहे आणि तो संपत्तीचा अधिक गरजवंत आहे, त्याअर्थी तोच याचा जास्त हक्कदार आहे की त्याला वारसाहक्कात प्राधान्य देण्यात यावे.'' (एमलामुल मौकीईन : २/११३)

काही परिस्थितीत दोघांमध्ये फरक न होण्याचे कारण

ज्या ठिकाणी पुरुषाच्या आर्थिक जबाबदाऱ्या कमी होतात, त्या ठिकाणी इस्लामने स्त्री आणि पुरुषादरम्यान फरक केलेला नाही. मृताच्या मागे संतती असल्यास त्याने मृताचे माता आणि पिता दोघांचा एक षष्ठांश (१/६) एवढा समान अधिकार ठेवला आहे. याचे एक प्रमुख कारण असे की संततीचा अधिकार प्रथम आहे. दुसरे कारण असे की ज्या व्यक्तीची संततीसुद्धा आपल्या संततीचा पिता वा पालक आहे. त्या ठिकाणी या मातापित्यांची जबाबदारीसुद्धा कमी आणि खूप कमी असते, इथपावेतो की त्यांच्या जबाबदाऱ्याच संपलेल्या असतात. त्यांचा दर्जा सामान्यत: आपल्या नातवंडांच्या पालकाचा असतो. मात्र मयत व्यक्तीस प्रथम अधिकार असलेली संतती नसल्यास आणि मृताच्या पित्यास संतती असल्यास - अर्थात मयतचे भाऊ बहीण असल्यास पित्याचा अधिकार आईपेक्षा जास्त असणार. कारण अशा स्थितीत पित्याच्या जबाबदाऱ्या पण जास्त असतात.

जवळच्या नातलगांचा अधिकार जास्त आहे

इस्लामने वारसाची विभागणी या तत्त्वाच्या आधारे केली आहे की रक्ताच्या नात्यामध्ये जो नातेवाईक मयताच्या जितक्या जवळचा असेल तेवढे त्याच्या अधिकारास प्राधान्य देण्यात येईल. दूरचे नातेवाईक अशा स्थितीतच हक्कदार असतील जेव्हा जवळचे नातेवाईक नसतील अथवा जवळच्या नातेवाईकांचा अधिकार त्यांना मिळाल्यावर उरलेली संपत्ती त्यांना नियमांनुसार मिळेल. या नियमानुसार जी स्त्री मयताच्या नात्यात सर्वांत जवळची असेल तिचा अधिकार इतरांच्या तुलनेत जास्त असेल. उदाहरणार्थ, मयत व्यक्तीस एक मुलगी व एक भाऊ आहे. अशा वेळी 'मयत'ची संपत्ती दोघांत समान वाटप होईल आणि एक मुलगी व मयतचे दोन भाऊ असल्यास मुलीस संपत्तीचा निम्मा भाग मिळेल आणि दोघा भावंडामध्ये संपत्तीचा निम्मा भाग वाटप होईल. जर दोन किंवा दोनपेक्षा जास्त मुली असतील तर त्यांचा वाटा दोन तृतियांश (१/३) असेल आणि एक व एकापेक्षा जास्त भाऊ असल्यास त्यांना केवळ एक तृतियांश (१/३) मिळेल.

या सविस्तर वर्णनामुळे एका आक्षेपाचे स्पष्ट खंडन होते की वारसाहक्काच्या बाबतीत स्त्रीबरोबर अन्याय झालेला आहे. याबाबतीत पुरुष आणि स्त्रीमध्ये दोघांतही भेदभाव पाळण्यात आलेला नाही. इस्लामने एकीकडे मयताच्या स्त्रीच्या नातेवाईकांना महत्त्व देण्यात आले तर दुसरीकडे पुरुषाच्या आर्थिक जबाबदाऱ्या समोर ठेवल्या आहेत. या आधारावर वारसाहक्कात स्त्रीचा अधिकार परिस्थितीनुसार कमी अधिक होत जातो. कधी कधी काही परिस्थितीनुसार स्त्री-पुरुषांचा अधिकार समान होतो. हे नाते आणि जबाबदाऱ्या या दोन्हीमध्ये कौशल्यपूर्ण समतोल आहे. हा समतोल इस्लामी शरीयतचे स्पष्ट वैशिष्ट्य आहे जे त्यास इतर धर्मांच्या तुलनेत व इतर विचारसरणीच्या तुलनेत वैशिष्ट्य प्रदान करते.

स्त्रीचा 'किसास'

(किसास म्हणजे 'हत्येचा बदला', बदल्याची हत्या, हत्या दंड) एखाद्या निर्दोष स्त्री व पुरुषाची हत्या केल्यास खुनी व्यक्तीस मृत्युदंड देण्यात येतो किंवा क्षमादानाच्या अवस्थेत मयताच्या नातेवाईकांना काही रक्कम अथवा द्रव्य मोबदल्याच्या स्वरुपात देण्यात येते. क्षमा करण्याचा अधिकार केवळ मृताच्या नातेवाईकांनाच असतो.

किसास खुनाचाही असू शकतो आणि जखमी केल्याचाही असतो. जीव घेण्याचा अथवा खून केल्याचा कीसास हा आहे की ज्या इसमाने हकनाक कोणाचा वध केल्यास त्यांच्या बदल्यात खुनाचा प्रतिवध करण्यात यावा. जखमा किंवा शारीरिक त्रास दिल्यास किंवा एखाद्या शारीरिक अवयवास क्षती पोहोचविल्यास त्याच्या अगदी समान स्वरुपात या बाबींचा बदला देण्यात येईल. 'किसास'चा हा कायदा मानवाच्या जीवाचे व शरीराचे रक्षण करण्यासाठी आहे. प्रश्न असा आहे की हा कायदा स्त्री व पुरुषासाठी समान स्वरुपाचा आहे की इस्लामने या बाबतीत यांच्या दरम्यान भेदभाव केला आहे? हा प्रश्न आमच्या विधी-ग्रंथामध्ये फार पूर्वीपासून चर्चेचा विषय आहे आणि आता जेव्हापासून स्त्री अधिकाराच्या गप्पा मारण्यात येत आहेत – तेव्हापासून तथाकथित स्त्री-हक्काच्या विद्वानांना परंतु एक प्रश्न चर्चेसाठी घोळायला मिळाला. येथे या गोष्टीचे प्रयत्न करण्यात येतील की या प्रश्नाचे सविस्तर वर्णन करुन प्रधान विचारधारेला सादर करण्यात येईल.

स्त्रीच्या प्राणाचा 'किसास' पुरुषाकडून

दिव्य कुरआनने 'किसास' चा आदेश या शब्दांत दिला आहे,

''हे श्रद्धावंतांनो! तुमच्यावर वध झालेल्यांच्या बरोबरीचा बदला अनिवार्य करण्यात आला आहे.'' *(दिव्य कुरआन, २ : १७८)*

याचे तात्त्विक कारण असे वर्णन करण्यात आले,

''हे ज्ञानीजनहो, मृत्यूदंडामध्ये (समाजाच्या सुरक्षिततेचे) जीवन आहे. आशा आहे कि ह्या कायद्याचे भंग करण्यापासून तुम्ही स्वत:ला वाचवाल.'' *(दिव्य कुरआन, २ : १७९)*

'तौरात'[१] च्या संदर्भाने म्हटले गेले आहे,

---

१. तौरात हा पैगंबर आदरणीय मूसावर अवतरित झालेला ग्रंथ आहे.

मी (स्वयं अल्लाहने) 'तौरात' 'ज्यू'साठी अवतरित झालेला ईश ग्रंथ) मध्ये 'ज्यू'वर हा आदेश अनिवार्य केला आहे की प्राणाच्या बदल्यात प्राण घेण्यात यावे. *(दिव्य कुरआन, ५ : ४५)*

''तौरातमध्ये आम्ही यहूदी लोकांसाठी हा आदेश लिहिला होता की प्राणाच्या बदल्यात प्राण, डोळ्यासाठी डोळा, नाकासाठी नाक, कानाबद्दल कान, दाताबद्दल दात आणि सर्व जखमांबद्दल बरोबरीचा बदला. मग जो किसास (हत्यादंड) ऐवजी दान (सदका) करील तर तो त्याच्यासाठी पापक्षालन (कफ्फारा) होय. आणि जे लोक अल्लाहद्वारे अवतरित केलेल्या कायद्याला अनुसरून न्यायनिवाडा करत नसतील तेच अत्याचारी होत.''

(दिव्य कुरआन, ५ : ४५)

या कायद्यानुसार पुरुषाने स्त्रीची हत्या केल्यास पुरुषाकडून 'किसास' (बदला) घेण्यात येईल आणि स्त्रीने पुरुषाचा 'वध' केल्यास स्त्रीकडून 'किसास' घेण्यात येईल. 'हदीस'मध्ये याची पुष्टी होते. एका हदीसमध्ये सविस्तरपणे म्हटले गेले आहे,

''पुरुषाने स्त्रीची हत्या केल्यास याच्या बदल्यात त्याचा वध करण्यात येईल.'' (संदर्भ : बैहकी, अल-सुननुल कुब्रा : ८/२८)

याची पुष्टी आणखीन बऱ्याच कथनांनुसार होते. 'सिहाह सित्ता' (सबळ पुरावा असलेले हदीसचे सहा ग्रंथ) मधील कथनात आहे की एका ज्यू धर्माच्या इसमाने एका अन्सार (मदीनाचे रहिवाशी) मुलीचे दागिने हस्तगत करण्याकरिता तिच्या डोक्यास क्षती पोहोचवून व तिचा खून करुन एका खड्ड्यात फेकून दिले. लोकांनी तिचे प्रेत पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या दरबारी आणले. ज्या लोकांवर खुनाचा संशय होता, त्यापैकी एकेकाचे नाव घेऊन त्यांची विचारपुस करण्यात आली व सर्वांनीच याचा (अर्थात खुनाचा) इंकार केला. परंतु या 'ज्यू' खुन्याचे नाव घेऊन बोलविण्यात आले, तेव्हा त्याने मान हलवूनच गुन्हा मान्य केला. यावर या खुन्याला याचे कारण विचारण्यात आल्यास त्याने बऱ्याच प्रयत्नानंतर हा गुन्हा मान्य केला आणि 'किसास'(खुनाच्या बदल्यात) मध्ये त्या खुन्याच्या डोक्यास दगडाने ठेचून वध करण्यात आला.

(बुखारी, किताबुदयास, मुस्लिम-अबू दाऊद, तिर्मिजी, निसाई)

इमाम नूदी यांनी सांगितले की या 'हदीस' मधून भरपूर नियम ज्ञात होतात. ते म्हणतात की,[1]

यापैकी एक असे की पुरुषाच्या किंवा स्त्रीच्या वधाच्या बदल्यात वध करण्यात येईल. यावर सर्वच विद्वानांचे मतैक्य आहे.

अबू दाऊद यांच्या हदीससंग्रहात एक कथन असे आहे;

''स्त्रीची 'दैयत' (खुनाचा आर्थिक मोबदला) (जर तिने अपराध केला असेल तर) तिच्या 'अस्बा' (मुले, नाती, भावंडे वगैरे) वर अनिवार्य होईल. 'अस्बा' म्हणजे ते लोक जे 'अस्हाबुल फरुज' (अर्थात मयताची पत्नी, माता-पिता, मुलगा व मुलगी) यांना त्यांचे निश्चित वाटे दिल्यानंतर तिच्या पूर्ण संपत्तीचे हक्कदार असतील. परंतु तिचा वध झाल्यास तिची मिळवलेली 'दैयत' (खुनाच्या द्रवाच्या वा संपत्तीच्या रुपात मिळालेला मोबदला) संपूर्ण वारसदारात वाटण्यात येईल आणि त्यांना 'किसास' घ्यावयाचा (खुनाचा बदला खून) असल्यास तिच्या खुन्यास ठार करु शकतात.[2]''

ते त्या स्त्रीच्या 'खुन्या'चा वध करु शकतात. 'इमाम निसाई' आणि 'इब्ने माजा' यांच्या ग्रंथामध्ये असलेल्या हदीसमध्ये तिच्या खुन्याबद्दल वापरलेले शब्दसुद्धा याचप्रकारे आहे. यावरुन स्पष्ट होते की 'स्त्री'च्या 'किसास' (खुनाचा बदला) मध्ये 'पुरुष-खुन्या'चा वध करण्यात येईल. मयत-स्त्रीच्या खुन्याला तिच्या वारसांचा अपराधी ठरविण्याचा विधिवत दर्जा स्पष्ट होतो. जणू तो केवळ मयत-स्त्रीचा खुनी नसून तिच्या पूर्ण वारसांचा खुनी आहे. त्यांना हा कायदेशीर अधिकार आहे की वाटल्यास तिच्या खुनाचा 'किसास' घ्यावा किंवा 'दैयत' (आर्थिक मोबदला) घेऊन खुन्यास माफ करावे.

---

१. शरेह मुस्लिम २/५८ इमाम शूकानी म्हणतात की या हदीस वरून असे ज्ञात होते की, मुस्लिमेतर व्यक्तीने मुस्लिम स्त्रिचा वध केल्यास 'कीसास' मध्ये खुन्याचा 'वध' करण्यात येईल. परंतु ही अडचण मात्र शिल्लक राहतेच की हाच नियम मुस्लिम खुन्या करिता आहे का नाही? या करिता शरीयतने मुस्लिमेतर आणि मुस्लिम मध्ये फरक केला आहे. खुनी मुस्लिम असल्यास 'कीसास' घेतला जाणार नाही (नीलुल अवतार : ७/१६२) परंतु ज्या फरकाच्या आधारावर शूकानी साहेबांनी शंका व्यक्त केली यावर सर्वांची सहमती नाही. हनफी पंथानुसार एका मुस्लिमाने मुस्लिम शासनात असलेल्या मुस्लिमेतर इसमाचा वध केल्यास 'कीसास' मध्ये मुस्लिम खुन्याचा वध करण्यात येईल. (हिदाया : ४/५५९)

२. अबू दाऊद, कीताबूल दयात, बाब दयातुल आजा.

सय्यदुत्ताबेईन हजर सईद बिन मुसैब सांगतात,

''पुरुषाचा स्त्रीच्या बदल्यात वध करण्यात येईल जर त्याने तिचा वध केला असेल.'' (बैहकी, अस्सननुल कुबरा : ८/२८)

इमाम बुखारी सांगतात,

''जाणकारांनी म्हटले आहे की पुरुष-खुन्याचा मयत-स्त्रीच्या बदल्यात 'वध' करण्यात येईल.''

(बुखारी-किताबुद्दयात, बाबुल कसास बैनुल रिजाल व निसा)

हेच मत चारही पंथांच्या विद्वानांचे अर्थात इमाम अबू हनीफा, इमाम मालिक, इमाम शाफई व इमाम अहमदचे आहे. (इब्ने कदामा, अल मुग्नी : ७१६७९)

'इमाम इब्ने बर' म्हणतात, यावर मतैक्य आहे की पुरुष-खुन्याकडून मयत-स्त्रीचा 'किसास' (बदला) घेण्यात येईल. पैगंबर सोबत्यांपैकी माननीय अली (रजि.) यांच्या बाबतीत येते की जर पुरुषाने स्त्रीचा वध केला तर मयत-स्त्रीच्या वारसदारांना याचा पूर्ण अधिकार आहे की ते तिचा किसास घेतील अथवा 'निम्मा दैयत' (मोबदला) देऊन वध करतील. (कारण स्त्रीची दैयत निम्मी आहे). जर त्याने स्त्रीची निम्मी दैयत दिली नाही तर त्यांना स्त्रीची दैयत मिळून जाईल. परंतु 'माननीय अली (रजि.)त्यांच्यामार्फत हे सिद्ध नाही. वास्तविक हे 'बसरा' शहराचे विद्वत्ते 'उस्मानुल बत्ती' यांचे कथन आहे.

(कतहुल बारी १२/१६० तफसीरे कबीर : २/१०८)

हे पण पाहायला मिळते की माननीय हसन बसरी आणि माननीय अता यांचे पण हेच मत होते जे सहमत विद्वानांचे होते.

(इब्ने-कदामा, अलमुगनी : ७/६७९)

याचा काही ठोस पुरावा नाही की स्त्रीची 'दैयत' पुरुषाच्या दैयतीच्या निम्मी असते. म्हणून पुरुषाकडून केवळ अशाच परिस्थितीत 'किसास' (बदला) घेण्यात येईल जेव्हा निम्मी दैयत (खुनाचा मोबदला) त्यास देण्यात येईल. कारण दोघांची 'कजफ'ची शिक्षा एकच आहे. स्त्रीने जर पुरुषावर 'व्यभिचाराचे' खोटे आरोप लावले तर तिला तीच शिक्षा देण्यात येईल जी या गुन्ह्यात पुरुषाला देण्यात येईल. पुरुषाला या शिक्षेच्या बदल्यात त्याच्याकडून कोणताच मोबदला घेता येणार नाही. 'किसास'मध्ये खुन्याची व नयताची किंमत पाहण्यात येत नाही. या कारणास्तव कोण्या व्यक्तीचा खून पूर्ण समूहाने मिळून केल्यास 'किसास'मध्ये त्या पूर्ण समूहाची हत्या करण्यात येईल. (अल-मुगनी : ७/६७९)

'इमाम शोकानी' सांगतात की 'किसास'चा उद्देश आणि तात्त्विक कारणाचीसुद्धा सहमत विद्वानाकडून पुष्टी होते. 'किसास'चा तात्त्विक फायदा हा आहे की मानवाचे हकनाक रक्त सांडू नये आणि इतरांच्या अन्याय व

अत्याचारापासून त्यांचे संरक्षण व्हावे. जर पुरुष खुन्याकडून मयत स्त्रीचा 'किसास' न घेतल्यास तिच्या जीवितास धोका असण्याचे कितीतरी कारणे व निमित्त आहेत : यापैकी एक कारण तिला 'वारसाहक्कापासून वंचित करणे' हेदेखील आहे. ज्या व्यक्तीस वारसाहक्क द्यायचा नसल्यास तो तिचा काटा काढण्यास मागे पुढे पाहणार नाही. दुसरे कारण 'इस्लामपूर्वीच्या पथभ्रष्ट काळातील न्यूनगंड व अहं' हेसुद्धा आहे. विशेषकरुन अशा स्थितीत जेव्हा त्यांच्याकडून थोडीशीसुद्धा चूक झाली असल्यास ती असहनीय होणार. अशाच चुकीच्या जाणिवांमुळे त्या काळात मुलींना जिवंत गाडण्यात येत असे. (तसे पाहिल्यास पुरुषीय अहं व न्यूनगंडाचे उदाहरण आजच्या प्रगत काळात व स्त्री-स्वातंत्र्याच्या चळवळीच्या अत्याधुनिक युगातसुद्धा भ्रूणहत्येच्या स्वरुपात पाहावयास मिळतच आहे असो!)

तिसरे कारण स्त्रीचे दौर्बल्यही आहे. खूनी-पुरुषाला कधीच अबला स्त्रीची भीती वाटत नाही, कारण तिच्यात पुरुषीय क्रौर्याचा सामना करण्याची शारीरिक व मानसिक शक्ती नसते. म्हणून स्त्रीचा किसास घेण्यास नेभळटपणा असल्यास व निष्काळजीपणा असल्यास अन्याय व अत्याचारात वाढ होऊन स्त्रियांच्या खुनाचे प्रमाण निश्चितच वाढणार. (नीललवतार : ७/१६४)

स्त्रीच्या खुनाचा स्त्रीकडून कीसास

या सविस्तर वर्णनावरुन स्पष्ट होते की या गोष्टीवर सर्व सहमती आहे अथवा कमीतकमी मतैक्य असलेल्या विद्वानांची व चार इमामंची संपूर्ण सहमती आहे की पुरुषाच्या खुनात खुनी स्त्रीकडून व स्त्रीच्या खुनात खुनी पुरुषाकडून किसास घेतला जाईल. आता एक प्रश्न असा की खुनी व मयत दोन्ही स्त्रिया असल्यास त्यांच्या बाबतीतसुद्धा किसासचा हाच प्रकार राहील काय? याचे उत्तर स्पष्ट आहे. जर एका स्त्रीच्या खुनाच्या किसासमध्ये खुनी पुरुषाचा वध केला जाऊ शकतो. तेव्हा स्त्रीच्या खुनाच्या किसासमध्ये स्त्री-खुन्याची हत्या का केली जाऊ शकत नाही. दिव्य कुरआनने स्पष्ट शब्दांत सांगितले की स्त्रीच्या बदल्यात स्त्रीचा वध केला जाईल. (सूरह बकरा : १७८) करिता धर्मविधीच्या विद्वानांदरम्यान यात कोणतेच मतभेद नाहीत. यावरुनच हनफी पंथामध्ये हा निर्णय आहे की स्वतंत्र स्त्रीने दासीचा जरी खून केला तर खुनी स्त्रीचा वध करण्यात येईल. (रद्दुल मुख्तार अलल दुरै मुख्तार : ५/४७१)

स्त्रीच्या जखमांचा 'किसास'

आता आपण तिला देण्यात येणाऱ्या शारीरिक क्षती व जखमांच्या किसासवर

उदाहरणार्थ, पुरुषाने स्त्रीचा आणि स्त्रीने पुरुषाचा हात तोडल्यास 'किसास'मध्ये त्यांचा हात तोडण्यात येईल. परंतु जर नुकसान भरपाईची अशी स्थिती समोर आली की ज्यामध्ये समान किसास घेणे शक्य नसेल तर 'दैयत' (नुकसानभरपाई) घेण्यात येईल.

माननीय अनस (रजि.) कथन करतात,

''त्यांची आत्या 'सबिया' यांनी एका मदीनावासी मुलीचे दात पाडले. 'रूबिया'च्या परिवारजनांनी 'किसास'मध्ये 'रूबिया'चे दात न पाडण्याची भूमिका घेतली व म्हणाले की त्यांचा हा अपराध माफ करावा अथवा 'दैयत' (नुकसानभरपाई) घ्यावी. हे प्रकरण पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या दरबारी सादर करण्यात आले. तेव्हा त्यांनी 'किसास' (दातांच्या बदल्यात दात) चा आदेश दिला. यावर माननीय अनस (रजि.) यांचे काका अर्थात रूबिया यांचे भाऊ म्हणाले, ''हे पैगंबर (स.)! अल्लाहची शपथ! रुबियाचे दात पाडण्यात येणार नाहीत. (कारण त्यांना वाटत होते की दात पडलेल्या मुलींचे परिवारजन दयाळू असल्याने ते रूबियाचा अपराध माफ करतील.) परंतु अल्लाहचे पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले की ''हे अनस! ईशग्रंथाचा आदेश 'किसास'चा आहे. तेव्हा 'किसास' अवश्य घेण्यात येईल.'' थोड्या वेळानंतर क्षतीग्रस्त मुलीचे परिवारजन 'किसास'च्या ठिकाणी 'दैयत'करिता तयार झाले. यावर पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाहचे काही दास असे आहेत की त्यांनी शपथ घेतल्यावर अल्लाह ती पूर्ण करतो!''

(बुखारी, किताबुस्सुलह, बाबुस्सुलह फिद्दैयत किताबुल्तफसीर (सूरह बकरा) बाब या अय्युहल लजीना आमनु कुतीब अलैकुमुल कीस्सास (सूरह मायदा) बाब कौलुल जलह कसास अबू दाऊद, किताबुदैयात, बाबुल किसास फिस्सीन)

हे बुखारी वगैरेचे कथन आहे. यावरून सिद्ध होते की एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीस जखमी केल्यास 'किसास' घेण्यात येईल. मुस्लिमचे कथन आहे,

''रबीअची बहीण उम्मे हारेसाने एका व्यक्तीस जखमी केले. हे भांडण पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या दरबारी गेले. पैगंबरांनी सांगितले की तिच्याकडून 'किसास' घेण्यात यावा. यावर रबीअच्या आईने म्हटले, ''उम्मे हारेसा कडून किसास घेतला जाईल? अल्लाहची शपथ! असे होणार नाही.'' त्यावर पैगंबर (स.) उत्तरले, ''हे उम्मे रबीअ, तुम्ही कशा गोष्टी करतात? ईशग्रंथाचा कायदा आहे की 'किसास' द्यावा लागेल. परंतु जो माणूस जखमी झाला होता, त्याचे परिवारजन दैयत (नुकसान भरपाई) घेण्यास तयार झाले.'' यावर अल्लाहचे पैगंबर (स.) उत्तरले की ''अल्लाहचे काही दास असे आहेत की त्यांनी शपथ ग्रहण केल्यास अल्लाह त्यांची

सविस्तर चर्चा करू या. याचे स्वरुपसुद्धा जीव घेण्याच्या स्वरुपाप्रमाणेच आहे. १) स्त्रीकडून पुरुषाचा 'किसास' घेण्यात यावा, २) पुरुषाकडून स्त्रीचा 'किसास' घेण्यात यावा, ३) स्त्रीचा स्त्रीकडून 'किसास' घेण्यात यावा.

दिव्य-कुरआनात आहे,

''तौरातमध्ये आम्ही यहूदी लोकांसाठी हा आदेश लिहिला होता की प्राणाच्या बदल्यात प्राण, डोळ्यासाठी डोळा, नाकासाठी नाक, कानाबद्दल कान, दाताबद्दल दात आणि सर्व जखमांबद्दल बरोबरीचा बदला. मग जो किसास (हत्यादंड) ऐवजी दान (सदका) करील तर तो त्याच्यासाठी पापक्षालन (कफ्फारा) होय. आणि जे लोक अल्लाहद्वारे अवतरित केलेल्या कायद्याला अनुसरून न्यायनिवाडा करत नसतील तेच अत्याचारी होत.''

(दिव्य कुरआन, ५ : ४५)

प्रश्न असा आहे की पुरुषाने स्त्रीचा व स्त्रीने पुरुषाचा वध केल्यास ज्याप्रमाणे त्यांचा 'किसास' घेण्यात येतो - तसाच 'किसास' शारीरिक क्षती पोहचविण्याचा घेण्यात येईल का? अथवा या दोन्हीचे नियम वेगवेगळे आहेत?

'माननीय अब्दुल्लाह बिन अब्बास (रजि.) सांगतात,

''अरब समाजात स्त्रीच्या हत्येच्या 'किसास'मध्ये पुरुषांची हत्या करण्यात येत नव्हती. परंतु जर स्त्रीने पुरुषाचा खून केल्यास 'किसास'मध्ये तिचा खून करण्यात येत असे. या आयतीत स्पष्ट करण्यात आले की मुस्लिम पुरुष व मुस्लिम स्त्री जर ते स्वतंत्र असतील तर ते या बाबतीत समान दर्जाचे आहेत. एकाने दुसऱ्याचा वध केल्यास अथवा शारीरिक इजा पोहोचविल्यास त्यांचा समान दर्जात्मक 'किसास' घेतला जाईल.[१]''

ईमाम नूदी सांगता की पैगंबर सोबत्यांच्या व त्यांच्या सोबत्यांच्या नंतरच्या धर्मपंडितामध्ये सहमत विद्वानांनी या आयतीतून सिद्ध केले की 'किसास'चा हा कायदा स्त्री आणि पुरुषादरम्यानसुद्धा चालू राहील. यापैकी दुसऱ्यांच्या खुन्यांचा 'वध' करण्यात येईल तसेच शारीरिक इजा व नुकसान पोहोचविल्यास त्याकडून अगदी या इजा व नुकसानीसमान 'किसास' घेण्यात येईल. (शरह-ए-मुस्लिम)

---

१. हे सुद्धा सांगतात की हेच नियम गुलाम (दास) आणि लौंडी (दासी) च्या दरम्यान आहेत. (संदर्भ- इब्ने जरीर तफसीर २/६०) दास आणि दासी यांचा प्रश्न सध्या चर्चेचा विषय नाही. दुसऱ्या वेळी यावर चर्चा करू या.

शपथ पूर्ण करतो.''

इमाम नूदी यांनी सांगितले की, या हदीसमधून कितीतरी बाबी लक्षात येतात.[१]

''यावरून एक गोष्ट ही सिद्ध होते की पुरुष व स्त्री दरम्यान 'किसास' होईल.'' (शरह मुस्लिम २/५९)

आता सहाबा (पैगंबरसोबती) व ताबेईन (सोबत्यांचे सोबती) यांचे काही कथन प्रस्तुत करण्यात येत आहेत की ज्यामुळे हे सिद्ध होते की स्त्रीचा किसास पुरुषाकडून व पुरुषाचा किसास स्त्रीकडून घेण्यात येईल.

इमाम बुखारींनी आदरणीय उमर (रजि.) यांचे कथन केले,

''स्त्रीने पुरुषाची हत्या केल्यास अथवा या पेक्षा कमी दर्जाची शारीरिक इजा पोहोचविल्यास (मयत पुरुषाचा अथवा जखमी पुरुषाचा) तिच्याकडून 'किसास' घेण्यात येईल.'' (बुखारी, किताबुद्दयात, बाबुल किसास बैनुर्रिजाल व न्निसा)

ज्याअर्थी (अपराधी) स्त्रीकडून पुरुषाच्या वध आणि जखमांचा किसास घेण्यात येईल. त्याअर्थी (क्षतिग्रस्त अथवा मयत) स्त्रीचा पण पुरुषाकडून 'किसास' घेण्यात यायला पाहिजे. कारण माननीय उमर (रजि.) सांगतात,

''स्त्री आणि पुरुषांचे जखम समान आहेत.'' (फतदुलबारी)

माननीय उमर बिन अब्दुल अजीज यांनी सांगितले,

''स्त्री व पुरुषा दरम्यान 'किसास'चा कायदा लागू होईल, इथपावेतो की प्राणांचे प्रकरणसुद्धा.'' (फतहुल बारी)

---

१. मुस्लिम किताबुल कसामा, बाब इस्बातुल कसास फिलइन्सान इमाम बुखारींनी हे कथन भाषांतराच्या प्रकरणात कथित केले आहे. (किताबुद्दयात) दोन्ही कथनाच्या वर्णनात जो फरक आहे. याच्या आधारे इमाम बैहकी सांगतात की ही घटना एक नसून दोन विविध घटना आहेत. परंतु इब्ने तुर्कमानीहे दोन घटना असल्याचे मान्य करीत नाही. (अस्सुननुल कुबरा ८/३९-६४) 'इब्ने हजम'चे मत आहे की या एकाच स्त्रीच्या दोन घटना आहेत. एका घटनेत तिने एकास जखमी केले तेव्हा पैगंबर मुहम्मद (स.) यांनी 'दैयत' (नुकसान भरपाई) चा निर्णय दिला. दुसऱ्या घटनेत दात तोडल्यामुळे 'किसास' (बदला) चा निर्णय दिला. पहिल्या घटनेत शपथ खाणारी तिची आई होती. आणि दुसऱ्या घटनेत भावाने शपथ खाल्ली होती. (फतहुलबारी १२/१७३-१७४) परंतु हे वर्णन कथनाशी साम्य साधत नाही. 'इमाम नूदी' यांनी पण या दोन घटना असल्याचे मान्य केले. (शरेह मुस्लिम २/५९)

ताबेईनच्या काळात प्रसिद्ध विधिज्ञ 'सुबआ (अर्थात माननीय सईद बिन मुसिय्यब, उरवा बिन जुबैर, कासिम बिन मुहम्मद अबू बकर बिन अब्दुर्रहमान, खारजा बिन जैद बिन साबित, उबैदुल्लाह बिन अब्दुल्लाह आणि सुलैमान बिन यसार (रजि.) आणि याचसारख्या विद्वान व विधिज्ञांच्या बाबतीत 'अबू जन्नाद' यांनी सांगितले,

''स्त्रीकडून पुरुषाचा 'किसास' घेण्यात येईल. डोळ्याच्या बदल्यात डोळे, कानाच्या बदल्यात कान, हर प्रकारच्या जखमेचा बदला त्याच्या समान असेल. (याचप्रमाणे पुरुषाकडून स्त्रीचा किसास घेण्यात येईल) आणि पुरुषाने जर तिचा वध केल्यास त्याचासुद्धा वध करण्यात येईल.'' (अलसुननलु कुबरा : ८/४०)

वरील सूरह मायदाच्या आयतीच्या आधारे सिद्ध करताना 'इमाम मालिक' यांनी सांगितले,

''स्त्रियांच्या दरम्यान अशाच प्रकारचा 'किसास' होईल, ज्याप्रमाणे पुरुषांदरम्यान आहे आणि पुरुष व स्त्रियांदरम्यानसुद्धा 'किसास' होईल.''

इब्ने कदामा हंबली सांगतात, ज्या व्यक्तींदरम्यान एक दुसऱ्यांच्या प्राणांचा किसास घेण्यात येतो, त्यांच्यात जखमांचा 'किसास'सुद्धा एक दुसऱ्यांशी घेण्यात येईल. हेच मत 'इमाम मालिक, इमास सूरी, इमाम शाफई, इसहाक-बिन-राविया, अबू सूर आणि इमाम अहमद यांचे आहे. (अल मुग्नी : ६७९-६८०)

या नियमानुसार की पुरुषाच्या 'किसास'मध्ये स्त्रीचे आणि स्त्रीच्या किसासमध्ये पुरुषाचे प्राण घेण्यात येते त्याचप्रमाणे एक दुसऱ्यांना जखम व क्षती पोहोचविल्यास त्याचा पण किसास घेण्यात येईल.

हनफी पंथानुसार स्त्री व पुरुषांदरम्यान प्राणांचा किसास तर आहे. परंतु जखमांचा किसास नाही. अर्थात यांपैकी कोणीही एक दुसऱ्याची हत्या केल्यास किसासमध्ये त्यांचे प्राण घेण्यात येईल. परंतु स्त्रीने पुरुषाचा व पुरुषाने स्त्रीचा हात कापल्यास किसासमध्ये कुणाचाच हात कापला जाणार नाही. याऐवजी 'दैयत' (नुकसान भरपाई) घेण्यात येईल. वध केल्याने स्त्रीचे प्राण जाईल व पुरुषाचेही प्राण जाईल. म्हणून दोघांचा 'किसास' घेण्यात येईल. परंतु अवयवाच्या बाबतीत मात्र थोडेस वेगळे स्वरुप आहे. याचे स्वरूप आर्थिक मोबदल्याचे आहे. आर्थिक संपत्तीसुद्धा प्राणाच्या रक्षणाकरिता आहे. अवयवसुद्धा प्राणाच्या रक्षणासाठीच आहेत. यामध्ये 'किसास' केवळ अशा स्थितीत होईल की यांची किंमत समान असेल.

परंतु शरीयतने स्त्रीच्या अवयवाची दैयत पुरुषाच्या अवयवाच्या दैयतपेक्षा कमी ठेवली आहे. ज्या वेळी दोघांच्या किंमतीमध्ये फरक येतो तेथे 'किसास' होणार

नाही.

सूरह मायदाच्या आयत क्र.४५ मध्ये किसासचा आदेश हा केवळ स्वरुपाचा नाही. ही गोष्ट सर्व मान्य आहे की 'हरबी' (अर्थात निधर्मी शासन असलेल्या राष्ट्राचा मुस्लिम नागरिक) किंवा 'मस्तामिन'चा किसास घेण्यात येणार नाही. ज्याअर्थी आयतीमधून यास वगळण्यात आले आहे, त्याअर्थी 'हदीस'च्या माध्यमाने स्त्रीलासुद्धा वगळण्यात येऊ शकते.

ज्याअर्थी असे म्हटले गेल्यास की पुरुषाचे हात लहान मोठे असतात आणि शक्ती व ऊर्जेच्या मानाने त्यांच्यात फरक असतो परंतु एवढे असूनही त्यांच्या दरम्यान 'किसास'मध्ये फरक केला जात नाही. तेव्हा स्त्री आणि पुरुषाच्या हातात तर फरक आहेच. मग याचा का विचार होऊ नये. याचे उत्तर असे आहे की स्त्री आणि पुरुषाच्या अवयवाच्या नुकसान भरपाईत फरक तर केला गेला आहे. म्हणून यावर विश्वास करता येईलही. परंतु पुरुषांच्या हातात असणाऱ्या फरकावर विश्वास करता येणार नाही. कारण याचा कोणताच नियम नाही. याकरिता त्यांना एक दुसऱ्याच्या समान गणले जाईल. (हिदया : ४/५६६, ५/२६७)

एक आरोप हासुद्धा करण्यात येतो की अवयवांच्या किसासमध्ये दैयतच्या समानतेचा आधार घेतल्यास कमीतकमी स्त्रीकडून पुरुषाचा किसास घेणे चुकीचे होणार नाही. कारण पुरुषाच्या अवयवाची 'दैयत' स्त्रीच्या दैयतपेक्षा जास्त आहे. जी वस्तू जास्त मोलाची आहे, तिचा किसास कमी मोल असलेल्या वस्तुंशी का घेऊ नये? उदाहरणार्थ, स्त्रीने पुरुषाचा हात कापल्यास किसासमध्ये तिचा हात कापणे अतिशय योग्य होईल. कारण पुरुषाच्या हाताची दैयत स्त्रीच्या हाताच्या दैयतसमान नसून जास्त आहे. वस्तुत: हनफी विधीमध्ये याला पण खरे ठरविण्यात आले नाही. (इब्ने क़दामा, अलमुग़नी : ७/६८०)

हनफी विधीचे प्रसिद्ध मत हेच आहे. परंतु हनफी पंथातसुद्धा एक मत याच्या योग्य असण्याच्या पक्षात मिळते. यानुसार स्त्रीने पुरुषाचा हात कापल्यास किसासमध्ये तिचा हात कापला जाऊ शकतो. (दुर्रूल मुख्तार : ५/४७७) हे मत स्वीकार केल्यास या आरोपाचे आपोआप खंडन होईल.

डोके व चेहऱ्यांच्या जखमांच्या बाबतीत [१] हनफी विधीमध्ये असे मत आहे की यामध्येसुद्धा स्त्री आणि पुरुषा दरम्यान 'किसास' होणार नाही. कारण

---

१. या जखमांना 'शजाज' असे म्हणतात. याचे प्रकार, नियम कोणत्या प्रकारात 'कीसास' वाजिब (अनिवार्य) होतो आणि कोणत्या प्रकारात 'दैयत' याच्या सपशेल माहीतीस्तव (हिदाया : ४/५८६ - ५८८)

'किसास'मध्ये त्याने आणि किंमत समान असणे आवश्यक आहे आणि स्त्री व पुरुषांदरम्यान ही समानता नाही. परंतु एकमत असेसुद्धा आहे की या जखमा वा क्षतीमध्ये स्त्री-पुरुषांदरम्यान 'किसास' होईल. कारण की अवयवाच्या 'किसास' आणि जखमांच्या व क्षतीच्या 'किसास'मध्ये फरक आहे. अवयव संपूर्ण कापण्यात आल्यामुळे त्यापासून होणारा वापर व त्याचे फायदे संपून जातील आणि त्यात व्यंग येते अथवा अंपगत्व येते. परंतु चेहऱ्यावर होणाऱ्या जखमामुळे चेहऱ्याचा वापर व फायदे कमी होत नाहीत. मात्र यामुळे व्यंग निर्माण होते. यामध्ये स्त्री व पुरुष दोघे समान आहेत. (रद्दुल मुख्तार अलल 'दुर्रूल' मुख्तार)

केवळ चेहऱ्याच्या जखमांमुळेच व्यंग निर्माण होत नसून अवयव कापण्यात आल्यामुळेसुद्धा व्यंग निर्माण होते. मग ज्याअर्थी व्यंग निर्माण होण्याच्या आधारावर चेहऱ्याच्या जखमांचा 'किसास' घेतला जाऊ शकतो. त्याअर्थी अवयवयांचासुद्धा किसास घेण्यात यायला पाहिजे. असो! वापर आणि फायद्याचा प्रश्न सोडून केवळ व्यंगतेच्या पैलूला समोर ठेवल्यास हनफी पंथाच्या मतावर आणखीनच विचार करण्याची गरज निर्माण होते. या बाबतीत इतर विद्वान आणि मतैक्य असलेल्या विद्वानांची विचारसरणी जास्त स्वीकारणीय आणि दमदार वाटते. अर्थात हे की अवयवांच्या 'किसास'मध्येसुद्धा स्त्री व पुरुषाच्या दरम्यान कोणताही फरक नाही.

स्त्रीची 'दैयत'

हकनाक कोणाच्या प्राणाचा बळी घेणे अथवा त्यास शारीरिक क्षती पोहोचविण्यास शरीयतने जो आर्थिक मोबदला ठरविला आहे. यास 'दैयत' असे म्हणतात. इस्लामच्या दैयतविषयक कायद्यावर एक आक्षेप असा घेण्यात येतो की यामध्ये स्त्री व पुरुषांदरम्यान पक्षपाती धोरण अवलंबिण्यात आले आहे. ह्यामध्ये वास्तविकता नाही.

विधी तज्ज्ञात मतभेद

ही एक विधीपूर्ण चर्चा आहे. यामध्ये तज्ज्ञांची मते आणि पंथ वेगवेगळे आहेत. खाली त्याचा तपशील आणि अढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

स्त्रीची 'दैयत' पुरुषाच्या 'दैयत'पेक्षा निम्मी आहे

हनफी विधी तज्ज्ञांच्या मते स्त्रीची 'दैयत' मग ती प्राणाची असो किंवा अवयवांची असो, पुरुषाच्या 'दैवत'पेक्षा निम्मी आहे. (हिदाया : ४/५८६)

हेच मत इमाम शाफई, सुफियान सूरी, इमाम लैस व अबूसूर वगैरेंचे आहे.
(बदायतुल मुजतहिद : २ / ४६३, अलमुगनी ७/७९७)

याचा पुरावा माननीय मआज बिन जबल (रजि.) यांनी कथन केलेली 'हदीस' आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

''स्त्रीची दैयत पुरुषाच्या दैयतीपेक्षा निम्मी आहे.''
(बैहकी, अस्सुननुल कुबरा : ८/९९)

या कथनाची सनद कमजोर आहे. (बैहकी, अस्सनुमुक कुबरा) मात्र या बाबतीत माननीय अली (रजि.) यांनी सांगितले आहे,

''स्त्रीच्या जखमांची दैयत पुरुषाच्या दैयतच्या निम्मी आहे. मग ती कमी असो वा जास्त.'' (मागील संदर्भानुसार)

इब्राहीम नखई हे माननीय उमर (रजि.) व माननीय अली (रजि.) या दोघांचे कथन कथित करतात,

''स्त्रीची दैयत पुरुषाच्या दैयतीपेक्षा निम्मी आहे. मग ती प्राणाची असो त्यापेक्षा कमी नुकसानीची असो.'' (अस्सुनतुल कुबरा ८/९६, इमाम बैहकी

म्हणतात की ही 'रिवायत' खंडित आहे. परंतु वरील कथनाचे समर्थन करते. माननीय उमर (रजि.) कडून विविध कथने मिळतात. अस्सनुनुलकुबरा : ८/९७)

हेच मत माननीय अब्दुलल्लाह बिन उमर (रजि.) आणि माननीय अब्दुल्लाह बिन अब्बास यांचेसुद्धा आढळते. हाफीज इब्ने हजर सांगतात की मला त्यांचे हे मत कोठेच आढळले नाही. (अलतल्खीसुल जबीर : २/३४९)

आता प्रश्न असा आहे की स्त्रीची दैयत ही पुरुषाच्या दैयतपेक्षा निम्मी का आहे? याचे उत्तर असे देण्यात येते की पुरुष हा परिवाराचा निर्वाहक व कर्ताधर्ता असतो आणि त्यांचा आर्थिक बोजा उचलतो. म्हणून त्याच्या मृत्यूमुळे परिवाराचे आर्थिक नुकसान हे स्त्रीच्या मृत्यूमुळे होणाऱ्या नुकसानीपेक्षा कितीतरी जास्त असते. म्हणून स्त्रीच्या दैयतपेक्षा पुरुषाची दैयत द्विगुणित ठेवण्यात आली आहे.

'रशीद रजा मिस्त्री' म्हणतात की,

''या प्रकरणात मूलभूत गोष्ट ही आहे की पुरुषाच्या मृत्यूमुळे त्याचे परिवारजण ज्या फायद्यापासून वंचित होतात, ते त्या फायद्यापेक्षा खूप मोठे आहे ज्यापासून त्यांना स्त्रीच्या मृत्युमुळे वंचित व्हावे लागते. करिता 'मिरास' (अर्थात वारसाहक्काची संपत्ती) मध्ये पुरुषाचा वाटा दुप्पट आहे, त्याचप्रमाणे 'दैयत'सुद्धा त्याची दुप्पट ठेवण्यात आली आहे.''

आणखी एक गोष्ट सांगण्यात आली आहे, ती अशी,

''इस्लामी कायद्यानुसार काही महत्त्वाच्या धार्मिक नेतृत्वासाठी पुरुषालाच योग्य ठरविण्यात आले आहे. उदाहणार्थ, नमाज आणि हजची इमामत तसेच शासनाचे नेतृत्व, लष्करी सेवा, राज्यांची सीमासुरक्षा यासारख्या सामूहिक जबाबदाऱ्या पुरुषावरच टाकण्यात आल्या आहेत. केवळ जागतिक व्यवहारातसुद्धा अर्थात उद्योग व्यापार जे मानवाच्या जीवनपूर्ततेसाठी आवश्यक आहेत. त्याचाच वाटा जास्त आहे. अशा रीतीने पुरुषाच्या हत्येमुळे केवळ परिवाराचे नसून पूर्ण समाजाचे नुकसान आहे. हे नुकसान स्त्रीच्या हत्येमुळे होणाऱ्या नुकसानीपेक्षा जास्त आहे. म्हणून स्वभावात: त्याची दैयत स्त्रीच्या दैयतपेक्षा द्विगुणीत ठेवण्यात आली आहे.'' (एअलामुल मोकेईन)

यात शंकाच नाही की या सैध्दान्तिक पैलूमध्ये खूप दम आहे. परंतु शरीयतच्या नियम व आदेशाचा निर्णय केवळ बुद्धिवादाच्या आधारवर नसून त्यास कुरआन व पैगंबराच्या चरित्राच्या दमदार आधाराची गरज असते. या प्रश्नाच्या बाबतीत ज्या रिवायती (कथन) व पैगंबर काळातील झालेल्या न्याय निवाड्याची साक्ष देण्यात येते ते काही जास्त दमदार नाहीत.

एक तृतियांश दैयतच्या पुढे स्त्रीची दैयत निम्मी आहे.

इमाम मालिक आणि इमाम अहमद वगैरेंच्या मतानुसार एक तृतियांश 'दैयत'च्या पुढे स्त्रीची दैयत पुरुषाच्या दैयतीच्या निम्मी असेल.

(अल मुगनी : ७/७९७-७९८)

याचा आधार हा आहे की माननीय अब्दुल्लाह बिन आस (रजि.) यांनी कथन केलेली पैगंबरवाणी आहे की पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे,

''स्त्रीची दैयत पुरुषाच्या दैयतीसमान आहे. इथवर की तिची दैयत एक तृतियांशपर्यंत पोहचते.'' (निसाई अबवाबुल कसासा, अकलुल मरात, दार कुतनी, किताबुल हुदु दुद दैयात पृष्ठ ३२६, ३२७) हे कथन पण दुर्बल आहे. [१]

या मताचे समर्थन माननीय जैद बिन साबित (रजि.) यांच्या कथनावरून होते. ते सांगतात,

''पुरुष आणि स्त्रीच्या जखमांची 'दैयत' एक तृतियांशपर्यंत समान आहे. यापेक्षा वाढल्यास स्त्रीची दैवत पुरुषाच्या दैयतपेक्षा निम्मी असेल.''

(बैहकी : ८/९६)

अशाच प्रकारचे कथन माननीय उमर (रजि.) यांचेसुद्धा आहे.

(मागील संदर्भानुसार)

माननीय सईद बिन मुसैब (रजि.) यांनी सांगितले की एक तृतियांश दैयतपर्यंत स्त्री आणि पुरुषाची दैयत समान आहे. मग ती बोटांची असो किंवा दातांची असो. शरीराच्या जखमांची असो अथवा डोक्याच्या जखमांची असो. (यानंतरची दैयत पुरुषाच्या दैयतच्या निम्मी आहे.)

इमाम मालिक यांनी सांगितले की इमाम जहरी आणि इमाम उरवा बिन जुबैर यांचे पण असेच मत आहे जे माननीय सईद बिन मुसैब यांचे आहे.

(मुअत्ता-ए-इमाम मालिक, किताबुल अकूल बाब अक्लुल मरात)

असे म्हटेल जाते की मतैक्य असलेल्या मदीनावासी विद्वान आणि ताबेईनचे प्रसिद्ध विधीतज्ज्ञ माननीय उमर बिन अब्दुल अजीज , इमाम लैस, कतादा वगैरेंचे पण हेच मत आहे. (जरकावी, शरेहुल मुअत्ता ४/३४, 'इब्ने कदामा' यांनी तर हे पण

---

१. संदर्भ बैहकी ८/९६ अलताअलीकुल मुगनी पृष्ठ ३२७ थोर विद्वान जरकावी म्हणतात की याची सनद कमकुव्वत आहे. (शरेहुल जरकानी अलल मौत्ता : ४/३४)

लिहिले आहे की यावर साहबींच्या काळात सर्व सहमती होती. फक्त माननीय अली (रजि.) यांचे मत याविरुद्ध व्यक्त करण्यात येते. परंतु तेसुद्धा त्यांच्या स्वकथनावरून सिद्ध नाही. (अल मुगनी ७/७९८) यावरून हेच म्हणता येईल की सर्व सहमतीचा दावा जितका सोपा आहे. तेवढा सिद्ध करण्यासाठी कदाचित सोपा नाही.)

काझी इब्ने रशद मालिकी या पुराव्याच्या बाबतीत असे म्हणतात की प्रथम उल्लेखित समूहात इमाम मालिक वगैरे आहेत. ज्यांचा विश्वास या बाबतीत केवळ काही कथित हदीसवरच आहे. (बदायतुल मुजतहिद : २/४६३)

यांच्या सनदींची अशी दुर्गत आहे. आता यावर बुद्धीसंमत विचार करू या. प्रश्न असा आहे की यामध्ये कोणता फायदेशीर पैलू आहे की एक तृतियांश दैयतपर्यंत स्त्री आणि पुरुष दोघांना समान लेखण्यात यावे आणि एक तृतियांशनंतर दोघांमध्ये पक्षपात करण्यात यावा की स्त्रीची दैयत पुरुषाच्या दैयतच्या केवळ निम्मी गणली जावी.

याचे उत्तर असे देण्यात आले की एक तृतियांश दैयतचेसुद्धा निम्मे करण्यात आल्यास त्याची उपयुक्तता कमी होते आणि स्त्रीच्या झालेल्या नुकसानीची भरपाई होणार नाही. याकरिता एक तृतियांशपर्यंत पुरुष आणि स्त्रीमध्ये फरक करण्यात आला नाही. मात्र यानंतर फरक करण्यात आला. (एलामुलमोअफईन : २/११२)

उपरोक्त कथनांना जरी स्वीकारण्यात आले तरी हे उत्तर प्रत्यक्षात अतिशय बुद्धीसंमत वाटते परंतु यावर आणखी एक प्रश्न निर्माण होतो. तो असा की या नियमानुसार क्षती व शारीरिक जखमांवर स्त्रीला एक तृतियांश दैयत मिळते आणि यापेक्षा जास्त जखमा तिची दैयत एक तृतियांशपेक्षा कमी होते. वस्तुत: ही एक बौद्धिक मागणी आहे की स्त्रीच्या नुकसानीच्या प्रमाणात तिच्या दैयतमध्ये वाढ व्हावयास पाहिजे. तेव्हा 'मुअत्ता-ए-मालिक' ग्रंथातील हे कथन करतात की रबिया बिन अब्दुर्रहमान आणि माननीय सईद बिन मुसैयिब यांच्या दरम्यान याविषयी झालेला संवाद खाली देत आहोत.

रबिया : आदरणीय! स्त्रीच्या एका बोटाची दैयत किती असेल?

सईद बिन मुसैयिब : दहा उंट!

रबिया : दोन बोटांची दैयत?

सईद बिन मुसैयिब : वीस उंट!

रबिया तीन बोटांची दैयत?

सईद बिन मुसैयिब : तीस उंट!

रबिया : बरे! चार बोटांची दैयत?

सईद बिन मुसैयिब : केवळ वीस उंट.

(कारण एका माणसाच्या प्राणाची दैयत 'शंभर उंट' आहे. स्त्रीची दैयत जेव्हा एक तृतियांशापेक्षा जास्त वाढेल तेव्हा त्यांच्याजवळ निम्मी होईल.)

रबिया : जेव्हा स्त्रीचे नुकसान जास्त होईल आणि तिच्या वेदना वाढतील तेव्हा दैयत कमी होईल काय?

सईद बिन मुसैयिब : तू इराक्चा रहिवाशी तर नाहीस, जो अक्कल लढवित आहे आणि इस्लामच्या केवळ मात्र नियमाच्या मुकाबल्यात 'कयास' लावित आहेस?

रबिया : नाही! मी एक विद्यार्थी आहे, विषयाचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न करतो.

सईद बिन मुसैयिब : हे बाळा! हेच सुन्नत (पैगंबरप्रणाली) आहे.[१]

---

१. संदर्भ : मौत्ता इमाम मालिक कीताबुल अकूल, बाब माजाफी अकलुल असाबेअ आदरणीय सईद बिन मुसैयिब ताबेई आहेत. त्यांचे हे कथन खंडीत आहे. कारण की या मध्ये एक साहबी (कथनकार) चा उल्लेख नाही, ज्यांच्या मार्फत त्यांनी हे ज्ञान मिळविले की 'दैयत' च्या बाबतीत हेच सुन्नत (प्रेषित पद्धती) आहे. इब्ने अब्दुल वर असे म्हणतात की धर्म पंडीतांची यावर सार्व सहमती आहे की, 'सईद बिन मुसैयिब यांचे खंडीत कथन इतरांच्या खंडीत कथना पेक्षा जास्त दमदार असते. काहींनी म्हटले की तपास पडताळ्या नंतर असे लक्षात येते की, अशा प्रकारच्या कथनांची सनद मिळते. संदर्भ : जरकावी शरेह मौत्ता : ४/३९ परंतु अडचण अशी की आदरणीय सईद बिन मुसैयिब यांनी यास सुन्नत कोणत्या अर्थी मान्य केले ? इमाम शाफई म्हणतात की, हे शक्य आहे की, हे कथन पैगंबर मुहम्मद (स.) यांचे मुखोद्गार असावे. जे कथन करण्यात आले. आणि याची पण शक्यता आहे त्यांच्या सामान्यत: सर्व विद्वानांचे असे मत असावे. सुरुवातीस माझे पण हेच मत होते. परंतु नतंर मी हे मत सोडून दिले आणि ईश-दरबारी प्रार्थना करीत होतो यासाठी की, कधी कधी लोक एक गोष्ट 'सुन्नत' ठरवितात. परंतु पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या तर्फे कोणताच पुरावा मिळत नाही. करिता या प्रश्नाबाबतीत हीच खरी पद्धत आहे की यावर 'कयांस' करण्यात यावे. (आणि इमाम शाफई नुसार मागील प्रमाणे की स्त्रिची दैयत कमी असो वा जास्त पुरुषाच्या दैयत ची निम्मी असेल.) राहिला प्रश्न आदरणीय जैद बिन साबित यांचे कथन तर यांच्या विरोधात आदरणीय अली (रजि.) यांचे कथन आहे. (दोन्ही वर उल्लेखलेले आहेत) ते पण असेच सिद्ध पूर्ण आहेत जसे हे आहेत. संदर्भ : बैहकी अस्सुननुल कुबरा : ८/९६ आणखीन सांगतात की इमाम मालिक सुद्धा यास सुन्नत ठरवित असे. या बाबतीत मी सुद्धा त्यांचे अनुकरण करीत असे. पंरतु माझ्या मनात 'सल' आवश्य होती. तरी पण असे नंतर लक्षात आले की 'सुन्नत' म्हणजे मदीना वासीयांची सुन्नत (मदीना वासीयांची पध्दत) आहे. व माझे समाधान झाले. अल-तलबीसुल हुबैर : २/३४०)

नंतरच्या काळातील विद्वानांपैकी इमाम शोकानी याच मताशी सहमत आहेत की एक तृतियांश दैयतनंतर स्त्रीची दैयत पुरुषाच्या दैयतपेक्षा निम्मी असेल. परंतु ते या हरकतीत काही दम असल्याचे मान्यसुद्धा करतात की अशा प्रकारे एक तृतियांश दय्यतीनंतर स्त्रीची दैयत अशा स्थितीत कमी होते जेव्हा बौद्धिक मागणी अशी आहे की तिला जास्त असायला पाहिजे. म्हणून त्यांच्या मतानुसार एक तृतियांश दैयतपर्यंत स्त्री आणि पुरुषाची दैयत एकच असेल. उदाहरणार्थ, ज्या ठिकाणी पुरुषाला दैयतमध्ये चाळीच उंट मिळतील तेथे स्त्रीची दैयत पस्तीस असेल. ते सांगतात की अब्दुल्लाह बिन उमर बिन आस (रजि.) यांचे जे कथन याविषयी सादर केले जाते ते अशा अर्थात घेण्यात हरकत नाही. राहिला प्रश्न हा की आदरणीय सईद बिन मुसैयिब (रजि.) यांचे कथन तर ते खंडित असल्याने स्वीकारणीय नाही. एवढेच नाही तर ते स्वत: हे स्पष्ट करतात की या हदीसचे अर्थ असे द्यावेत,

'जेणेकरून न्याय, बुद्धी आणि कयासमध्ये स्पष्ट पुराव्याशिवाय गुरफटून जाऊ नये!' (नीलुल अवतार : ७/२२६)

आणखी काही मतभेद

'दैयत'च्या बाबतीत आणखी भरपूर मतभेद आहेत. जे लोक यावर सहमत आहेत की एक तृतीयांश दैयतनंतर स्त्रीची दैयत निम्मी होते. यांच्या दरम्यान असे मतभेद आहेत की प्रत्येक व्यक्तीकरिता हा नियम आहे अथवा नाही? (१) एक तृतियांशपूर्वी स्त्री आणि पुरुषाची दैयत समान असेल. ज्या ठिकाणी ते एक तृतियांशावर पोहोचतील, दोघांची दैयत निम्मी होईल. (२) एक तृतियांशपर्यंत दोघांची दैयत समान असेल. एक तृतीयांश नंतर निम्मी होईल.

'इब्ने कदामा हम्बली' यांनी पहिल्या मतास प्राधान्य दिले. ते म्हणतात की कथन केलेले शब्द असे आहेत. (इथपावेतो की ते एक तृतियांशवर पोहोचावी) यावरून निदर्शनास येते की एक तृतियांशापेक्षा कमी असेपर्यंतच पुरुष व स्त्रीची दैयत समान असेल. (अलमुगनी : ७/७९७)

काही जण एक तृतियांश दैयतपर्यंतसुद्धा स्त्री व पुरुषाच्या दैयतमध्ये समानता असण्याच्या भूमिकेत आहेत. माननीय अब्दुल्लाह बिन मसऊद (रजि.) सांगतात की दाताची दैयत आणि 'मोजाह' (ज्या जखमेतून हाड दिसते) ची दैयत स्त्री व पुरुषांची समान असेल. यानंतर स्त्रीची दैयत पुरुषाच्या दैयतीच्या निम्मी असेल.

(बैहकी, अल सुनमुल कुबरा : ८/९६)

हदीसमध्ये आहे की दातांची 'दैयत' पाच उंट आहे. (निसाई, कसामा, अकलुस्सनान) आणि 'मोजाह'ची दैयतसुद्धा हीच आहे. (अबू दाऊद, तिर्मिजी, निसाई, कसामा, हनफी विधीतसुद्धा दैयतचे हेच प्रमाण आहे.) याचा अर्थ असा की केवळ पाच उंटापर्यंत स्त्री आणि पुरुषाच्या दैयतमध्ये कोणताच फरक नाही. यानंतर स्त्रीची दैयत निम्मी होईल. 'काझी शरीह' यांचेसुद्धा हेच मत आहे. एक मत असेसुद्धा आहे की पंधरा उंटापर्यंत दोघांची दैयत समान असेल. यानंतर निम्मी होईल. (काझी शूकानी म्हणतात की अर्थात या सर्व कथनांमागे कोणता पुरावा नाही.)
(नीलुल अवतार : ७/२२७)

जवळपास हेच मत नंतरच्या विद्‌वानांचे आढळतात. थोर विद्‌वान 'अब्दुर्रउफ मुनादी शफ्फई' सांगतात की स्त्रीच्या अवयवांची दैयत पुरुषांप्रमाणेच एक तृतियांश आहे. परंतु जेव्हा ती वाढून निम्म्यापर्यंत पोहचते, तेव्हा स्त्रीची 'दैयत' पुरुषाच्या दैयतपेक्षा निम्मी होईल. (अत्तय्य सीर बशरहुल जामें अल सगीर : २/१३३)

अगदी याचप्रमाणे 'मुहम्मद बिन अब्दुलहादी सिंधी' यांनी पण हेच म्हटले आहे जे हनफी पंथीय आहेत. (हाशीयतुल सिंदी अलन निसाई : २४७)

अशा प्रकारे सर्व सहमत विद्‌वानांची यावर तर सहमती आहे की स्त्रीची दैयत पुरुषाच्या दैयतीच्या निम्मी असेल. परंतु याच्या तपशीलात त्यांच्यामध्ये मतभेद आहेत. स्त्रीची प्रत्येक लहान मोठी दैयत पुरुषाच्या दैयतपेक्षा निम्मी असेल अथवा एक तृतियांशपेक्षा जास्त असेल अथवा एकूण दैयतच्या निम्मी झाल्यास त्याचीही निम्मी होईल? याखेरीज आणखीन खूप मतभेद आहेत. याचे कारण असे आहे की या बाबतीत दिव्य कुरआनात स्पष्ट आणि सडेतोड मार्गदर्शन नाही, जे हदीसचे मार्गदर्शन सुद्धा एवढे दमदार नाही की या आधारे अगदी अचूक निर्णय घेता येईल. याच कारणामुळे विधी तज्ञांच्या भूमिकेतसुद्धा मतभेद झाले आहेत. तरीसुद्धा त्यांच्या घेण्यात येणाऱ्या पूर्ण भूमिका निराधारसुद्धा नाहीत. यापैकी कोणा एकाच्या भूमिकेस प्राधान्य देण्यात येऊ शकते आणि त्या सर्वांना समोर ठेऊन या विषयावर सखोल अभ्यास करता येऊ शकतो.

एक विचारपात्र भूमिका

याविषयी एक आखणी भूमिका आपल्या समोर आहे. ही भूमिका 'असम' आणि कुरआनचे विश्लेषक 'इब्ने अनिया' यांची आहे. ते म्हणतात, स्त्री आणि पुरुष या दोघांची दैयत समान आहे. 'असम' हे या मताच्या समर्थनात दिव्य कुरआनची ही आयत सादर करतात.

या मतावर सर्वांची सहमती आहे की या आयतीमध्ये पुरुष आणि स्त्री दोन्हींच्या हत्येच्या बाबतीत समान उल्लेख आहे. त्याअर्थी त्यांची 'दैयत'सुद्धा एकच असावयास पाहिजे. (तफसीरे कबीर : ३/२९७)

थोर विद्वान 'रशीद रजा मिस्री' म्हणतात की कुरआनातील या आयतीनुसार कोणत्याच कायदेशीर बंधनाशिवाय याचा उल्लेखच नाही. कारण यातील वापरण्यात येणाऱ्या शब्दात सर्वसामान्यता व सार्वजनिकता आढळते. याची बौद्धिक मागणी अशी आहे की दैयतच्या ज्या प्रमाणावर मयताचे वारस राजी होतील तेच प्रमाण दुरुस्त समजले जाईल. मग ते प्रमाण कमी व अल्प असो की जास्त असो. परंतु 'सुन्नत'च्या नियमांनी यावर मर्यादा आखलेली आहे. यामध्ये ही परंपरा समोर ठेवण्यात येईल जी अरब समाजात प्रचलित होती. विधी तज्ज्ञांची यावर सहमती आहे की एका स्वतंत्र मुस्लिमाची, ज्यामध्ये एखादा असा अपराध नाही की कोणत्या हत्येची शास्त्रसंमत परवानगी असेल, त्याची 'दैयत' शंभर उंट अथवा तेवढी किंमत आहे आणि स्त्रीची दैयत यांच्या निम्मी आहे. यानंतर सांगतात,

या आयतीतून स्पष्ट तर असे होते की स्त्री व पुरुषाच्या दैयतमध्ये काहीच फरक नाही. (नफसीरुल मतार : ५/२३२-२३३)

यात शंका नाही की प्रसिद्ध विधी तज्ञांनी ही भूमिका व्यक्त केली नाही की स्त्री आणि पुरुष दोहोंची दैयत समान आहे. म्हणून हे मत अगदीच नगण्य लोकांचे आहे, असे वाटते. परंतु ही मात्र विचार करण्यासारखी बाब आहे. यावर अवश्य विचार व्हावा.

स्त्रीची साक्ष

इस्लामच्या साक्षविषयक कायद्यावर एक आक्षेप असासुद्धा घेण्यात येतो की यामध्ये दोन स्त्रियांची साक्ष एका पुरुषाच्या साक्षीसमान गृहीत धरली जाते. हा स्त्रीचा अपमान आणि तिच्याबरोबर असमानतेचे वर्तन व अन्याय आहे.

हे बरोबर आहे की इस्लामने बहुतेक विषयांत स्त्री व पुरुषाच्या साक्षीमध्ये फरक केला आहे. परंतु यास स्त्रीचा अपमान समजणे हाच एक प्रकारचा अन्याय आणि इस्लामविरोधी विचारसरणी आहे. हा फरक इस्लामने बळजबरी केलेला नसून स्त्रीस्वभाव, तिचे नैसर्गिक वर्तन व भावना वगैरेंवर आधारित आहे.

विषयास इस्लामच्या दृष्टिकोनानुसार थोड्या सविस्तर रितीने अभ्यासण्याची गरज आहे.

इस्लाम साक्षीचे तीन प्रकार आहेत.

'हुदुद' आणि 'किसास'मध्ये साक्ष

एखाद्या व्यक्तीस शिक्षा ठोठावणे अथवा 'किसास' घेण्याकरिता दोन पुरुषांची साक्ष अवश्य आहे. मात्र 'व्यभिचारा'च्या पुराव्यासाठी चार पुरुषांची साक्ष आवश्यक आहे. याशिवाय व्यभिचाराचा आरोप सिद्ध होणार नाही आणि शिक्षा होणार नाही. दिव्य कुरआनने व्यभिचाराच्या पुराव्यासाठी साक्षीदारांच्या संख्येचा उल्लेख या आयतीमध्ये केला आहे.

''जे लोक पवित्र चारित्र्याच्या स्त्रियांवर व्यभिचाराचे आळ घेतील आणि यावर जर त्यांनी चार पुरुष साक्षीदार दिले नाहीत, तर त्यांना ऐंशी फटके लावावे.'' *(दिव्य कुरआन, २४ : ४)*

या आयतीमध्ये (तुमच्यापैकी) 'चार पुरुष साक्षीदार'च्या शब्दा वरून स्पष्ट होत आहे की 'व्यभिचारा'च्या पुराव्याकरिता 'चार पुरुषांची' साक्ष आवश्यक आहे.[१]

---

१. येथे एक प्रश्न असा पडतो की 'हत्ये'सारख्या गुन्ह्यामध्ये केवळ दोन पुरुषांची साक्ष पुरेशी असताना व्यभिचाराच्या पुराव्याकरिता चार पुरुषांच्या साक्षींची काय गरज? उत्तर- इस्लाम हे पसंत करीत नाही की समाजात या निर्लज्ज वर्तनाची चर्चा व्हावी. जर कोणाच्या हातून हे कृष्ण कृत्य घडले तरी त्यावर पडदा टाकला जावा. व्यभिचारांची शिक्षा अशा अवस्थेत देण्यात येईल जेव्हा चार पुरुषांनी (ज्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे) साक्ष दिली असेल.

यांचा अर्थ असा आहे की शिक्षा आणि किसासमध्ये केवळ चार पुरुषांची साक्ष विश्वसनीय असेल, तसेच स्त्रियांची साक्ष मान्य करण्यात येणार नाही. प्रसिद्ध 'इमाम जहरी' यांचे कथन आहे की पैगंबर मुहम्मद (स.) आणि माननीय अबू बकर (रजि.) व माननीय उमर (रजि.) यांच्या काळात हाच कायदा लागू होता. ते सांगतात,

''पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांच्यानंतर दोन्ही खलीफा (अर्थात अबू बकर (रजि.) आणि उमर (रजि.) च्या काळापासून हीच पद्धत प्रचलित आहे की आणि किसासमध्ये स्त्रियांची साक्ष विश्वसनीय नसते.''

इस्लामने मानवाचे प्राण, संपत्ती आणि अब्रूच्या रक्षणासाठी व 'किसास'ची व्यवस्था केली आहे. कोणी कोणाची हत्या केल्यास 'किसास' मध्ये खुन्याची प्रतिहत्या करण्यात येते. अविवाहिताने व्यभिचार केल्यास त्याला शंभर कोडे मारण्यात येतात. हाच अपराध विवाहित व्यक्तीने केल्यास त्याला 'संगसार' (दगडाने वध) करण्यात येते. चोरीचा गुन्हा सिद्ध झाल्यास त्याचा हात कापण्यात येतो. खोटे आरोप लावणे व दारू पिणे यावरसुद्धा कडक शिक्षा देण्यात येते. ज्या अपराधांवर इस्लामने शिक्षा निश्चित केली अथवा किसासचा आदेश दिला, ते अपराध इतके घोर आहेत की हे अपराध घडल्यानंतर जिवंत राहूनही त्याची अब्रू धुळीस मिळालेली असते व त्याचा समाजात आदर होत नाही. या अपराधांच्या पुराव्यासाठी स्त्रियांची साक्ष मान्य न करण्याचे कारण त्यांचे प्रत्यक्षात हेच विशिष्ट स्वरूप आणि महत्त्व आहे. स्त्री मुळात घराची संचालिका आहे.

तिचा आपला एक स्वभाव व वैचारिक भावना आहे. आणि एका विशेष वातावरणात तिचे संगोपान आणि प्रशिक्षण झाले असते. अशा भयानक अपराधांच्या वातावरणाशी क्वचितच तिचा संबंध येतो. म्हणून या बाबतीत तिचा अनुभव व ज्ञान पुरुषापेक्षा कमीच असतो. मग आणखी हे की स्त्रीकरिता तिचा मृदू स्वभाव आणि तीव्र भावनामुळे व्यक्तिगत व सामूहिक हत्या, चोरी, दरोडा आणि बलात्कारासारख्या भयानक अपराधांचे निरीक्षण करणे. त्यांना पूर्णपणे पाहणे आणि अचूकरित्या त्याचे न्यायालयात वर्णन करणे काही सोपे नाही. याविषयी तिच्या वर्णनात्मक भाष्याचा न्यायालयास तेवढे समाधान मिळू शकणार नाही जेवढे पुरुषामुळे मिळते. तिच्या भाष्यात शंकाकुशंकेची संभावना असणार. इस्लामचा आदेश आहे की ठोस पुराव्याशिवाय निर्णय देण्यात येऊ नये आणि आरोपीस शक्य तेवढे वाचवण्याचा मार्ग काढण्यात यावा.

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले की, ''शक्य तेवढे मुस्लिमांची शिक्षा

कमी करा.'' (तिर्मिजी, अववाबुल हुदुर बाब माजा की दराऊल हुदुद)

हे कथन खंडित व अखंडपणे दोन्ही प्रकारे मिळाले आहे. 'इमाम तिर्मिजी' सांगतात की हे खरे आहे की हे कथन खंडित आहे.

आणखीन एका हदीसमध्ये आहे की जेथे शंका असेल तेथे शिक्षा देण्यात येणार नाही.

संदेह असल्यास शिक्षा टाळावी. (ही हदीस कमजोर आहे, परंतु जास्त संख्येत सनदशीर कथीत आहे करिता निषेधात्मक आहे. नीलुल अवतार : ७/२७२)

काही स्त्रिया अशा असू शकतात की त्यांचे निरीक्षणात्मक अनुभव हत्या, चोरी, दरोडा आणि बलात्कारासारख्या भयानक अवस्थेतसुद्धा विश्वसनीय ठरते. तसेच त्या न्यायालयासमोर अचूकपणे सादर करू शकतात. परंतु तिच्या मृदू स्वभावानुसार तिच्यात याची सहनशक्ती निश्चितच कमी असते. तेव्हा हे अगदी स्पष्ट आहे की निर्णय जेव्हा गुन्ह्याच्या स्वरूपानुरूप देण्यात येईल तेव्हा त्याच्या काही जणांना नव्हे तर मोठ्या संख्येत व्यक्तींना समोर ठेवण्यात येईल.

अधिकार आणि व्यवहारात साक्ष

शिक्षा आणि किसासव्यतिरिक्त इतर अधिकार आणि व्यवहारात स्त्रीची साक्ष स्वीकारण्यात येईल. याचे कारण हे की एकतर शिक्षा आणि किसासचे जे महत्त्व आहे ते दुसऱ्या इतर प्रकरणांना नाही. दुसरे हे की अधिकार व व्यवहारांचा संबंध दररोज उद्भवणाऱ्या प्रश्नांशी व अवस्थेशी आहे. स्त्रीचे कार्यक्षेत्र हे 'घर' असूनदेखील या प्रकरणांशी तिचा संबंध येत असतो. मात्र तिच्या विशिष्ट अवस्था आणि काही स्वभाविक दुर्बलतांच्या कारणास्तव दोन प्रकारे पावले उचलण्यात आली आहेत. प्रथम हे की ' दोन पुरुषांची साक्ष अथवा कमीतकमी एक पुरष व दोन स्त्रियांची साक्ष' असल्यावरच निर्णय द्यावा. एका पुरुषाच्या ठिकाणी दोन स्त्रिया ठेवण्याचे कारण दिव्य कुरआनने हे दिले की एखाद्या घटनेचा तपशील स्त्री विसरू शकते. एका स्त्रीने विसरल्यास दुसरी आठवण करून देईल. दिव्य कुरआनात आहे,

''आपल्या पुरुषांपैकी दोन साक्षीदार दोन पुरुष नसल्यास एक पुरुष व दोन स्त्रिया असाव्यात. यांपैकी जे तुम्हाला योग्य वाटेल की जेणेकरून यांच्यापैकी एक विसरल्यास दुसरा साक्षीदार त्यास आठवून देईल.''

(दिव्य कुरआन, २ : २८२)

आयतीवरून तर अशी शंका निर्माम होते की स्त्रियांची साक्ष केवळ अशाच

स्थितीत स्वीकारण्यात येईल ज्या ठिकाणी पुरूषच उपलब्ध नसेल. परंतु ही शंका बरोबर नाही. याचा अर्थ केवळ असा आहे की साक्षीमध्ये दोन पुरुष असावेत अथवा एक पुरुष आणि दोन स्त्रीचा असाव्यात. ज्या प्रकरणात स्त्रियांना 'साक्ष' देण्याचे अधिकार आहेत, त्यामध्ये पुरुष उपलब्ध असतानादेखील एक पुरुष आणि दोन स्त्रियांची साक्ष स्वीकारण्यास येईल.

या आयतीपासून हेसुद्धा सिद्ध करण्यात आले की स्त्रियांकडून वेगवेगळ्या साक्षी घेण्यात येणार नाहीत. याउलट साक्षीच्या वेळी दोघी एकत्रित असतील की जेणेकरून एखादी गोष्ट एक स्त्री विसरल्यास दुसरी आठवण करून देईल.

(फतहुल बारी : ५/१६९)

ही आयत कर्जाच्या नियमांच्या चर्चविषयी आलेली आहे. म्हणून सर्वसहमती असलेल्या विद्वानांची यावर सहमती आहे की कर्जाची देवाणघेवाण आणि आर्थिक व्यवहारात स्त्रीची साक्ष स्वीकारण्यात येईल. (ईजन : ५/१६८)

हनफी पंथामध्ये एक पुरुष आणि दोन स्त्रियांची साक्ष केवळ शिक्षा आणि किसासच्या बाबतीत स्वीकार करण्यात येणार नाही. याखेरीज व्यापार, कर्ज, आर्थिक व्यवहार, मालकी, विवाह, वकिली व समर्थन, तलाक व अंतिम सूचना, वारसा वगैरे पूर्ण अधिकार व प्रकरणात यांची साक्ष स्वीकारणीय आहे.

याची अशी पुष्टी करण्यात आली की साक्षीकरिता तीन गोष्टी आवश्यक आहेत. एक हे की घटनेचे अचूक निरीक्षण व अभ्यास असावे. दुसरे हे की ती घटना अचूक रीतीने स्मरणात असावी. तिसरे हे की त्यास जशास तसे वर्णन करण्यात यावे. दिव्य कुरआनने स्त्रीची ही कमजोरी वर्णन केली आहे की ती तपशील विसरू शकते व तिच्या या विसराळू स्वभावाची भरपाई एका पुरुषाच्या जागी दोन स्त्रियांनी करण्यात आली आहे. म्हणून शिक्षेचा निवाडा आणि किसासव्यतिरिक्त इतर प्रकरणात तिची साक्ष स्वीकारण्यात यावी.

येथे एक प्रश्न असा विचारला जाऊ शकतो की दोन स्त्रियांची साक्ष एका पुरुषासमान असल्यास ज्या प्रकरणांचा न्यायनिवाडा दोन पुरुषांच्या साक्षीवर होतो, तेव्हा चार स्त्रियांच्या साक्षीवर का होऊ नये. याचे उत्तर विधीतज्ञांनी असे दिले की बौद्धिकरित्या ही बाब अगदी बरोबर आहे. परंतु यास शास्त्रसमंत ठरविल्यास स्त्रियांची घराबाहेर निघणे व ये-जा करण्याचे प्रमाण खूप वाढेल आणि शरीयत हेतू असा आहे की त्यांनी आपले कार्यक्षेत्र (घर) सोडून जास्त बाहेर निघू नये. (हिदाया : ३/१५४ मआ शरुरल हिदाया) तसेच यामुळे जे बिघाड निर्माण होतील ते खूप भीषण आहेत.

स्त्रियांच्या विशिष्ट प्रकरणात साक्ष

विधी तज्ञांची यावर सहमती आहे की जी प्रकरणे केवळ स्त्रियांच्या विशिष्ट प्रश्नांशी निगडीत आहेत. यामध्ये केवळ स्त्रियांचीच साक्ष पुरेशी आहे. उदाहरणार्थ, जन्माच्या वेळी मूल जिवंत असण्याची साक्ष, कारण मुलगा जिवंत जन्मल्यास वा मृत जन्मल्यास त्याच्या जनाज्याची नमाज पढण्यात येईल आणि त्याच्याविषयी विरासतचे नियम पाळले जातील अन्यथा नाही. अथवा एखादी मुलगी व स्त्री वयात आलेली आहे किंवा नाही, किशोरी आहे किंवा नाही, तसेच स्त्रियांचे विशेष लैंगिक रोग व दुर्बलता वगैरेची साक्ष या सर्व बाबींचा कधी कधी विवाह आणि याशी संबंधित प्रकरणांवर प्रभाव पडतो. (काही ठिकाणी विधी तज्ञांत मतभेद आहेत. येथे त्याची चर्चा केली नाही.)

या बाबतीत इमाम जहरी यांची भूमिका अशी आहे,

''सुन्नत (पैगंबरपद्धती) ही आहे की (केवळ) स्त्रियांची साक्ष या प्रकरणात धर्मसंमत आहे की ज्यामध्ये त्यांच्याखेरीज दुसऱ्या कुणालाही त्याची माहिती नसते. अर्थात मूल जन्मतेवेळी त्यांची स्थिती आणि त्यांचे बिघाड वगैरेंबाबतची माहिती.''

माननीय अब्दुल्लाह बिन उमर (रजि.), सईद बिनुल मुसैयिब (रजि.) आणि उरवा बिन जुबैर (रजि.) यांच्या कथनांवरून याची पुष्टी होते.

माननीय अली (रजि.) यांच्या बाबतीत येते की त्यांनी एका 'दाया' (बाळंतिणीची शुश्रुशा करणारी) च्या साक्षीवर निर्णय दिला. माननीय उमर (रजि.) यांनीदेखील एका 'दाया'च्या साक्षीवर मान्य केले की मूल जिवंत जन्मले होते.

(अद्दराया फी तखरीज अहादीसुल हिदाया : पृ. २९५)

विधीतज्ञांमध्ये या बाबतीत मतभेद आहेत की स्त्रियांच्या विशिष्ट प्रश्नांत किती स्त्रियांची साक्ष असावी. सामान्यत: याकरिता चार स्त्रियांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. इमाम मालिक आणि इमाम अबी लैला म्हणतात की यामध्ये दोन स्त्रियांच्या साक्षीवर निर्णय देण्यात येईल. इमाम सूरी आणि हनफी पंथीयांजवळ केवळ एका स्त्रीची साक्ष पुरेशी आहे. (फतहुलबारी : ५/१६८, १६९)

हनफी पंथीयांनी याचे दोन पुरावे दिलेत. एक हे की वरील कथनात स्त्रियांच्या संख्येची अट ठेवण्यात आली नाही. म्हणून एका स्त्रीची साक्षसुद्धा पुरेशी असायला पाहिजे. दुसरा पुरावा हा देण्यात आला की स्त्रियांच्या विशिष्ट प्रश्नांत केवळ त्यांचीच

साक्ष यासाठी पुरेशी समजण्यात आली, तसेच पुरुषाची साक्ष आवश्यक ठरविण्यात आली नाही की एखाद्या स्त्रीच्या गुप्त अवयवांना दुसऱ्या स्त्रीच्या पाहण्यात जेवढे वाईट आहे त्यापेक्षा जास्त वाईट पुरुषाच्या पाहण्यात आहे. या आधारावर म्हणता येऊ शकते की एका स्त्रीच्या तुलनेत एकापेक्षा जास्त स्त्रियांच्या तपासणी करण्यात जास्त बिघाड आहे. परंतु याबरोबरच यामध्येच काळजीपूर्वकता दाखविण्यात आली आहे की एकापेक्षा जास्त स्त्रियांची साक्ष असावी. (हिदाया : ३/१५४)

प्रकरण –१६

स्त्री आणि राजकीय नेतृत्व

स्त्री ही इस्लामी राज्याची प्रशासक होऊ शकत नाही!

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

''ते राष्ट्र अजिबात यशस्वी होऊ शकत नाही ज्याने आपले व्यवहार (व जबाबदाऱ्या) कोण्या 'स्त्री'च्या स्वाधीन केले.''

(बुखारी किताबुल मगाजी, बाब किताबुल नबी इला किसरा व कैसर, तिर्मिजी, अबवाबुल फितन)

यापासून ही शास्त्रसिद्धता घेतली गेली आणि हे अगदी खरे आहे की स्त्री इस्लामी राज्याची प्रशासक होऊ शकत नाही. कारण जे प्रयत्न कोण्या राष्ट्राकरिता यशस्वितेचे सबब व कारण नसून त्यास विघटण आणि तोट्याकडे घेऊन जाणारे असतील त्यापासून दूर राहिलेले बरे.

नमाजच्या 'इमामत' वरून घेण्यात येणारा पुरावा व सिद्धान्त

याचे समर्थन आणखी एका पैलूने होते. 'इमामत-ए-कुबरा' (महान नेतृत्व) ला इमामत-ए-सुगरा (लहान नेतृत्व) म्हणजे नमाजच्या 'इमामत' (नेतृत्व) नुसार अर्थ घेण्यात आला आहे. पैगंबर मुहम्मद (स.) यांनी आजारपणाच्या वेळी नमाजच्या 'इमामत'साठी सोबत्यांपैकी माननीय अबू बकर (रजि.) यांना पुढे केले होते. यामुळे असे मानण्यात आले की ते 'इमामत-ए-कुबरा'स सुद्धा पात्र आहेत व नंतर या गोष्टीवर सर्वांची सहमती झाली.

सर्वसहमत विद्वानांची यावर भूमिका अशी आहे की स्त्री नमाजमध्ये पुरुषांची 'इमामत' करू शकत नाही. (इमाम शाफई यांच्याजवळ केवळ स्त्रियांच्या नमाजची इमामत स्त्री करू शकते.) अबू सूर आणि तिबरी यांनी इमामत अगदी धर्मसंमत ठरविले आहे. याचा अर्थ असा की ती पुरुषांची इमामतसुद्धा करू शकते. परंतु जसे की इब्ने रशद यांनी लिहिले की हे एक अतिनगण्य मत आहे.

(हिदायतुल मुज्तहिद : १/१४८-१४९)

याचा नेमका अर्थ असा की 'इमामत-ए-कुबरा'साठी स्त्री उत्तम प्रकारे योग्य नाही.

हा स्त्रीबरोबर पक्षपातीपणा आहे काय?

असाही आरोप लावला जातो की याबाबत स्त्रीबरोबर पक्षपाती धोरणाचा अवलंब केला आहे आणि एक प्रकारे तिला सामूहिक जीवनापासून बेदखल करण्यात आले आहे.

इस्लाममध्ये राष्ट्रप्रमुखाच्या जबाबदाऱ्या

येथे ही बाब दृष्टीसमोर असायला हवी की इस्लाममध्ये राष्ट्रप्रमुखाचा दर्जा हा ब्रिटेनच्या राष्ट्रप्रमुखाप्रमाणे केवळ वैधानिक प्रमुखाचा नसून तोच मुळात राष्ट्रीय व्यवहारास पूर्णपणे जबाबदार असतो. कारण पैगंबर मुहम्मद (स.) यांनी सांगितले,

''इमाम (नेता) जो लोकांचा प्रमुख आहे, तो 'राई' (देखभाल करणारा) आहे. (निवाड्याच्या दिवशी ईशदरबारी) रयतेच्या (देखभालीच्या) बाबतीत त्याची विचारपूस होईल.'' (बुखारी किताबुल, आअसाम, बाब कुलुलह्नाह व आतियु)

इस्लामी विद्वानांनी लिहिले आहे की इस्लामी राष्ट्राकरिता प्रमुख असणे यासाठी आवश्यक आहे की त्याने शरीयतचे आदेश लागू करावे, ईशमर्यादा प्रस्थापित कराव्यात, आर्थिक संयोजन करावे, बंड आणि अरेरावी थांबवावी, प्रत्येक स्थितीत न्याय प्रस्थापित करावा, गरीब व अनाथांचे प्रश्न सोडवावेत वगैरे.

एवढी मोठी जबाबदारी उचलण्यासाठी ते म्हणतात की अशी व्यक्ती विवेकशील आणि प्रशासकीय बुद्धिमान, महाप्रतापी, शूर-वीर, जबरदस्त इच्छाशक्ती असलेली असावी. तसेच ज्ञान, ईशपरायणता आणि प्रशासकीय कौशल्य असलेली निर्भय असावी. ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे की एकाच वेळी हे सर्व कौशल्य व वैशिष्ट्ये पुरुषात क्वचितच आढळतात आणि स्त्रीमध्ये तर आणखीच कठीण.

राष्ट्रप्रमुख अथवा इमाम (नेता) साठी हेसुद्धा आवश्यक आहे की त्याने सर्वसामान्य जनतेप्रमाणे सामान्य जीवन जगावे. जुमा व ईदची नमाज त्यानेच पढवावी आणि 'हज'चे नेतृत्व करावे. या सर्व गोष्टींचा उद्देश असा आहे की सामान्य जनतेशी त्याचा नेहमी संपर्क असावा. जनतेने विनासायास त्यास भेटावे आणि त्याने स्वत:हूनदेखील त्यांच्या परिस्थितीची जाणीव ठेवावी.

(शरेहुल अकायद नसफी - पृ. ११३-११४)

स्त्री या जबाबदाऱ्या सांभाळू शकत नाही

स्त्रीकरिता इस्लामी सामाजिक मर्यादांचे पालन करून अशा प्रकारचे सार्वजनिक जीवन जगणे शक्य नाही. वस्तुस्थिती अशी आहे की स्त्री आपली शक्ती व कौशल्य कामकाज, विचारशैली, मानसिकता, भावना व जाणिवांसहित कोणत्याच पैलूने राष्ट्रप्रमुखाची जबाबदारी उचलू शकत नाही.

स्त्री इतर सामूहिक जबाबदाऱ्या सांभाळण्यास पात्र आहे काय?

येथे ही गोष्ट लक्षात असली पाहिजे की चर्चेचा संबंध राज्याचे प्रशासन आणि 'इमामत-ए-कुबरा'शी आहे. यापेक्षा कमी दर्जाच्या सामूहिक जबाबदाऱ्या तिला सोपविल्या जाऊ शकतात की नाही? याबाबत विधी तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत. हनफी पंथानुसार शिक्षा आणि किसासखेरीज इतर बाबतीत तिला काझी (न्यायधीश) बनविले जाऊ शकते. 'हिदाया' या विधीग्रंथात आहे,

''शिक्षा आणि किसासव्यतिरिक्त इतर प्रकरणांत निर्णय देणे हे स्त्रीकरिता धर्मसमंत आहे.'' (हिदाया : ३/१४०)

याचप्रमाणे तिला 'वक्फ' प्रॉपर्टीची प्रमुख आणि अनाथांच्या उद्धारकार्याची प्रमुख बनविली जाऊ शकते.'' (दुरुल मुख्तार मआ रद्दुल मुख्तार : ४/४९४)

या सखोल वर्णनावर एखाद्याने सारासार विवेकबुद्धीने नम्रतापूर्वक विचार केल्यास त्याला निश्चितच मान्य करावे लागेल की इस्लामने स्त्रीबरोबर कोणतेच पक्षपाती धोरण अवलंबिलेले नाही व कोणताच अन्याय केलेला नाही. याउलट तिच्यावर केवळ एवढ्याच जबाबदाऱ्या टाकण्यात आल्या ज्या ती सहजतेने पार पाडू शकते. तिच्या ऐपती व शक्तीबाहेर असलेल्या जबाबदाऱ्यांतून तिला मुक्त करण्यात आले. हा अन्याय नसून केवळ न्याय आहे!

संदर्भ

पुस्तकामध्ये जेथे दिव्य कुरआनच्या आयतींचा संदर्भ घेण्यात आला आहे, त्याबरोबरच 'सूरह'चा व 'आयती'चा क्रमांक देण्यात आला आहे. कुरआन व्यतिरिक्त ज्या ग्रंथाच्या संदर्भांचा वापर करण्यात आला त्यांचा संदर्भ कंसात दिला आहेच. तसेच स्पष्टीकरणाच्या वाढीच्या भयास्तव ग्रंथाचे संक्षिप्त नाव, त्याचा खंड क्रमांक आणि पृष्ठाच्या संदर्भापर्यंतच सूचना देण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी ग्रंथाच्या नावासहित ग्रंथकाराच्या नावाचा उल्लेखदेखील आहे. येथे विषयानुरूप ग्रंथांच्या लेखकांची पूर्ण नावे, त्यांच्या मृत्यूच्या तारखा, पुस्तकाच्या दृष्टिकोनानुसार ग्रंथाचे मुद्रण व प्रकाशनाची सविस्तर माहिती देण्यात येत आहे, जेणेकरून अध्ययन सोपे व्हावे.

पुस्तकाच्या पुनरावृत्तीच्या काळात काही पुस्तकांच्या नवीन आवृत्या उपलब्ध होत्या. त्यांचे संदर्भ आवश्यक ठिकाणी कंसात सविस्तर देण्यात आले आहेत. 'हदीस' (पैगंबर वचन व कार्य) च्या ज्या ग्रंथांच्या सदर्भांचे स्पष्टीकरण देण्यात आले आहेत, त्यांच्या मुद्रकांचा उल्लेख करण्याची गरज भासली नाही.

कुरआनच्या 'तफसीरी' (कुरआनचे वर्णनग्रंथ)

१) इब्ने जरीर (जामेऊल बयान फी तफ्सीरुल कुरआन) : अबू जाफर मुहम्मद बिन जरीऊल तिब्री. मृत्यू ३१० हिजरी सन; मुद्रक : अल-मुनबाअतुल मैमनिया.

२) इब्ने कसीर (तफ्सीरुल कुरआनुल अजीम) : इमादुद्दीन इस्माईल मृत्यू - ७७४ हिजरी सन; मुद्रक : मतबआ मुस्तफा मुहम्मद - इजिप्त. १३५६ हिजरी सन

३) अहकामुल - कुरआन : अबू बकर अहमद अली युर्राजी युल जस्सासुल - हनफी - मृत्यू - ३७० हिजरी सन; मुद्रक : मतबअतल बहीया, इजिप्त - १३४७ हिजरी सन.

४) अहकामुल कुरआन : इब्ने अरबी मालिकी, मृत्यू - ५४२ हिजरी - सन; मुद्रक : अलसाअदत - इजिप्त १३३१ हिजरी सन.

५) बैजावी (अनवारुल तन्जील वल इसरारुल तावील) : काझी नासेरुद्दीनुल बैजावी. मृत्यू ६८५ हिजरी. मुद्रक : अहमद. दिल्ली - १२६८ हिजरी सन.

६) तफसीरात-ए-अहमदिया फी बयानुल आयातुश्शरीया मआ तफरीआतुल मसायलुल फिकीया : अररोख अहमदुल मदऊ बमला जीवन - मृत्यू १७१७ इसवी सन मुद्रक : जय्यद बरकी प्रेस, दिल्ली १३४९ हिजरी सन.

७) तफसीर-ए-कदीर (मफातीहुल गैब) : फखरुद्दीन उमर रजी. मृत्यू - ६७४ हिजरी सन - मुद्रक : अल मतबअल आमेरा अलशर्फिया इजिप्त, १३०८ हिजरी सन.

८) अल सिराजुल मुनीर फिल आलिया अली मआरिफत बआज मानी कलाम रब्बनल हकीमुल खबीर : मुहम्मदुल शरबीनी युल खतीब. मृत्यू - ९७७ हिजरी सन; मुद्रक : मुन्शी नवल किशोर, लखनौ.

९) अल-करशाफ अन हकायकुल तनजील व उयूनुल धकावील फी वुजूहत्तावील : अबुल कासिम जारल्लाह महमूद बिन उमर अल - जफखश्री - मृत्यू ५३८ हिजरी सन; मुद्रक : अल्लैसी कोलकाता - १२७६ हिजरी सन.

१०) मआलिमुत्तनजील : अबू मुहम्मदुल हुसैन बिल मसऊदुल फरा अल बग्वी - मृत्यू ५१६ हिजरी, तफसीर खाजिन सह मुद्रित झाली आहे. मुद्रक : मतबा अल तकद्दमुल इलमिया - इजिप्त. १३४९ हिजरी सन.

११) अल-मनार (तफसीरुल कुरआनुल हकीम) : सय्यद मुहम्मद रशीद रजा, मृत्यू : १९३५ इ.स.; मुद्रक : अल मनार-इजिप्त १३६५ हिजरी सन.

हदीस ग्रंथ

१२) अल तल्खीसुल हुबैर फी तखरीज अहादीसु राफई उल कबीर : शहाबुद्दीन अहमद बिन अली बिन हजरुल अस्कलानी - मृत्यू ८५२ हिजरी. मुद्रक : मतबाऊल अंसारी, दिल्ली - १३०७ हिजरी सन.

१३) जामे तिर्मिजी : अबू ईसा मुहम्मद बिन ईशा तिर्मिजी, मृत्यू २७९ हि.स.

१४) अल जौहरुलनकी अलल सुबनुल कुबरा : अल बैहकी - अलाउदीन बिन अली बिन उस्मानुल मआरदीनी उश्शहीर बाबीनुल तुर्कमानी - मृत्यू ७४९ हि.स. अस्सननुल कुबरा, बैहकी (क्र.२०) सह मुद्रित झाली आहे.

१५) अशरिया फी तखरीज अहादिसुल हिदाया : शहाबुद्दीन अहमद बिन अली बिन हजरुल अस्कलानी-मृत्यू ७५२ हि.स.; मुद्रक :: मेहबूबुत्ताबेअ १३५० हि.स.

१६) सुनन निसाई : अबू अब्दुर्रहमान अहमद बिन शुऐब बिन अली निसाई - मृत्यू ३०३ हि.स.

१७) सुनन इब्ने माजा : अबू अब्दुल्लाह मुहम्मद बिन यजीद बिन अब्दुल्लाह बिन माजा उल. कझवीनी; मृत्यू ३७३ हि.स.

१८) सुबन दारमी : अबू अब्दुल्लाहुद्दारमी - मृत्यू २५५ हि.स.

१९) सुननदार कुतनी : अली बिन उमर दारे कुतनी; मृत्यू ३८५ हि.स. मुद्रक : मतबआ फारुकी; दिल्ली - १३१० हि.स.

२०) सुनन बैहकी (अस्सननुल कुबरा) : अबू बकर अहमद बिनुल - हुसैन बिन अलीयुल बैहकी - मृत्यू ४५८ हि.स.

२१) सुनन अबू दाऊद : अबू दाऊद सुलैमान बिन अशा असुल जर्स्ताना; मृत्यू २७९ हि.स.

२२) सहीह-बुखारी (जामेऊस्सहीह) : मुहम्मद बिन इस्माईल - बुखारी; मृत्यू २५६ हि.स.

२३) सहीह-मुस्लिम : अबू मुस्लिम बिनुल हिज्जाज; मृत्यू २६१ हि.स.

२४) मुअत्ता-अ-इमाम मालिक : मालिक बिन अनस बिन मालिक; मृत्यू १७९ हि.स.

२५) मस्नद अहमद : अहमद बिन हम्बलु रशैबानी; मृत्यू २४१ हि.स. मुद्रक : अल मतबआतुल मौमिनिया-इजिप्त १३१३ हि.स.

२६) मिश्कातुल मसाबेह : वलीयुद्दीन मुहम्मद बिन अब्दुल्लाहुल खतीबुल - तबरेजी; मृत्यू ७३७ हि.स. अथवा यानंतर.

शुरुह-हदीस

२७) तोहफतुल आहुजी : मौलाना अब्दुर्रहमान बिन अब्दुर्रहीम बिन मुबारकपुरी; मृत्यू १३५३ हि.स., मुद्रक : जय्यद बरकी प्रेस दिल्ली - १३४६ हि.स.

२८) अल-तालीफुल मुग्नी अली सुनन दारकुतनी : मौलाना शम्सुल हक अजीमाबादी मृत्यू १३२७ हि.स. दारे कुतनी बरोबरच मुद्रित झाली. मुद्रक फारुकी, दिल्ली.

२९) अल-तयुर-सीर बशरहुल जामेउस्सगीर : अब्दुर्रऊफुल मुनादी मृत्यू १०३१ हि.स. दारुल मतबाअतुल आमेरा-इजिप्त १२८२ हि.स.

३०) हाशीयाउस्सनदी अलन निसाई : अल्लामा अबुल हसन मुहम्मद बिन अब्दुल हादी; मृत्यू ११३८ हि.स. निसाई मतबूआ मुजतबाई दिल्ली.

३१) शरहुल जरकानी अलीउल मुअत्ता : मुहम्मद बिन अब्दुल बाकी बिन यूसुफ बिन अहमद शहाबुद्दीनुल जरकानी; मृत्यू १६८ हि.स. मुद्रक : मतबुआ - खैरिया - इजिप्त १३०१ हि.स.

३२) शरह मआनिऊल आसार : अहमद बिन सुलैमानुल अजदी उत्तहावी - मृत्यू ३२१ हि.स.

३३) शरह मआनिरुल आसार : मुहीयुद्दीन अबू कडरीयाउल नूदी, मृत्यु ६७६ हि.स. मुद्रक : असाहुल मुआबेअ १३४९ हि.स.

३४) फतहुलबारी : शहाबुद्दीन अबुल फजल अहमद बिन अली बिन - हजर - मृत्यू ८५२ हि.स. मुद्रक : मतबाउल खैरिया, इजिप्त १३२९ हि.स.

३५) फैजुलबारी अला सहीहुल बुखारी : अनवर शाह कश्मीरी; मृत्यू १३५२ हि.स. मुद्रक : मतबआ हिज्जाजी; कैरो - इजिप्त १३५७ हि.स.

३६) मआलिमुस्सनुन : अबू सुलैमान अहमद बिन मुहम्पदूल खत्ताबी; मृत्यू ३८७ हि.स. मुद्रक : मतबूमल इल्मीया हलब १९५१ हि.स.

फिक्ह व फतावा

३७) अल फसाह अन अआनिउस् सिहाह : अलवजीर ऊनुद्दीन अबुल मुजफ्फर यहया बिन मुहम्मद बिन हबीरहुल हम्बली; मृत्यू ५६० हि.स. मुद्रक : मुताबेअुर्रज्जबी, कैरो; इजिप्त.

३८) एअलामुल मौकिईन अन रब्बुल आलमीन : शम्सुद्दीन अबू अब्दुल्लाह मुहम्मद बिन अबू बकर उर्फ इब्ने कय्यीम जौजी मृत्यू ७५१ हि.स. मुद्रक : इदारतुलबाअतुल मुनारीया, इजिप्त.

३९) बदायतुल मुज्तहिद वलनहायतुल मक्तसद : काझी अबुल वहीद मुहम्मद बिन अहमद बिन रश्दुल कर्तबी; मृत्यू ५९५ हि.स. इजिप्त १९६६ इ.स.

४०) हाशीयस्सावी अल्ल शरहुस्सगीर : अहमद बिन मुहम्मदुस्सावी मृत्यू १२४१ हि.स. अश्शरहुस्सगीर (क्र. ४३).

४१) अद्दुरुल मुख्तार शरह तनवीरुल अन्सार : मुहम्मद - अलाउछीतुल हनफी मृत्यू १०८८ हि.स. रछुल मुख्तार (क्र. ४३) सह.

४२) रछुल मुख्तार अलल दुररुल मुख्तार : मुहम्मद अमीन इब्ने आबेदीन मृत्यू १८३६ ई.स. मुद्रक : उस्मानिया - इजिप्त १३२७ हि.स.

४३) अश्शरहुसगीर अला अकरबुल मसालिक रला मजहब : इमाम मालिक अहमद बिन मुहम्मद दरदीर; मृत्यू १७८६ हि.स. मुद्रक : दारुल मआरुफ इजिप्त हि.स. १३७२.

४४) शरेह निकाया मआ हाशिया उम्दतुर रिआया : उबैदुल्ला बिन मसऊद बिन ताजुश्शरीया) मृत्यू - ७४७ हि.स. मुद्रक : कुसूम कानपूर १९१६ इ.स.

४५) अल इनाया (शरहुल हिदाया) : अकमलुद्दीन मुहम्मद बिन मेहमूदुल बाबरती. मृत्यु १३८४ ई.स. फनहुल कदीर विशेषांक (क्र. ४६) सह.

४६) फतहुल कदीरुल अजीजुल फकीर (शरहुल हिदाया) : कमालुद्दीन मुहम्मद बिन अब्दुल वाहिद उर्फ इब्नुल हम्मामुल हनफी; मृत्यू ६८१ हि.स. मुद्रक : अलमतबआउलकुबरा उल अमीरिया, इजिप्त १३१५ हि.स.

४७) अल किफाया अललहिदाया (शरहुल हिदाया) : जलालुद्दीन खवारजमी कलकत्ता १८३३ इ.स.

४८) अल मुग्नी अलल मुख्तेसर अललकासिमुल खरकी : अबू मुहम्मद अब्दुल्लाह बिन अहमद बिन कदामुल मुकद्दमी; मृत्यू ६२० हि.स. मुद्रक : मक्तबा रियाझुल हदीसा - १९८१ इ.स.

४९) मजमुआ फनावा शेखुल इस्लाम अहमद बिन तैमिया : संपादक - अब्दुर्रहमान - बिन मुहम्मद बिन कासिम - मुद्रन : दारुल अरेबिया, लेबनान १३९८ हि.स.

५०) अल महला : अबू मुहम्मद अली बिन अहमद बिन हजम; मृत्यू ४५८ हि.स. मुद्रक : इदारतुल तबाअतुल मुनीरीया; इजिप्त - १३५२ हि.स.

५१) अल - हिदाया (शरह - द्वायतुल मुब्ददी) : बुरहानुद्दीन अली बिन अबीबकरुल मुर्गीयानी; मृत्यू ५९३ हि.स. मुद्रक : मुजतबाई; दिल्ली १९३१ इ.स.

अकाइद (श्रद्धांच्या नियमांचे ग्रंथ)

५२) शरद अकायद नसफी : सआदुद्दीनुत्तफताजानी; मृत्यू ७९२; मुद्रक : रशीदिया - दिल्ली.

५३) अद्दारुल नसीर अला हामिशुन्नहाया : जलालुद्दीन अब्दुर्रहमान बिन अबू बकर सुयूती; मृत्यू ९११ हि.स. अलनहाया (विशेषांक ५७) सह.

५४) अलनकामुसुल मुहीस : मुजद्दिद्दीन मुहम्मद बिन याकूबुल फेरोजाबादी, मृत्यू ८१७ हि.स. मुद्रक : नवल किशोर; लखनौ.

५५) लिसानुल अरब : अबुल फजल जमालुद्दीन मुहम्मद बिन मुकर्रम इब्ने मंजूरुल मिस्त्री ७११ हि.स. मुद्रक : दार सादिर दारबैरुत; १३६७ हि.स.

५६) अल मुफर्रिदात फी गरीबुल कुरआन : अबुल कासिमुल हुसैन बिन मुहम्मद उर्फ बिरागिबुल अस्कहानी; मृत्यू ५०२ हि.स. मुद्रक : अल अतबआतल मैमीनिया, इजिप्त - १३२४ हि.स.

५७) अल-जहाया फी गरीबिल हदीस वल असर : इब्नुल असीरुल जजरी; मृत्यू ६६६ हि.स. मुद्रक : अलमतबआतल मैमीनिया - इजिप्त १३११ हि.स.

उर्दू पुस्तके व मासिके

५८) मासिक 'बुरहान', दिल्ली.

५९) त्रैमासिक 'तहकीकात-ए-इस्लामी', अलीगढ.

६०) साप्ताहिक 'दाअ्वत', मुस्लिम पर्सनल लॉ विशेषांक, दिल्ली.

६१) मासिक 'जिंदगी', रामपूर.

६२) 'औरत इस्लामी मआशरे में', सय्यद जलालुद्दीन उमरी, मर्कजी मक्तबा इस्लामी, दिल्ली.

६३) 'औरत और इस्लाम', सय्यद जलालुद्दीन उमरी, मर्कजी मक्तबा इस्लामी, दिल्ली.

६४) मासिक 'अल फुरकान', लखनौ.

६५) कौमी आवाज', नवी दिल्ली.

शब्दसूचिका

(स.)	:	सल्लल्लाहु अलैहिसलम (त्यांच्यावर अल्लाहची शांती असो) हे शब्द अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) करिता वापरण्यात येतात.
(रजि.)	:	रजिअल्लाहु अनहू (अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न होवो) हे शब्द पैगंबरांच्या सोबत्यांकरिता वापरला जातो.
(रह.)	:	रहमतुल्लाह अलैह (अल्लाहची त्यांच्यावर कृपा असो)
सुन्नत	:	पैगंबर मुहम्मद (स.) यांची कार्यपद्धती अथवा जीवनप्रणाली संमत कार्य, पैगंबरप्रणाली.
मसनून	:	पैगंबर संमत कार्य.
वाजिब	:	अनिवार्य.
अंसार	:	सहकार्य करणारे, अर्थात मदीनावासीयांचे विशेषण.
दिव्य कुरआन	:	अर्थात ईशग्रंथ, जो अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरित झाला.
हदीस	:	पैगंबर मुहममद (स.) यांची कथने व वचने अथवा कार्य व कर्म.
सहाबी	:	पैगंबर मुहम्मद (स.) यांचे सोबती.
सहाबा	:	सहाबीचे अनेकवचन.
ताबई	:	साहबींचे सोबती.
ताबेईन	:	ताबईचे अनेकवचन.